# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

**सत्र-५ पेपर ८** DSE - E 72

# विकासाचे अर्थशास्त्र

(Economics of Development)

**सत्र-६ पेपर १३** DSE - E 197

# नियोजनाचे अर्थशास्त्र

(Economics of Planning)

**बी. ए. भाग-३ : अर्थशास्त्र**

(शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२२
बी. ए. (विकासाचे अर्थशास्त्र/नियोजनाचे अर्थशास्त्र) भाग - ३ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ३००**

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-92887-56-7

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सल्लागार समिती


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) आर. जी. कुलकर्णी**
प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**■ अभ्यासमंडळ : अर्थशास्त्र ■**

अध्यक्ष – **डॉ. अनिलकुमार कृष्णराव वावरे**
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

- **प्रा. डॉ. डी. सी. तळुले**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती विद्या कट्टी**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. संतोषकुमार बबनराव यादव**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. बाळासो पांडुरंग पाटील**
  यशवंतराव चव्हाण कॉलेज, इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. नेताजी व्ही. पोवार**
  कमला कॉलेज, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. निवास जाधव**
  राजा शिव छत्रपती आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज,
  महागांव, जि. कोल्हापूर
- **डॉ. एस. एम. भोसले**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **प्रा. डॉ. जे. एफ. पाटील**
  अक्षय, बी–६, तारा टेसेसेस, एस.एस.सी. बोर्ड रोड,
  सम्राट नगर, कोल्हापूर
- **डॉ. विजय भिमाप्पा देसाई**
  राजर्षी शाहू आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, रुकडी
  जि. कोल्हापूर
- **डॉ. विजयकुमार आप्पासाहेब पाटील**
  आर्टस अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, आटपाटी,
  जि. सांगली
- **प्रा. डॉ. सिद्धाप्पा टिप्पान्ना बागलकोटे**
  डिपार्टमेंट ऑफ स्टडीज इन इकॉनॉमिक्स,
  कर्नाटक विद्यापीठ, धारवाड (कर्नाटक राज्य)
- **डॉ. राहूल शंकरराव म्होपरे**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर
- **श्री. सुर्यकांत बाबूराव पाटील–बुद्धिहाळकर**
  सागर, २१०३/७+८, ई वॉर्ड, रुक्मीनीनगर, कोल्हापूर
- **डॉ. संजय शंकरराव रुपे**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर

# प्रस्तावना

जून २००७ पासून शिवाजी विद्यापीठाने बहि:स्थ विद्यार्थ्यांसाठी दूर शिक्षण कार्यक्रम राबविण्याचे ठरविलेले आहे. यावर्षी बी. ए. भाग ३ (अर्थशास्त्र) या वर्गाच्या नवीन बदललेल्या अभ्यासक्रमानुसार सत्र-५ पेपर क्र. ८ ''विकासाचे अर्थशास्त्र'' व सत्र-६ पेपर क्र. १३ साठी ''नियोजनाचे अर्थशास्त्र'' हे पुस्तक लिहिले आहे. अर्थशास्त्र या विषयातील विविध अभ्यासू व अनुभवी लेखकांनी वेगवेगळे घटक या पुस्तकांमध्ये लिहिले आहेत. या पुस्तकातील विषयाच्या विविध संकल्पना, सिद्धांत व आर्थिक नियोजन यांची मांडणी सोप्या व दर्जेदार भाषेत करून हा विषय विद्यार्थीभिमुख करण्याचा प्रयत्न केला आहे. बहि:स्थ विद्यार्थ्यांना या विषयातील विविध संकल्पना, सिद्धांत व धोरणे समजण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी कोष्टके व आकृत्या काढून विषय अधिक सोपा करून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

या पुस्तकात बी. ए. भाग-३ (अर्थशास्त्र) या वर्गाच्या बहि:स्थ विद्यार्थ्यांसाठी असलेल्या 'विकासाचे अर्थशास्त्र' सत्र-५ पेपर क्र. ८ व 'नियोजनाचे अर्थशास्त्र' सत्र-६ पेपर १३ या बदललेल्या सुधारीत अभ्यासक्रमाची एकूण आठ घटकांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. यामध्ये सत्र ५ साठी आर्थिक विकासाच्या मूलभूत संकल्पना, विकसनशील आणि विकसित देश, आर्थिक विकासाचे सिद्धांत, आर्थिक विकासाची संसाधने तर सत्र ६ साठी आर्थिक नियोजन-१, आर्थिक नियोजनातील चर्चेचे विषय, भारतातील नियोजन-१, भारतातील नियोजन-२ यांची सविस्तर मांडणी केलेली आहे.

बहि:स्थ विद्यार्थ्यांना विषयाचे त्वरीत व मुद्देसूद आकलन व्हावे यासाठी घटकांची मांडणी एका विशिष्ठ पद्धतीने म्हणजेच उद्दिष्टे, प्रास्ताविक, विषय विवेचन, सारांश, पारिभाषिक शब्द तसेच प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयं अध्ययनासाठी प्रश्न व त्यांची उत्तरे सरावासाठी दीर्घोत्तरी प्रश्न व टीपा दिलेल्या आहेत. पुस्तकाच्या शेवटी अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तकांची नावे दिलेली आहेत. या पुस्तकाची मांडणी आणि विवेचन विद्यार्थ्यांना विषयाचे चांगले आकलन होण्यासाठी उपयुक्त ठरेल अशी अपेक्षा आहे.

या पुस्तकाचा वापर करणाऱ्या सर्व विद्यार्थी व शिक्षक वर्गाला आमची नम्र विनंती अशी की त्यांनी त्यांच्या सूचना प्रकाशक वा संपादकांकडे जरूर पाठवाव्यात. पुढील आवृत्ती अधिक बिनचूक, अद्ययावत व उपयुक्त करण्यासाठी त्याचा उपयोग होईल.

या पुस्तकाचे प्रकाशन करण्याच्या कामी मदत केलेल्या शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रातील सर्व कर्मचारी व प्रशासकीय अधिकारी यांना मनःपूर्वक धन्यवाद. या पुस्तकाच्या सर्व घटक लेखकांनी आपले घटक वेळेत पूर्ण केल्याबद्दल संपादक या नात्याने कृतज्ञ आहोत.

**■ संपादक ■**

**डॉ. ए. के. पाटील**
सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज,
विद्यानगर कराड, ता. कराड, जि. सातारा

**डॉ. अनिल सत्रे**
मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगाव,
ता. वाळवा, जि. सांगली.

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**पेपर–८ विकासाचे अर्थशास्त्र**
**पेपर–१३ नियोजनाचे अर्थशास्त्र**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–५ घटक क्रमांक | सत्र–६ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **प्रा. डॉ. चंद्रकांत जाधव**<br>यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर<br>ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर | १, २ | – |
| **डॉ. संजय धोंडे**<br>आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा,<br>ता. जावळी, जि. सातारा | ३, ४ | – |
| **डॉ. प्रशांत कोंडीबा पोवार**<br>एच. एम. शिंदे आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, तिसंगी,<br>ता. गगनबावडा, जि. कोल्हापूर | – | १ |
| **डॉ. विजयकुमार अ. पाटील**<br>कला व विज्ञान महाविद्यालय, आटपाडी,<br>ता. आटपाडी, जि. सांगली | – | २ |
| **डॉ. सोमनाथ काळे**<br>विवेकानंद महाविद्यालय, ताराबाई पार्क, कोल्हापूर | – | ३ |
| **डॉ. प्रकाश बुरूटे**<br>मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगाव,<br>ता. वाळवा, जि. सांगली. | – | ४ |

**■ संपादक ■**

**डॉ. ए. के. पाटील**
सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज,
विद्यानगर कराड, ता. कराड, जि. सातारा

**डॉ. अनिल सत्रे**
मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगाव,
ता. वाळवा, जि. सांगली.

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | पेपर–८ : सेमिस्टर–५ | |
| १. | आर्थिक विकासाच्या मूलभूत संकल्पना | १ |
| २. | विकसनशील आणि विकसित देश | २२ |
| ३. | आर्थिक विकासाचे सिद्धांत | ४७ |
| ४. | आर्थिक विकासाची संसाधने | ७१ |
| | पेपर–१३ : सेमिस्टर–६ | |
| १. | आर्थिक नियोजनाची ओळख | ९१ |
| २. | आर्थिक नियोजनातील समस्या | १२६ |
| ३. | भारतातील नियोजन–१ | १६६ |
| ४. | भारतातील नियोजन–२ | १९३ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

---

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी (क्र. ८ व १३) एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२०-२१ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक १
# आर्थिक विकासाच्या मूलभूत संकल्पना
## (Basic Concepts of Economic Development)

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ आर्थिक विकासाचा अर्थ, आर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धी यांच्यातील फरक

१.२.२ आर्थिक विकासाचे निर्देशक

१.२.३ आर्थिक विकासातील अडथळे

१.२.४ शाश्वत आणि हरित विकास

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द व त्यांचा अर्थ

१.५ स्वयं-अध्ययन प्रश्न

१.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.७ सरावासाठी स्वाध्याय

१.८ क्षेत्रीय कार्य

१.९ अधिक वाचनासाठी संदर्भ


### १.० उद्दिष्ट्ये (Objectives) :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणाला पुढील उद्दिष्ट्ये साध्य करता येतील.

* आर्थिक विकासाची संकल्पना समजून घेता येईल.
* आर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धी यांच्यातील फरक समजून येईल.

* आर्थिक विकासाचे निर्देशक यांची माहीती मिळेल.
* आर्थिक विकासातील अडथळे समजून येतील.
* शाश्वत आणि हरित विकास या संकल्पना जाणून घेता येतील.

## १.१ प्रास्ताविक (Indroduction) :

अर्थशास्त्रामध्ये आर्थिक विकास या संकल्पनेला महत्त्वाचे स्थान आहे. विकसित देश, विकसनशील देश आणि मागासलेले देश या सर्वांच्या दृष्टीकोनातून आर्थिक विकासाच्या संकल्पनेला महत्त्व दिले जाते. विशेषत: विसाव्या शतकात म्हणजेच दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील सर्व राष्ट्रांत आर्थिक विकासाची प्रेरणा वेगाने पसरली गेली. काही देशांना युद्धोत्तर पुनर्रचना करण्याचा प्रश्न होता, तर काही देशांना परकीय राजवटीमधून मुक्त झाल्यामुळे आर्थिक मागासलेपणा दूर करण्याचे प्रश्न होते. अशा दोन्ही प्रकारच्या राष्ट्रांच्या आर्थिक समस्या (प्रश्नांची) सोडवणूक करण्यासाठी नवीन अर्थशास्त्रीय तात्विक चौकटीची आवश्यकता होती. त्यामधुनच विकासाचे अर्थशास्त्र ह्या अर्थशास्त्राच्या शाखेचा विकास झाला. मागासलेल्या किंवा अविकसित देशांमधील आर्थिक विकासाच्या समस्यांचे स्वरूप आणि जटिलता भिन्न होती त्यांची सोडवणूक करण्यासाठी विकासाचे अर्थशास्त्र या अर्थशास्त्राच्या ज्ञानशाखेची निर्मिती झाली. तसेच दुसऱ्या बाजूला इंग्लंड मधील औद्योगिक क्रांती विकास प्रक्रिया सुरू झालेल्या आणि विसाव्या शतकात विकसनशील देशांच्या तुलनेत बरेच पुढे गेलेले विकसित देश यांच्या आर्थिक समस्या भिन्न होत्या. त्यांच्या विश्लेषणाचा विचार वृद्धीचे अर्थशास्त्र यात केला जाऊ लागला. आर्थिक विकासाच्या अर्थशास्त्रात आर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धी यामध्ये अनेक अर्थतज्ञांनी फरक असल्याचे स्पष्ट केले. परंतू व्यवहारात आर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धी या दोन्ही संकल्पना एकाच अर्थाने वापरल्या जात आहेत. तथापि ह्या दोन्ही संकल्पनांमध्ये मूलत: फरक आहे. अर्थशास्त्रात आर्थिक विकास ही संज्ञा अधिक व्यापकपणे वापरली जात आहे. एखाद्या देशाचा आर्थिक विकास कसा होतो आहे किंवा किती झाला हे मोजण्यासाठी आर्थिक विकासाचे निर्देशक घटक अभ्यासणे आवश्यक ठरते. आर्थिक विकासाची प्रक्रिया कधीच संथ नसते तर विकासाच्या प्रक्रियेत अनेक अडथळे येत असतात. अलिकडच्या काळात आर्थिक विकास म्हणजे फक्त औद्योगिक विकास नसून विकासाच्या आधुनिक संकल्पनेनुसार आर्थिक विकासात मानवी विकास (Human Development) हा घटक महत्त्वाचा असतो. एकविसाव्या शतकात आर्थिक विकासात मानवी विकास (Human Development) अपेक्षित आहेच पण मानवी विकास हा शाश्वत किंवा चिरंतर विकास असावा. आर्थिक विकासात शाश्वत विकासाबरोबरच हरित विकासालाही अलिकडे अनन्य साधारण असे महत्त्व प्राप्त झाले आहे. म्हणूनच सदरच्या घटकात आपण आर्थिक विकासाचा अर्थ, आर्थिक विकास आणि आर्थिक वृध्दी यांच्यातील फरक आर्थिक विकासातील अडथळे आणि शाश्वत व हरित विकास यांचा अभ्यास करणार आहोत.

### आर्थिक विकासाचा अर्थ (Meaning of Economic Development) :

विकासाच्या अर्थशास्त्रात आर्थिक विकास ही मध्यवर्ती संकल्पना आहे. कारण आर्थिक विकास ही सातत्याने व दिर्घकालीन प्रक्रियेत घडून येणारी घटना आहे. तसेच आर्थिक विकास ही संकल्पना अतिशय व्यापक

आणि गुंतागुंतीची आहे. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत विविध पैलू असतात जसे की, आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीत सुधारणा, आरोग्य, शिक्षण, कामाची परिस्थिती, देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय धोरणे, वस्तू आणि श्रमबाजाराची परिस्थिती या सारख्या समग्र आर्थिक सामाजिक घटकांचा अभ्यास विकासाच्या अर्थशास्त्रात केला जातो. अशा समग्र सामाजिक आणि आर्थिक घटकांमध्ये सुधारणा करण्यावर लक्ष केंद्रित केले जाते.

आर्थिक विकासाच्या संकल्पनेत वास्तव राष्ट्रीय उत्पन्नाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. म्हणजेच वास्तव राष्ट्रीय उत्पन्न ही आर्थिक विकासाची कसोटी मानली जाते. देशाचा आर्थिक विकास म्हणजे देशाचे वास्तव राष्ट्रीय उत्पन्न वाढणे होय. म्हणून आर्थिक विकास म्हणजे देशाच्या वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात दीर्घकालावधीत वाढ होणे होय. थोडक्यात आर्थिक विकास म्हणजे ''दीर्घकालावधीत अर्थव्यवस्थेच्या वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होण्याच्या क्रियेला आर्थिक विकास असे म्हणतात.'' यावरून असे लक्षात येते की, आर्थिक विकास ही दीर्घकाळात साध्य होणारी बाब आहे. तसेच आर्थिक विकास ही एक प्रक्रिया आहे. आर्थिक विकास किती झाला किंवा नाही हे पाहण्यासाठी देशाच्या वास्तव राष्ट्रीय उत्पन्नाचा अभ्यास करावा लागेल.

काही अर्थशास्त्रीय विचारवंतांच्यामते आर्थिक विकास म्हणजे देशातील लोकांचे दारिद्र्य कमी करून राहणीमानात सुधारणा करणे होय. लोकांचे राहणीमान हे लोकांच्या वास्तव दरडोई उत्पन्नावर अवलंबून असते. त्यामुळे आर्थिक विकासाच्या संकल्पनेत वास्तव दरडोई उत्पन्नातही अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. देशाचा आर्थिक विकास होणे म्हणजेच देशातील लोकांच्या वास्तव दरडोई उत्पन्नामध्ये वाढ होणे अपेक्षित असते. त्यामुळे आर्थिक विकास म्हणजे, ''दीर्घकालावधीत देशाच्या वास्तव दरडोई उत्पन्नात वाढ होण्याच्या प्रक्रियेला आर्थिक विकास असे म्हणतात.'' थोडक्यात देशातील लोकांच्या वास्तव दरडोई उत्पन्नात वाढ झाली तर देशाचा आर्थिक विकास घडून आला असे म्हणता येईल.

आर्थिक विकासाच्या वास्तव राष्ट्रीय उत्पन्न (Real National Income) आणि वास्तव दरडोई उत्पन्न (Real Per Capita Income) या दोन कसोट्यांचा आपण विचार केला. जर एकूण वास्तव उत्पन्न आणि लोकसंख्या ह्या दोन्ही गोष्टी सारख्याच प्रमाणात वाढल्या तर वास्तव दरडोई उत्पन्नात वाढ होत नाही. म्हणून मायर, बाल्डवीन आणि कुझनेटस् ह्या सारख्या अर्थतज्ज्ञांनी वास्तव दरडोई उत्पन्नापेक्षा एकूण वास्तव राष्ट्रीय उत्पन्न हीच आर्थिक विकास झाला आहे की नाही ते पाहण्याची अचूक व सर्वात चांगली कसोटी आहे असे म्हटले.

**आर्थिक विकासाच्या व्याख्या (Definitions of Economic Development) :**

आर्थिक विकासाच्या विविध व्याख्या खालीलप्रमाणे आहेत.

**१) प्रा. मायर आणि बाल्डविन यांची व्याख्या :** ''आर्थिक विकास ही अशी प्रक्रिया आहे की, ज्यायोगे एखाद्या देशाच्या वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात दीर्घकालावधीत वाढ होणे, जर लोकसंख्या वाढीपेक्षा वास्तव राष्ट्रीय उत्पन्नामध्ये वाढ झाली तर देशाच्या दरडोई उत्पन्नातही वाढ होईल.''

("Economic Development is a process whereby the real national income of a country increases over a long period of time. If the increase in the real national income is more than the

population increase then the per capita real income of the country will also increase." - Prof. Meier and Baldwin.)

**२) प्रो. विल्यमसन यांची व्याख्या :** ''आर्थिक विकास ही एक प्रक्रिया आहे. ज्यायोगे देशातील लोक उपलब्ध साधनांचा अशा प्रकारे वापर करतात की देशाचे दरडोई उत्पन्न वाढते.''

("Economic Development is a process whereby the people of a country utilize the available resources in such a way that per capita income of the country increases." - Prof. Williamson.)

**३) प्रो. हिगिन्स यांची व्याख्या :** ''आर्थिक विकास म्हणजे एखाद्या देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात आणि दरडोई उत्पन्नात वाढ होणे होय.

("Economic Development is the increase in per capita and national income of a country." - Prof. Higgins.)

**४) प्रो. आर्थर लेविस यांची व्याख्या :** ''आर्थिक विकास हा देशाच्या उत्पादनात दरडोई वाढीचे प्रतिनिधित्व करतो.''

("Economic Development represents the per capita increase in the producation of a country " - Prof. Arthur Lewis)

**५) प्रो. विन्स्टन यांची व्याख्या :** ''देशातील लोकसंख्या वाढीशी तुलना करता उपभोग आणि उत्पादन वाढणे म्हणजे आर्थिक विकास होय.''

("Economic Development shows the excess of consumption and production of a country as compared with increase in population." - Prof. Winston.)

**६) संयुक्त राष्ट्र संघाच्या तज्ज्ञ समितीची व्याख्या :** ''विकासाचा संबंध केवळ लोकांच्या भौतिक गरजांशी नसून तो त्याच्या जीवनाच्या सामाजिक स्थितीच्या सुधारणेशी आहे. विकास म्हणजे केवळ आर्थिक वृद्धी नव्हे. परंतू वृद्धी आणि सामाजिक, सांस्कृतिक, संख्यात्मक तसेच आर्थिक बदल आणि वाढ होय.''

(" Development concern not only man's material needs but also the improvement in the social condition of his life, development is therefore, not only economic growth, but growth plus change social, cultural and institutional as well as economic." - United Nations Expert Committee.)

वरील विविध व्याख्यांमध्ये विविध अर्थतज्ज्ञांनी आर्थिक विकासाच्या विविध पैलूवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्येकांच्या व्याख्या मध्ये काही बाबतीत साम्य आणि भेद दिसून येत आहे. परंतू आर्थिक विकास म्हणजे काय ते विविध पैलूंचा विचार करून विविध अर्थतज्ज्ञांनी विविध व्याख्यांच्या सहाय्याने स्पष्ट केले आहे.

**आर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धी यांच्यातील फरक (Distinction between Economic Development and Economic Growth) :**

आर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धी ह्या दोन्ही संकल्पनामध्ये काही बाबतीत फरक असलेला दिसून येतो. मॅडिसन सारखे अर्थतज्ञ म्हणतात की, उत्पन्न पातळी वाढविण्याचे प्रयत्न विकसनशील देशात होत असल्यास त्याला आर्थिक विकास असे म्हणतात, तर हेच प्रयत्न विकसित अर्थव्यवस्थेत होत असल्यास ती आर्थिक वृद्धी असे समजण्यात येते. त्यामुळे आर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धी या संकल्पनांमध्ये विविध बाबतीत फरक असलेला आढळून येतो त्याचे तुलनात्मक विश्लेषण पुढीलप्रमाणे आपणास करता येईल.

| आर्थिक विकास | आर्थिक वृद्धी |
|---|---|
| १. वास्तव राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ ही आर्थिक विकासाची कसोटी मानली जाते. | १. एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ ही आर्थिक वृद्धीची कसोटी मानली जाते. |
| २. लोकसंख्येच्या वाढीपेक्षा वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात अधिक प्रमाणात वाढ झाली तरच आर्थिक विकास झाला असे मानले जाते. | २. लोकसंख्येच्या वाढीपेक्षा एकूण राष्ट्रीय उत्पन्नात जरी कमी प्रमाणात वाढ झाली तरी आर्थिक वृद्धी झाली असे मानले जाते. |
| ३. आर्थिक विकास ही दीर्घकाळात घडून येणारी क्रिया आहे. | ३. आर्थिक वृद्धी ही विशिष्ट काळात घडून येणारी क्रिया आहे. |
| ४. आर्थिक विकास ही संज्ञा विकसनशील देशांच्या संदर्भात वापरली जाते. | ४. आर्थिक वृद्धी ही संज्ञा विकसित देशांच्या संदर्भात वापरली जाते. |
| ५. आर्थिक विकास ही स्थिर अर्थव्यवस्थेत घडून येणारी घटना आहे. | ५. आर्थिक विकास ही गतिमान अर्थव्यवस्थेत घडून येणारी घटना आहे. |
| ६. आर्थिक विकास ही बाब जाणीवपूर्वक व जागृकतेने केलेल्या प्रयत्नांचे फळ असते. | ६. आर्थिक विकास ही नैसर्गिक क्रिया मानली जात असते. |
| ७. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत अर्थव्यवस्थेत स्वयंपूर्ण व तुटक किंवा खंडित स्वरूपाचे बदल होत असतात. | ७. आर्थिक वृद्धीच्या प्रक्रियेत अर्थव्यवस्थेत संथगतिने बदल होत असतात. |
| ८. आर्थिक विकास ही संज्ञा सामाजिक आणि आर्थिक बाबींशी निगडीत असते. | ८. आर्थिक वृद्धी ही संज्ञा फक्त आर्थिक बाबींशी निगडीत असते. |
| ९. आर्थिक विकास म्हणजे गरिबी दूर करणे, बेकारी कमी करणे व लोकांच्या जीवनमानाचा स्तर(दर्जा) उंचावणे होय. | ९. आर्थिक वृद्धी म्हणजे एकूण राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होणे होय. |
| १०. आर्थिक विकास ही अर्थव्यवस्थेतील मोठी घटना मानली जाते. | १०. आर्थिक वृद्धी ही अर्थव्यवस्थेतील तुलनेने मोठी घटना नसते. |
| ११. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सरकारी हस्तक्षेपाची व मदतीची अत्यंत आवश्यकता असते. | ११. आर्थिक वृद्धीच्या प्रक्रियेत सरकारी हस्तक्षेपाची व मदतीची जास्त आवश्यकता नसते. |
| १२. आर्थिक विकासात गुणात्मक बदल अभिप्रेत असतात. | १२. आर्थिक वृद्धीच्या प्रक्रियेत संख्यात्मक बदल अभिप्रेत असतात. |

### १.२.२ आर्थिक विकासाचे निर्देशक (Indicators of economic development) :

देशाच्या आर्थिक विकासाची पातळी जाणून घेण्यासाठी आर्थिक विकासाचे भिन्न निर्देशक घटक वापरले जात असतात. अशा निर्देशक घटकांच्या सहाय्याने देशाचा विकास कसा होतो आहे किंवा नाही ते समजते. आर्थिक विकास निर्देशकांच्या सहाय्याने देशा-देशांची तुलना करता येते. स्वदेशाची भिन्न कालावधीमध्ये घडून आलेली आर्थिक विकासाची कल्पना येते. देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी योग्य प्रकारे नियोजन करता येते. म्हणून आर्थिक विकासाच्या निर्देशकांचा अभ्यास करणे महत्त्वपूर्ण ठरते. अशा आर्थिक विकासाच्या निर्देशकांचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे देता येईल.

**१) राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ (Increase in National Income) :**

राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीमध्ये वास्तव राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ हा आर्थिक विकासाचा निर्देशक मानला जातो. प्रो. मायर व बाल्डविन, सायमन कुझनेटस् यासारख्या विकासवादी अर्थशास्त्रज्ञांनी वास्तव राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीला आर्थिक विकासाचा निर्देशक म्हणून मानले होते. त्यांच्या मते दीर्घकालावधीत एखाद्या अर्थव्यवस्थेच्या वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होण्याच्या क्रियेला आर्थिक विकास असे म्हणतात. त्यामुळे वास्तव राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ हा आर्थिक विकासाचा महत्त्वाचा निर्देशक घटक आहे.

**२) दरडोई वास्तव उत्पन्नातील वाढ (Increase in real Per Capita Income) :**

वास्तव दरडोई उत्पन्नातील वाढ हा दुसरा एक महत्त्वाचा आर्थिक विकास निर्देशक घटक आहे. देशाचा आर्थिक विकास होणे म्हणजे देशातील लोकांच्या राहणीमानात सुधारणा होणे होय. देशातील लोकांच्या राहणीमानाचा दर्जा हा लोकांच्या दरडोई वास्तव उत्पन्नातील वाढीवर अवलंबून असतो. देशातील लोकांच्या दरडोई वास्तव उत्पन्नात वाढ झाली तर देशाचा आर्थिक विकास घडून आला असे म्हणता येते. दरडोई वास्तव उत्पन्न काढण्यासाठी एकूण वास्तव राष्ट्रीय उत्पन्नाला लोकसंख्येने भागले जाते. थोडक्यात दरडोई वास्तव उत्पन्नातील वाढ हा सुद्धा आर्थिक विकासाचा निर्देशक घटक आहे. दरडोई वास्तव उत्पन्न काढण्याचे सुत्र आपणास पुढीलप्रमाणे सांगता येईल.

सुत्ररूपाने

$$\text{दरडोई वास्तव उत्पन्न} = \frac{\text{वास्तव राष्ट्रीय उत्पन्न}}{\text{एकूण लोकसंख्या}}$$

**३. आर्थिक कल्याण (Economic Welfare) :**

आर्थिक कल्याण हा आर्थिक विकास मापनाचा महत्वाचा निर्देशांक आहे असे म्हणणे योग्य ठरते. कारण आर्थिक विकास किती आणि कसा झाला आहे हे तपासण्यासाठी लोकांच्या आर्थिक कल्याणातील वाढ मोजावी

लागेल. वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात आणि दरडोई वास्तव उत्पन्नात वाढ झाल्यास लोकांच्या वस्तू आणि सेवांच्या खरेदीत, उपभोगात वाढ होते, त्या वेळी आर्थिक विकास घडून आला आहे असे म्हणावे लागेल. ओकुन आणि रिचर्डसन यांच्या मते आर्थिक विकास ही 'भौतिक कल्याणात एक शाश्वत आणि धर्मनिरपेक्ष सुधारणा आहे, ज्याचा आपण वस्तू आणि सेवांच्या वाढत्या प्रवाहातून प्रतिबिंबित होऊ शकते.'

**४. दरडोई उपभोगातील वाढ (Increase in per capita consumption) :**

देशातील लोकांकडून वस्तू आणि सेवांच्या वापरामधील वाढ दरडोई उपभोग यांच्या साहाय्याने मोजली जाते. जीवनावश्यक वस्तू यामध्ये अन्नधान्य, कपडे यांचा उपभोग वाढेल, तसेच शिक्षण, आरोग्याच्या सेवा सुविधांमध्येही वाढ झाली असेल, लोकांच्या जीवनावश्यक वस्तूबरोबरच चैनीच्या ही वस्तूंचा उपभोग वाढत असेल तर देशाचा उच्च आर्थिक विकास होत आहे हे दर्शविले जाते.

**५. औद्योगिक प्रगती (Industrial progress) :**

औद्योगिक प्रगती ही एखाद्या देशाच्या आर्थिक विकासाचे महत्वपूर्ण सूचक (निर्देशक) असते. देशातील उद्योगाची प्रगती वेगाने झाल्यामुळे देशाच्या राष्ट्रीय उत्पादनात वाढ होते. तसेच देशातील लोकांच्या दरडोई उत्पन्नातही वाढ होते. देशातील उद्योगांच्या प्रगतीमुळे त्या देशाचे स्थुल राष्ट्रीय उत्पादन आणि दरडोई उत्पन्न वाढत असेल तर त्या देशाचा आर्थिक विकास घडून आला आहे असे म्हणता येईल.

**६. भांडवल निर्मिती (Capital formation) :**

देशात औद्योगिक प्रगती झाल्यास राष्ट्रीय उत्पन्न वाढते. तसेच देशातील लोकांचे दरडोई उत्पन्नही वाढते. राष्ट्रीय उत्पन्न अणि दरडोई उत्पन्नातील वाढीमुळे लोकांच्या बचतीमध्ये वाढ होते. बचतीचे रूपांतर गुंतवणुकीत होणे म्हणजे भांडवल निर्मिती होय. देशातील लोकांच्या बचतीत वाढ झाल्यामुळे गुंतवणुकीमध्येही वाढ घडुन येते. गुंतवणुकीतील वाढीमुळे उत्पादन व उत्पन्न वाढून आर्थिक विकास अधिकच वेगाने होतो. त्यामुळे भांडवल निर्मितीचा वाढलेला वेग हा आर्थिक विकासाचा निर्देशक असतो.

**७. मानव विकास निर्देशांक (Human Development Index) :**

आर्थिक विकासाचे आर्थिक घटकांबरोबरच सामाजिक घटकांचाही विचार करुन मोजमाप करण्यासाठी मानव विकास निर्देशांक ही संकल्पना वापरली जाते. पाकिस्तानी अर्थशास्त्र मेहबूब उल हक आणि अमर्त्य सेन यांनी मानव विकास निर्देशांक विकसित केले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या विकास कार्यक्रमाने सन १९९० पासून देशांचा विकास मोजण्यासाठी या संकल्पनेचा वापर केला आहे. या निर्देशांकात मानव विकासाशी निगडीत तीन परिमाणांचा विचार केला जातो. त्यामध्ये पहिला (अ) दिर्घ आणि निरोगी जीवन (Long and healthy life ) याचे मोजमाप अपेक्षित आयुमर्यादेच्या साहाय्याने केले जाते. दुसरा आ) ज्ञान (Knowledge) यामध्ये शिक्षणाची अपेक्षित वर्षे व शालेय शिक्षण वर्षे यांच्या साहाय्याने मापन केले जाते. तर तिसरा इ) जीवनमान (Standard of living) याचे मोजमाप वास्तविक दरडोई उत्पन्नातील बदल (जे क्रयशक्ती समतेच्या आधारावर डॉलरमध्ये ठरविले जाते) यांच्या साहाय्याने केले जाते. या तीनही घटकांचे स्वतंत्र निर्देशांक केले जातात. त्यासाठी प्रत्येक घटकाचे

किमान व कमाल मुल्य किती हे ठरविले जाते. सर्व घटकांचे निर्देशांक तयार केल्यानंतर तीनही घटकांच्या निर्देशांकाची सरासरी काढली जाते त्या मुल्यांलाच मानव विकास निर्देशांकाचे मुल्य असे म्हणतात. मानव विकास निर्देशांकाचे मुल्य नेहमी शून्य ते एक यांच्या दरम्यान असते.

**मानव विकासातील तीन परिमाणाच्या मोजमापासाठी सुत्र –**

$$\text{परिमाण निर्देशांक} = \frac{\text{घटकाचे प्रत्यक्ष मूल्य – किमान मूल्य}}{\text{महत्तम मूल्य – किमान मूल्य}}$$

मानव विकास निर्देशांकाच्या सहाय्याने आर्थिक विकास मापन अचूकपणे केले जात आहे. आर्थिक विकास मापनाच्या विविध निर्देशाकांपैकी मानव विकास निर्देशांक हा व्यापक व वास्तववादी आहे.

आर्थिक विकसाचे मोजमाप करण्यासाठी कोणताही एक निर्देशक वापरणे व्यावहारीक दृष्टया योग्य ठरणार नाही. देशाच्या भौगोलिक आर्थिक आणि सामाजिक घटकांचा विचार करुन वास्तववादी निर्देशकाच्या साहाय्याने आर्थिक विकास किती झाला हे सांगणे योग्य ठरेल.

### १.२.३ आर्थिक विकासातील अडथळे (Obstacles to Economic Development) :

ज्या प्रमाणे सर्व राष्ट्रांसाठी सर्वमान्य आर्थिक विकासाचे निर्देशक सांगणे कठीण आहे तशाच पद्धतीने आर्थिक विकासाच्या मार्गातील सामान्य अडथळे दाखविणे सुद्धा कठीण आहे. प्रत्येक देशातील भौगोलिक, राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीत भिन्नता असल्यामुळे आर्थिक विकासातील अडथळयांचे स्वरुप सुद्धा भिन्न भिन्न आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालेल्या अनेक राष्ट्रांनी लोकशाही शासन व्यवस्थेचा अवलंब केला. लोकांना परकिय राजवटीच्या काळात लोकशाहीचे प्रशिक्षण मिळाले नसल्यामुळे सुरवातीला विकासात सामाजिक अडथळे निर्माण झाले. काही अविकसित किंवा विकसनशील देशांपुढे वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येची समस्या निर्माण झाली. वाढणारी लोकसंख्या त्या देशांच्या आर्थिक विकासाचे लाभ खाऊन टाकत होती. एकंदरीत सर्व देशांसाठी सामान्य असे अडथळे दाखविणे कठिण आहे. तथापि त्यापैकी काही प्रमुख आर्थिक विकासाच्या मार्गातील अडथळ्यांची आपण पुढे चर्चा करणार आहोत.

**१. परकीय राजवटीचा परिणाम :**

जगातील अनेक देश दीर्घकाळ परकीय राजवटीच्या वर्चस्वाखाली होते. परकिय राजवटींनी अशा देशांच्या नैसर्गिक साधनसंपत्तीचे मोठ्या प्रमाणात शोषण केले आहे. म्हणजे परकिय सत्ता वसाहतीमधुन स्वस्त दराने कच्चा माल घेवून जात असते तर तयार पक्कामाल आणुन वसाहतीमध्ये जास्त किंमतीला विकत असते. परकीय राजवटींनी लघुद्योग नष्ट केले. शेती क्षेत्रात जमीनदारी वर्गाची निर्मिती केली. वसाहतीमधील लोकांची स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची शक्ती कारकुनी शिक्षण देऊन नष्ट केली. नैसर्गिक साधनसंपत्तीचा साठा मोठ्या प्रमाणात लुटुन नेला. लोकसंख्या वाढीला चालना दिली. त्यामुळे अशा देशांच्या आर्थिक विकासाच्या मार्गात लवकर दूर न होणारे आणि दुरगामी अडथळे निर्माण झाले.

## २. दारिद्र्याचे दृष्टचक्र :

अविकसित देशांच्या अर्थव्यवस्थांमध्ये विविध आर्थिक घटकांचा चक्रीय संबंध (Circular Relationship) असलेला दिसून येतो. विशेषत: अनेक घटकांपैकी कोणता तरी एक घटक मुळ कारण असतो तर इतर एखादा घटक त्यांचा परिणाम असतो दुसऱ्याचा परिणाम पुन्हा पुढील घटकावर होतो. शेवटी अखेरच्या घटकाचा पुन्हा पहिल्या घटकावर परिणाम होऊन ही क्रिया अधिक तीव्र होते, यालाच दृष्टचक्र (Vicious Circle) असे म्हणतात.

रॅग्नर नर्क्स यांनी दारिद्र्याचे दुष्टचक्र स्पष्ट करताना त्यांनी पुढील उदाहरण दिले. समजा गरीब मनुष्याला खाण्यासाठी पुरेसे अन्न मिळत नाही त्यामुळे त्याची शारिरिक प्रकृती नित्कृष्ट राहते. परिणामी त्यांची कार्यक्षमता सुध्दा कमी होते. कमी कार्यक्षमतेमुळे व्यक्ती जास्त किंवा पुरेसे उत्पन्न मिळवु शकत नाही. परिणामी तो पुन्हा गरीबच राहतो. म्हणजेच गरीब मनुष्याची गरीबीही गरीबीचे कारण आणि अंतिम परिणाम ठरते. जसे व्यक्तीच्या बाबतीत घडते तसेच देशाच्या बाबतीत सुध्दा घडते. एखाद्या देशातील चक्रीय आणि संचयी प्रक्रियेमुळे तो देश सुध्दा गरीब राहतो. म्हणुन देश गरीब आहे कारण तो गरीब आहे. (A Country is poor because it is poor) असे म्हटले जाते. रॅग्नर नर्क्स यांच्या मते विकसनशील देशात भांडवल निर्मितीच्या बाबतीत दोन्ही बाजूंनी दृष्टचक्र कार्यान्वित झालेले दिसुन येते.

**मागणीची बाजू -**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कमी वास्तव उत्पन्न | → | कमी मागणी | → | कमी गुंतवणूक |
| ↑ | | | | ↓ |
| कमी रोजगार | ← | कमी उत्पादन | ← | कमी भांडवल निर्मिती |

**पुरवठ्याची बाजू -**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कमी वास्तव उत्पन्न | → | कमी बचत | → | कमी गुंतवणूक |
| ↑ | | | | ↓ |
| कमी रोजगार | ← | कमी उत्पादन | ← | कमी भांडवल निर्मिती |

वरील चक्राकार प्रवाहाने विकसनशील देशात भांडवनिर्मितीच्या बाबतीत दुष्टचक्र कसे काम करते ते समजते. म्हणजे कमी वास्तव उत्पन्नामुळे देश गरीब राहतो. पण गरीबीचे कारण हेच अंतिम परिणाम सुध्दा ठरते.

अशा प्रकारे आर्थिक विकासाच्या मार्गात दारिद्र्याचे दुष्टचक्र हा एक मोठा अडथळा ठरतो.

### ३. कृषी विकासातील अडथळे :

विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थेमध्ये कृषी हा अग्रस्थानी असणारा घटक आहे. बहुसंख्य लोकांची उपजीविका शेती क्षेत्रावर अवलंबून असते. विकसित देशांच्या अनुभवावरुन असे लक्षात येते की शेतीचा उपयोग भांडवल निर्मितीसाठी करुन विकास साध्य करता येतो. परंतू अविकसित देशाच्या बाबतीत ही शक्यता कमीच असते. कारण शेतीच्या विकसामध्ये अनेक अडथळे असतात. जसे दैववादी वृत्ती, सिंचन सुविधांचा अभाव आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव, शेतकऱ्याचा निरक्षरपणा, भांडवलाची कमतरता, शेतमालाच्या आधार किंमतीची समस्या इत्यादी. कृषी विकासातील अडथळ्यांमुळे कृषीचा विकास करणे कठीण होते परिणामी आर्थिक विकासाच्या मार्गात अडथळे निर्माण होत आहेत.

### ४. बाजारातील अपूर्णता :

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत बाजारातील अपुर्णता हा एक महत्वाचा अडथळा ठरतो. अर्थव्यवस्थेमध्ये वस्तू बाजार आणि घटक बाजारात अपूर्णता असलेली दिसुन येते. त्यामध्ये किंमत स्थिरता, बाजारपेठेचे अपुर्ण ज्ञान, अचल घटक, बदलणारी सामाजिक परिस्थिती, उत्पादन घटकांच्या गतीशीलतेचा अभाव, माहीतीच्या बाजारातील अपूर्णता अशा विविध प्रकारच्या अपुर्णतेमुळे आर्थिक विकासाच्या मार्गात अडथळे निमार्ण होतात.

### ५. वाढती लोकसंख्या :

अविकसित किंवा विकसनशील देशामधील जलद वाढणारी लोकसंख्या हा आर्थिक विकासात मोठा अडथळा ठरत आहे. लोकसंख्या वाढल्यामुळे लोकसंख्येचे आकारमान आणि लोकसंख्या वाढीचा दर सुध्दा आधिक राहतो. परिणामी वाढलेल्या लोकसंख्येला अन्नधान्य टंचाईला सामोरे जावे लागते. अर्थव्यवस्थेत चलनवाढीची स्थिती निर्माण होते. लोकसंख्या वाढल्यामुळे बेरोजगारी, दारिद्रय, निरक्षरता आणि नित्कृष्ट राहणीमान अशा समस्या निर्माण होतात. वाढणारी लोकसंख्या आर्थिक विकासात साहाय्यभुत ठरण्याऐवजी अडथळा ठरत असते.

### ६. भांडवल टंचाई :

विकसनशील देशाच्या बाबतीत वास्तव राष्ट्रीय उत्पन्न अल्प राहते. त्यामुळे देशातील बचत कमी, भांडवलनिर्मिती कमी, रोजगार कमी आणि देशाचे वास्तव राष्ट्रीय उत्पन्न कमी राहते. म्हणजे भांडवलनिर्मिती अल्प राहील्यामुळे आर्थिक विकसात भांडवल टंचाई निर्माण होते. भांडवल हा उत्पादनाचा एक महत्वाचा घटक आहे. भांडवालाचीच टंचाई निर्माण झाल्यामुळे उत्पादन प्रक्रिया वेगाने वाढत नाही. परिणामी देशाच्या आर्थिक विकासाच्या मार्गात अडथळे निर्माण होतात.

### ७. आधुनिक उद्योजकता आणि व्यवस्थापन कौशल्याचा अभाव :

विकसित देशामधील आधुनिक व्यवस्थापन कौशल्यामुळे उद्योजकांनी धोका पत्करुन अनेक प्रकल्पात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली त्यामुळे विकसित देशांचा विकास अधिक वेगाने घडून आला. परंतु अविकसित

देशांच्या बाबतीत आधुनिक व्यवस्थापन कौशल्यांचा अभाव असल्यामुळे आर्थिक विकासाच्या मार्गात अडथळा निर्माण होत आहे.

**८. आंतरराष्ट्रीय घटक :**

आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये व्यापारशर्ती ह्या अविकसित देशांना नेहमी प्रतिकूल ठरत असतात. कारण अविकसित देशांच्या आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये प्राथमिक वस्तूंची संख्या अधिक असते. विकासाच्या सुरवातीच्या काळात आवश्यक यंत्रे व तंत्रज्ञानाची टंचाई असते. त्यामुळे अविकसित देशांची आयात जास्त आणि निर्यात कमी राहते. याचा एकंदरित परिणाम म्हणुन अविकसित देशांच्या व्यवहारतोलात तुट निर्माण झालेली असते. आर्थिक विकासाबरोबर आंतरराष्ट्रीय पातळीवर विकसित देश अविकसित देशांची बाजारपेठ मिळविण्यासाठी काही अटी शर्ती अविकसित देशांवर लादतात. त्याचा एकूण परिणाम म्हणून अविकसित देशांच्या आर्थिक विकासात अडथळा निर्माण होतो.

**९. राजकीय अस्थैर्य :**

अविकसित किंवा विकसनशील देशांच्या आर्थिक विकासात राजकीय अस्थैर्य हा महत्वाचा अडथळा असतो. विकसनशील देशांमध्ये बऱ्याच वेळा स्थिर आणि बहुमताचे सरकार सत्तेवर येत नाही, परकीय आक्रमणाचा धोका, दहशतवादी हल्ले अशा घटकांमुळे राजकीय अस्थैर्य निर्माण होते. देशातील उद्योग क्षेत्रातील अशांतता, सततचे मोर्चे यामुळे विदेशी आणि स्वदेशी गुंतवणुकीवर विपरीत परिणाम होतो. गुंतवणुक घटल्यामुळे विकासाच्या मार्गात खिळ बसते.

**१०. भ्रष्ट प्रशासन व्यवस्था :**

अविकसित देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सरकारने पुढाकार घ्यावा अशी अपेक्षा असते. सरकार देशाच्या विकासासाठी विविध घटकांच्या सहाय्याने कार्यभार पार पाडीत असते. परंतू आर्थिक विकास प्रक्रियेचा कार्यभार पार पाडताना प्रशासकीय यंत्रणा भ्रष्ट पध्दतीने कार्य करते. त्यामुळे आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण होतो. अनेक प्रकल्प सरकारच्या लालफितीच्या कारभारात अडकतात. उद्योगांमधील गुंतवणुक कमी होते.

**११. धार्मिक घटक :**

अविकसित देशामध्ये विकासाच्या सुरवातीच्या काळात निरक्षरतेचे प्रमाण अधिक असते. निरक्षरतेमुळे समाजातील बहुसंख्य लोकांची वृत्ती दैववादी असते. अनेक धार्मिक चालीरिती, परंपरांचा समाजावर पगडा असतो.

**१२. सामाजिक, सांस्कृतिक अडथळे :**

सामान्यपणे अविकसित देशांमध्ये सामाजिक आणि सांस्कृतिक चालिरिती, पध्दती आर्थिक विकासाच्या मार्गात अडसर ठरत असतात. सनातनी विचारांच्या काही सामाजिक संघटना, सांस्कृतिक रितीरिवाज काळानुसार

बदलल्यास आर्थिक विकासाला पोषक वातावरण तयार होते. परंतू अशा सामाजिक, सांस्कृतिक, रुढी, परंपरा यांच्यात बदल करण्याचा प्रयत्न केल्यास संघर्ष निर्माण होतो. परिणामत: आर्थिक विकासात अडथळे निर्माण होतात.

सारांश रूपाने विकासमार्गातील अडथळयांच्या बाबतीत असे म्हणता येते की, अविकसित राष्ट्रांच्या विपणनातील अपूर्णतेमुळे उपलब्ध संसाधनांची वाटणी आदर्श होत नाही. दारिद्र्याच्या दृष्ट चक्रामुळे अर्थव्यवस्थेत रचनत्मक बदल घडवून आणणे कठीण जाते. अडथळ्यांची तीव्रता जास्त असल्यामुळे या देशातील विकासाचा वेग कमी असलेला दिसून येतो.

**१.२.४. शाश्वत आणि हरित विकास (Sustainable and Green Development) :**

औद्योगिक क्रांतीची सुरवात अठराव्या शतकाच्या शेवटी इंग्लंडमध्ये झाली. औद्यागिक उत्पादनाच्या क्षेत्रात एक महान क्रांती ठरली. प्रचंड उत्पादनाचा प्रारंभ औद्योगिक क्रांतीतुनच झाला. उत्पादनाच्या श्रम ह्या घटकापेक्षा भांडवल ह्या घटकाला सर्वाधिक महत्व प्राप्त झाले. जगातील इतर देशांमध्ये सुध्दा भांडवलशाहीची रचना रुढ झाली. श्रम हा उत्पादनाचा महत्वाचा घटक मानला जाऊ लागला आणि त्यातुनच श्रमाचे शोषण सुरु झाले. कार्ल मार्क्स यांनी श्रमिकांच्या शोषणाविरुध्द कामगार वर्गाने संघर्षाचा मार्ग अवलंबिला.

औद्योगिक क्रांतीच्या काळात श्रमिक वर्गाच्या शोषणा बरोबरच दुसऱ्या एका घटकाचे शोषण जवळपास दोनशे वर्षे होतच राहीले. तो घटक म्हणजे नैसर्गिक साधनसंपत्तीचे शोषण होय. औद्योगिक क्रांतीमुळे भांडवलशाही पध्दती रुढ झाली. भांडवलशाही भोगवादी संस्कृती वाढली. लोकसंख्या वाढीमुळे प्रचंड उत्पादन वाढले. परिणामी नैसर्गिक साधनसंपत्तीच्या वापराशिवाय प्रचंड उत्पादन शक्य नसते. त्यामुळे नैसर्गिक साधनसंपत्ती (भूमी, वायू व पाणी) यांचे प्रचंड शोषण झाले. पर्यावरणाचा समतोल ढासळत गेला. यामुळे अनेक नैसर्गिक संकटे जसे, महापुर, ढगफुटी, भूकंप, त्सुनामी, वादळे, तापमान वाढ, दुष्काळ, महामारी, साथीचे आजार मोठ्या प्रमाणात उद्भवले आहेत. ही सर्व लक्षणे ढासळलेल्या पर्यावरणाच्या ऱ्हासाची आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या अफाट प्रगतीने औद्योगिकीकरण, वाढते शहरीकरण, वेगवान आर्थिक विकास त्यातून निसर्गाचे प्रचंड शोषण जर असेच होत राहीले तर पृथ्वीवरील जीवसृष्टी काही दशकातच धोक्यात येईल. अठराव्या शतकात थॉमस माल्थस यांनी लोकसंख्या वाढीचे व्यक्त केलेले भाकित विसाव्या शतकात मीडोज फॉरेस्टर यांनी परिस्थितीकी प्रलय (Ecological Catasrophe) याची भिती आज तंतोतंत खरी ठरत आहे. जर आपण निसर्ग वाचवण्यासाठी प्रयत्न केले नाहित तर भविष्यकाळात निसर्ग आपणाला वाचवणार नाही. आपले अस्तित्व टिकविणे शक्य नाही. आपले अस्तित्व टिकविण्याचा एकच मार्ग म्हणजे शाश्वत आणि हरित विकास होय.

**शाश्वत विकास (Sustainable Development) :**

शाश्वत विकास ही संकल्पना तशी अलीकडील आहे. कारण मानवाने नैसर्गिक साधनसंपत्तीचे केलेले प्रचंड शोषण थांबविण्यासाठी आणि आर्थिक विकासाच्या मर्यादा ओळखून निसर्ग व नैसर्गिक साधने संरक्षणाच्या आंतरराष्ट्रीय संघाने सादर केलेल्या १९८० च्या जागतिक संवर्धन डावपेच (World Conservation Strategy)

यामध्ये ही संकल्पना सर्वप्रथम वापरली. शाश्वत विकासाच्या विचारसरणीचा कामावर प्रकाश टाकण्याच्या बाबतीत १९६२ मध्ये रॅचेल कार्लसन यांनी 'द सायलेंट स्प्रिंग' या पुस्तकात इकोलॉजिस्ट मॅगझिन १९७२ आणि क्लब ऑफ रोम यांच्या लिमिट्स टू ग्रोथ रिपोर्ट १९७२ यामध्ये प्रयत्न केले गेले होते.

शाश्वत विकास संकल्पनेला १९७२ च्या स्टॉकहोम येथिल संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी पर्यावरण परिषदेत आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली. सन १९९२ च्या रिओ दी जानिरो येथिल संयुक्त राष्ट्रसंघाच्या पर्यावरण आणि विकासावरील परिषदेत शाश्वत विकासाचा कृती कार्यक्रम आणि रणनीती आखली गेली. सन २००२ मध्ये जोहान्सबर्ग येथील जागतिक शाश्वत विकासावरील शिखर परिषदेत १९१ राष्ट्रे, संयुक्त राष्ट्रसंघाच्या विविध संस्था आणि बहुपक्षीय वित्तीय गट सहभागी झाले होते. रिओ दी जानिरो पासुनच्या प्रगतीचे मुल्यांकन करण्याचे ठरले. सन २०१२ मध्ये रिओ दी जानिरो येथे संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकासावरील परिषदेत शाश्वत विकासाची ध्येये जन्माला आली. सन २०१५ साली न्यूयॉर्क येथे संयुक्त राष्ट्राची शिखर परिषद संपन्न झाली. त्यामध्ये २०१५ नंतरचा विकास अजेंड स्वीकारण्यावर चर्चा झाली. यामध्ये शाश्वत विकासाची १७ उद्दिष्ट्ये ठरविण्यात आली. शाश्वत विकासाची ध्येये अहवाल २०२० नुसार जगातील कोणताच देश कोव्हिड-१९ महामारी पासुन वाचू शकत नाही. कोव्हिड -१९ च्या महामारीमुळे ऑगस्ट-२०२१ पर्यंत ४४,२६,५३१ पेक्षा ही जास्त लोक मृत्यू मुखी पडले आहेत. अन्न असुरक्षिततेने ग्रस्त लोकांचे प्रमाण वाढले आहे. बेकारी प्रचंड वाढली आहे. आता तरी आपण शाश्वत विकासाची कास धरणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा आपले जिवनच धोक्यात आले आहे.

**शाश्वत विकासाचा अर्थ आणि व्याख्या :**

शाश्वत विकासाची संकल्पनाही सर्वसमावेशक आणि व्यापक आहे. भविष्यकालीन गरजा आणि विकासाशी शाश्वत विकास ही संकल्पना लागु ठरते. उपलब्ध नैसर्गिक आणि मानवी साधनसंपत्तीचा अतिरिक्त आणि अविवेकी पध्दतीने वापर केला तर भविष्यकालीन पिढीला अनेक समस्यांना सामोरे जावे लागेल. म्हणून साधनसंपत्तीचा वापर विवेकी आणि शाश्वत हवा. उपलब्ध नैसर्गिक आणि मानवी साधन संपत्तीचा वापर अशा पध्दतीने वर्तमान पिढीने करणे की भावी पिढीला त्याग किंवा त्रास सहन करावा लागणार नाही. म्हणुन नियोजन आणि विकासाच्या अर्थशास्त्रात शाश्वत विकासाच्या संकल्पनेला अनन्य साधारण असे महत्व आहे. शाश्वत विकासाच्या व्याख्या पुढील प्रमाणे -

**१. ब्रूटलॅंड अहवालानुसार –** 'स्वत:च्या गरजा पूर्ण करण्यासाठी भविष्यकालीन पिढ्यांची क्षमता बाधित होऊ न देता, वर्तमानकलीन गरजा पुर्ण करणे म्हणजे शाश्वत विकास होय.' (Sustainable development is development that meets the needs of the present without compromising the ability of future generation it meet their own needs- Brutland Report )

**२. रॉबर्ट अॅलन यांच्या मते –** 'मानवी गरजांचे चिरकाल टिकणारे समाधान आणि मानवी जीवनाच्या दर्जात सुधारणा साध्य करणे म्हणजे शाश्वत विकास होय.'(Sustainable development that is likely to acheive lasting satisfaction of human need and improvement of the quality of human life." – Robert Allen )

**३. के परिख यांच्या मते –** ' निसर्गाच्या अवस्थेपासून प्राप्त केलेल्या त्याच वस्तू व सेवा अर्थव्यवस्थेचे उत्पादन शक्यतेची तजवीज करुन सुरु ठेवणे म्हणजे शाश्वत विकास होय.'

वरील व्याख्यांवरुन असे म्हणता येईल की, शाश्वत विकासाच्या व्याख्येमध्ये सामान्यपणे दोन पिढ्यांमधील समता अंतर्भुत असते. भविष्यातील पिढ्यांच्या गरजा पुर्ण करण्यासाठी दिर्घकालीन शाश्वता असणे गरजेचे आहे. तर होणारा विकास हा शाश्वत असेल.

**शाश्वत विकास ध्येये (Sustainable Development Goals) :**

शाश्वत विकास ध्येये ही जगातील सर्व प्रकारची गरिबी हटवण्यासाठी व एक समान, न्याय आणि सर्व व्यक्तीसाठी व पृथ्वीवर सुबत्ता आणणाऱ्या जगाच्या निर्मितीसाठी दुरदर्शी व वैश्विक मान्यतेची तत्वे आहेत. शाश्वत विकासाची सतरा ध्येये आणि१६९ त्यांची उद्दिष्टे सप्टेंबर २०१५ मध्ये पार पडलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या ऐतिहासिक परिषदेत १९३ देशांनी मान्य केलेल्या व १ जानेवारी २०१६ पासून अंमलात आलेल्या अहवालाचा महत्त्वाचा भाग आहेत.

शाश्वत विकासाची सतरा ध्येये पुढील प्रमाणे आहेत.

**१. गरिबी निर्मूलन :** जगातील सर्व राष्ट्रांमधील सर्व स्वरूपातील सार्वत्रिक दारिद्र्य (गरिबी) निर्मूलन करणे.

**२. उपासमारीचे समूळ उच्चाटन :** सन २०३० पर्यंत उपासमारी समुळ नष्ट करणे. सर्वांना अन्न सुरक्षीतता प्राप्त करुन देणे. सुधारित पोषण आहाराचे ध्येये साध्य करणे. शाश्वत शेतीला चालना देणे.

**३. निरोगीपणा आणि श्रमकुशल :** सर्व वयोगटातील लोकांसाठी उत्तम आरोग्याची सुनिश्चिती करणे आणि चांगल्या जीवनमाणास चालना देणे.

**४. गुणवत्तापूर्ण शिक्षण :** सर्वासाठी सर्वसमावेशक व समन्याय गुणवत्तापूर्ण शिक्षणाची सुनिश्चिती करणे आणि आजीव शिक्षणाच्या संधीना चालना देणे.

**५. लिंग समभाव :** लैंगिक समानता साध्य करणे आणि सर्व महिला व मुलींचे सक्षमीकरण करणे. सर्व ठिकाणच्या सर्व महिला व मुलींच्या बाबतीत सर्व प्रकारचे भेदभाव दुर करणे.

**६. स्वच्छ पाणी व स्वच्छता :** सर्वांसाठी पाणी व स्वच्छता याची उपलब्धता करणे. पाण्याचे शाश्वत व्यवस्थापन याची सुनिश्चिती करणे.

**७. परवडण्यायोग्य आणि स्वच्छ ऊर्जा :** सर्वांसाठी परवडण्याजोगी, खात्रीची शाश्वत व आधुनिक ऊर्जा यासाठीच्या प्रवेशाची सुनिश्चिती करणे. सन २०३० पर्यंत, जागतिक संमिश्र ऊर्जेमध्ये नवीकरणयोग्य ऊर्जांच्या हिश्श्यात भरीव वाढ करणे.

**८. चांगल्या दर्जाचे काम आणि आर्थिक वाढ :** सर्वांसाठी शाश्वत सर्वसमावेशक आणि शाश्वत

आर्थिक वृद्धी पूर्णवेळ आणि उत्पादन रोजगार आणि प्रतिष्ठापूर्वक काम या गोष्टींना चालना देणे.

**९. उद्योग, नावीन्यपूर्णता आणि पायाभूत सुविधा :** स्थिती स्थापक पायाभूत सुविधा तयार करणे. सर्वसमावेशक आणि शाश्वत औद्योगिकीकरणास चालना देणे व नवनवीन कल्पना जोपासने.

**१०. विषमता कमी करणे :** देशांतर्गत आणि देशां-देशांमधील असमानता दुर करणे.

**११. शाश्वत शहरे आणि समुदाय :** शहरे आणि मानवी वसाहती सर्वसमावेशक, सुरक्षित स्थितीसापेक्ष आणि शाश्वत बनविणे.

**१२. शाश्वत वापर आणि उत्पादन :** शाश्वत उपभोग व उत्पादन आकृतिबंध सुनिश्चिती करणे. सन २०३० पर्यंत नैसर्गिक स्त्रोतांचे शाश्वत व्यवस्थापन व पूर्ण कार्यक्षमतेने वापर साध्य करणे. उत्पादनोत्तर अपव्यय कमी करणे.

**१३. हवामान क्रिया :** हवामानातील बदल व त्याचे दुष्परिणाम यांचा सामना करण्यासाठी तात्काळ कृती करणे.

**१४. पाण्याखालचे जीवन :** शाश्वत विकासासाठी महासागर, समुद्र व सागरी स्त्रोतांचे जतन व शाश्वत वापर करणे.

**१५. जमिनीवरचे जीवन :** भूभागावरील परिस्थितीकी संस्थांचे संरक्षण, पुन:स्थापना आणि शाश्वत वापरास प्रोत्साहन देणे, वनांचे व्यवस्थापन करणे, वाळवंटीकरणाशी लढा देणे, मानवी वसाहतींमुळे होणारी जैवविविधतेची हानी थांबवणे व तिची भरपाई करणे.

**१६. शांती, न्याय आणि सशक्त संस्था :** शाश्वत विकासासाठी शांततापूर्ण व समावेशक संस्थांना प्रचलित करणे, सर्वांसाठी न्याय पुरविणे, परिणामकारक, जबाबदार आणि सर्व स्तरांवर समावेशक अशा संस्थांची उभारणी करणे.

**१७. ध्येयांसाठी भागीदारी :** शाश्वत विकासासाठी कार्यान्वयनाच्या साधनांचे बळकटीकरण करणे आणि जागतिक सहभाग पुन:र्जिवित करणे.

आपले जग बदलण्यासाठी शाश्वत विकासाची सतरा ध्येये गाठणे अत्यंत गरजेचे आहे.

**हरित विकास (Green Development) :**

आर्थिक विकास आणि पर्यावरणीय आव्हानांचा सामना करताना आर्थिक विकासाचा एक नवीन स्त्रोत म्हणून हरित विकास या संकल्पनेकडे पाहिले जात आहे. विकसित, विकसनशील आणि अल्पविकसित देशांचा आर्थिक विकास होताना तो हरित विकासातून साध्य व्हावा यासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रयत्न केले जात आहेत. हरित विकास हा आर्थिक विकास आणि शाश्वत विकास या दोहोंचा ही भाग आहे. हरित विकासामध्ये आर्थिक प्रगती बरोबर नैसर्गिक साधनांचा वाढता उपयोग, परिस्थितीकी (Ecosystem) चा शाश्वत

विकास, समाजामध्ये मित्रत्वाची, बंधुत्वाची भावना वाढविणे, लोकांमध्ये निसर्गप्रेम वाढवून लोकांचे जीवन सुखी, समाधानी आणि आनंदी बनविणे अभिप्रेत असते.

**हरित विकासाचा अर्थ व व्याख्या :**

हरित विकासाचा अर्थ समजण्यासाठी आपणास पुढील काही व्याख्यांचा अभ्यास करावा लागेल.

१. 'हरित विकास म्हणजे नैसर्गिक संसाधनांचा कार्यक्षम व परिणामकारक उपयोग, दारिद्र्य घट, टाकाऊ पदार्थ नसणे, सर्व सेवांचा योग्य आधार आणि हरितगृह वायुचे प्रमाण कमी असणे होय.'

२. ' हरित विकास म्हणजे सामाजिक, आर्थिक शाश्वतता, सामाजिक एकता व सहभाग आणि हरिगृह वायुचे अल्पप्रमाण होय.'

**हरित विकासाबाबतच्या विविध संकल्पना :**

हरित विकासाबाबतच्या विविध संकल्पना खालील प्रमाणे.

**१. हरित अर्थव्यवस्था (Green Economy) :** लोकांचे जीवनमान उंचावणे, एकता असणे, सामाजिक न्याय आणि सर्वसमावेशकता तसेच पर्यावरणीय ऱ्हास कमी करणे हे ध्येय असणाऱ्या अर्थव्यवस्थेला हरित अर्थव्यवस्था असे म्हणतात.

**२. हरित शहर (Green City) :**

हरित शहर म्हणजे असे शहर की, ज्या ठिकाणी आरामात जीवन जगता येईल, विकासाच्या संधी उपलब्ध असतील त्याशिवाय शहरात उत्तम शक्ती साधने, उष्ण पाणी पुरवठा, सार्वजनिक उत्तम वाहतूक, टाकऊ पदार्थांच्या विल्हेवाटीची योग्य व्यवस्था असते.

**३. हरित गुंतवणूक (Green Investment) :**

हरित गुंतवणूक म्हणजे असे प्रकल्प, प्रक्रिया आणि कामे यामधील गुंतवणूक की जेथे ऊर्जा आणि साधनांचा कार्यक्षमपणे वापर होतो व पाण्याशिवाय तंत्रज्ञानाचा वापर सोबत परिस्थितीकी संस्थेच्या मुल्याचे संवर्धन होय.

**४. हरित रोजगार (Green Job) :**

हरित रोजगार म्हणजे असा रोजगार की ज्यामध्ये ऊर्जेचा, कच्च्यामालाचा आणि पाण्याचा कमीत कमी वापर असेल, हरितगृह वायुच्या उत्सर्जनावर मर्यादा, जल आणि वायू प्रदूषणात घट तसेच हवामान बदलाला पुरक पर्यावरणीय दर्जात सुधारणा करणे होय.

**५. हरित खरेदी (Green Procurement) :**

हरित खरेदी म्हणजे पर्यावरणावर कमीत कमी प्रतिकूल प्रभाव निर्माण करणारी उत्पादने आणि सेवा खरेदी करणे होय.

**६. हरित कर (Green Tax ) :**

हरित कर म्हणजे असा कर की जो पर्यावरणावर नकारात्मक परिणाम करणाऱ्या उत्पादन, सेवा आणि उपभोगावर आकारला जाईल.

हरित विकासासाठी सहा राष्ट्रीय सक्षम अटी **(Six National Enabling Conditions for Green Development) :**

१. सरकारचा शाश्वत आणि हरित विकासासाठी खर्च वाढविणे.

२. हरित विकासासाठी कायद्याची अधिक प्रभावी अंमलबजावणी करणे.

३. हरित विकासासाठी शिक्षण आणि प्रशिक्षणासाठी प्रसार करणे.

४. हरित विकासासाठी नैसर्गिक संसाधने आणि जमीन हक्क अंतिम शासनाकडे असेल.

५. हरित विकासासाठी मानसिक आणि वर्तन बदलासाठी सक्षम परिस्थिती निर्माण करणे.

६. सर्वसमावेशक शाश्वतता आणि समता निर्माण करण्यासाठी समकालिन व्यवसाय सुलभिकरण करणे.

**हरित विकासासाठी नियंत्रणात्मक यंत्रणा (Green Development Mainstreaming Mechanisms) :**

१. सार्वजनिक पर्यावरणीय खर्चाचा आढावा घेणे.

२. व्युहरचनात्मकरित्या पर्यावरण मूल्यांकन करणे.

३. शाश्वत विकासासाठी परिषद आयोजित करणे.

४. हरित लेखांकन किंवा पर्यायी विकास उपाय अवलंबविणे.

**हरित विकासाची साधने (Green Development Policy Instrument) :**

१. हरित विकसासाठी शाश्वत उत्पादन आणि व्यापार प्रमाणपत्र देणे.

२. हरित विकासासाठी अनुदान किंवा अंशदान देणे.

३. परिस्थितीकी संस्था सेवांसाठी देयके देणे.

४. हरित विकासासाठी पर्यावरणीय वित्तीय सुधारणा करणे.

५. हरित ऊर्जा वापरासाठी चौकट तयार करणे आणि त्यासाठी प्रोत्साहन देणे.

६. सर्वसमावेशक हरित सामाजिक उपक्रमांना प्रोत्साहन देणे. उदा. हरित वारी, माझी वसुंधरा इत्यादी.

७. शाश्वत सार्वजनिक खरेदी करणे. उदा., सरकारने खरेदी करताना हरित विकासाचा विचार करावा.

८. हरित विकासासाठी उद्योग आणि सेवा क्षेत्रात हरित नवप्रवर्तन घडवून आणणे.

विकसित, विकसनशील आणि अल्प विकसित देशांनी आर्थिक विकास साध्य करताना जर शाश्वत आणि हरित विकास साध्य केल्यास आपण पृथ्वीतलावर दिर्घकाळ सुरक्षित राहू शकू. कोरोना महामारीच्या काळात आता सर्वांना हरित विकासाचे महत्व लक्षात आले आहे. भविष्यकाळात आपला आर्थिक विकास साध्य करताना जर पर्यावरणाच्या हरित विकासाचा विचार करुन हरित विकासासाठी कृती केली तर आपणाला मुबलक प्राणवायु मिळेल. आपण हरित विकासाचे ध्येय सोडून दिले तर आपला सुध्दा मृत्यू प्राणवायूच्या अभावामुळे होवू शकतो. आता तरी सावध व्हा आणि हरित विकासाची कास धरा.

## १.३ सारांश :

आर्थिक विकास आणि आर्थिक वृध्दीच्या संकल्पना आणि त्यांच्यातील फरक ही आपण जाणून घेतला. आर्थिक विकास घडून येताना आपण परंपरागत ते आधुनिक आर्थिक विकासाचे निर्देशक घटक अभ्यासले आर्थिक विकास साध्य करताना विविध अडथळे उद्भवतात यांचाही आपण अभ्यास केला. आर्थिक विकास घडवून आणताना होणारा आर्थिक विकास हा शाश्वत आणि हरित असावा हे अत्यंत गरजेचे आहे याचा ही आपण अभ्यास केला. आर्थिक विकास साध्य करताना शाश्वत आणि हरित विकासासाठी आपली कृती काय आणि कशी असायला पाहिजे हे समजले.

## १.४. पारिभाषिक शब्द व त्यांचा अर्थ :

**१. आर्थिक विकास :** दीर्घकालावधीत अर्थव्यवस्थेच्या वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होण्याच्या क्रियेला आर्थिक विकास असे म्हणतात.

**२. आर्थिक वृध्दी :** आर्थिक वृध्दी म्हणजे केवळ एकूण राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होणे होय.

**३. मानव विकास निर्देशांक :** मानव विकास निर्देशांक म्हणजे दीर्घकालीन आणि निरोगी आयुष्य, ज्ञानार्जनास प्रवेश आणि राहणीमानातील सभ्य मानदंड या मानव विकासाच्या तीन मुलभूत आयामांमधील प्रगतीच्या मुल्यांकनासाठी असलेले सारांश मोजमाप होय.

## १.५. स्वयं-अध्ययन प्रश्न :

### अ) खालीलपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुर्ण करा.

१. आर्थिक विकासामध्ये दीर्घकालीन ............ राष्ट्रीय उत्पन्नामधील वाढ अभिप्रेत असते.

अ) वास्तव ब) पैशातील क) अवास्तव ड) यापैकी नाही

२. प्रा. आर्थर लेविस यांच्या मते .......... हा देशाच्या उत्पादनात दरडोई वाढीचे प्रतिनिधित्व करतो.

अ) दरडोई विकास ब) आर्थिक विकास क) आर्थिक वृध्दी ड) वरील सर्व

३. आर्थिक वृध्दी ही संज्ञा ........ देशांच्या संदर्भात वापरली जाते.

अ) विकसित ब) अल्पविकसित क) विकसनशील ड) अविकसित

४. आर्थिक विकासात ............ अभिप्रेत असतात.

अ) संख्यात्मक बदल ब) गुणात्मक बदल क) 'अ' आणि 'ब' पर्याय ड) यापैकी नाही.

५. ............ हे आर्थिक विकासाचे निर्देशक आहेत.

अ) राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ ब) दरडोई वास्तव उत्पन्नातील वाढ

क) आर्थिक कल्याण ड) वरील सर्व

६. मानव विकास निर्देशांक ही संकल्पना ........ यांनी मांडली

अ) मेहबूब उल हक ब) अमर्त्य सेन क) यापैकी नाही ड) अ व ब बरोबर

७. .......... हे आर्थिक विकासातील अडथळे आहेत.

अ) परकीय राजवटीचा परिणाम ब) दारिद्र्याचे दृष्टचक्र क) वाढती लोकसंख्या ड) वरील सर्व

८. औद्योगिक क्रांतीच्या काळात श्रमिक वर्गाच्या शोषणा बरोबरच .......... ही शोषण झाले.

अ) नैसर्गिक साधनसंपत्तीचे ब) कामगार वर्गाचे क) भांडवलाचे क) यापैकी नाही

९. शाश्वत विकास संकल्पनेला १९७२ च्या......... येथिल संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी पर्यावरण परिषदेत मान्यता मिळाली.

अ) नवी दिल्ली ब) रिओ दी जनिरो क) स्टॉक होम ड) वरील सर्व

१०. हरित विकासामध्ये ........... अभिप्रेत असते.

अ) नैसर्गिक साधनांचा पर्यावरणपुरक वापर ब) नैसर्गिक साधनांचा विपुल वापर.

क) हरितगृह वायूचे प्रमाण वाढविणे ड) वरील सर्व

*** एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. आर्थिक विकास म्हणजे काय?

२. आर्थिक वृध्दी म्हणजे काय?

३. आर्थिक विकास आणि आर्थिक वृध्दीतील एक फरक स्पष्ट करा.

४. आर्थिक विकास ही संकल्पना कोणत्या अर्थव्यवस्थेशी संबंधीत आहे.

५. आर्थिक विकासातील दोन अडथळे सांगा.

६. शाश्वत विकास म्हणजे काय?

७. हरित विकास म्हणजे काय?

**१.६. स्वयं-अध्ययन प्रशनांची उत्तरे :**

**(अ)** १. अ) वास्तव — २. ब) आर्थिक विकास

३. अ) विकसित — ४. ब) गुणात्मक बदल

५. ड) वरील सर्व — ६. ड) अ आणि ब दोन्ही बरोबर

७. ड) वरील सर्व — ८. अ) नैसर्गिक साधनसंपत्तीचे

९. क) स्टॉक होम — १०.अ) नैसर्गिक साधनांचा पर्यावरण पुरक वापर

**(ब)** १. एखाद्या देशाच्या वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात दीर्घकालावधीत वाढ होणे म्हणजे आर्थिक विकास होय.

२. एखाद्या देशाच्या विशिष्ट कालावधीतील एकूण राष्ट्रीय उत्पन्नामधील वाढ म्हणजेच आर्थिक वृध्दी होय.

३. आर्थिक विकासामध्ये गुणात्मक बदल तर आर्थिक वृध्दीत संख्यात्मक बदल अभिप्रेत असते.

४. आर्थिक विकास ही संकल्पना विकसनशील अर्थव्यवस्थेशी संबंधीत आहे.

५. वाढती लोकसंख्या आणि भांडवल टंचाई हे आर्थिक विकासातील दोन अडथळे आहेत.

६. स्वत:च्या गरजा पुर्ण करण्यासाठी भविष्यकालीन पिढ्यांची क्षमता बाधित होऊ न देता वर्तमानकालीन गरजा पुर्ण करणे म्हणजे शाश्वत विकास होय.

७. हरित विकास म्हणजे नैसर्गिक संसाधनांचा कार्यक्षम व परिणामकारक उपयोग, दारिद्र्य घट, टाकाऊ पदार्थ नसणे, सर्व सेवांचा योग्य आधार आणि हरित गृह वायुचे प्रमाण कमी असणे होय.

**१.७. सरावासाठी स्वाध्याय :**

**(अ) टीपा लिहा :**

१. आर्थिक विकास

२. आर्थिक वृध्दी

३. आर्थिक विकासाचे निर्देशक घटक

४. आर्थिक विकासातील अडथळे

५. शाश्वत विकास

६. हरित विकास

**(ब) दिर्घोत्तरी प्रश्न :**

१. आर्थिक विकास संकल्पना सविस्तर स्पष्ट करा.

२. आर्थिक विकास अणि आर्थिक वृध्दी यातील फरक सांगा.

३. आर्थिक विकासाचे निर्देशक घटक सविस्तर सांगा.

४. आर्थिक विकासाच्या मार्गातील अडथळ्यांचे विश्लेषण करा.

५. शाश्वत विकास संकल्पनेचे स्पष्टीकरण द्या.

६. हरित विकास म्हणजे काय? स्पष्ट करा.

**१.८. क्षेत्रीय कार्य :**

१. आपल्या परिसरातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकास योजनांचा अभ्यास करणे.

२. आपल्या परिसरातील मानव विकास निर्देशांकाचा अभ्यास करण्यासाठी आकडेवारी गोळा करणे आणि मानव विकास निर्देशांक तयार करणे.

३. आपल्या परिसरातील शाश्वत विकासाला बाधा आणणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

४. आपल्या शहराचे किंवा गावाचे हरित लेखांकन करा.

५. आपल्या शहराच्या किंवा गावाच्या हरित विकासासाठी वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन किंवा इतर अनुषंगीक उपाययोजनत्मक कृती करणे.

**१.९. अधिक वाचनासाठी संदर्भ :**


१. Jhingan M. L. (1997) , "The Economics of Development and Planning" , 31st Revised and Enlarged Edition, Vinda Publication (p) Ltd, Delhi.

२. Misra S. K. and Puri V. K. (1998) , "Economics of Development and Planning (Theory and Practice), Seventh Revised and Enlarged Edition, Himalaya Publishing House, Mumbai.

३. कविमंडन विजय (२०११), 'विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

४. गर्गेरंजन (२०१७), 'शाश्वत विकास', पंकजा ॲण्ड पुष्पज्योती प्रकाशन, औरगांबाद.

५. फडणवीस मृणालिनी (२००९), 'विकासाचे अर्थशास्त्र व सिध्दांत', विद्या प्रकाशन, नागपूर.

६. पाटील जे.एफ. (संपादक) (२०११), 'वृध्दी व विकासाचे अर्थशास्त्र', फडके प्रकाशन कोल्हापूर.

७. OECD Report (2012) " Green Growth and Developing Countries : A Summary for Policy Makers, www.oecd.org/dac/greengrowth.

८. Reports (2015), "Sustainable Development Goals", United Nations Resident Coordinator's office India- New Delhi, www. is.one. un.org.

९. देशपांडे ज्योत्स्ना (२०११), 'विकासाचे अर्थशास्त्र', पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.


* * *

# घटक – २

# विकसनशील आणि विकसित देश

# Developing and Developed Countries

**अनुक्रमणिका**


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

  २.२.१ अविकसितपणाची वैशिष्टे

  २.२.२ आर्थिक विकासावर परिणाम करणारे घटक

  २.२.३ आर्थिक वृध्दिची वैशिष्टे

  २.२.४ भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाची स्थिती

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द व त्याचा अर्थ

२.५ स्वयं-अध्ययन प्रश्न

२.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.७ सरावासाठी स्वाध्याय

२.८ क्षेत्रीय कार्य

२.९ अधिक वाचनासाठी संदर्भ


## २.० उद्दिष्टे :

१) विकसनशील देश आणि विकसित देश संकल्पनांचा अभ्यास करता येईल.

२) अविकसितपणाची वैशिष्टे जाणून घेता येईल.

३) आर्थिक विकासावर परिणाम करणारे घटक समजावून घेता येतील.

४)     आर्थिक वृध्दिची वैशिष्टे जाणून घेता येतील.

५)     भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाची सद्यस्थिती अभ्यासता येईल.

## २.१ प्रास्ताविक :

अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक प्रगतीच्या विश्लेषणासाठी जगातील विविध देशांच्या अर्थव्यवस्थांची विभागणी अविकसित अर्थव्यवस्था (विकसनशील अर्थव्यवस्था) आणि विकसित अर्थव्यवस्था अशी केली आहे. जगभरातील कोणत्याही राष्ट्रासाठी अविकसित अर्थव्यवस्था ही एक मोठी चिंता असू शकते. कारण अविकसित अर्थव्यवस्थे समोर अनेक आर्थिक आणि सामाजिक प्रश्न किंवा समस्या निर्माण झालेल्या असतात. त्यामुळे जगातील प्रत्येक देशाची विकसित अर्थव्यवस्थांच्या यादीत जाण्यासाठीची धडपड सुरु असते. अर्थव्यवस्थेत असलेल्या उपलब्ध साधन सामग्रीच्या सहाय्याने आर्थिक विकास घडवून आणणे हे प्रत्येक अर्थव्यवस्थेचे महत्वाचे आर्थिक उद्दिष्ट असते. त्यामुळे आपणास आर्थिक विश्लेषणाच्या दृष्टीकोनातून अविकसित अर्थव्यवस्था आणि विकसित अर्थव्यवस्था यांच्या विविध पैलूंचा अभ्यास करणे गरजेचे ठरते.

## २.२ विषय विवेचन :

अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांना अविकसित अर्थव्यवस्था (विकसनशील अर्थव्यवस्था) आणि विकसित अर्थव्यवस्था या संकल्पनांच्या विविध पैलूबद्दल जाणून घेण्यासाठी सदरचे प्रकरण उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे सदरच्या प्रकरणात आपण विकसनशील (अविकसित) आणि विकसित देश या संकल्पना, अविकसितपणाची वैशिष्टे, आर्थिक विकासावर परिणाम करणारे घटक, आर्थिक वृध्दिची वैशिष्टे आणि भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाची सद्य:स्थिती अभ्यासणार आहोत.

अविकसितपणाची वैशिष्टे अभ्यासण्यापूर्वी जगातील अर्थव्यवस्थांची विभागणी तीन गटात कशी झाली ते आपण पाहू. जागतिक बँकेनी सन २०११ मध्ये जगातील विविध अर्थव्यवस्थांची विभागणी दरडोई उत्पन्नाच्या आधारावर तीन गटात केली. ती पुढील प्रमाणे.

| **अर्थव्यवस्थेचा प्रकार** | **दरडोई उत्पन्न (U.S. Dollar)** |
|---|---|
| कमी उत्पन्न अर्थव्यवस्था (अल्प विकसित) | १०२५ किंवा त्यापेक्षा कमी |
| मध्यम उत्पन्न अर्थव्यवस्था (विकसनशील/अविकसित) | १०२६ ते १२४७५ |
| उच्च उत्पन्न अर्थव्यवस्था (विकसित) | १२४७६ किंवा त्यापेक्षा जास्त |

सर्वसाधारणपणे अर्थव्यवस्थेची विभागणी अल्प विकसित अर्थव्यवस्था, विकसनशील/अविकसित अर्थव्यवस्था आणि विकसित अर्थव्यवस्था या तीन गटात केली. अविकसित अर्थव्यवस्था ही अल्प विकसित आणि विकसित अर्थव्यवस्थांच्या मधील अवस्था आहे.

### २.२.१. अविकसितपणाची वैशिष्टे (Characteristics of Underdevelopment) :

अविकसित म्हणजे संपूर्ण विकास न झालेली किंवा विकसनशील म्हणजे विकासाच्या मार्गावर असणारी अर्थव्यवस्थेची अवस्था होय. बसू, के. (२०१३) यांच्या मते 'अविकसित' ही संज्ञा सापेक्ष संकल्पना आहे. अविकसितपणा मध्ये प्रामुख्याने विकासाचा अभाव दर्शविला जातो. आर्थिक विकास ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. खरंच विकासाच्या समान पातळीवर दोन देश शोधणे जगात कठीण आहे. जगातील विविध अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक विश्लेषणाच्या सोयीसाठी विविध देशांच्या अर्थव्यवस्थांची मोठ्या प्रमाणावर दोन श्रेणींमध्ये विभागली. त्यामध्ये एक म्हणजे अविकसित किंवा विकसनशील अर्थव्यवस्था आणि दुसरी म्हणजे विकसित अर्थव्यवस्था होय.

अविकसित अर्थव्यवस्थेमध्ये गरीबीचे प्रमाण लक्षणीय असते. शेतीसारखे प्राथमिक क्षेत्र अर्थव्यवस्थेच्या अग्रस्थानी असते. अर्थव्यवस्थेतील मुबलक नैसर्गिक साधनसंपत्ती, मनुष्यबळ या स्वरूपातील संसाधनांचा विवेकपूर्ण वापर केला जात नाही. अर्थव्यवस्थेतील उत्पादन हे पारंपारिक पध्दतींवर अवलंबून राहिल्यामुळे उत्पादन दर व उत्पादकता कमी राहते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे श्रीमंत आणि गरीब यांच्यात लक्षणीय फरक असतो. गरीबीचे प्रमाण जास्त असलेले दिसून येते. तसेच अविकसित अर्थव्यवस्थेमध्ये उच्च लोकसंख्या वाढीचा दर, मुबलक परंतु कमी वापरलेली नैसर्गिक संसाधने, भांडवल निर्मितीचा अल्प दर, अल्प दरडोई उत्पन्न, बेरोजगारीचा उच्च दर आणि मागासलेले राहणीमान अविकसित अर्थव्यवस्थेमध्ये असलेले दिसून येते.

अविकसित अर्थव्यवस्थेचे आकलन होण्यासाठी विविध वैशिष्ट्यांचे चांगले ज्ञान असणे आवश्यक आहे. अविकसित अर्थव्यवस्थेचे किंवा देशांच्या मूलभूत चौदा वैशिष्ट्यांवर आपण प्रकाश टाकणार आहोत. ती पुढील प्रमाणे आहेत.

**१. उत्पन्नाची निम्न पातळी (Low Level of Income) :**

उत्पन्नाची निम्न पातळी हे अविकसित देशांचे महत्वाचे वैशिष्ट्य असलेले दिसून येते. विकसित देशांच्या तुलनेत अविकसित देश उत्पन्नाच्या अत्यंत कमी पातळीवर कार्यरत असतात. विकसित देशांशी तुलना केली तर अविकसित देशांच्या समूहांचे दरडोई उत्पन्न सुध्दा अत्यंत कमी असते. शिवाय, उत्पन्नाच्या वितरणामध्ये असमानता म्हणजेच विषमता असलेली दिसून येते. अविकसित देश उत्पन्नाच्या निम्न स्तरावर कार्यरत असल्यामुळे अर्थव्यवस्थेची स्थिती मागासलेली असलेली असते.

**२. मोठ्या प्रमाणात गरिबी (Mass Poverty) :**

दीर्घकालीन दारिद्र्याचे अस्तित्व हे अविकसित अर्थव्यवस्थांचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. गरिबीची ही समस्या कोणत्याही तात्पुरत्या आर्थिक गैरव्यवस्थेमुळे उद्भवली नाही तर मुख्यत्वे उत्पादन आणि सामाजिक संस्थांच्या सनातनी पद्धतींच्या अस्तित्वामुळे उद्भवलली आहे. लोकसंख्येचा आकार वाढणे, उत्पन्नातील वाढती असमानता आणि किंमतीची पातळी वाढल्याने या अर्थव्यवस्थांमध्ये दारिद्र्याचे प्रमाण हळूहळू वाढते. रॅग्नर नर्क्स (Ragnar Nurkse) यांच्या मते गरिबी किंवा दारिद्र्य हे दारिद्र्याचे कारण आणि अंतिम परिणाम ठरतो. त्यामुळे

अविकसित देशामध्ये गरिबी किंवा दारिद्र्य यांचे प्रमाण जास्त दिसून येते.

जगातील जवळजवळ ७६.८ टक्के लोकसंख्या अविकसित किंवा विकसनशील देशांमध्ये रहात आहे. जी लोकसंख्या एकूण जागतिक पातळीवरील स्थूल जागतिक उत्पादनाच्या केवळ १५.६ टक्के इतकाच आनंद म्हणजेच लाभ घेत आहेत.

### ३. भांडवली निर्मितीचा अभाव (Lack of Capital Formation) :

जगातील विकसनशील किंवा अविकसित देश भांडवल निर्मितीच्या अल्प दरामुळे त्रस्त आहेत. या देशांमध्ये दरडोई उत्पन्नाची पातळी खूपच कमी असल्याने बचतीचा दर देखील खूपच कमी राहतो. यामुळे भांडवल निर्मितीचा अभाव निर्माण झाला आहे. परिणामी देशांमध्ये गुंतवणुकीच्या कमी दरासाठी पुन्हा भांडवल निर्मितीचा कमी दर जबाबदार आहे. भांडवल निर्मितीचा दर कमी म्हणून गुंतवणूक कमी परिणामी दरडोई उत्पन्न कमी त्यामुळे बचत कमी अंतिमत: पुन्हा भांडवल निर्मितीचा दर कमी राहतो.

उदाहरणार्थ, भारत आणि पाकिस्तान सारख्या देशांमध्ये गुंतवणुकीचा दर अगदी १० टक्क्यांपेक्षा कमी आहे, परंतु दुसरीकडे, गुंतवणुकीचा दर यू.एस.ए., कॅनडा इत्यादी विकसित देशांमध्ये मात्र १५ ते ३० टक्क्यांच्या दरम्यान आहे. भांडवल निर्मितीचा कमी दर हा जगातील अविकसित देशांच्या विकासाच्या मार्गातील एक प्रमुख अडथळा मनाला जातो.

### ४. प्रचंड लोकसंख्येचा दबाव (Heavy Population Pressure) :

अविकसित देशातील प्रचंड लोकसंख्येचा दबाव हे एक सर्वत्र दिसून येणारे वैशिष्ट्य आहे. अविकसित देशांवर वाढत्या लोकसंख्येचा प्रचंड दबाव आहे. या देशांतील लोकसंख्येचा नैसर्गिक वाढीचा दर खूप जास्त आहे. कारण तिचा प्रचलित उच्च जन्मदर आणि घसरलेला मृत्यू दर होय. लोकसंख्येचा जास्त दबाव हा कमी दर्जाचे जीवनमान आणि जमिनीच्या धारण क्षेत्राच्या सरासरी आकारात घट होण्याची समस्या अशा विविध समस्या निर्माण करत आहे. अविकसित देशांमधील लोकसंख्येत दरवर्षी २ ते ३ टक्केनी वाढ होत आहे. ज्यामुळे विविध समस्या निर्माण झाल्या आहेत. जसे की शेतजमिनीचे विभाजन आणि तुकडीकरण, बेरोजगारीची, अन्न संकट, दारिद्र्य इ. अविकसित देशातील वाढती लोकसंख्या हि विविध समस्याचे मूळ कारण ठरते.

### ५. कृषी मागासपणा (Agricultural Backwardness) :

अविकसित देशात कृषीसारखे प्राथमिक क्षेत्र अर्थव्यवस्थेच्या अग्रस्थानी असते. त्यामुळे अविकसित देशामधील कृषी मागासलेपणामुळे त्रस्त आहेत. कृषी हे सर्वात महत्त्वाचे क्षेत्र असले तरी, या देशांमध्ये कृषी क्षेत्र पूर्णपणे अविकसित राहिले आहे. पण त्याहून विलक्षण गोष्ट म्हणजे हे देश या कृषी क्षेत्रावर जास्त अवलंबून आहेत. या देशांच्या एकूण लोकसंख्येपैकी जवळजवळ ६० ते ७० टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष शेतीवर अवलंबून असते. अविकसित देशांच्या स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या सुमारे ३० ते ४० टक्के हिस्सा कृषी उत्पादनातून निर्माण होत असतो. या देशांतील कृषी उत्पादकता आणि उत्पादन दर खूप महत्त्वाचा असूनही अजून त्यामध्ये अत्यंत मागासलेपणा राहिलेला आहे.

अविकसित देशांमध्ये शेतकरी अजूनही पारंपारिक पद्धतींचा अवलंब करत आहेत. आधुनिक तंत्रज्ञान अत्यंत मर्यादित प्रमाणात वापरले जात आहे. अश्या प्रकारे अविकसित देशामध्ये कृषी मागासलेपणा दिसून येतो.

## ६. बेरोजगारीची समस्या (Unemployment Problem) :

जास्त लोकसंख्येचा दबाव आणि पर्यायी व्यवसायाचा अभाव यामुळे अविकसित देशांमध्ये प्रचंड बेकारी आणि बेरोजगारीची समस्या निर्माण झाली आहे. अविकसित देशांच्या औद्योगिक आणि सेवा क्षेत्रामध्ये पर्यायी व्यवसायांच्या आणि रोजगारीच्या वाढीच्या अनुपस्थितीमुळे बेरोजगारीची समस्या अधिक तीव्र बनत आहे. लोकसंख्येच्या वाढीमुळे कृषी क्षेत्रात अतिरिक्त लोकसंख्या ढकलली जात आहे. त्याचा कृषी क्षेत्रावरील भार वाढत आहे. कृषी क्षेत्रावर अशा प्रकारच्या वाढत्या अवलंबनामुळे अविकसित अर्थव्यवस्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी किंवा अल्प रोजगारी निर्माण होत आहे. शिवाय अशा अर्थव्यवस्थांमध्ये सुशिक्षित बेरोजगारीची समस्या देखील औद्योगिक विकासाअभावी दिवसेंदिवस हळूहळू वाढत निघाली आहे.

## ७. मुबलक नैसर्गिक संसाधने (Abundant Natural Resources):

अविकसित देशांमध्ये आर्थिक वाढीची वेगवान गती राखण्यासाठी, विविध प्रकारच्या नैसर्गिक संसाधनांचा पुरेशा प्रमाणात ताबा घेणे आणि त्याचा वापर करणे अत्यंत महत्वाचे आहे. परंतु अल्प विकसित देश एकतर कच्च्या मालाच्या कमतरतेने ग्रस्त आहेत किंवा स्वतःच्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा गैरवापर करत आहेत.

जर आपण अविकसित देशांच्या नैसर्गिक साधनसंपत्तीची स्थिती पाहिली तर ती मुबलक प्रमाणात असलेली दिसून येते. काही अविकसित देशांकडे नैसर्गिक संसाधने जसे की, जमीन, पाणी, खनिज साठे, जंगल संपत्ती इत्यादी पुरेशा प्रमाणात आहेत. परंतु ही संसाधने मोठ्या प्रमाणावर वापरली गेली नाहीत. मुबलक नैसर्गिक संसाधने योग्य प्रमाणात न वापरल्यामुळे अशा देशांना विविध अडचणी भेडसावत आहेत. या अडचणींमध्ये प्रदेशाची दुर्गमता, भांडवलाची कमतरता, मागासलेले तंत्रज्ञान, वाहतूक अडथळे आणि बाजाराची मर्यादा यांचा समावेश आहे. अशा प्रकारे अविकसित देश नैसर्गिक संसाधनांचा वापर करून, त्यांच्या स्वत: च्या किमान पुढाकाराने त्यांची अर्थव्यवस्था विकसित करू शकतात.

## ८. तंत्रज्ञान आणि कौशल्यांची कमतरता (Shortage of Technology and Skills) :

अविकसित देशामध्ये तंत्रज्ञान आणि कौशल्यांची कमतरता हे महत्वाचे वैशिष्ट्ये असलेले दिसून येते आहे. अविकसित देशांना कमी दर्जाचे तंत्रज्ञान आणि कुशल मनुष्यबळाची तीव्र कमतरता भेडसावत आहे. कमकुवत तंत्रज्ञान आणि कमी कौशल्ये हि अकार्यक्षम आणि अपुऱ्या उत्पादनासाठी जबाबदार ठरली आहेत. ज्यामुळे अर्थव्यवस्थेतील जनतेमध्ये गरिबी किंवा दारिद्र्य असलेले आपणास पहावयास मिळत आहे. मागास तंत्रज्ञानाच्या वापरामुळे अशा देशांमध्ये आर्थिक वाढीचा वेग अत्यंत मंद गतीचा आहे. तांत्रिक मागासलेपणामुळे मनुष्यबळामध्ये कौशल्यांची कमतरता असलेली दिसून येते. परंतु कृषी आणि औद्योगिक क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर या देशांमध्ये अत्यंत आवश्यक आहे. यासाठी पुरेशा भांडवलाची, तांत्रिक ज्ञानाची आणि प्रशिक्षणाची आवश्यकता आहे.

## ९. पायाभूत विकासाचा अभाव (Lack of Infrastructural Development) :

पायाभूत विकासाचा अभाव हे अविकसित देशांचे सामान्य वैशिष्ट्य आहे. वाहतूक, दळणवळण, वीज निर्मिती आणि वितरण, बँकिंग सुविधा, शैक्षणिक सुविधा, आरोग्यविषयक सुविधा आणि पिण्याच्या पाण्याची सुविधा इत्यादी बाबतीत असे देश बहुतेक विकसित देशांच्या तुलनेत खूपच मागासलेले आहेत. अशाप्रकारे अपुऱ्या पायाभूत सुविधांमुळे, या देशांमध्ये आर्थिक विकासाची गती अत्यंत मंद आहे. पायाभूत सुविधांच्या विकासासाठी मोठ्याप्रमाणात भांडवल गुंतवणुकीची आवश्यकता असते. परंतु अविकसित देशामध्ये भांडवलाची कमतरता असते, तसेच तंत्रज्ञान आणि कौशल्यांची हि कमतरता असते. त्यामुळे पायाभूत सुविधांचा विकास करण्यात अविकसित देशांना अनेक अडचणी येत असतात.

## १०. औद्योगिकीकरणाचा अभाव (Lack of Industrialization):

अविकसित देश औद्योगिक विकासाच्या अभावामुळे सर्वत्र ओळखले जातात. भांडवल निर्मितीचा अभाव, यंत्रसामग्री आणि साधनांच्या पुरवठ्यातील कमतरता तसेच या देशांतील लोकांकडून पुढाकार आणि उपक्रमाच्या अभावामुळे या देशांमध्ये औद्योगिकीकरणाची गती अत्यंत मंद आहे.

औद्योगिक विकासाची प्रचंड क्षमता असूनही हे देश औद्योगिक क्षेत्राचा योग्य पायावर विकास करू शकले नाहीत. शिवाय या देशांनी साध्य केलेला कोणताही औद्योगिक विकास हा केवळ काही मर्यादित क्षेत्रांपुरताच मर्यादित राहिला आहे.

## ११. योग्य बाजाराचा अभाव (Lack of Proper Market):

अविकसित देश योग्यरित्या विकसित झालेल्या बाजाराच्या अभावामुळे त्रस्त आहेत. अशा देशांनी कितीही बाजारपेठ विकसित केली असली तरी, ते मर्यादांच्या समस्येने ग्रस्त आहेत. उदा. बाजार माहितीची कमतरता, विविधतेचा अभाव, स्पर्धेचा अभाव, पुरेशी मागणी नसणे किंवा मागणीनुसार पुरवठा नसणे इत्यादी.

## १२. मोठ्या प्रमाणात निरक्षरता (Mass Illiteracy):

अविकसित देश मुख्यतः निरक्षरतेच्या अस्तित्वाद्वारे दर्शविले जातात. निरक्षरतेमुळे या देशांतील लोक खूपच अंधश्रद्धाळू, दैववादी आणि पुराणमतवादी असतात. जे या देशांतील लोकांच्या उद्योजकतेच्या आणि उपक्रमांच्या अभावासाठी पुन्हा जबाबदार असतात. एकूण लोकसंख्येच्या जवळपास ४० टक्के लोक निरक्षर असतात. निरक्षरते मध्ये महिलांचे प्रमाण सर्वाधिक असलेले दिसून येते. निरक्षरतेमुळे अविकसित देशात अनेक समस्या निर्माण झालेल्या असतात. अविकसितपणाचे हे एक महत्वाचे कारण आणि वैशिष्ट्य ठरले आहे.

## १३. गरीब (मागास) सामाजिक-आर्थिक स्थिती (Poor Socio-Economic Condition):

अविकसित देश पूर्णपणे गरीब किंवा मागासलेल्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीमुळे ग्रस्त आहेत. या देशांतील आर्थिक विकासाच्या मार्गात विविध सामाजिक-आर्थिक घटकांद्वारे अडथळे आणले जात आहेत. संयुक्त कुटुंब व्यवस्था, सार्वत्रिक विवाह, दैववादीवृत्ती, महागड्या सामाजिक चालीरीती - रीतिरिवाज आणि

वारसा हक्क कायदा इत्यादीमुळे अविकसित देशातील लोकांची सामाजिक – आर्थिक स्थिती गरीब किंवा मागासलेलीच राहते.

### १४. अकार्यक्षम प्रशासकीय व्यवस्था (Inefficient Administrative Set Up) :

अविकसित देश त्याच्या विद्यमान अकार्यक्षम प्रशासकीय व्यवस्थेमुळे त्रस्त आहेत. अकार्यक्षमतेमुळे भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात वाढलेला पहावयास मिळतो. कार्यक्षम आणि सुयोग्य प्रशासकीय व्यवस्थेच्या अनुपस्थितीमुळे अशा देशांना सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या धोरणांची आखणी आणि अंमलबजावणी करता येत नाही. अकार्यक्षम प्रशासकीय व्यवस्थेमुळे राजकोषीय धोरणाची आणि मौद्रिक धोरणाची सुध्दा प्रभावीपणे अंमलबजावणी करता येत नाही. भांडवल उभारणी आणि गुंतवणुकीच्याबाबतीत योग्य निर्णय घेता येत नाहीत. ज्यामुळे अर्थव्यवस्थेत संपूर्ण गैरव्यवहार सुरु होतो.

## २.२.२. आर्थिक विकासावर परिणाम करणारे घटक (Factors affecting Economic Development):

आर्थिक विकास ही आधुनिक संकल्पना असून दुसऱ्या महायुद्धानंतर यांच्या अभ्यासाला अधिक महत्व प्राप्त झाले आहे. आर्थिक विकासामध्ये देशाच्या वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात सातत्याने आणि दीर्घकालीन प्रक्रियेने वाढ होणे अपेक्षित असते. परंतु अविकसित अर्थव्यवस्थांमध्ये सार्वत्रिक दारिद्र्य बेरोजगारी, अल्प उत्पादकता, वाढती लोकसंख्या आणि निकृष्ठ राहणीमान अशा विविध समस्या निर्माण झालेल्या असतात. तर विकसित अर्थव्यवस्थांमध्ये आर्थिक विकासाचा वेग टिकवणे, व्यापार चक्रे टाळणे यासाठी आर्थिक विकासावर परिणाम करणाऱ्या घटकांचा आपण अभ्यास करणे गरजेचा ठरणार आहे. आर्थिक विकासावर परिणाम करणारे घटक पुढील प्रमाणे आहेत.

### १. पायाभूत सुविधांचे स्तर (Levels of Infrastructure) :

पायाभूत सुविधांमध्ये वाहतूक, दळणवळणाची साधने, रस्ते, रेल्वे आणि बंदरे यामधील गुंतवणूक वाढल्यामुळे भारतातील आर्थिक विकास सुधारला आहे. पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक वाढल्यामुळे खाजगी क्षेत्रातील गुंतवणूक मोठ्या प्रमाणात वाढते. या गुंतवणुकीचा काही भाग विकसित देशांच्या अनेक कंपन्यांकडून आलेला असतो. अशा गुंतवणुकीतील वाढ रोजगार आणि उत्पन्न वाढवते, बचत आणि भांडवल निर्मिती वाढवते, त्यामुळे आर्थिक विकासावर त्याचा अनुकूल परिणाम घडून येतो.

### २. शिक्षण (Education) :

शिक्षणाचा श्रम उत्पादकतेवर महत्त्वपूर्ण प्रभाव पडतो. कारण श्रम हा उत्पादनाचा महत्वाचा घटक आहे. अशा श्रम या उत्पादक घटकाचा गुणात्मक विकास घडवून आणण्यासाठी शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्वाची ठरली आहे. म्हणूनच शिक्षण हा मानवी भांडवलाच्या (श्रमाच्या) विकसातील महत्वाचा घटक आहे. मूलभूत साक्षरता आणि कौशल्याशिवाय श्रमापासून सेवा क्षेत्रात नवीन आणि उच्च तंत्रज्ञान उद्योग विकसित करणे कठीण आहे. उदाहरणार्थ, भारतातील शिक्षणाच्या चांगल्या पातळीमुळे माहिती तंत्रज्ञान आणि कॉल सेंटरसारख्या सेवा उद्योगांमध्ये तसेच औद्योगिक क्षेत्रात रोजगार वाढीच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. म्हणजेच शिक्षण हा आर्थिक


विकासावर परिणाम करणारा महत्वाचा घटक ठरला आहे. शिक्षणाचा आर्थिक विकासावर धनात्मक परिणाम घडून येतो.

### ३. आवक गुंतवणुकीचे स्तर (Levels of Inward Investment) :

विदेशी आणि देशांतर्गत गुंतवणूक आकर्षित करू शकणारे विकसनशील देश भांडवलाच्या उच्च पातळीमुळे आर्थिक विकास वेगाने करत आहेत. तसेच विकसनशील देशांनी बहुराष्ट्रीय कंपन्यांना त्यांच्या अर्थव्यवस्थेत आकर्षित करण्याच्या प्रयत्नामुळे विकासात लक्षणीय वाढ घडून आणली आहे. नवीन औद्योगिक देशांसाठी आर्थिक विकास वाढवण्यासाठी विदेशी आणि देशांतर्गत गुंतवणूकीने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. अर्थव्यवस्थेतील आवक गुंतवणूक हि उद्योगात आणि सेवा क्षत्रात गुंतविल्यास त्याचे भांडवलात रुपांतर होते. भांडवल हा उत्पादनाचा एक महत्वाचा घटक आहे. त्यामुळे आवक गुंतवणुकीचा परिणाम आर्थिक विकसावर होत असतो.

### ४. बचतीचा स्तर/भांडवल (Levels of Savings / Capital) :

हेरॉल्ड-डोमर प्रतिमान (Harrod-Domar model) सारख्या वाढीच्या प्रतीमानामध्ये बचत आणि भांडवलाची पातळी आर्थिक वाढ निश्चित करण्यासाठी मुख्य घटक म्हणून पाहिली जाते. उच्च बचतीमुळे वाढीव गुंतवणूक, उच्च वाढ आणि त्यामुळे उच्च बचत यांचे सद्‌गुण वर्तुळ निर्माण होते. परिणामी आर्थिक विकास वेगाने होतो. बचतीमधून भांडवल निर्मिती आणि आर्थिक विकास कसा घडून येतो याबाबतचे प्रतिमान हेरॉल्ड-डोमर यांनी स्पष्ट केले. आकृतीच्या सहाय्याने ते अधिक स्पष्ट केले आहे.



वरील प्रतीमानाच्या सहायाने बचत आणि भांडवल स्थर वाढून आर्थिक विकासाचा वेग वाढविता येतो हे दिसून येते.

### ५. **राजकीय स्थिरता, कायदा आणि सुव्यवस्था (Political Stability / Law and Order):**

विकसनशील अर्थव्यवस्थांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी, कंपन्यांना प्रोत्साहन देण्यासाठी राजकीय स्थिरता आणि खाजगी मालमत्तेचे संरक्षण हे सर्वात महत्वाचे घटक म्हणून स्थान देण्यात आले आहेत. अस्थिरतेचे कोणतेही लक्षण विकसनशील देशांमध्ये गुंतवणुकीचे आर्थिक आणि वैयक्तिक जोखीम वाढवते. राजकीय स्थिरता, कायदा आणि सुव्यवस्था यामध्ये अस्थैर्य असेल तर आर्थिक विकासावर त्याचा अत्यंत प्रतिकूल परिणाम होत असतो. दीर्घकालीन नागरी अशांतता/लष्करी संघर्ष हा आर्थिक विकासाचा सर्वात मोठा अडथळा आहे, कारण यामुळे गुंतवणूक सुकते म्हणजे नष्ट होते किवा थांबते. परिणामी अनुत्पादक मार्गाने अर्थव्यवस्थेमधील संसाधने वाया जातात.

### ६. **व्यापक आर्थिक स्थिरता (Macroeconomic Stability):**

राजकीय स्थिरतेप्रमाणेच, व्यापक आर्थिक स्थिरता गुंतवणूक आणि विकासाला प्रोत्साहन देते. यामध्ये महागाईचे कमी दर आणि विनिमय दर स्थिरता यांचा समावेश होतो. जलद अवमूल्यनामुळे भांडवल उड्डाण आणि आर्थिक वाढ कमी होऊ शकते. त्यामुळे महागाई, विनिमय दर, बेरोजगारी आणि दारिद्र्य यांचा आर्थिक विकासावर आत्यंतिक परिणाम होत असतो.

### ७. **कामगार गतिशीलता (Labour Mobility):**

कामगारांचा आर्थिक विकासावर फार मोठा परिणाम होत असतो. कारण श्रम म्हणजेच कामगार हा उत्पादनाचा एक महत्वाचा घटक आहे. श्रम तुलनेने अनुत्पादक शेतीतून अधिक उत्पादक क्षेत्राकडे जाऊ शकतो का? यावर औद्योगिक आणि सेवा क्षेत्राचा विकास अवलंबून असतो. कामगारांच्या गतिशीलतेवर अनेक आर्थिक आणि सामाजिक घटक परिणाम करीत असतात. कामगार उत्पादन घटक असल्याने आर्थिक विकासावर परिणाम करीत असतो.

### ८. **परदेशी मदत (Foreign Aid):**

विकसित देश आणि आंतरराष्ट्रीय संस्था जागतिक लक्ष्य साध्य करणे, पायाभूत सुविधा आणि राहणीमान सुधारण्यासाठी आर्थिक मदत करू शकते. कमी पातळीची बचत आणि भांडवली गुंतवणूक असलेल्या विकसनशील अर्थव्यवस्थांसाठी हि आर्थिक मदत महत्त्वाची ठरू शकते. परदेशी मदत कशी वापरली जाते, यावर आर्थिक विकास अवलंबून असतो. मग ती व्यापार करारांशी जोडलेले असो किंवा शिक्षण आणि आरोग्य सेवेसारख्या क्षेत्रातील असो, बाजारातील अपयशावर मात करण्यासाठी ती वापरली जाते. परदेशी मदतीवर काही अर्थतज्ज्ञांकडून टीका देखील केली जाते. परंतु परदेशी मदत आर्थिक प्रोत्साहनांवर परिणाम करू शकते. मदतीचा परिणाम अनुकूल किंवा प्रतिकूल सुध्दा असू शकतो.

## ९. **प्रादेशिक परिणाम (Regional Effects):**

एखाद्या देशांच्या अर्थव्यवस्थेच्या विकासाचा दुसऱ्या शेजारी देशाच्या आर्थिक विकासावर जोरदार प्रभाव पडतो. उदाहरणार्थ, १९८० आणि १९९० च्या दशकात दक्षिण पूर्व आशियाने आर्थिक वाढ आणि विकासाचा मजबूत स्तर दर्शविला. तथापि, उप-सहारा आफ्रिकन देशांनी मात्र अतिशय मंद वृध्दी अनुभवली. हे अंशतः प्रदर्शन परिणामाच्या प्रभावामुळे घडते आहे. जवळच्या शेजाऱ्या राष्ट्रांशी व्यापार सर्वात फायदेशीर आणि कार्यक्षम असतो असा आंतरराष्ट्रीय सिद्धांत सांगतो. जर एखाद्या शेजारील राष्ट्राने अधिक चांगले काम केले, तर वाढीव व्यापार आणि वाढीव गुंतवणूक यासारख्या घटकांचा आर्थिक विकासावर अत्यंत चांगला परिणाम होऊ शकतो.

## १०. **नैसर्गिक संसाधने (Natural Resources) :**

नैसर्गिक संसाधनांचे उच्च स्तर असलेले देश आर्थिक विकासासाठी याचा वापर करू शकतात. उदाहरणार्थ, इंधन तेलापासून मिळणाऱ्या उत्पन्नामुळे आखाती देशांना वास्तविक जीडीपीच्या उच्च पातळीवर झपाट्याने विकसित होण्यास सक्षम केले आहे. आफ्रिकन आणि आशियाई देशांसाठी, विविध प्रकारचा कच्चा माल हा महसूल आणि निर्यात कमाईचा महत्त्वाचा स्त्रोत आहे. ज्यामुळे उच्च आर्थिक विकास शक्य होतो.

तथापि, नैसर्गिक संसाधने आणि आर्थिक विकास यांच्यातील दुवा सरळ नाही. जिथे अर्थव्यवस्था अर्थव्यवस्थेत विविधता आणण्यासाठी कोणतेही प्रोत्साहन न देता प्राथमिक वस्तूंच्या उत्पादनात अडकली आहे, तिथे कच्च्या मालाच्या निर्यातीमुळे आणि प्रचंड वापरामुळे 'संसाधनाचा बेसुमार वापर शाप' ठरू शकतो. हे नैसर्गिक संसाधने विकसनशील अर्थव्यवस्थेच्या मालकीचे आहेत की नाही यावर अवलंबून असू शकते. नैसर्गिक संसाधनाच्या पर्याप्त आणि विवेकी वापरासाठी मानवी भांडवल महत्वाची भूमिका बजावत असते.

## ११. **कर दर आणि भ्रष्टाचाराची पातळी (Tax Rates and Levels of Corruption):**

कर दराचा वस्तू आणि सेवांच्या मागणी आणि गुंतवणुकीवर परिणाम होत असतो. उच्च कर दर वस्तू आणि सेवांच्या मागणी आणि गुंतवणुकीवर विपरीत परिणाम घडून आणतात. विदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी कमी कर दर महत्त्वाचा असू शकतो. तथापि, देशातील कराचे दर कमी किवा मर्यादित असतील तर देशांतर्गत विविध उद्योग आणि उपक्रमी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करू शकतात. देशात असलेल्या प्रशासकीय यंत्रणेतील कारभार गुंतवणूक वाढीवर प्रभाव टाकू शकते. सुलभ प्रशासकीय यंत्रणा अनुकूल परिणाम घडवू शकते.

## १२. **मुक्त व्यापार विरुद्ध संरक्षणवाद (Free Trade vs Protectionism):**

आर्थिक विकासातील एक महत्वाची चर्चा मुक्त व्यापार विरुद्ध संरक्षणवाद याच्या फायद्यांमध्ये आहे. जकात अडथळे काढून टाकल्याने निर्यातीत वाढ होऊ शकते जी आर्थिक विकासासाठी महत्वपूर्ण योगदान देते. कोरिया, तैवान आणि चीन सारख्या आशियाई देशांचा शुल्क (जकाती) हटवल्यामुळे फायदा झाला आहे. तथापि, प्राथमिक वस्तू आणि सेवांच्या उत्पादनात अडकलेल्या विकसनशील अर्थव्यवस्थांसाठी नवीन शिशु

उद्योग विकसित करण्यास सक्षम होण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात (अल्पकाळात) संरक्षणवादाचे धोरण आर्थिक विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरते.

**१३. पर्यटन (Tourism):**

आकर्षक हवामान आणि पर्यावरणासह विकसनशील अर्थव्यवस्थांसाठी पर्यटन हे परदेशी कमाईचे एक महत्त्वाचे साधन आहे. देशातील पायाभूत सुविधा, दळणवळणाची साधने आणि नवीन हॉटेल्स विकसित करण्यासाठी ते प्रोत्साहन असू शकते. पर्यटन उद्योगाच्या विकासामुळे आर्थिक विकासावर अनुकूल परिणाम घडून येतो.

**१४. उद्योजकतेची संस्कृती (Culture of Entrepreneurship) :**

अर्थव्यवस्थेतील उद्योजकतेसाठी दिले जाणारे प्रोत्साहन, उपक्रमशीलता यांचा आर्थिक विकासावर परिणाम घडून येत असतो. उदाहरणार्थ, गेल्या काही दशकात भारताने भौतिक सुधारणेवर अधिक लक्ष केंद्रित करून रूढीवादी आणि धार्मिक समाजातून अधिक धर्मनिरपेक्ष समाजात बदल घडून आणला आहे. त्यामुळे देशात उद्योजकतेची संस्कृती रुजवली जात आहे. उदारणार्थ, विशेष आर्थिक क्षेत्र, विशेष निर्यात क्षेत्र, स्टार्ट अप इंडिया, आत्मनिर्भर भारत इत्यादी.

**१५. नियमन/मुक्त बाजार व्यवस्था (Regulation / Free Market System) :**

अर्थव्यवस्थेत बाजार यंत्रणेकडून निर्णय घेतले जात असतील तर आर्थिक विकासावर अनुकूल परिणाम घडून येतो. उदारणार्थ, खाजगीकरण, निर्हस्तक्षेप नीती इत्यादी. अर्थव्यवस्थेत जर निर्बंध किंवा नियंत्रणे असतील, परवाना धोरण, विविध कर, नोटाबंदी इत्यादी मुळे आर्थिक विकासामध्ये अडथळे निर्माण होतात.

अशा विविध घटकांचा आर्थिक विकासावर अनुकूल किंवा प्रतिकूल परिणाम घडून येऊ शकतो. ज्या घटकांचा विकासावर अनुकूल परिणाम होतो, त्यामुळे विकासाची गती अधिक वाढते तर ज्या घटकामुळे विकासाच्या प्रक्रीयेत अडथळे निर्माण केले जातात त्यामुळे विकासाची गती मंदावते. सरकार विविध आर्थिक धोरणे आणि नियोजनाच्या माध्यमातून विकासातील अडथळे दूर करून विकासाचा वेग वाढविण्यासाठी प्रयत्न करीत असते. त्यासाठी आर्थिक विकासावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास अत्यंत महत्वाचा ठरतो.

**२.२.३. आर्थिक वृध्दिची वैशिष्टे (Features of Economic Growth):**

विकसित देशांच्या आधुनिक काळातील आर्थिक वृद्धीच्या आधारावर अभ्यास केल्यास आपणास विविध आर्थिक वृद्धीची वैशिष्टे सांगता येतील.ती पुढील प्रमाणे.

**१. लोकसंख्या आणि दरडोई उत्पादन वाढीचा उच्च दर (High Rates of Growth Per Capita Output and Population) :**

विकसित देशांच्या गेल्या १०० वर्षाच्या आर्थिक इतिहासाचा आढावा घेतल्यास असे अनुभवास येते की, लोकसंख्या वाढीचा सरासरी दर १ टक्के आणि सरासरी दरडोई उत्पादन वाढीचा दर २ टक्के राहिलेला दिसून

येतो. आर्थिक वृद्धीच्या काळात विकसित देशांच्या लोकसंख्येमध्ये अधिक वेगाने वाढ होत होती. परंतु देशाच्या आर्थिक वृध्दीबरोबर दरडोई उत्पादन वाढीचा दर मात्र अधिक होता. लोकसंख्या वाढीबरोबर मानवी भांडवलातही वेगाने वाढ झाली. लोकसंख्या हा उत्पादनासाठीचा श्रम (कामगार) हा घटक पुरवीत असल्यामुळे दरडोई उत्पादन वाढ वेगाने घडून आली.

### २. **उत्पादकतेमधील वाढ (Rise in Productivity) :**

बहुतेक सर्वच विकसित राष्ट्रांमध्ये आधुनिक काळात सर्वच क्षेत्रात एकूण उत्पादन आणि उत्पादकतेत मोठ्याप्रमाणात वाढ झालेली आढळते. त्यामुळेच दरडोई उत्पादनामध्ये सुध्दा भरीव आणि वेगाने वाढ झाली आहे. विकसित देशामधील एकूण उत्पादन आणि उत्पादकतेच्या वाढीचे प्रमुख कारण म्हणजे औद्योगीकीकरण आणि यांत्रिक-तांत्रिक प्रगती हे आहे. लोकसंख्या वाढीतून मानवी भांडवलामध्ये भरीव आणि वेगाने झालेली वाढ यांत्रिक-तांत्रिक आणि औद्योगिक प्रगतीला सहाय्यभूत ठरली. लोकसंख्येमधील गुणात्मक वाढ, यांत्रिक-तांत्रिक प्रगती, माहिती तंत्रज्ञानाची प्रगती विकसित देशांच्या उत्पादकता वाढीस अत्यंत महत्वाची ठरली.

### ३. **रचनात्मक बदल (Structural Changes) :**

आर्थिक वृध्दीच्या वैशिष्ट्यांमध्ये हे वैशिष्ट्य अत्यंत महत्त्वाचे आहे. विकसित देशांच्या वृद्धीचा अभ्यास केल्यास असे निदर्शनास येते की, अर्थव्यवस्थेमधील विविध क्षेत्रांचा राष्ट्रीय उत्पादनातील हिस्सा आणि विविध क्षेत्रामध्ये गुंतलेली श्रमशक्ती यांच्यामध्ये रचनात्मक बदल झालेले दिसून येतात.

विकसित देशांच्या आर्थिक वृध्दी मध्ये अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांचा राष्ट्रीय उत्पादनातील हिस्सा बदललेला दिसून येतो. आर्थिक वृध्दी बरोबर राष्ट्रीय उत्पन्नातील शेती क्षेत्राचा हिस्सा घटला असून उद्योग आणि सेवा क्षेत्राचा हिस्सा वेगाने वाढला आहे. उद्योगापेक्षा सेवा क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा अत्यंत वेगाने वाढला आहे. जगात याला फक्त ऑस्ट्रेलिया हा देश अपवाद ठरला आहे. उद्योग क्षेत्राचा हिस्सा ५० टक्के पेक्षाही जास्त तर सेवा क्षेत्राचा हिस्सा ही जास्त असलेला दिसून येतो. शेती क्षेत्राचा हिस्सा मात्र ५ टक्केच्या दरम्यान असलेला पहावयास मिळतो. एकूणच आर्थिक वृध्दी बरोबर उद्योग आणि सेवा क्षेत्राचा हिस्सा वाढत जाऊन शेती क्षेत्राचा हिस्सा घटलेला आहे.

विकसित देशांमधील विविध क्षेत्रात गुंतलेली श्रमशक्ती सुध्दा आर्थिक वृध्दी बरोबर बदलत गेलेली दिसून येते. मोठ्या प्रमाणात शेती क्षेत्रात गुंतलेली श्रमशक्ती हळूहळू उद्योग आणि सेवा क्षेत्रात स्थलांतरीत झालेली पहावयास मिळते. विकसीत राष्ट्रात सर्वाधिक श्रमशक्ती शेवटी सेवा क्षेत्रात गुंतलेली असते.

### ४. **शहरीकरण (Urbanization):**

आर्थिक वृध्दीचे हे आणखी एक महत्वाचे वैशिष्ट्य होय. औद्योगिक क्रांतीने उद्योगधंद्यांची वाढ वेगाने होऊ लागली. शहरांच्या सभोवती उद्योगांची वाढ होऊ लागली. उद्योगामध्ये रोजगारासाठी, कच्च्यामालाच्या पुरवठ्यासाठी शेती क्षेत्रातील श्रमिक शहरांकडे स्थलांतरित होऊ लागले. त्यांची शहरातील घरांची, दळणवळण साधनांची, पायाभूत सुविधांची मागणी वाढू लागली. ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात लोकसंख्या शहरीभागाकडे

रोजगारासाठी आकर्षित होऊ लागली. परिणामी आर्थिक वृध्दी आणि शहरीकरण यांच्यात धनात्मक संबंध असलेला दिसून येतो. आर्थिक वृध्दी बरोबर शहरीकरण वाढले.

**५. श्रमिक, वस्तू आणि भांडवल यांचे आंतरराष्ट्रीय स्थलांतरण (International Migration of Labour, Goods and Capital) :**

प्रा. सायमन कुझनेट्स यांनी स्पष्ट केलेला हा घटक सुध्दा आर्थिक वृध्दीचे एक महत्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. सायमन कुझनेट्स यांना विकसित देशांच्या अभ्यासावरून असे दिसून आले की, विकसित देशांच्या आर्थिक प्रगतीबरोबर श्रमिक, वस्तू आणि भांडवलाचे आंतरराष्ट्रीय स्थलांतरण झाले. विकसित देशातील प्रगत उत्पादन तंत्र वाहतूक-दळणवळणाची साधने आणि दूरसंचार यामुळे विकसित देशात उत्पादित झालेल्या वस्तू आणि सेवांचा पुरवठा जगातील इतर विकसनशील आणि अविकसित देशांकडे सुरु झाला. विकसित देशातील भांडवल सुध्दा विकसनशील आणि अविकसित देशांकडे प्रवाहित झाले. कारण विकसनशील आणि अविकसित देशामध्ये मुबलक नैसर्गिक साधन संपत्ती पडून होती. विकसित देशांतील विकासाच्या प्रवाहामुळे श्रमिकांची मागणी वाढू लागली. परिणामी श्रमिक विकसित देशांकडे आकर्षित झाले. श्रमिकांचे स्थलांतरण विकसनशील आणि अविकसित देशांकडून विकसित देशांकडे सुरु झाले ते आजतागायत सुरूच आहे. एकूणच प्रा. सायमन कुझनेट्स यांचा अभ्यास पहिल्या महायूध्दापूर्वीचा आहे. परंतु जागतिकीकरणाच्या काळात ही प्रवृत्ती पुन्हा सिध्द झाली आहे, असेच म्हणावे लागेल.

**६. विकसित देशांचा प्रभाव परिणाम (Influence of Developed Countries):**

विकसित देशांच्या आर्थिक वृध्दी बरोबर वृध्दीचा परिणाम विकसनशील आणि अविकसित देशांवर झालेला दिसून येतो. म्हणून हे आर्थिक वृध्दीचे वैशिष्ट्य ठरते. विकसित देशातील प्रगत तंत्रज्ञांनातून उत्पादित झालेल्या वस्तू आणि सेवा यांची निर्यात विकसनशील आणि अविकसित देशांकडे वेगाने वाढते. अविकसित आणि विकसनशील देश विकसित देशांच्या सर्वच घटकांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे अविकसित आणि विकसनशील देशांचे विकसित देशांच्यावरील अवलंबित्व वाढते. कारण विकसित देशांच्या सर्वच क्षेत्रांचा प्रभाव परिणाम अविकसित आणि विकसनशील देशांवर होत असताना अपणाला दिसून येतो आहे.

**७. माहिती तंत्रज्ञानातील प्रगती (Progress in Information Technology) :**

अलीकडील काळातील विकसित देशांच्या आर्थिक वृध्दीतील महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे माहिती तंत्रज्ञांनातील प्रगती हे आहे. माहिती तंत्रज्ञानाचा विकास विकसित देशांमध्ये अत्यंत वेगाने झालेला दिसून येतो. माहिती तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे अर्थव्यवस्थेतील सर्वच क्षेत्रात अत्यंत झपाट्याने आणि रचनात्मक बदल होत गेले आहेत. आर्थिक वृध्दी बरोबर माहिती तंत्रज्ञानाचा विकास आणि माहिती तंत्रज्ञानामुळे आर्थिक वृध्दी वेगाने होताना दिसून येते.

अशा प्रकारे जगातील विकसित देशांच्या अभ्यासावरून आपणास आर्थिक वृध्दीची वैशिष्ट्ये पहावयास

मिळतात. जगातील विकसित राष्ट्रांमध्ये एकसारखी वैशिष्ट्ये आढळत नसली तरी जी एकसारखी आणि जास्त ठळकपणे आढळून येतात अशा वैशिष्ट्यांचा आपण अभ्यास केला आहे.

### २.२.४. भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाची स्थिती (Development Status of Indian Economy):

भारताला स्वातंत्र्य मिळाले, त्यावेळी भारताची आर्थिक स्थिती अत्यंत मागासलेली होती. अर्थव्यवस्थेत दारिद्र्य ही अत्यंत गंभीर समस्या होती. लोकसंख्या वेगाने वाढत होती आणि राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ मात्र अल्प होती. त्यामुळे दरडोई उत्पन्न सुध्दा अल्पच होते. देशातील लोकांना अन्न,वस्त्र आणि निवारा ह्या किमान आवश्यक गरजा सुध्दा भागविणे अत्यंत कठीण झाले होते. शेतीची उत्पादकता अत्यंत अल्प होती. ७० टक्क्यांपेक्षा जास्त लोकसंख्या प्रत्यक्ष शेतीवर अवलंबून होती. अर्थव्यवस्थेत लोकसंख्या वाढीमुळे बेकारी आणि दारिद्र्याची मोठी समस्या निर्माण झाली होती. दुष्काळा सारखी परिस्थिती उद्‌भवल्यास मोठ्या प्रमाणात लोकांची उपासमार होत होती.

अशा सर्व संकटातून भारतीय अर्थव्यवस्थेला बाहेर काढण्यासाठी अनेक तज्ञांनी नियोजनाचा मार्ग सुचविला. भारताचे तत्कालीन सरकारने यात लक्ष घातले आणि १९ जानेवारी १९५० रोजी काँग्रेस वर्किंग कमिटीने भारताच्या आर्थिक विकासाची योजना आखण्यासाठी नियोजन मंडळाची (Planning Commission) स्थापना करण्याची शिफारस भारत सरकारला केली. तत्कालीन सरकारने ही मागणी मान्य करून त्यावेळचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन मंडळाची स्थापना १५ मार्च १९५० रोजी करण्यात आली. २८ मार्च १९५० रोजी नियोजन मंडळाची पहिली बैठक संपन्न झाली आणि भारताच्या आर्थिक विकासाला खऱ्या अर्थाने सुरवात झाली. नियोजनाच्या माध्यमातून देशाचा आर्थिक विकास साध्य करण्यासाठी नियोजन आयोग जवळपास ६५ वर्षे कार्य करीत होता. ३१ डिसेंबर २०१४ रोजी नियोजन आयोगाचे कामकाज संपुष्टात आले. नियोजन आयोगाने बारा पंचवार्षिक आणि सहा वार्षिक योजनांच्या माध्यमातून विकास सध्या केला आहे. १ जानेवारी २०१५ पासून राष्ट्रीय भारत परिवर्तन संस्था (National Institute for Transforming India - NITI) नीती आयोगाच्या माध्यामातून आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न केला जातो आहे. सध्या भारताला स्वातंत्र्य मिळून ७४ वर्षे पूर्ण झाली आहेत. अशा भारतीय अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकासाची स्थिती आपण पुढील मुद्यांच्या आधारे जाणून घेणार आहोत.

#### १. राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा वार्षिक दर (Annual Rate of National Income Growth):

भारताने आर्थिक नियोजनाचा मार्ग अवलंबल्यापासून स्थूल राष्ट्रीय उत्पन्न, निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न आणि दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा वार्षिक दर कसा बदलत गेला आहे तो आपणाला तक्ता क्र.२.१ च्या सहाय्याने अभ्यासता येते.

**तक्ता क्र. २.१.**

**स्थूल राष्ट्रीय उत्पन्न, निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न आणि दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा वार्षिक दर (स्थिर किंमतीनुसार).**

| अ.क्र. | वर्षे | स्थूल राष्ट्रीय उत्पन्न (%) | निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न (%) | दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न (%) |
|---|---|---|---|---|
| १. | १९५१-५२ | ३.१ | ३.५ | १.८ |
| २. | १९६०-६१ | ५.५ | ५.८ | ३.८ |
| ३. | १९७०-७१ | ५.२ | ४.७ | २.४ |
| ४. | १९८०-८१ | ६.८ | ६.९ | ४.५ |
| ५. | १९९०-९१ | ५.३ | ५.२ | ३.१ |
| ६. | २०००-०१ | ३.६ | ३.२ | १.४ |
| ७. | २०१०-११ | ९.८ | ९.८ | ८.३ |
| ८. | २०२०-२१ (१-सु.अ.) | -७.९ | -८.० | -८.९ |

स्त्रोत : Economic Survey of India, 2020-21, Volume-2, Page No.A3, A4.

टीप: १-सु.अ.: प्रथम सुधारित अंदाज. २. सन १९५०-५१ ते २०२१०-११ पर्यंत २००४-०५ च्या किंमतीनुसार तर २०२०-२१ ची आकडेवारी २०११-१२ च्या किंमतीनुसार.

तक्ता क्र. २.१ मध्ये स्थूल राष्ट्रीय उत्पन्न, निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न आणि दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा वार्षिक दर दर्शविला आहे. सन १९५०-५१ मध्ये स्थूल राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर ३.१% तर निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर ३.५% आणि दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा वार्षिक दर १.८% इतका होता. त्यात सन १९६०-६१ साली मोठ्या प्रमाणात प्रगती होऊन स्थूल राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर ५.५% तर निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर ५.८% आणि दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा वार्षिक दर ३.८% इतका झाला. सन १९७०-७१ साली मात्र मागील दशकाच्या तुलनेत अल्पशी घट होऊन तो ५.२% स्थूल राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर, ४.७% निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर आणि २.४% दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर झाला. मात्र सन १९८०-८१ साली त्यात वाढ होऊन तो स्थूल राष्ट्रीय उत्पन्न, निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न आणि दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा वार्षिक दर अनुक्रमे ६.८%, ६.९% आणि ४.५% इतका झाला. पुन्हा सन १९९०-९१ आणि २०००-०१ साली त्यामध्ये घट झालेली दिसून येते. सन १९९०-९१ नंतर घट होण्याचे कारण म्हणजे जागतिकीकरणाचा परिणाम होय. सन २०१०-११ साली मात्र त्यामध्ये मोठ्या प्रमाणात प्रगती होऊन स्थूल राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर ९.८% तर निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर ९.८% आणि दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न

वाढीचा वार्षिक दर ८.३% इतका झाला. सन २०२०-२१ साली कोविड-१९ च्या जागतिक महामारीमुळे लागु करण्यात आलेली टाळेबंदी याचा परिणाम म्हणून ऋणात्मक वाढ नोंदवली गेली. म्हणजेच स्थूल राष्ट्रीय उत्पन्न, निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न आणि दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पन्नामध्ये वाढ होण्याऐवजी घटच झाली आहे.

गेल्या ७४ वर्षाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की सन १९५०-५१ च्या तुलनेत सन २०२०-२१ पर्यंत स्थूल राष्ट्रीय उत्पन्न, निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न आणि दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न यामध्ये तिपटीपेक्षाही जास्त वाढ झाली आहे.

**२. विविध क्षेत्रानुसार स्थूल देशांतर्गत उत्पादनातील हिस्सा (The Share of Gross Domestic Product in Different Sectors):**

आर्थिक विकास साध्य करीत असताना अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रातील स्थूल देशांतर्गत उत्पादनातील हिस्सा आर्थिक विकासाबरोबर बदलत गेलेला दिसून येतो. विकसित देशाच्या अनुभवावरून असे लक्षात येते की, आर्थिक विकासबरोबर शेती क्षेत्राचे महत्व कमी होऊन उद्योग आणि सेवा क्षेत्राचे महत्व वाढत आहे. भारताच्या गेल्या सात दशकातील आकडेवारीचा विचार केल्यास आपणाला विकसित देशांच्या विकास प्रक्रीये सारखाच अनुभव यतो. अधिक स्पष्टीकरण आपणाला तक्ता. क्र.२.२ मधील आकडेवारीच्या सहाय्याने करता येईल.

**तक्ता. क्र. २.२.**

**विविध क्षेत्रानुसार स्थूल देशांतर्गत उत्पादनातील हिस्सा**

**(सन २००४-०५ च्या स्थिर किंमतीनुसार) (आकडेवारी % मध्ये)**

| अ.क्र. | क्षेत्र | १९५०-५१ | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०२०-२१ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शेती आणि संलग्न क्षेत्र | ५३.८८ | ४८.६५ | ४२.६६ | ३६.६९ | २९.६३ | २२.२६ | १४.५९ | १६.३८ |
| २. | उद्योग क्षेत्र | १६.५८ | २१.०९ | २३.६२ | २५.६६ | २७.७३ | २७.२५ | २७.९२ | २९.३५ |
| ३. | सेवा क्षेत्र | २९.५४ | ३०.२६ | ३३.७२ | ३७.६५ | ४२.६४ | ५०.४९ | ५७.४९ | ५४.२७ |
| ४. | एकूण | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० |

स्रोत: १. विविध आर्थिक पाहणी अहवाल.(१९५०-५१ ते २०२०-२१)

२. https://statisticstimes.com/economy/country/india-gdp-sectorwise.php. (Date-25/08/2021).

तक्ता. क्र.२.२ वरून असे निदर्शनास येते की, सन १९५०-५१ साली शेती आणि संलग्न क्षेत्राचा स्थूल देशांतर्गत उत्पादनातील हिस्सा ५३.८८ टक्के इतका होता त्यात सन १९६०-६१ मध्ये घट होऊन तो ४८.६५ टक्के इतका झाला. सन १९७०-७१ मध्ये ४२.६६ टक्के तर १९८०-८१ मध्ये ३६.६९ टक्के इतका झाला. सन १९९०-९१ मध्ये २९.६३ टक्के तर २०००-०१ मध्ये २२.२६ टक्के आणि २०१०-११ मध्ये १४.५९ टक्के झाला. फक्त २०२०-२१ सालीच सलग मागील सतरा वर्षात प्रथमच त्यामध्ये वाढ होऊन तो १६.३८ टक्के इतका झाला.


कोविड-१९ च्या जागतिक महामारी मुळेच प्रथमच शेती आणि संलग्न क्षेत्राचा हिस्सा वाढताना दिसून आला आहे. कारण कोविड-१९ च्या जागतिक महामारी मुळे सर्वत्र टाळेबंदी केली होती त्याचा परिणाम म्हणून उद्योग आणि सेवा क्षेत्रात तुलनेने घट होऊन फक्त शेती आणि संलग्न क्षेत्रातच वाढ झालेली आढळते.

उद्योग क्षेत्राचा विचार केल्यास मात्र त्यामध्ये सतत वाढ झालेली आढळून येते आहे. सन १९५०-५१ साली उद्योग क्षेत्राचा हिस्सा १६.५८ टक्के इतका होता. त्यामध्ये सन १९६०-६१ मध्ये वाढ होऊन तो २१.०९ टक्के इतका झाला. सन १९७०-७१ मध्ये त्यात पुन्हा वाढ झाली आणि तो २३.६२ टक्के इतका झाला. सन १९८०-८१, १९९०-९१ साली अनुक्रमे २५.६६ टक्केवरून २७.७३ टक्के इतका झाला. सन २०००-०१ व २०१०-११ मध्ये अनुक्रमे २७.२५ आणि २७.९२ टक्के इतका असलेला दिसून येतो. सन २०२०-२१ मध्ये तो २९.३५ टक्के इतका झाला.


सेवा क्षेत्राचा विचार केल्यास मात्र सन १९५०-५१ पासुन २०२०-२१ पर्यंत सतत सेवा क्षेत्राचा स्थूल देशांतर्गत उत्पादनातील हिस्सा वाढत गेलेला दिसून येतो. सन १९५०-५१ साली सेवा क्षेत्राचा स्थूल देशांतर्गत उत्पादनातील हिस्सा २९.५४ टक्के इतका होता त्यात सन १९६०-६१ मध्ये वाढ होऊन तो ३०.२६ टक्के इतका झाला. सन १९७०-७१ मध्ये ३३.७२ टक्के तर १९८०-८१ मध्ये ३७.६५ टक्के इतका झाला. सन १९९०-९१ मध्ये ४२.६४ टक्के तर २०००-०१ मध्ये ५०.४९ टक्के आणि २०१०-११ मध्ये ५७.४९ टक्के झाला. सन २०२०-२१ साली त्यात घट होऊन तो ५४.२७ टक्के इतका झाला. कोविड-१९ च्या जागतिक महामारी मुळेच प्रथमच सेवा क्षेत्राचा हिस्सा घटताना दिसून आला आहे. कारण कोविड-१९ च्या जागतिक महामारी मुळे सर्वत्र टाळेबंदी केली होती त्याचा परिणाम म्हणून सेवा क्षेत्राच्या उत्पादनात तुलनेने घट झालेली आढळून येते.

एकंदरीत तिन्ही क्षेत्राचा विचार केल्यास आर्थिक विकासाबरोबर शेती आणि संलग्न क्षेत्राचे महत्व कमी होत जाऊन उद्योग आणि सेवा क्षेत्राचे महत्व वाढलेले आढळते. आर्थिक विकासाबरोबर उद्योग क्षेत्रापेक्षा सेवा क्षेत्राचे महत्व अधिक वेगाने वाढलेले दिसून येते.


आकृती क्र. २.१, २.२, २.३ आणि २.४ वरून से दिसून येतेकी शेती आणि संलग्न क्षेत्राचा हिस्सा घटत असून उद्योग आणि सेवा क्षेत्राचा हिस्सा वाढताना दिसून येत आहे. उद्योग क्षेत्रा पेक्षा सेवा क्षेत्राचा हिस्सा अधिक वेगाने वाढत आहे. हेच भारताच्या आर्थिक विकास प्रक्रियेचे निर्देशक ठरते.





आकृती-२.१




आकृती-२.२




आकृती-२.३




आकृती-२.४

### ३. अन्नधान्याचे उत्पादन (Food grain Production):

भारताच्या आर्थिक विकासाबरोबर अन्नधान्याचे उत्पादन सतत वाढताना दिसून येत आहे. कारण भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर सर्व प्रथम अन्नधान्याच्या टंचाईला तोंड द्यावे लागले. सन १९६५-६६ पासून भारतात हरितक्रांती घडूवून आणली त्यामुळे अन्नधान्याच्या उत्पादनात प्रचंड प्रमाणात वाढ झाली. भारत एकेकाळी अन्नधान्याच्या आयातीवर अवलंबून होता. आज तोच भारत अन्नधान्याची मोठ्या प्रमाणात निर्यात करीत आहे. हे सर्व आपणाला तक्ता क्र. २.३ वरून स्पष्ट करता येईल.

**तक्ता. क्र. २.३.**

**भारतातील अन्नधान्याचे उत्पादन**

| **वर्षे** | **अन्नधान्य उत्पादन (दशलक्ष टन)** |
|---|---|
| १९५०-५१ | ५०.८० |
| १९६०-६१ | ८२.०२ |
| १९७०-७१ | १०८.४२ |
| १९८०-८१ | १२९.५९ |
| १९९०-९१ | १७६.३९ |
| २०००-०१ | १९६.८१ |
| २०१०-११ | २४१.५६ |
| २०२०-२१ | २९६.५० |

स्रोत: १. Reserve Bank of India, Handbook of Statistics on Indian Economy, Various Reports. (https://dbie.rbi.org.in)

तक्ता क्र. २.३ मध्ये भारतातील सन १५५०-५१ ते २०२०-२१ या काळातील अन्नधान्याचे उत्पादन दर्शविले आहे. सन १९५०-५१ मध्ये अन्नधान्याचे उत्पादन ५०.८० दशलक्ष टन होते. सन १९६०-६१ मध्ये ते ८२.०२ दशलक्ष टन झाले. सन १९६५-६६ पसून भारतात हरितक्रांती घडवून आणल्यामुळे सन १९७०-७१ रोजी अन्नधान्याचे उत्पादन १०८.४२ दशलक्ष टन इतके झाले. सन १९८०-८१ मध्ये १२९.५९ दशलक्ष टन आणि १९९०-९१ साली १७६.३९ दशलक्ष टन इतके उत्पादन झाले. सन २०००-०१, २०१०-११ आणि २०२०-२१ मध्ये अनुक्रमे १९६.८१, २४१.५६ आणि २९६.५० दशलक्ष टन अन्नधान्याचे उत्पादन झाले. एकंदरीत सन १९५०-५१ पासुन २०२०-२१ पर्यंत अन्नधान्याच्या उत्पादनात जवळपास सहापट वाढ झाली आहे.

### ४. भारतातील लोकसंख्या वाढ (Population Growth in India):

भारताच्या आर्थिक विकासाबरोबर लोकसंख्या वाढ मात्र अत्यंत वेगाने घडून आली आहे. आर्थिक विकासाबरोबर लोकसंख्येचे आकारमान वाढले आहे. तक्ता क्र.२.४ मध्ये भारतातील लोकसंख्या वाढ दर्शवली आहे.

**तक्ता. क्र. २.४.**

**भारतातील लोकसंख्या वाढ (आकडे कोटी मध्ये)**

| जनगणना वर्ष | एकूण लोकसंख्या | दशकामधील लोकसंख्येत वाढ/घट | दशकामधील लोकसंख्येत वृध्दी/घट (टक्के) | वाढीचाप्रकार |
|---|---|---|---|---|
| १९५१ | ३६.११ | +४.२४ | +१३.३१ | लोकसंख्येत वेगाने वाढ |
| १९६१ | ४३.९२ | +७.८१ | +२१.६४ | |
| १९७१ | ५४.८२ | +१०.९० | +२४.८० | लोकसंख्येत प्रचंड वेगाने वाढ |
| १९८१ | ६८.३३ | +१३.५१ | +२४.६६ | |
| १९९१ | ८४.६४ | +१६.३० | +२४.८७ | |
| २००१ | १०२.८७ | +१८.२३ | +२१.५४ | लोकसंख्या वाढीचा वेग कमी |
| २०११ | १२१.०२ | +१८.१५ | +१७.६४ | |

स्त्रोत: विविध आर्थिक पाहणी अहवाल आणि जनगणना अहवाल.

तक्ता क्र. २.४ वरून असे दिसून येतेकी, सन १९५१ मध्ये भारताची लोकसंख्या ३६.११ कोटी इतकी होती. सन १९६१ मध्ये ४३.९२ कोटी आणि १९७१ मध्ये ५४.८२ कोटी झाली. सन १९५१ ते १९६१ मध्ये लोकसंख्या वेगाने वाढत होती. परंतु सन १९७१ पासून लोकसंख्येतील वाढ प्रचंड वेगाने घडून आली आहे. सन २००१ पासून पुन्हा लोकसंख्या वाढीचा वेग कमी झालेला देसून येतो. सन २०११ साली भारताची लोकसंख्या १२१.०२ कोटी इतकी झाली. सन २०२१ मधील जनगणना कोविड–१९ च्या महामारीमुळे पुढे ढकलण्यात आली. सन २०२१ मध्ये भारताची लोकसंख्या १३५ कोटी पेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे.

### ५. जन्मदर व मृत्यूदर यामधील बदल (Change in Barth Rate and Death Rate):

भारताच्या आर्थिक विकासाचा जन्मदर आणि मृत्यूदर यांच्यावर मोठा परिणाम झाला आहे. आर्थिक विकासाबरोबर मृत्यूदर वेगाने कमी झाला आहे. तर जन्मदर त्या तुलनेत कमी वेगाने घटत आहे. त्याचा परिणाम म्हणून लोकसंख्या मात्र अत्यंत वेगाने वाढत आहे. विकसित देशात जन्मदर आणि मृत्युदर दोन्ही सारखेच असतात. परंतु भारतासारख्या विकसनशील देशात मात्र मृत्यु दरापेक्षा जन्मदर अधिक असल्यामुळे लोकसंख्या वाढली आहे. तक्ता क्र. २.५ मध्ये भारतातील जन्मदर व मृत्युदर स्पष्ट केला आहे.

**तक्ता क्र. २.५.**

**भारतातील जन्मदर व मृत्यूदर (प्रति १००० लोकसंख्येमागे)**

| अ.क्र. | जनगणना वर्ष | जन्मदर | मृत्यूदर | वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| १. | १९५१ | ३९.९ | २७.४ | +१२.५ |
| २. | १९६१ | ४०.९ | २२.३ | +१८.१ |
| ३. | १९७१ | ४१.१ | १८.९ | +२२.२ |
| ४. | १९८१ | ३३.३ | १२.५ | +२०.८ |
| ५. | १९९१ | २९.५ | ९.८ | +१९.७ |
| ६. | २००१ | २६.१ | ८.७ | +१७.४ |
| ७. | २०११ | २१.८ | ७.१ | +१४.७ |

स्रोत: विविध आर्थिक पाहणी अहवाल आणि जनगणना अहवाल.

तक्ता क्र. २.५ मध्ये भारतातील जन्मदर व मृत्युदर दर्शविला आहे. सन १९५१ पासून सन २०११ पर्यंत जन्मदर ३९.९ पासून २१.८ पर्यंत घटताना दिसून येतो आहे. तर सन १९५१ पासून मृत्युदर २०११ पर्यंत २७.४ वरून ७.१ पर्यंत घटलेला दिसून येतो. जन्मदर आणि मृत्युदर यांची तुलना केली असता हे स्पष्ट होते की जन्मदारातील घट कमी वेगाची आहे तर मृत्युदरातील घट मात्र जास्त वेगाची आहे. त्यामुळे लोकसंख्येत नैसर्गिक वाढ झालेली आपणास दिसून येते.

**६. साक्षरता दर (Literacy Rate) :**

भारताचा आर्थिक विकास आणि साक्षरता दर यांच्या मध्ये धनात्मक संबंध असलेला दिसून येतो. म्हणून आर्थिक विकासाबरोबर साक्षरता दर वाढलेला दिसून येतो. तक्ता क्र. २.६ मध्ये भारतातील साक्षरता दर सन १९५१ पासून २०११ पर्यंत कसा वाढत गेला ते दिसून येते.

**तक्ता क्र. २.६**

**भारतातील साक्षरता दर (%)**

| अ.क्र. | जनगणना वर्ष | साक्षरता दर (%) |
|---|---|---|
| १. | १९५१ | १८.३ |
| २. | १९६१ | २८.३ |
| ३. | १९७१ | ३४.४ |
| ४. | १९८१ | ४३.६ |
| ५. | १९९१ | ५२.२ |
| ६. | २००१ | ६४.८ |
| ७. | २०११ | ७४.०४ |

स्रोत: विविध आर्थिक पाहणी अहवाल आणि जनगणना अहवाल.

तक्ता क्र. २.६ मध्ये भारतातील साक्षरता दर दाखवला आहे. सन १९५१ मध्ये १८.३ टक्के साक्षरता दर होता. त्यामध्ये सन १९६१ मध्ये वाढ होऊन तो २८.३ टक्के इतका झाला. सन १९७१ मध्ये ३४.४ टक्के, सन १९८१ मध्ये ४३.६ टक्के आणि सन १९९१ मध्ये ५२.२ टक्के साक्षरता दर झाला. सन २००१ आणि सन २०११ मध्ये अनुक्रमे तो ६४.८ आणि ७४.०४ टक्के इतका झाला. एकंदर सन १९५१ पासुन सन २०११ पर्यंत साक्षरता दर सतत वाढलेला दिसून येतो.

## ७. सरासरी आयुर्मान (Life Expectancy) :

जसजसा देशाचा विकास होऊ लागला तसतसा भारताच्या लोकसंख्येत गुणात्मक बदल होताना दिसून येतो आहे. म्हणजे आर्थिक विकासाबरोबर भारतातील लोकांचे सरासरी आयुर्मान वाढलेले दिसून येते. तक्ता क्र. २.७.मध्ये भारतातील लोकांचे सरासरी आयुर्मान कसे वाढत गेले ते दाखविले आहे.

**तक्ता क्र. २.७.**

**भारतातील लोकांचे सरासरी आयुर्मान (वर्षे)**

| अ.क्र. | जनगणना वर्ष | आयुर्मान (वर्षे) |
|---|---|---|
| १. | १९५१ | ३२.१ |
| २. | १९६१ | ४१.३ |
| ३. | १९७१ | ४५.६ |
| ४. | १९८१ | ५०.४ |
| ५. | १९९१ | ५८.७ |
| ६. | २००१ | ६२.५ |
| ७. | २०११ | ६६.१ |

स्त्रोत : विविध आर्थिक पाहणी अहवाल आणि जनगणना अहवाल.

तक्ता क्र. २.७ मध्ये भारतातील लोकांचे सरासरी आयुर्मान दाखवले आहे. सन १९५१ साली सरासरी आयुर्मान ३२.१ वर्षे इतके होते, त्यामध्ये सन १९६१ साली वाढ होऊन ते ४१.३ वर्षे झाले. सन १९७१ साली ते ४५.६ वर्षे, सन १९८१ मध्ये ५०.४ वर्षे, १९९१ मध्ये ५८.७ वर्षे, सन २००१ मध्ये ६२.५ वर्षे आणि सन २०११ मध्ये ६६.१ वर्षे इतके झाले. एकंदरीत आर्थिक विकासाबरोबर अनेक आरोग्याच्या सेवा सुविधा उपलब्ध झाल्यामुळे भारतातील लोकांचे सरासरी आयुर्मान वाढत आहे.

गेल्या ७४ वर्षांचा विचार करता भारतीय अर्थव्यवस्थेने मोठ्या प्रमाणात आर्थिक विकास साध्य केला आहे. त्याचा आपण सन १९५१ पासून सन २०२१ पर्यंतचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यावरून भारतीय अर्थव्यवस्थेचा आर्थिक विकास अधिक प्रकर्षाने मांडता येईल.

## २.३. सारांश :

अर्थतज्ज्ञांनी आर्थिक विकासाच्या विश्लेषणासाठी जगाची विभागणी विकसित, विकसनशील आणि अल्पविकसित देशांच्या गटात केली. जगात विकसनशील देशांची संख्या जास्त असून त्यांची आर्थिक विकासाची धडपड अत्यंत वेगाने सुरु आहे. त्यांची वैशिष्टये आपण जाणून घेतलीत. आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी आर्थिक विकासावर अनेक आर्थिक, सामाजिक, नैसर्गिक आणि मानसिक घटकांचा परिणाम होत असतो त्याचा आपण अभ्यास केला. विकसित देशांच्या बाबतीत वृध्दी साध्य करताना कोणती वैशिष्ट्ये दिसून येतात ती आपण पाहिली आहेत. आर्थिक विकासाच्या संकल्पनांचा अभ्यास केल्यानंतर भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाची सद्य स्थिती कशी आहे ती आपण अभ्यासली आहे.

## २.४. पारिभाषिक शब्द व त्याचा अर्थ :

**१. विकसनशील अर्थव्यवस्था (Developing Economy)** : सन २०११ च्या जागतिक बँकेच्या दरडोई उत्पनाच्या निकषांनुसार ज्या अर्थव्यवस्थेमधील लोकांचे दरडोई उत्पन्न १०२६ ते १२४७५ अमेरिकन डॉलर इतके असते त्या अर्थव्यवस्थेस विकसनशील अर्थव्यवस्था असे म्हणतात.

**२. स्थूल देशांतर्गत उत्पादन (Gross Domestic Product-GDP)** : एका वर्षाच्या कालावधीत देशाच्या भौगोलिक सीमेच्या आत उत्पादित झालेल्या सर्व अंतिम वस्तू व सेवांचे एकूण पैशातील मूल्य म्हणजे स्थूल देशांतर्गत उत्पादन होय.

## २.५. स्वयं-अध्ययन प्रश्न :

### १. बहुपर्यायी प्रश्न :

१. .................. ही अविकसितपणाची वैशिष्टे आहेत.

अ) उत्पन्नाची निम्न पातळी ब) मोठ्या प्रमाणात गरिबी क) कृषी मागासलेपणा ड) वरील सर्व

२. अविकसित देशात .................... जास्त असते.

अ) बेरोजगारी ब) श्रीमंती क) भांडवल निर्मिती ड) औद्योगीकरण

३. विकसनशील अर्थव्यवस्थेसमोर ......................... या समस्या असतात.

अ) दारिद्र्य ब) बेरोजगारी क) निरक्षरता ड) वरील सर्व

४. आर्थिक विकासावर ..................... हे घटक परिणाम करीत असतात.

अ) पायाभूत सुविधांचा स्तर ब) शिक्षण क) बचत व भांडवल स्तर ड) वरील सर्व

५. विकसनशील देशात गुंतवणूक वाढल्यास ............................

अ) आर्थिक विकास वेगाने होतो. ब) आर्थिक विकास ऋणात्मक होतो.

क) आर्थिक घट होते. ड) वरील सर्व

६.	...................... ही आर्थिक वृध्दीची वैशिष्टे आहेत.

अ) लोकसंख्या आणि दरडोई उत्पादन वाढीचा उच्च दर	ब) उत्पादकतेमधील वाढ

क) रचनात्मक बदल	ड) वरील सर्व

७.	विकसित देशांच्या आर्थिक वृध्दी बरोबर .................... यांचे आंतरराष्ट्रीय स्थलांतरण होते.

अ) श्रमिक	ब) जमीन	क) हवामान	ड) वरील सर्व

८.	राष्ट्रीय भारत परिवर्तन संस्था (नीती आयोग) यांची स्थापना ................. रोजी झाली.

अ) १ जानेवारी १९५०	ब) १ जानेवारी २०१५ क) १ एप्रिल १९३५	ड) १५ ऑगस्ट १९४७

९.	सन २०२०-२१ साली शेती आणि संलग्न क्षेत्राचा स्थूल देशांतर्गत उत्पादनातील हिस्सा ............. टक्के होता.

अ) १६.३८	ब) १४.५९	क) १५.१५	ड) ५४.२७

१०.	सन २०२०-२१ साली भारताचे अन्नधान्याचे उत्पादन ............... होते.

अ) ५०.८० दशलक्ष टन	ब) १२९.५९ दशलक्ष टन

क) २९६.५० दशलक्ष टन	ड) १९६.३५ दशलक्ष टन

**२.६. स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

१. - ड) वरील सर्व,	२.- अ) बेरोजगारी,	३.- ड) वरील सर्व,

४. - ड) वरील सर्व	५.- अ) आर्थिक विकास वेगाने होतो

६.- ड) वरील सर्व	७.- अ) श्रमिक	८.- ब) १ जानेवारी २०१५

९.- अ) १६.३८	१०.- क) २९६.५० दशलक्ष टन

**२.७. सरावासाठी स्वाध्याय :**

**प्रश्न. १. थोडक्यात उत्तरे लिहा.**

१.	अविकसितपणाची वैशिष्टे थोडक्यात सांगा.

२.	आर्थिक विकासावर परिणाम करणारे घटक थोडक्यात स्पष्ट करा.

३.	आर्थिक वृध्दीची वैशिष्टे सांगा.

४.	भारताच्या आर्थिक प्रगतीची स्थिती सध्या कशी आहे.

**प्रश्न २ टीपा लिहा.**

१.	अविकसितपणाची वैशिष्टे.

२.	आर्थिक विकासावर परिणाम करणारे घटक.

३.	आर्थिक वृध्दीची वैशिष्टे.

४. भारताच्या आर्थिक विकासाची स्थिती.

**प्रश्न ३ दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. अविकसितपणाची वैशिष्टये सविस्तर स्पष्ट करा.

२. आर्थिक विकासावर परिणाम करणाऱ्या घटकांचे विश्लेषण करा.

३. आर्थिक वृध्दीची वैशिष्टे सविस्तर सांगा.

४. भारतीय अर्थव्यवस्थेची आर्थिक विकासाची स्थिती सध्या कशी आहे ते सविस्तर स्पष्ट करा.

**२.८. क्षेत्रीय कार्य :**

१. भारतीय अर्थव्यवस्थेची आर्थिक वैशिष्टे अभ्यासा आणि लिहा.

२. आपल्या शहराच्या किंवा गावच्या विकासावर परिणाम करणारे घटक अभ्यासा आणि लिहा.

**२.९. अधिक वाचनासाठी संदर्भ :**


१. Datt - Mahajan (2015), Indian Economy, S. Chand and Company, Pvt.Ltd, New Delhi.

२. Govt. of India, Economic Survey, Various Report (1950-2021).

३. Govt. of India, Various Census Reports .

४. Jhingan M.L. (1998), The Economics of Development and Planning, 31st Revised and Enlarged Edition, Vrindra Publications (P) Ltd, Delhi.

५. Misra-Puri (1998), Economics of Development and Planning -Theory and Practice, Himalaya Publishing House , Mumbai.

६. Reserve Bank of India, Handbook of Statistics on Indian Economy, 2001, 2011, 2015, 2020-21.

७. कविमंडन विजय (२०११), विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

८. केंद्र सरकारचे अंदाजपत्रक २०२०-२१, नवी दिल्ली.

९. पाटील जे.एफ. (संपादक) (२०११), वृध्दी व विकासाचे अर्थशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

१०. फडणवीस मृणालिनी (२००९), विकासाचे अर्थशास्त्र व सिद्धांत, विद्या प्रकाशन, नागपूर.

११. भोसले-काटे (२०१२), विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

१२. देशपांडे ज्योत्स्ना (२०११), विकासाचे अर्थशात्र, पिंपळापुरे आणि कंपनी पब्लिशर्स, नागपूर.

१३. देसाई-भालेराव (२०११), भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे.


* * *

# घटक ३

# आर्थिक विकासाचे सिध्दांत

# Theories of Economic Development

**अनुक्रमणिका**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

- ३.२.१ विकासाचा सनातनवादी दृष्टीकोन - रिकार्डो यांचा सिध्दांत
- ३.२.२ मिर्दाल यांचा आर्थिक विकासाचा सिध्दांत
- ३.२.३ रोस्टो यांच्या आर्थिक विकास अवस्था
- ३.२.४ संतुलित व असंतुलित विकास सिध्दांत
- ३.२.५ सारांश

३.३ पारिभाषिक शब्द

३.४ स्वयं अध्ययन प्रश्न

३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


## ३.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास पुढील बाबीची कल्पना येईल.

१. आर्थिक विकासाबाबतचा सनातनवादी दृष्टीकोन कोणता होता ते समजून येईल.

२. आर्थिक विकासाचा मिर्दाल यांचा सिध्दांत समजून घेता येईल.

३. रोस्टो यांच्या आर्थिक वाढीच्या अवस्थांचे स्वरुप समजण्यास मदत होईल.

४. संतुलित व असंतुलित विकास सिध्दांताची कल्पना येईल.

## ३.१ प्रास्ताविक :

आर्थिक विकास साध्य करणे हे जगामधील प्रत्येक राष्ट्राचे सर्वात महत्त्वाचे उद्दिष्ट राहिलेले आहे. त्यामुळे आर्थिक विकासाचा प्रश्न हा अर्थशास्त्रज्ञांसमोर फार पूर्वीपासून आहे. सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांपासून ते अगदी अलिकडील काळातील आधुनिक मानल्या जाणाऱ्या अर्थतज्ञांनी आर्थिक विकासासंबंधी आपले विचार आणि कल्पना मांडल्या आहेत. एका विशिष्ट चौकटीत देशाची प्रगती कशी करावी याबाबतचे विचार आणि कल्पना मांडल्या जातात. त्यामधूनच आर्थिक विकासाचे सिध्दांत उदयास येतात. अर्थव्यवस्थेच्या स्वरुपानुसार आर्थिक विकासाचे सिध्दांत मांडण्यात आलेले आहेत. अविकसित अर्थव्यवस्थेच्या संदर्भात मांडण्यात आलेले विकासाचे सिध्दांत आणि विकसित अर्थव्यवस्थेच्या बाबतीत मांडले गेलेले सिध्दांत यांमध्ये अर्थशास्त्रज्ञांनी फरक केल्याचे दिसून येते, असे असले तरीसुध्दा अनेक अर्थतज्ञांनी मांडलेल्या आर्थिक विकास सिध्दांतांचा अवलंब सर्व प्रकारच्या अर्थव्यवस्थांसाठी कमी अधिक प्रमाणात केल्याचे दिसून येते.

प्रस्तुत घटकामध्ये आपण प्रामुख्याने विकासाचा सनातनवादी दृष्टिकोन, मिर्दाल यांचा आर्थिक विकासाचा सिध्दांत, रोस्टो यांचा आर्थिक अवस्था वाढीचा सिध्दांत आणि संतुलित व असंतुलित आर्थिक विकासाचे सिध्दांत इ. सिध्दांतांचा सविस्तर आढावा घेणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन :

उपरोक्त घटकामधून आपण आर्थिक विकाससंबंधीच्या सनातनवादी दृष्टीकोनातील प्रमुख मुद्दे आणि त्याचे मूल्यमापन तसेच आर्थिक विकासाबाबतच्या डेव्हीड रिकार्डो यांनी मांडलेल्या सिध्दांताचा सविस्तर आढावा घेणार आहोत. त्याचप्रमाणे मिर्दाल यांच्या आर्थिक विकासासंबंधीच्या सिध्दांतामधील चक्रीय कार्यकारण संबंध वर्धमान प्रक्रिया व विस्तारक आणि प्रतिसारक परिणाम या संकल्पनांचा आढावा घेणार आहोत. त्याचप्रमाणे प्रा. रोस्टो यांनी प्रतिपादन केलेल्या आर्थिक वाढीच्या पाच अवस्था अनुक्रमे प्राथमिक अवस्था, उड्डाणपूर्ण अवस्था, उड्डाण अवस्था, पूर्णावस्थेकडे वाटचाल आणि अतिउपभोग अवस्था यांचा तपशिलवार आढावा घेणार आहोत. या घटकाच्या शेवटच्या भागामध्ये संतुलित विकासाबाबत प्रा. रोझिस्टीन रोडान आणि रॅग्नर नर्क्स यांनी मांडलेले विचार आणि असंतुलित विकासाबाबत प्रामुख्याने सिंजर आणि हर्शमान यांनी मांडलेल्या सिध्दांताचा परामर्श घेणार आहोत.

### ३.२.१ विकासाचा सनातनवादी दृष्टीकोन – रिकार्डोचा सिध्दांत :

आर्थिक विकासाबाबत मांडण्यात आलेल्या विविध सिध्दांतांपैकी विकासाचा सनातनवादी सिध्दांत किंवा दृष्टीकोनाला आजही अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. सनातनवादी विचारांशी प्रामुख्याने ॲडम स्मिथ, डेव्हिड रिकार्डो, जॉन स्टुअर्ट मिल, थॉमस माल्थस इ. अर्थशास्त्रज्ञ जोडलेले आहेत. आर्थिक विकासासंबंधी या सर्व अर्थशास्त्रज्ञांनी जरी आपले वेगवेगळे सिध्दांत मांडलेले असले तरीदेखील सर्वांच्या सिध्दांतामध्ये एकसारखेपणा जाणवतो. म्हणूनच यास विकासाचा अभिमतपंथी किंवा वेगळ्या शब्दात सनातनवादी दृष्टीकोन असे संबोधले जाते.

डेव्हीड रिकार्डो यांनी मांडलेला आर्थिक विकासाचा सिध्दांत अभ्यासण्यापूर्वी आपणांस प्रथमत:

विकासाचा सनातनवादी दृष्टीकोन समजून घेणे गरजेचे आहे. सनातनवाद्यांचा विकासाबाबतचा दृष्टीकोन काय होता. त्याबाबत आपणास पुढील काही मुद्यांचा परामर्श घ्यावा लागेल.

**सनातनवादी सिध्दांताचे प्रमुख मुद्दे :**

**१) भांडवल संग्रहण :**

सनातनवाद्यांच्या मते आर्थिक विकास हा भांडवल संग्रहणावर अवलंबून असतो. जर देशात उत्पादन वाढवायचे असेल तर भांडवली गुंतवणूक आवश्यक आहे. अर्थात भांडवल गुंतवणूकीसाठी बचत करणे आवश्यक आहे. परंतु समाजात जमिनदार आणि श्रमिक या वर्गाकडून बचत केली जाऊ शकत नाही. करण या वर्गाचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात उपभोगावरच खर्च होते आणि म्हणून बचत करण्याचे कार्य प्रामुख्याने भांडवलदारांकडूनच केले जाते. त्यामुळे आर्थिक विकासात भांडवलदारांचे स्थान अतिशय महत्वाचे असते.

**२) नफ्याची भूमिका :**

भांडवल संग्रहणासाठी बचतीची आवश्यकता असते आणि अशी बचत भांडवलदार या वर्गाकडून होत असते आणि भांडवलदार आपल्या नफ्यातून बचत करतात. जेवढा नफा जास्त तेवढी बचत जास्त केली जाते. अशी बचत गुंतवणुकीसाठी वापरली जाते. परिणामी उत्पादन वाढून आर्थिक विकासाला चालना मिळते. म्हणून सरकारने भांडवलदारांच्या नफ्यावर जास्त कर लादू नयेत. नफ्यावर जास्त कर आकारल्यास नफ्याचा दर घटून बचत, भांडवल संग्रहण, गुंतवणूक, उत्पादन या सर्वांमध्ये घट होईल. त्यामुळे विकासाची प्रक्रिया धोक्यात येईल.

**३) विकासाची मर्यादा :**

सनातनवादी दृष्टीकोनानुसार असीमित आर्थिक विकास (कायमस्वरुपी विकास) शक्य नाही. काही काळाने विकासाच्या मर्यादा पडून विकास संपुष्टात येतो. याचे कारण म्हणजे नफ्याच्या दरात घट होत जाणे हे आहे. नफ्याचा दर घटण्याचे कारण म्हणजे जसजसे भांडवल संग्रहण वाढते, तसतसा वेतनाचा दर वाढतो. वेतन वाढल्यामुळे लोकसंख्या वाढते याचाच अर्थ असा की श्रमिकांकडून अधिक मुले जन्माला घातली जातात. लोकसंख्येतील वाढीमुळे अन्नधान्याची मागणी वाढते. परिणामी अन्नधान्याच्या किंमती वाढतात व त्यामुळे खंडातही वाढ होते. भांडवलदारांच्या खर्चामध्ये या सर्व बाबींचा समावेश होत असल्याचे त्यांचा नफा घटतो. त्यातूनच बचत कमी, भांडवल संग्रह कमी, गुंतवणूक कमी असे चक्र सुरू होऊन शेवटी विकासाची प्रक्रिया मंद होते व विकासाला मर्यादा पडतात.

**४) स्थैतिकता :**

नफा कमी झाल्याचा परिणाम म्हणून अर्थव्यवस्थेला स्थैतिकता प्राप्त होते. याचाच अर्थ अर्थव्यवस्थेला कुंठीत अवस्था प्राप्त होते. अशा स्थितीमध्ये नफ्याचा दर खूपच कमी असतो. भांडवली संग्रहण थांबते. लोकसंख्येची वाढ मंदावते, तसेच वेतन दर खालच्या पातळीवर स्थिरावतो. थोडक्यात अर्थव्यवस्थेला स्थिरावस्था प्राप्त होते.

### ५) आऱ्हासी उत्पत्ती :

सनातनी दृष्टीकोनामध्ये आऱ्हासी उत्पत्तीच्या प्रवृत्तीला महत्त्वाचे स्थान आहे. ही प्रवृत्ती टाळता येत नाही. विकासाच्या प्रक्रियेला थांबविण्यास कारणीभूत ही निसर्गाची मर्यादा असेल. निसर्ग (आऱ्हासी प्रवृत्ती) आणि मानव (लोकसंख्या वाढ) यांच्या संयुक्त कृतीमुळे अर्थव्यवस्थेच्या प्रगतीला मर्यादा पडते असे सनातनवाद्यांचे मत होते.

**मूल्यमापन :**

विकासाच्या सनातनवादी दृष्टीकोनावर पुढीलप्रमाणे टीका करण्यात आलेल्या आहेत.

**१) अवास्तव गृहिते :** सनातनवाद्यांनी ज्या गृहितांच्या आधारे विवेचन केले आहे. ती गृहित चौकट अवास्तव आहे. पूर्ण स्पर्धेचे अस्तित्व, लोकांची वृत्ती व क्षमता इ. गृहिते प्रत्यक्षात खरी ठरत नाहीत.

**२) तांत्रिक प्रगतीकडे दुर्लक्ष :** आर्थिक विकासामध्ये तांत्रिक प्रगतीची महत्त्वपूर्ण भूमिका असते. याकडे सनातनवादी दृष्टिकोनाने दुर्लक्ष केले आहे. निरनिराळ्या शोधांमुळे उत्पादन तंत्रात आमुलाग्र बदल झालेले आहेत व त्याद्वारे विकसित राष्ट्रे प्रगत अवस्थेत आहेत ही बाब सनातनवादी विचारवतांनी लक्षात घेतली नाही.

**३) निर्वाह वेतन :** सनातनवाद्यांनी निर्वाह वेतनाच्या सिध्दांताला अवास्तव महत्व दिले. वेतन वाढल्याने लोकसंख्या वाढते हे विधान अनेक देशांनी चुकीचे ठरविले आहे. आजच्या विकसित देशांमध्ये श्रमिकांच्या वेतनात सातत्याने वाढ होऊन देखील नफ्याचा दर घटलेला नाही.

**४) निराशावाद :** लोकसंख्येची वाढ व तिचे भयानक परिणाम, जमिनीमध्ये आऱ्हासी उत्पत्तीची प्रवृत्ती लागू होणे तसेच अर्थव्यवस्थेला स्थैतिकता प्राप्त होणे यांसारखे निराशावादी विचार सनातनवाद्यांनी मांडलेले आहेत.

**सारांश :** सनातनवादी विचारवंतांचा निराशावाद, श्रमिकांबद्दलची त्यांची अनास्था, भांडवलदारांवरील अति विश्वास हे सर्व सुसंगत वाटत नाही. म्हणुनच जेव्हान्सने रिकार्डो व मिल या सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांना 'अर्थशास्त्राचे वाहन चुकीच्या मार्गाने नेल्याबद्दल दोषी ठरविले आहे.'

### डेव्हिड रिकार्डो यांचा आर्थिक विकासाचा सिध्दांत :

आर्थिक विकासाबाबत सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी मांडलेल्या सिध्दांतामध्ये डेव्हिड रिकार्डो यांचा आर्थिक विकासाचा सिध्दांत सर्वात जास्त प्रसिध्द मानला जातो. रिकार्डो यांनी ॲडम स्मिथच्या कल्पना पुढे विकसीत करुन आपला आर्थिक विकासाचा सिध्दांत मांडला आहे.

### रिकार्डो यांच्या सिध्दांताची गृहिते :

सनातनवादी दृष्टीकोनात आढळून येणारी सर्व गृहिते रिकार्डो यांनी स्वीकारली आहेत. रिकार्डो यांचा सिध्दांत खालील गृहितांवर आधारित आहे.

१) पूर्ण स्पर्धा अस्तित्वात आहे.

२) सर्व श्रमिकांची मजुरी निर्वाह वेतनाएवढीच असते.

३) अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगारी अस्तित्वात आहे.

४) भांडवल संग्रहण नफ्याच्या दरावर अवलंबून असते.

५) श्रमिकांची मागणी भांडवल संचयावर अवलंबून असते.

६) आऱ्हासी उत्पत्तीची प्रवृत्ती अर्थव्यवस्थेत आढळून येते.

७) भांडवल आणि श्रम पूर्णपणे पर्यायी घटक आहेत.

**आर्थिक रचनेतील प्रमुख गट :**

रिकार्डो यांनी आर्थिक विकासाच्या संदर्भात तीन गटांची भूमिका महत्वपूर्ण असते असे प्रतिपादन केले आहे. ते गट म्हणजे भांडवलदार, श्रमिक आणि जमिनमालक हे होत. यामध्ये भांडवलदार गटाला नफा रुपाने मोबदला मिळतो. तसेच श्रमिकाला वेतन आणि भूमिला खंड अशा स्वरुपात मोबदला मिळतो.

रिकार्डोने आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत भांडवलदारांना अत्यंत महत्व दिले आहे. त्यांच्या मते भांडवलदार दुहेरी भूमिका पार पाडतात. यापैकी पहिली बाब म्हणजे भांडवलदार त्यांच्याकडील भांडवल कुठे गुंतवले असता महत्तम नफा मिळेल याचा शोध घेतात आणि दुसरी बाब म्हणजे मिळणारा नफा गुंतवणूक करुन भांडवल संग्रहण वाढविण्याचे काम भांडवलदार करतात. आर्थिक विकासाकरिता भांडवलदारांची अशी दुहेरी भुमिका महत्वपूर्ण असते.

दुसरा गट म्हणजे श्रमिक होत. या वर्गाजवळ उत्पादनाची साधने नसतात हा वर्ग रोजगारासाठी भांडवलदारांवर अवलंबून असतो. रिकार्डो यांच्या मते श्रमिकांचा वेतनदर हा वेतननिधी भागिले श्रमिकांची संख्या या आधारावर निश्चित होतो. वेतनदरात वाढ झाल्यास श्रमिकांची संख्या वाढते याउलट वेतनदरात घट झाल्यास श्रमिकांची संख्या घटते.

विकास प्रक्रियेतील तिसरा गट म्हणजे जमीन मालक किंवा भुमी हा होय. भुमी या घटकाचा पुरवठा स्थिर असतो. जसजशी समाजाची प्रगती होते तसतसा सुपीक जमिनाचा तुटवडा निर्माण होतो. त्यामुळे पुढे कमी सुपीक जमिन लागवडीखाली आणली जाते. भुमिच्या सुपिकतेतील फरक आणि आऱ्हासी उत्पत्तीची प्रवृत्ती यामुळे सीमांत उत्पादनात ऱ्हासाची प्रवृत्ती दिसून येते. श्रेष्ठ दर्जाची किंवा सुपीक जमीन मिळावी यासाठी भांडवलदारांमध्ये स्पर्धा सुरू होते. त्यामुळे सुपीक जमिन मालकांना जास्तीचा मोबदला मिळतो यालाच खंड असे म्हणतात. भुमीच्या मुलभूत व अविनाशी शक्तीबद्दल भूमीतून मिळणाऱ्या उत्पादनाचा जो भाग जमिन मालकाला मिळतो तो खंड होय. असे रिकार्डो यांनी स्पष्ट केलेले आहे. यातुनच त्यांनी आपला प्रसिध्द असा खंड सिध्दांत मांडला आहे.

**विकासाची प्रक्रिया :**

रिकार्डो यांनी विकासाची प्रक्रिया स्पष्ट करण्यासाठी एकूण उत्पन्न आणि शुध्द उत्पन्न यांतील फरक विचारात घेतला आहे. त्यांचे मते विशिष्ट काळात उत्पादन केलेल्या अंतिम वस्तुंचे बाजारमुल्य म्हणजे एकूण उत्पन्न होय. या एकूण उत्पन्नांपैकी काही भाग श्रमिकांच्या वेतनासाठी तसेच काही भाग भांडवलावरील चालू खर्चासाठी खर्च करावा लागतो. एकुण उत्पन्नामधून असा वेतनावरील व भांडवलावरील खर्च वजा केला तर शिल्लक राहणारे उत्पन्न हे शुध्द उत्पन्न असते. हे शुध्द उत्पन्न भांडवलदारांना मिळते व भांडवलदारना शध्द उत्पन्नाची गुंतवणूक करतात. तेव्हाच विकासाची प्रक्रिया सुरु होते. याचा अर्थ रिकार्डो यांच्या मते विकासाच्या भांडवलदारांकडील भांडवल संग्रहणाला महत्वाचे स्थान असते. हे भांडवल संग्रहण प्रामुख्याने भांडवलदारांच्या बचत करण्याच्या क्षमतेवर अवलंबून असते. त्यामुळे भांडवलदारांना जेवढा जास्त नफा मिळेल तेवढी बचत क्षमता जास्त राहुन भांडवल संग्रहण जास्त होईल.

रिकार्डो यांनी भांडवल संग्रहणात नफ्याला महत्व दिले आहे. त्यांनी नफ्याचा संबंध वेतनाशी जोडला आहे. त्यांच्या मते नफा हा वेतनावर अवलंबून असतो. तर वेतन हे अन्नधान्यांच्या किंमतीवर अवलंबून असते. अन्नधान्याची किंमत ही जमिनीची (भुमीची) सुपिकता किंवा उत्पादकता किती आहे त्यानुसार ठरते. अन्नधान्याची किंमत जास्त झाल्यास वेतन देखील जास्त होईल. साहजिकच वेतन घटल्यास नफा वाढतो. याउलट वेतन वाढल्यास नफा घटतो. या संदर्भात रिकार्डो यांनी जमिनीच्या व सुपिकतेचा विचार केलेला आहे. त्यांच्या मते उत्पादन तंत्रात सुधारणा केल्यामुळे शेतीची सुपिकता किंवा उत्पादकता वाढते. त्यामुळे अन्नधान्याच्या किंमती कमी होतात व त्यामुळे श्रमिकांना वेतन कमी दिले जाते व भांडवलदारांना नफा मात्र जास्त मिळतो. भांडवलदारांच्या जास्त नफ्यामुळे त्यांच्याकडून जास्त बचत केली जाते. त्यामुळे भांडवल संग्रहण वाढत जाते. थोडक्यात रिकार्डो यांच्या मते अर्थव्यवस्थेत भांडवल संग्रहण हे नफ्यावर अवलंबून असते आणि नफ्याचा संबंध हा वेतनाशी असतो आणि तो व्यस्त स्वरुपाचा असतो. जोपर्यंत भांडवलदारांना नफा मिळत राहतो तोपर्यंत भांडवल संग्रहण होवून विकासाची प्रक्रिया सुरु राहील.

**स्थैतिक अवस्था :**

रिकार्डो यांच्या मते अर्थव्यवस्थेचा विकास कायमस्वरुपी व सातत्याने होत राहणे शक्य नसते. काही काळाने विकास प्रक्रिया खंडीत होते. म्हणजेच अर्थव्यवस्थेत स्थैतिक अवस्था (Stationary State) निर्माण होते. अशी अवस्था निर्माण होण्याचे कारण म्हणजे काही काळाने भांडवलदारांच्या नफ्यात होत जाणारी घट होय. नफ्यात घट होत जाण्याची प्रक्रिया कशी असते ते रिकार्डो यांनी पुढीलपमाणे स्पष्ट केले आहे.

रिकार्डो यांच्या मतानुसार सुरुवातीस जेव्हा नफा जास्त मिळतो. तेव्हा भांडवल संग्रहणात वाढ होते. त्यामुळे अर्थव्यवस्थेचा विकास होतो. परंतु भांडवल गुंतवणुकीतील वाढीमुळे उत्पादनात वाढ होत जाते. त्यामुळे अधिक श्रमिकांना कामावर घेतले जाईल. त्यामुळे त्यांच्या वेतनात वाढ केली जाईल. वेतनात वाढ केल्यामुळे लोकसंख्येत वाढ होत जाते व लोकसंख्या वाढीचा परिणाम म्हणजे अन्नधान्यांची मागणी वाढते. त्यामुळे वाढती अन्नधान्याची गरज पूर्ण करण्यासाठी अधिकाधिक जमिन लागवडीसाठी आणली जाईल. परिणामी सुपिक

जमिनीवरील खंडात वाढ होईल. तर कमी सुपिक जमिन लागवडीखाली आणली जाईल. त्यामध्ये कमी उत्पादन मिळेल व त्या जमिनीवर लागवडीसाठीचा खर्च अधिक असल्यामुळे नफा घटण्याची प्रक्रिया सुरु होईल. नफा घटल्याने श्रमिकांच्या वेतनात देखील घट होत जाते. जेव्हा सर्वात कमी सुपिक जमीन लागवडीखाली आणली जाते. तेव्हा अशा जमिनीचा उत्पादन खर्च हा त्या जमिनीतून मिळणाऱ्या उत्पन्नाबरोबर असल्याने नफा मिळत नाही. म्हणजेच याठिकाणी नफ्याचा दर शुन्य झाल्याने अर्थव्यवस्थेत स्थैतिक अवस्था येते. असे रिकार्डो यांनी आपल्या विवेचनातून मांडले आहे.

**आंतरराष्ट्रीय व्यापाराचे स्थान :**

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत आंतरराष्ट्रीय व्यापार देखील महत्वपूर्ण भूमिका बजावत असतो असे रिकार्डो यांचे मत आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे भांडवलदारांच्या नफ्यात होणारी घट काही प्रमाणात टाळता येते. रिकार्डो यांनी मुक्त व्यापाराचे समर्थन केले आहे. मुक्त व्यापार हा सर्वच देशांना फायदेशीर असतो. असे त्यांनी प्रतिपादन केले आहे. मुक्त व्यापारामुळे औद्योगिक राष्ट्रे इतर देशांकडून अन्नधान्याची आयात करु शकतात. अन्नधान्याची आयात केल्याने औद्योगिक राष्ट्रांमध्ये वेतनाचा दर कमी राहून उत्पादनाचा खर्च कमी येतो. परिणामी भांडवलदारांना जास्त नफा मिळून भांडवल संग्रहण वाढते व विकासाची प्रक्रिया सुरळितपणे चालते असे रिकार्डो यांनी स्पष्ट केले आहे.

**अल्पकाळ व दिर्घकाळ :**

विकास प्रक्रियेचे विवेचन करताना रिकार्डो यांनी कालावधीचाही विचार केला आहे. त्यांच्या मतानुसार अल्पकाळात भुमीमध्ये वाढत्या फलाचा (वर्धी उत्पत्ती) नियम लागू होतो. त्यामुळे उत्पादन व नफा वाढून आर्थिक विकास वेगाने होतो. मात्र दिर्घकाळात भुमीमध्ये आऱ्हासी उत्पत्तीची प्रवृत्ती आढळते. त्यामुळे दिर्घकाळात खंडात वाढ होते. त्यामुळे भांडवलदारांचा नफा घटतो. त्यामुळे अर्थव्यवस्थेत स्थैतिक अवस्था निर्माण होऊन आर्थिक विकास थांबतो. थोडक्यात सुपीक जमिनीचा तुटवडा व वाढता खंड हे आर्थिक विकासाला मर्यादित करणारे घट आहेत असे रिकार्डोने आपल्या विवेचनातुन स्पष्ट केले आहे.

**रिकार्डो यांच्या सिध्दांतावरील टीका :**

रिकार्डो यांच्या आर्थिक विकासाच्या सिध्दांतावर पुढीलप्रमाणे काही टीका केल्या जातात.

**१) बचत करणारा वर्ग :** अर्थव्यवस्थेत बचत केवळ भांडवलदारांकडून केली जाते असे रिकार्डो म्हणतात. परंतु आजच्या काळात श्रमिक व जमिनदार हे देखील काही प्रमाणात बचत करतात. त्यामुळे अशी बचत आर्थिक कार्याकडे वळविली जाते व त्यामुळे विकासाला हातभार लागतो. याकडे या सिध्दांतात दुर्लक्ष केले आहे.

**२) वेतनाचा दर :** लोकसंख्या किंवा श्रमिकांची संख्या वाढत असताना वेतनाचा दर वाढत नाही हे रिकार्डो यांचे मत आज कोणत्याच देशात खरे ठरत नाही. उलट अनेक देशांमध्ये वेतनाचा दर वेगाने वाढत असूनही श्रमिकांच्या वेतनात वाढ होताना आढळून येते.

**३) आऱ्हासी उत्पत्ती :** भुमीमध्ये आऱ्हासी प्रवृत्ती निर्माण होत असल्याने शेवटी विकासाची प्रवृत्ती थांबते असे मत रिकार्डो यांनी मांडले. परंतु अलिकडील काळात तंत्रज्ञानाच्या विकासामुळे शेतीतील उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले आहे. अशा तांत्रिक प्रगतीचा अंदाज रिकार्डो यांना येऊ शकला नाही.

वरील महत्त्वपूर्ण दोष अगर टिकांमुळे रिकार्डो यांच्या सिध्दांताला काही प्रमाणात मर्यादा पडतात.

### ३.२.२ मिर्दाल यांचा आर्थिक विकासाचा सिध्दांत :

मिर्दाल यांच्या आर्थिक विकाससंबंधीच्या सिध्दांताचं मुळ स्वरुप त्यांनी मांडलेल्या आंतरराष्ट्रीय आर्थिक विषमतेच्या संकल्पनेतून लक्षात घ्यावे लागते. 'एशियन ड्रामा' हा मिर्दाल यांचा जगप्रसिध्द ग्रंथ मानला गेला आहे. ज्याप्रमाणे अॅडमस्मिथ यांना त्यांच्या 'राष्ट्राची संपत्ती' या ग्रंथामुळे, कार्ल मार्क्सचा 'दास कॅपिटल' या ग्रंथामुळे जी प्रसिध्दी मिळाली, तशीच प्रसिध्दी मिर्दाल यांना 'एशियन ड्रामा' या ग्रंथाने मिळवून दिली आहे. याच जगप्रसिध्द ग्रंथामधून मिर्दाल यांनी आंतरराष्ट्रीय आर्थिक विषमतेवर प्रकाश टाकून संपूर्ण जगाचे लक्ष या प्रश्नांकडे वेधण्याचा प्रयत्न केला आहे. आंतरराष्ट्रीय विषमतेची चर्चा करताना विविध घटकांच्या चक्रीय कार्यकारण संबंधाची मिर्दाल यांनी चर्चा केली आहे. मिर्दाल यांनी आर्थिक विकाससंबंधी चक्रीय कार्यकारण सिध्दांत मांडून त्याद्वारे आर्थिक विषमतेचे स्पष्टीकरण केले आहे आणि आंतरराष्ट्रीय विषमतेच्या स्पष्टकरणासाठी मिर्दाल यांनी आपल्या सिध्दांतात पुढील तीन संकल्पनांचा आधार घेतला आहे.

१) चक्रिय कार्यकारण संबंध (Circular Causation)

२) वर्धमान प्रक्रिया (Cumulative Process)

३) विस्तारक व प्रतिसारक परिणाम (Spread & Backwash Effects)

**चक्रिय कार्यकारणसंबंध व वर्धमान प्रक्रिया :**

मिर्दाल यांच्या मते अर्थव्यवस्थेतील विविध चले (Variables) ही परस्परांशी चक्रिय संबंधाने निगडीत असतात. ही चले एक दुसऱ्याचे कारण आणि परिणामही असतात. विकसनशील राष्ट्रातील लोकांचे दरडोई उत्पन्न कमी असते. त्यामुळे त्यांचा उपभोग आणि बचत देखील कमीच असते. त्यातुनच त्यांची गुंतवणूक व उत्पादकता कमी राहते. या सर्वाचा परिणाम म्हणून शेवटी दरडोई उत्पन्न सुध्दा कमीच असते. म्हणजेच वरील चलांमधील चक्रिय कार्यकारण संबंधामुळे आणि वर्धमान प्रक्रियेमुळे राष्ट्र मागासलेलेच राहते. मिर्दाल यांनी चक्रिय कार्यकारण संबंध स्पष्ट करण्यासाठी अमेरिकेतील निग्रो समाजातील समस्येचे उदाहरण दिले आहे.

अमेरिकेत निग्रो लोकांची संख्या जास्त असून देखील त्यांचा सामाजिक दर्जा खालावलेला होता. यामागे खालील दोन घटकांचा चक्रिय कार्यकारण संबंध दिसून येतो.

१) निग्रोबद्दल गौरवर्णियांकडून केला जाणारा वर्णभेद.

२) निग्रोंचा खालावलेला राहणीमानाचा स्तर.

वर्णभेदांमुळे निग्रोंचे राहणीमान कमी ठेवले जाते. तर कमी राहणीमानामुळे पुन्हा वर्णभेद वाढून त्यातून त्यांच्या राहणीमानाचा स्तर कमी राहतो. म्हणून या ठिकाणी वरील दोन्ही घटक परस्परांचे कारण व परिणाम असून

या चक्रिय कार्यकारण संबंधातून निग्रोंची सामाजिक परिस्थिती खालावलेलीच राहते. मिर्दाल यांच्या मतानुसार निग्रोंचे राहणीमान कमी ठेवणारा एक घटक जरी बदलला तरी त्यामधून वर्धमान प्रक्रिया सुरु होऊन त्यांच्या राहणीमानावर त्यांचा अनुकूल किंवा प्रतिकूल परिणाम दिसून येईल.

जर गौरवर्णियांचा निग्रोंकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला किंवा शिक्षण व रोजगार पातळीत वाढ यांसारख्या अंतर्गत कारणांमध्ये बदल घडवून आणल्यास वर्धमान प्रक्रिया लवकर सुरु होऊन निग्रोंची परिस्थिती लवकर सुधारेल. अशा प्रकारे चक्रिय कार्यकारण संबंध विचारात घेऊन केवळ एका घटकात योग्य बदल करुन वर्धमान प्रक्रिया चांगल्या दिशेने सुरु करता येईल. याचाच अर्थ दुष्ट चक्राचे रुपांतर जर सुष्ट चक्रांमध्ये होऊ शकले तर अल्पविकसित राष्ट्रांचा विकास जलद होऊ शकतो.

**प्रादेशिक विषमतेची मिमांसा :**

मिर्दाल यांनी आपल्या चक्रिय कार्यकारण सिध्दांताच्या आधारे प्रादेशिक विषमतेचे स्पष्टीकरण केले आहे. मिर्दाल यांच्या मते विविध घटकांमधील चक्रीय कार्यकारण संबंधामधून प्रादेशिक विषमता वाढीस लागते. देशामध्ये काही प्रदेश असे असतात की, तेथे विकासाची प्रक्रिया आधी सुरु होते व त्या प्रदेशाचा विकास होत राहतो. मात्र इतर प्रदेशांमध्ये विकासाची क्षमता असून सुध्दा त्या प्रदेशात कुशल श्रमिक, भांडवल, तसेच संघटक इ. घटक आकर्षित न होता विकसित प्रदेशाकडेच आकर्षित होतात. त्यामुळे विकसित भागाचा विकास होत राहतो व मागासलेला प्रदेश अधिकच मागास राहतो. त्यातुनच प्रादेशिक विषमता वाढीस लागते. मिर्दाल यांच्या पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूकीत वाढ होत गेली. त्यामुळे रस्ते, रेल्वे, दळणवळणाच्या सोई वाहतूक साधने इ.मध्ये वाढ होत गेली. अनेक देश परकीय देशांबरोबर व्यापार करू लागले. या सर्व घडामोडीतून अनेक देशांच्या अर्थव्यवस्था पारंपारिक अवस्थेतून उड्डाणपूर्व अवस्थेकडे झेप घेऊ लागल्या. अर्थात ही उड्डाणपूर्व अवस्था किती काळ राहिल हे संबंधित देशामधील राजकीय नेतृत्वाची इच्छाशक्ती, शेतीची प्रगती, औद्योगिक प्रगती इ. घटकांवर अवलंबून राहते. हे घटक अनुकूल राहिल्यास हा काळ कमी राहील याउलट या घटकांची प्रतिकूलता असल्यास हा काळ अधिक राहील असे रोस्टो यांचे मत आहे.

**३) उड्डाणावस्था (Take - off) :**

विकासाच्या अवस्थेमधील सर्वात महत्त्वपूर्ण अवस्था म्हणजे उड्डाणावस्था होय. या अवस्थेमध्ये विकासाच्या मार्गातील सर्व अडथळे दूर झालेले असतात. उड्डाण हा शब्द रोस्टो यांनी विमानशास्त्राचा आधार घेऊन वापरलेला आहे. विमानाने धावपट्टीवरून किमान गती प्राप्त केल्यानंतर ते आकाशाकडे झेप घेते त्यास विमानाचे उड्डाण असे म्हणतात. त्याचप्रमाणे उड्डाणपूर्ण अवस्थेत अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या किमान अटी पूर्ण होतात व नंतर अर्थव्यवस्थेची खरी प्रगती सुरू होते. त्यालाच रोस्टो यांनी 'उड्डाणावस्था' असे संबोधले आहे.

रोस्टो यांच्या मते उड्डाणावस्था म्हणजे समाजाच्या जीवनातील एक निर्णायक बदलाचा क्षण आहे. कारण येथून विकास ही एक सामान्य प्रक्रिया बनते. रोस्टो यांनी उड्डाण अवस्थेला औद्योगिक क्रांतीच असे म्हटले आहे. या अवस्थेचा कालखंड २० ते ३० वर्षाचा असतो.

रोस्टो यांच्या मते उड्डाणावस्थेसाठी पुढील अटी पूर्ण होणे आवश्यक आहे.

**१) निव्वळ गुंतवणुकीचा उच्च दर :**

रोस्टो यांच्या मते जर अर्थव्यवस्थेत दरडोई उत्पन्न वाढीचा दर हा लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षा जास्त करावयाचा असेल तर निव्वळ राष्ट्रीय उत्पन्नाचा १०.५ ते १२.५ टक्के भाग हा नियमितपणे गुंतवणे आवश्यक आहे. ही गुंतवणूकीची अट पूर्ण झाल्याशिवाय उड्डाणावस्थेची कल्पना साध्य होणार नाही.

**२) प्रधान क्षेत्राचा विकास :**

रोस्टो यांच्या मते उड्डाणावस्था प्राप्त करण्यासाठी ज्या क्षेत्रात विकासाचा दर जास्त असेल अशा क्षेत्राचा विकास होणे आवश्यक आहे. त्या क्षेत्रामध्ये उत्पादन केल्या जाणाऱ्या वस्तू आणि सेवांना प्रभावी मागणी असली पाहिजे. तसेच विकासाकरीता या क्षेत्रात पुरेसे भांडवल असावे आणि यातून मिळणाऱ्या नफ्याची पुर्नगुंतवणूक, झाली पाहिजे. प्रधान क्षेत्र म्हणजे असे क्षेत्र की, त्या क्षेत्राच्या विकासामुळे इतर क्षेत्रांमध्ये उत्पादन वाढीला चालना मिळून त्या क्षेत्रांचा विकास झाला पाहिजे.

प्रा. रोस्टो यांच्या मते प्रधान क्षेत्रामध्ये पुढील तीन क्षेत्रांचा समावेश करता येऊ शकेल.

**अ) प्राथमिक विकास क्षेत्र :** या क्षेत्रामध्ये कापड उद्योग किंवा रेल्वे उद्योगांसारख्या उद्योगांचा समावेश करता येतो. कारण अशा उद्योगामध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर करता येऊ शकेल. त्यामुळे हे क्षेत्र प्रधान ठरू शकते.

**ब) दुय्यम विकास क्षेत्र :** दुय्यम विकास क्षेत्रामध्ये लोखंड पोलाद उद्योगांचा समावेश होता. या उद्योगांचा विकास हा रेल्वेच्या विकासावर अवलंबून असतो. रेल्वेचा विकास होत गेल्यास लोखंड व पोलाद उद्योगांचा विकास होतो आणि हा विकास इतर उद्योगांच्या विकासाला पूरक ठरतो.

**क) आधारित विकास क्षेत्र :** देशातील लोकसंख्या, उत्पन्न इ. घटकांच्या वाढीमुळे विस्तारीत होणारे आधारित विकास क्षेत्र किंवा उत्पादित विकास क्षेत्र असू शकते. या विकास क्षेत्रात अन्नपदार्थ उत्पादन करणारे उद्योग, तसेच गृहनिर्माण उद्योग इ. उद्योगांचा समावेश होतो. लोकसंख्या वाढत जाईल तसतशी अन्नधान्य उत्पादन व गृहनिर्माण उद्योगांची वाढ होत जाईल.

**३) संस्थात्मक रचना :**

उड्डाणावस्थेला प्रेरक ठरणारी सामाजिक, राजकीय आणि संस्थात्मक रचना अत्यंत आवश्यक असते असे रोस्टो यांचे मत आहे. देशातील भांडवलनिर्मिती ही संस्थात्मक रचनेवर अवलंबून असते. जपान सारख्या राष्ट्राने संस्थात्मक रचनांच्या आधारावर कोणत्याही देशाची मदत न घेता उड्डाणावस्था प्राप्त केली आहे. उड्डाण अवस्थेचे वैशिष्ट्य म्हणजे या अवस्थेत नवनवीन उद्योग अतिशय वेगाने विकसित होतात. त्यांचा नफा पुन्हा गुंतविल्यामुळे औद्योगिक विकास गतिमान होतो. औद्योगिक विकासामुळे श्रमिकांच्या संख्येत वाढ होते. त्याचबरोबर सेवा क्षेत्राचाही विकास होतो. लोकांचे उत्पन्न वाढून बचत आणि पर्यायाने गुंतवणुकीत वाढ होते. अशा रितीने स्वयंचलित विकास होत राहतो. केवळ उद्योगच नव्हे तर शेती क्षेत्रामध्येदेखील नवीन तंत्रज्ञानाचा वापर होत असल्याने उड्डाणावस्थेच्या काळात शेतीवरील अवलंबित्व कमी होते.

निरनिराळ्या अर्थव्यवस्थांमध्ये (राष्ट्रांमध्ये) उड्डाणावस्था केव्हा पूर्ण झाली याचा कालखंड रोस्टो यांनी पुढीलप्रमाणे सांगितला आहे.

| देश | उड्डाणावस्थेचा काळ | |
|---|---|---|
| इंग्लंड | १७८३-१८०२ | (१९ वर्षे) |
| फ्रान्स | १८३०-१८६० | (३० वर्षे) |
| बेल्जियम | १८३३-१८६० | (२७ वर्षे) |
| युनायटेड स्टेट्स | १८४३-१८६० | (२३ वर्षे) |
| जर्मनी | १८५०-१८७३ | (२३ वर्षे) |
| स्विडन | १८६८-१८९० | (२२ वर्षे) |
| जपान | १८७८-१९०० | (२२ वर्षे) |
| रशिया | १८९०-१९१४ | (२४ वर्षे) |
| कॅनडा | १८९६-१९१४ | (१८ वर्षे) |
| भारत | १९५२- | |
| चीन | १९५२- | |

### ४) पुर्णावस्थेकडे वाटचाल (Drive to Maturity) :

रोस्टो यांच्या सांगितलेल्या विकासाच्या अवस्थेतील चौथी अवस्था म्हणजे पुर्णावस्थेकडे वाटचाल होय. ही अवस्था उड्डाणावस्थेनंतर साधारणपणे ६० वर्षांनी प्राप्त होते. या अवस्थेत तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करून साधनसामग्रीचा पर्याप्त वापर केला जातो. उत्पादनात प्रचंड वाढ झालेली असते. या काळात गुंतवणूकीचा दर राष्ट्रीय उत्पन्नाच्या १० ते २० टक्के इतका असतो. या अवस्थेमध्ये लोकसंख्येचा भार कमी होऊन, देशात पर्याप्त लोकसंख्येची अवस्था निर्माण होते. आवश्यक अशा सर्वच वस्तू देशातच निर्माण होतात. नवीन तंत्रज्ञानाचे फायदे मिळविण्याची अर्थव्यवस्थेत क्षमता निर्माण झालेली असते. तसेच या अवस्थेमध्ये देशाला आंतरराष्ट्रीय रचनेमध्ये महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त होते. तसेच या विकासाच्या अवस्थेमध्ये श्रमिक अधिक कुशल बनतात. त्यांच्या कौशल्यात आणि कार्यक्षमतेत वाढ होते. श्रमिकांप्रमाणेच संघटकांचा वर्गसुद्धा अधिक कार्यक्षम आणि सुसंस्कृत होतो. औद्योगिकरणाचे विविध फायदे देशातील नागरिकांना माहित होतात. त्यामुळे ते नेहमीच नवीन तंत्र, नवीन संधी, नवीन प्रेरणा याची वाट पाहत असतात.

### ५) अतिउपभोगाची अवस्था (Age of High Mass-Consumption) :

या अवस्थेमध्ये लोकांच्या वास्तव उत्पन्नात मोठी वाढ झालेली असते. त्यामुळे त्यांच्या मुलभूत

गरजांबरोबरच चैनिच्या व आरामदाई वस्तुंच्या उपभोगात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असते. याबरोबरच या अवस्थेमध्ये शहरीकरणात प्रचंड वाढ घडून येते. त्यामुळे सेवा क्षेत्राचा विकास प्रचंड प्रमाणावर होतो. नोकरी करणाऱ्या लोकांचे प्रमाण खूप असते. तसेच अर्थव्यवस्थेमधून अधिकाधिक लाभ मिळविण्यासाठी सर्वच व्यक्ती अगर घटक प्रयत्नशील असतात. उत्पादनाच्या क्षेत्रात भांडवली वस्तुंच्या निर्मितीबरोबरच उपभोग्य वस्तुंच्या निर्मितीवर अधिक भर दिला जातो. उपभोग्य वस्तुंमध्ये टी.व्ही, फ्रिज, फर्निचर यासारख्या वस्तुंच्या उपभोगाचे प्रमाण अधिक असते. रोस्टो यांच्या मते या अतिउच्च उपभोगाच्या अवस्थेत सामाजिक कल्याण आणि सुरक्षितता या बाबींना खूपच महत्त्व दिले जाते.

रोस्टो यांच्या मताप्रमाणे अतिउपभोगाची अवस्था अमेरिकेत सर्वात आधी म्हणजे १९२० पूर्वी सुरू झाली. इंग्लंडमध्ये ती १९३० तर जपान आणि युरोपीयन राष्ट्रात १९५० च्या दशकात सुरू झाली.

**मूल्यमापन :**

रोस्टो यांच्या आर्थिक विकासाच्या अवस्था या विषयीच्या विवेचनाला 'सिद्धांत' म्हणता येणार नाही अशी अनेक अर्थतज्ञांनी म्हटले आहे. कारण त्यांनी इतिहासाचा आधार घेऊन काही सामान्य अवस्था दाखविल्या आहेत. परंतु अर्थव्यवस्थेचा विकास हा रोस्टोने सांगितलेल्या पाच टप्प्यांनी होणे शक्य नाही. अशा स्वरूपाच्या टिका करण्यात आलेल्या आहेत. रोस्टो यांच्या सिद्धांतावर करण्यात आलेल्या काही प्रमुख टिका पुढीलप्रमाणे आहेत.

१) **पारंपारिक अवस्था :** रोस्टो यांनी सांगितलेली विकासाची पहिली अवस्था म्हणजेच पारंपारिक अवस्था होय. परंतु बहुतांश विकसीत झालेल्या देशांमध्ये पारंपारिक अवस्था आढळत नाही. उदा- कॅनडा, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, न्युझिलंड इ. देशांमध्ये वरील अवस्था आढळलेली नाही.

२) **उड्डाणावस्था :** उड्डाण अवस्थेची रोस्टोंनी सांगितलेली वैशिष्टे त्या अवस्थेच्या सुरूवातीस दिसून येतात की शेवटी याबाबत रोस्टो यांचे विवेचन स्पष्ट स्वरूपात नाही. त्यांनी विविध देशांच्या बाबत उड्डाण अवस्थेचा कालावधी वादग्रस्त आहे. भारतासाठी रोस्टो यांनी उड्डाणावस्थेचे वर्ष १९३७ चा उल्लेख केला होता आणि नंतर १९५२ असा उल्लेख केलेला आहे. तसेच उड्डाण अवस्थेत गुंतवणूक वाढल्याने राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीच्या वेगात मोठी वाढ होते असे रोस्टोचे मत आहे. परंतु तशी वाढ रोस्टो यांनी विचारात घेतलेल्या देशांच्या बाबतीत दिसून येते नाही.

३) **उड्डाणाच्या अटी :** उड्डाण अवस्थेच्या रोस्टो यांनी सांगितलेल्या अटी काल्पनिक आहेत. उदा- गुंतवणूकीचा दर १०% असावा, तसेच प्रधान क्षेत्राची अट अयोग्य वाटते. कारण रोस्टोने प्रधान क्षेत्रामध्ये उद्योग क्षेत्राला समाविष्ट केले आहे. खरेतर प्रधान क्षेत्रामध्ये शेती क्षेत्राचा सुद्धा समावेश होऊ शकतो याकडे रोस्टो यांनी दुर्लक्ष केले आहे.

४) **अतिउपभोग अवस्था :** रोस्टो यांनी सांगितलेली ही सर्वात शेवटची अवस्था आहे. परंतु या अवस्थेची जी वैशिष्ट्ये रोस्टो यांनी सांगितली ती या आधीच्या अवस्थेमध्ये दिसू शकतात.

**सारांश :**

रोस्टो यांच्या सिद्धांतावर वरीलप्रमाणे टिका केल्या असल्या तरी रोस्टो यांची उड्डाणावस्थेची कल्पना विकसनशील देशांच्या औद्योगिकरणाच्या संदर्भात उपयुक्त ठरते. तसेच रोस्टो यांची प्रधान क्षेत्राची महत्त्वपूर्ण भूमिका विकसनशील देशांच्या बाबतीत विचारात घेण्यासारखीच आहे. कारण प्रधान क्षेत्र हे विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असते आणि म्हणून रोस्टो यांच्या सिद्धांताला महत्त्व प्राप्त झालेले आहे.

**३.२.४ संतुलित व असंतुलित विकास सिद्धांत :**

**प्रास्ताविक :**

संतुलित व असंतुलित विकासाबाबत अर्थशास्त्रज्ञांमध्ये तीव्र स्वरूपाने मतभेद आढळून येतात. रोझेस्टिन रोडान, लायबेन्स्टाईन, रॅग्नर नर्क्स हे विचारवंत संतुलित विकासाचे समर्थक मानले जातात. याउलट पॉल स्ट्रीटन, हर्शमान, रोस्टो, सिंगर इ. अर्थशास्त्रज्ञ असंतुलित विकासाचे समर्थन करणारे आहेत. संतुलित विकासाचे समर्थन करणाऱ्या विचारवंतांच्या मते अर्थव्यवस्थेत केली जाणारी गुंतवणूक ही जास्तीत जास्त आणि विविध क्षेत्रांमध्ये व्हावी. याचाच अर्थ अर्थव्यवस्थेतील प्रत्येक क्षेत्राची प्रगती एकाच वेळी व्हावी. याउलट असंतुलानातून विकास याविषयी समर्थन करणाऱ्या विचारवंतांच्या मते अर्थव्यवस्थेत सर्व क्षेत्रात गुंतवणूक न करता काही निवडक अशाच क्षेत्रात प्रथम केल्यास जास्त फायदेशीर ठरते. अशाप्रकारे संतुलनातून विकास आणि असंतुलनातून विकास या दोन विचारधारा आहेत. या दोन्ही पैकी कोणती विचारधारा अधिक फायदेशीर आणि कोणती विचारधारा कमी फायदेशीर हे ठरविणे कठीण आहे आणि म्हणून या दोन्ही बाजुंनी मांडली जाणारी मते कोणती त्यातील दोष कोणते हे अभ्यासणे महत्त्वपूर्ण ठरते.

**अ) संतुलित विकास (Balanced Growth) :**

संतुलित विकास या संकल्पनेबाबत अर्थशास्त्रज्ञांमध्ये एकवाक्यता दिसून येत नाही. सॅम्युअलसन यांच्यामते संतुलित विकास म्हणजे सर्व प्रकारच्या भांडवली साठ्यात एका निश्चित दराने वाढ होणे होय. तर काहींच्या मते शेतीतील मागासलेपणा दूर करण्यासाठी औद्योगिकरण करणे हे संतुलनाचे लक्षण आहे.

वरील वैचारिक मतभेद बाजूला ठेवून आपण असे म्हणू शकतो की, संतुलित विकासाच्या कल्पनेत संपूर्ण अर्थव्यवस्थेचा एकत्रित एकसंघ असा विकास घडवून आणणे होय. अर्थव्यवस्थेतील प्रत्येक क्षेत्राची प्रगती एकाचवेळी व्हावी. कोणतेही एक क्षेत्र अतिप्रगत होवू नये तसेच ते अविकसित किंवा अप्रगत राहू नये. असा विचार संतुलित विकास या संकल्पनेत अभिप्रेत आहे. समजा अर्थव्यवस्थेत केवळ उद्योगांचा विकास झाला आणि शेती क्षेत्र मागासलेले राहिले तर उद्योगांना आवश्यक असणारा कच्चा माल पुरेशा प्रमाणात उपलब्ध होणार नाही. याउलट केवळ शेतीचा विकास होऊन उद्योगक्षेत्र मागासलेले राहिले तर शेतीतील कच्चा माल पडून राहिल. म्हणूनच शेतीच्या प्रगतिसाठी उद्योगांचा विकास व उद्योगांच्या प्रगतीसाठी शेतीचा विकास होणे आवश्यक ठरते. त्याचप्रमाणे अर्थव्यवस्थेत उपभोग्य वस्तुंचे उत्पादन जास्त व भांडवली वस्तुंचे उत्पादन कमी असे असून चालणार नाही तर या दोन्ही प्रकारच्या वस्तुंच्या उत्पादनात समतोलपणा असला पाहिजे. असे झाले तरच संतुलित विकास साध्य होतो. यावरून संतुलित विकासासाठी आवश्यक अशा अटी आपणास पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) विविध उद्योगांमध्ये एकाचवेळी गुंतवणूक झाली पाहिजे.

२) प्रत्येक क्षेत्रात किती प्रमाणात गुंतवणूक केली पाहिजे हे ठरविताना बाजारपेठेच्या विस्ताराकडेही लक्ष दिले पाहिजे.

३) गुंतवणूक करताना उत्पादन क्षेत्रे एकमेकास पूरक असतील याचा विचार केला जावा.

४) वरील सर्व अटींची कार्यक्षमपणे पूर्तता करण्यासाठी प्रभावी केंद्रीय नियंत्रण असले पाहिजे.

**संतुलित विकास सिद्धांत :**

संतुलित विकासाबाबत रोझेस्टीन रोडान, प्रो. रॅग्नर नर्क्स यांनी आपआपले सिद्धांत मांडलेले आहेत. या सिद्धांताचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**रोझिस्टन रोडानचे स्पष्टीकरण :**

प्रा. रोझेस्टिन रोडान यांनी सर्वप्रथम १९४३ मध्ये संतुलित विकासाची कल्पना मांडली आहे. रोडान यांच्यामते अविकसीत आणि विकसनशील राष्ट्रांमध्ये दारिद्र्याचे दुष्टचक्रे कार्यरत असतात. त्यामुळे अशा राष्ट्रांचा आर्थिक विकास घडून येणे कठीण असते. अशी दुष्टचक्रे दूर करणे विकासाच्या दुष्टीने अत्यंत आवश्यक असते. यासाठी बाजारपेठांमधील अपूर्णता दूर करावी लागते. त्यासाठी संतुलित विकासाचा मार्ग योग्य असतो असे रोडान यांचे मत आहे.

बाजारपेठेमधील अपूर्णता दूर करण्यासाठी उपाय म्हणजे विविध अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रांमध्ये एकाचवेळी गुंतवणूक व्हायला हवी. त्यामुळे एका उद्योगाच्या उत्पादनाला इतर उद्योगांकडून मागणी निर्माण होईल व त्यामुळे सर्वच उद्योगांचा समान प्रमाणात विकास होईल व त्याबरोबरच बाजारपेठेचा विस्तारही होऊ शकेल. रोडान यांच्या मते जर अर्थव्यवस्थेतील एकाच उद्योगात गुंतवणूक केली तर त्याचे इतर क्षेत्रांवर होणाऱ्या अनुकूल परिणामांसाठी खूपच वेळ लागतो. त्यामुळे विकासाचा वेग देखील मंद राहील. म्हणून अर्थव्यवस्थेत विविध उद्योगांमध्ये एकाचवेळी गुंतवणूक आवश्यक ठरते. रोडान यांनी आपले मत स्पष्ट करण्यासाठी पादत्राण उद्योगाचे उदाहरण दिले आहे.

**पादत्राण उद्योगाचे उदाहरण :**

रोझेटिन रोडान यांच्या म्हणण्यानुसार समजा एखाद्या विकसनशील अर्थव्यवस्थेत एखादा पादत्राण उद्योग उभारण्यात आला तर उद्योगासाठी १०० बेरोजगार श्रमिकांना काम मिळेल. त्यामुळे आता या १०० श्रमिकांना वेतन स्वरूपात जे उत्पन्न मिळेल ते सर्व उत्पन्न त्यांनी त्याच उद्योगात तयार होणाऱ्या पादत्राणांवर खर्च केले तर पादत्राणांच्या उत्पादनाला बाजारपेठ मिळाल्याने तो उद्योग यशस्वी होईल. परंतु श्रमिक आपले सर्वच उत्पन्न केवळ पादत्राणे खरेदीसाठी खर्च करतील असे नाही. तर त्यांना जीवन जगण्यासाठी इतर आवश्यक वस्तुंची गरज असल्याने इतर गरजेच्या वस्तुंवर सुद्धा त्यांना आपले उत्पन्न खर्च करावे लागते. त्यामुळे या पादत्राण उद्योगाला कायमस्वरूपात बाजारपेठ उपलब्ध होणार नाही. त्यामुळे बाजारपेठेअभावी असा उद्योग बंद पडेल किंवा य उद्योगास तोटा होईल आणि म्हणूनच यावर उपाय म्हणून हेच उदाहरण रोडान यांनी थोड्या वेगळ्या प्रकारे स्पष्ट

केले आहे.

रोडान यांच्यामते वरील पादत्राण उद्योगासोबतच इतर वस्तुंचे उत्पादन करणारे एकूण १०० उद्योग सुरू केल्यास अशा सर्व उद्योगांमध्ये १०,००० श्रमिकांना रोजगार मिळेल. आता या सर्व १०,००० श्रमिकांना मिळणारे उत्पन्न १०० उद्योगांमध्ये उत्पादन होणाऱ्या विविध वस्तुंवर खर्च होईल. त्यामुळे प्रत्येक वस्तुला बाजारपेठ उपलब्ध होईल. याचाच अर्थ जे एका पादत्राण उद्योगाबाबत होऊ शकले नाही ते या १०० उद्योगांबाबत होऊ शकेल व अशा उद्योगांमध्ये गुंतवणूक करण्याची प्रेरणा मिळेल व सर्व उद्योगांचा एकाचवेळी विकास घडून येईल.

रोडान यांनी वरील प्रमाणे दिलेल्या उदाहरणावरून असे स्पष्ट होते की, केवळ एकाच उद्योगात गुंतवणूक करण्यापेक्षा परस्परांना पूरक अशा विविध क्षेत्रांमध्ये एकाचवेळी गुंतवणूक केल्यास संपूर्ण अर्थव्यवस्थेचा संतुलित विकास साध्य होतो. अर्थात असे असले तरी अशाप्रकारे एकाचवेळी विविध क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यासाठी खाजगी लोक गुंतवणूकीसाठी धाडस करणे कठीण असल्याने अशावेळी तेथे गुंतवणूकीसाठी सरकारने पुढाकार घेतला पाहिजे. एकदा सरकारने पुढाकार घेतल्यावर आपोआपच खाजगी गुंतवणूकदार सुद्धा गुंतवणूकीसाठी धाडशी पाऊल टाकतात. त्यामुळे विकासाचा मार्ग मोकळा होतो.

**रॅग्नर नर्क्सचे विचार :**

संतुलित विकासाबाबत रोझेस्टिन रोडान यांनी मांडलेल्या विश्लेषणाचा आधार घेऊन प्रो. रॅग्नर नर्क्स यांनी पुढे त्यामध्ये भर घातली. त्यामुळे प्रो. नर्क्स यांच्या संतुलित विकासाच्या तत्वाला चांगली प्रसिद्धी मिळाली.

प्रो. नर्स्के यांच्या मतानुसार देशाच्या आर्थिक विकासातील एक प्रमुख अडथळा म्हणजे 'दारिद्र्याचे दुष्टचक्र' होय. अविकसीत देशामध्ये दारिद्र्याचे दुष्टचक्र कार्यरत असते. हे दारिद्र्याचे दुष्टचक्र छेदल्याशिवाय अशा देशांचा आर्थिक विकास घडून येणे अशक्य आहे असे नर्क्स यांचे मत आहे. संतुलित विकासाद्वारे दुष्टचक्राला छेद देणे शक्य आहे असे नर्क्स यांनी आपल्या विवेचनातून स्पष्ट केले आहे.

नर्क्स यांच्या मते अविकसीत राष्ट्रातील मागासलेपणा व दारिद्र्य दूर करावयाचे असेल तर देशात एकाचवेळी वेगवेगळ्या परंतु एकमेकांशी पूरक अशा अनेक उद्योगांमध्ये गुंतवणूक करणे आवश्यक आहे. असे केल्यासच दुष्टचक्र तोडता येणे शक्य आहे असे नर्क्स यांनी प्रतिपादन केले आहे. एकाचवेळी अनेक उद्योगांत गुंतवणूक केल्यामुळे एका उद्योगातून तयार होणारे उत्पादन हे दुसऱ्या उद्योगासाठी कच्चा माल ठरेल. दुसऱ्या शब्दात एका उद्योगाचा पुरवठा हा इतर उद्योगांसाठी मागणी असेल. त्यामुळे अर्थव्यवस्थेत अतिरिक्त क्षमता किंवा वस्तुंचा तुटवडा निर्माण होण्याचा प्रश्न उद्‌भवणार नाही.

प्रो. नर्क्स यांच्यामते समतोल विकास याचा अर्थ सर्व उद्योगांची वाढ एकाच दराने करावी असा नसून प्रत्येक उद्योगाची वाढ पर्याप्त दराने झाली पाहिजे. जेव्हा अनेक उद्योगांमध्ये एकाचवेळी गुंतवणूक केल्यामुळे लोकांची क्रयशक्ती वाढते व त्यामुळे विविध वस्तुंच्या मागणीत वाढ होऊन बाजारपेठेचा विस्तार घडून येतो. तसेच नर्क्स यांच्यामते कृषी आणि उद्योग या क्षेत्रांत एकाचवेळी गुंतवणूक केल्यास या दोन्ही क्षेत्रांचा समतोल

विकास साधला जाईल.

**अतिरिक्त मनुष्यबळाचा भांडवल निर्मितीसाठी वापर :**

अविकसीत देशातील अतिरिक्त मनुष्यबळाचा वापर भांडवल निर्मितीसाठी कसा करावा हा एक महत्त्वपूर्ण विचार नर्क्स यांनी आपल्या विवेचनात मांडला आहे. नर्क्सच्या मते अविकसीत राष्ट्रांत शेती क्षेत्रात छुपी बेकारी (सुप्त बेकारी) मोठ्या प्रमाणात आढळते. छुपी बेकारी म्हणजे शेतीच्या कामामध्ये जेवढ्या व्यक्तींची गरज असते त्यापैकी अधिक व्यक्ती शेतीत काम करत असतात. परंतु अशा अतिरिक्त व्यक्तींकडून शेती उत्पादनात कोणतीही वाढ होत नाही. तेव्हा छुपी बेकारी अस्तित्वात असते. उदा. एखाद्या शेतकरी कुटुंबाजवळ २ एकर जमीन असून त्या शेती कामासाठी ३ कामगार पुरेशे आहेत. मात्र प्रत्यक्षात त्या कुटुंबातील ५ कामगार त्या शेतावर काम करतात म्हणजे २ कामगार अतिरिक्त आहेत आणि त्या दोन कामगारांकडून शेती उत्पन्नात कसलीही वाढ होत नाही याचाच अर्थ ते २ कामगार छुपे बेकार आहेत, असा अर्थ होतो.

नर्क्सच्या मते अशी अतिरिक्त माणसे शेती व्यतिरिक्त इतर उत्पादक कार्यामध्ये वापरल्यास उदा. वनीकरण, रस्ते बांधणी, शेत तळी, शेतीला बांध घालणे, इ. कामासाठी वापरल्यास शेती उत्पादन वाढून त्यातून भांडवलनिर्मिती होते.

**बचत प्रवृत्ती वाढविणे :**

नर्क्स यांच्या मते ग्रामीण भागातील जनतेकडून अल्पबचत योजनेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी जमा होऊ शकतो. बचत सर्वांना बंधनकारक करून भांडवलनिर्मिती करावी. बचत रूपाने जमा झालेला निधी अनुत्पादक कार्यासाठी न वापरता उत्पादक कार्यासाठी वापरला जावा. बचतीचा वापर प्रामुख्याने सामाजिक संरचना निर्माण करण्यासाठी करावा. उदा. वाहतूक, दळणवळण, वीज, पाणीपुरवठा इ. अशा प्रकारे संतुलित विकास पद्धतीनेच अविकसीत देश दारिद्र्याच्या दुष्ट चक्रातून बाहेर पडू शकतात असे नर्क्स यांनी प्रतिपादन केले आहे.

**संतुलित विकास सिद्धांताचे मुल्यमापन :**

संतुलित विकास सिद्धांतावर प्रामुख्याने हर्शमान व सिंगर या विचारवंतांनी काही आक्षेप घेतले आहेत. त्यांच्या आक्षेपाचे मुद्दे पुढीलप्रमाणे आहे.

१) सिंगर यांच्यामते संतुलित विकासाचे तत्व अविकसीत अर्थव्यवस्थेसाठी उपयुक्त ठरत नाही तर ते विकसीत अर्थव्यवस्थेसाठी उपयुक्त ठरू शकते याचे कारण असे की, संतुलित विकासासाठी संसाधने मोठ्या प्रमाणात आवश्यक असतात. मात्र अविकसीत राष्ट्रांकडे इतक्या मोठ्या प्रमाणात संसाधने उपलब्ध नसतात. दुर्मिळ संसाधनामुळे किंवा पुरेशा भांडवलाअभावी एकाचवेळी सर्व क्षेत्रात गुंतवणूक करणे शक्य नाही. त्यामुळे अशावेळी काही ठराविकच क्षेत्रात गुंतवणूक करून म्हणजेच असंतुलनातूनच अविकसीत राष्ट्रांचा आर्थिक विकास होतो.

२) सिंगर यांनी केलेली दुसरी टिका म्हणजे विकसनशील देशांचा विकास अगदी प्राथमिक अवस्थेपासून सुरू होतो असे गृहित धरणे चूक आहे. मात्र प्रत्यक्षात कोणत्याही देशाचा विकास सुरू होण्यापूर्वी देशात थोडीतरी गुंतवणूक झालेली असते. त्यामुळे नवीन गुंतवणूक करताना जी क्षेत्रे फायदेशीर ठरतील अशाच क्षेत्रांमध्ये गुंतवणूक करणे योग्य होईल. यासाठी असंतुलित विकास महत्त्वाचा ठरतो.

३) मार्क्स फ्लेमिंग यांनी संतुलित विकासाच्या सिद्धांताला ज्या मर्यादा पडतात त्या स्पष्ट करताना असे मत मांडले आहे की, अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांमध्ये एकाचवेळी मोठ्या प्रमाणात भांडवल गुंतवणूक करण्यासाठी पहिली मर्यादा पडते ती म्हणजे असे जास्तीचे भांडवल अविकसीत राष्ट्रांकडे उपलब्ध असत नाही. तसेच दुसरी मर्यादा म्हणजे अविकसीत राष्ट्रातील छुपे बेकार किंवा अतिरिक्त श्रमिक उद्योगक्षेत्राकडे स्थानांतरित होण्यासाठी सहजासहजी तयार होऊ शकणार नाहीत. यासारख्या मर्यादांमुळे संतुलित विकासाचा प्रयत्न यशस्वी होऊ शकत नाही असे मार्क्स फ्लेमिंग यांनी प्रतिपादन केले आहे.

४) हर्षमन यांच्यामते संतुलित विकासाद्वारे अप्रगत अर्थव्यवस्थेवर प्रगत अर्थव्यवस्था लादण्याचा प्रयत्न होतो. हर्षमनच्या मते हा विकासच नसतो. याला द्विदल पद्धतीचा विकास म्हणावे लागेल.

५) सरकारी यंत्रणेमार्फत एकाचवेळी विविध उद्योग सुरू करणे कठीण आहे अशी टिका या सिद्धांतावर करण्यात येते. संतुलित विकास तत्वानुसार एक प्रकल्प सुरू केल्यास तो अयशस्वी होईल. पण तोच उद्योग इतर दहा उद्योगांबरोबर सुरू केल्यास यशस्वी होतो असे असले तरी विकसनशील देशांकडे पुरेशा भांडवलाअभावी एवढे उद्योग एकाचवेळी सुरू करणे जवळपास कठीण आहे अशी टिका संतुलित विकास सिद्धांतावर करण्यात येते.

**सारांश :**

संतुलित विकासाचे तत्व चुकीचे आहे असे म्हणता येणार नाही. परंतु असे असले तरी अविकसीत देशांसाठी हे तत्व तितके उपयुक्त ठरत नाही.

## ब) असंतुलित विकास (Unbalanced Growth) :

असंतुलित विकासाचा पुरस्कार करणाऱ्या अर्थशास्त्रज्ञांमध्ये प्रामुख्याने सिंगर व हर्षमन यांचा समावेश होतो. या तज्ञांच्या मते संतुलित विकासाचे तत्व अविकसीत तसेच विकसनशील राष्ट्रांसाठी फायदेशीर ठरू शकत नाही. तर अशा देशांमधील दारिद्र्याचे दुष्टचक्र तोडण्यासाठी असंतुलित विकासच उपयुक्त असतो. अविकसीत राष्ट्रांमध्ये गुंतवणूकीचा विचार करताना नेमकी गरज लक्षात घेऊन महत्त्वाच्या किंवा निवडक क्षेत्रांमध्ये गुंतवणूक करणे अधिक फायदेशीर ठरते. अशा अविकसीत राष्ट्रांमध्ये भांडवल व तंत्रज्ञान पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नसल्याने सर्वच क्षेत्रांचा एकदम विकास करता येत नाही. म्हणूनच महत्त्वाच्या क्षेत्रावर प्रथम भर दिला पाहिजे. म्हणजेच अर्थव्यवस्थेत असंतुलन निर्माण केले पाहिजे असे मत सिंगर, हर्षमन, किंडलबर्जर यांसारख्या असंतुलित विकासाचे समर्थन करणाऱ्या विचारवंतांनी मांडले आहे.

**सिंगर याचा असंतुलित विकासाबाबत दृष्टीकोन :**

सिंगर यांच्या मते अविकसीत राष्ट्राचा विकास घडवून आणणे म्हणजे अशा राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेमध्ये

शेती क्षेत्रात गुंतलेल्या लोकसंख्येचे प्रमाण ८० टक्क्यांवरून १५ टक्क्यांपर्यंत खाली आणणे होय. आर्थिक विकास होत असताना शेती क्षेत्रावरील अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे स्थानांतरण उद्योग क्षेत्रात झाले पाहिजे असे मत संतुलित विकासाचे समर्थन करणाऱ्या विचारवंताचे आहे. अर्थात शेती क्षेत्राकडून उद्योग क्षेत्राकडे श्रमिकांचे स्थानांतरण करायचे असेल तर सर्वप्रथम शेती क्षेत्राचा विकास घडवून आणणे आवश्यक असते. याचाच अर्थ गुंतवणूक करताना एकाच वेळी शेती आणि उद्योग या दोन्हीमध्ये न करता केवळ शेती क्षेत्रातच गुंतवणूक करणे आवश्यक आहे. असे झाले तरच शेती क्षेत्रावरील अतिरिक्त श्रमिकांचा भार कमी होऊन शेतीमधून उद्योगांमध्ये श्रमिकांचे स्थानांतरण होईल. आणि म्हणूनच असंतुलित विकास अधिक श्रेयस्कर ठरतो असे मत सिंगर यांनी आपल्या विवेचनात मांडले आहे.

**असंतुलित विकासाबाबत हर्शमन यांचा दृष्टीकोन :**

असंतुलित विकासाच्या तत्वाचा जोरदार पुरस्कार हर्शमन यांनी केला आहे. असे असूनसुद्धा हर्शमन यांनी नर्क्स यांच्या संतुलित विकासाबाबतचे विचार काही प्रमाणात मान्य केलेले आहेत. विकसनशील देशांना आर्थिक विकासासाठी प्रबळ चालना (Big Push) आणि उद्योगांची परस्पर पुरकता या दोन्हीची आवश्यकता असते हे नर्क्स यांचे विचार हर्शमन यांनीही मान्य केले आहेत. परंतु हर्शमन यांच्या मते अशा प्रकारे संतुलित विकास घडवून आणण्यासाठी विकसनशील देशांची क्षमता अपुरी ठरते. कारण अशा देशांकडे प्रबळ चालनेसाठी पुरेशी साधनसामग्री नसते. त्यामुळे विकसनशील राष्ट्रे संतुलित विकसाचा मार्ग स्वीकारू शकत नाहीत. म्हणूनच हर्शमन यांनी असे सुचविले आहे की, विकसनशील देशांत प्रबळ चालना निर्माण करण्यासाठी काही महत्त्वाची निवडक क्षेत्रे यांची निवड प्रथम करावी व अशा क्षेत्रांमध्येच गुंतवणूकीस प्राधान्य द्यावे. याचाच अर्थ असंतुलनाच्या मार्गाने विकास हे तत्व स्वीकारावे. कारण विकसीत देशांचा विकास देखील याच मार्गाने झालेला आहे. तेथे सुद्धा प्रथम प्रमुख क्षेत्रांचा विकास होऊन नंतर संपूर्ण अर्थव्यवस्थेची प्रगती झाली आहे.

**असंतुलनाचे स्वरूप :**

हर्षमनच्या मते देशाचा विकास असंतुलनातूनच होतो. असंतुलनातून अर्थव्यवस्थेचा विकास घडवून आणण्यासाठी हर्षमन यांनी पुढील दोन मार्ग सांगितले आहे.

**अ) मुलभूत सामाजिक गुंतवणूक (Social Overhead Capital/SOC) :**

यामध्ये विविध लोकोपयोगी सेवा शिक्षण, दळणवळण यासारख्या सामाजिक सेवांचा समावेश होतो. अशा प्रकारच्या सेवा निर्माण केल्याशिवाय अर्थव्यवस्थेत उत्पादक कार्याची सुरूवात होत नाही असे हर्शमन यांनी म्हटले आहे.

**ब) प्रत्यक्ष उत्पादक गुंतवणूक (Directly Productive Activities/DPA) :**

अशा प्रकारच्या गुंतवणूकीमुळे अर्थव्यवस्थेत वस्तू व सेवांचा पुरवठा प्रत्यक्षपणे वाढतो म्हणजे विविध प्रकारचे उद्योग वाढतात.

असंतुलित विकासाच्या वरील दोन मार्गापैकी कोणत्याही एका मार्गाचा अवलंब करून विकास करता येतो. असे हर्शमन यांनी प्रतिपादन केले आहे. वरील दोन्ही मार्गाने विकासाची प्रक्रिया कशी घडून येईल त्याचे

विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

**मुलभूत सामाजिक गुंतवणूक (SOC) द्वारे असंतुलन :**

जर सरकारने प्रथम विविध प्रकारच्या सामाजिक सेवांमध्ये (SOC) गुंतवणूक केली तर त्यातून प्रेरणा घेऊन खाजगी उद्योजक विविध वस्तुंचे उत्पादन करणारे उद्योग म्हणजेच प्रत्यक्ष उत्पादक गुंतवणूक (DPA) सुरू करण्यास आपोआप पुढे येतील याचाच अर्थ मुलभूत सामाजिक गुंतवणूक (SOC) या मार्गाला प्राधान्य दिल्यास जे असंतुलन निर्माण होते. त्यामुळे दुसऱ्या मार्गातील म्हणजेच प्रत्यक्ष उत्पादक गुंतवणूक (DPA) सुरू होऊन अर्थव्यवस्थेचा विकास साधला जाईल असे हर्शमन यांनी स्पष्ट केले आहे.


**प्रत्यक्ष उत्पादक गुंतवणूक (DPA) द्वारे असंतुलन :**

वरील प्रकारच्या अगदी विरूद्ध मार्गानेही असंतुलन निर्माण करून विकास साधता येतो असे हर्शमन यांनी सांगितले आहे. समजा प्रत्यक्ष उत्पादक गुंतवणूक (DPA) मध्ये गुंतवणूक केली तर या ठिकाणी सामाजिक सेवांच्या (SOC) कमतरतेमुळे उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात वाढेल त्यामुळे विविध प्रकारच्या सामाजिक सेवा उदा- रस्ते, दळणवळण इ. निर्माण करण्यासाठी दबाव निर्माण होऊन लवकरच (SOC) मध्ये गुंतवणूक केली जाईल.

वरील दोन्ही प्रकारच्या गुंतवणूकीवरून असे स्पष्ट होते की, (SOC) मधील गुंतवणूकीला प्राधान्य दिल्यास नफ्याच्या अपेक्षेने (DPA) मधील गुंतवणूकीला चालना मिळेल. याउलट (DPA) मधील गुंतवणूकीला प्राधान्य दिल्यास दबावांमुळे (SOC) मधील गुंतवणूकीला चालना मिळेल. अशाप्रकारे कोणत्याही एका मार्गाने असंतुलन प्रथम निर्माण केले तरी त्यातून अर्थव्यवस्थेचा विकास होतो. असे हर्शमन यांचे मत आहे.

**विकासाचा मार्ग :**

असंतुलनातून विकासाचा मार्ग कसा असेल हे स्पष्ट करण्यासाठी खालील आकृतीचा आधार घेतला आहे.



वरील आकृतीमध्ये OX अक्षावर SOC मधील नवीन गुंतवणूक दर्शविली आहे. तर OY या अक्षावर DPA मधील नवीन गुंतवणूक दाखविली आहे. a b c d हे उत्पादन समता वक्र (सम उत्पादन वक्र) आहेत. हे वक्र मूळ बिंदूपासून जसजसे वर जातात तसे वरच्या पातळीवरील प्रत्येक वक्र हा खालच्या पातळीवरील वक्रापेक्षा जास्त उत्पन्न दर्शवितो. आकृतीत O या आरंभ बिंदुतून $45^0$ अंशाची रेषा या वक्रावरील पर्याप्त बिंदूना जोडणारी असल्याने ती रेषा SOC आणि DPA मधील संतुलित विकास दर्शविते.

हर्षमन यांनी असे गृहीत धरले आहे की, विकसनशील देशात SOC व DPA चा एकाचवेळी विकास करणे शक्य नसते. त्यामुळे महत्तम फायद्याच्या दृष्टीने गुंतवणूकीचा क्रम कसा असला पाहिजे हे त्यासाठी त्यांनी दोन मार्ग सांगितले आहेत. याचे स्पष्टीकरण वरील आकृतीद्वारे पुढीलप्रमाणे देता येईल.

**अ) SOC च्या गुंतवणूकीत वाढ करून विकासाची सुरूवात (SOC to DAA)**

**(SOC च्या अतिरिक्त क्षमतेद्वारे विकास) :**

हा मार्ग आकृतीमध्ये जाड रेषेने दाखविला आहे. त्याचा मार्ग A - $A_1$ - B - $B_2$ - C असा आहे. जर प्रथम SOC मध्ये A पासून $A_1$ पर्यंत वाढ केली तर त्यामुळे प्रेरित होऊन DPA मध्ये $B_1$ पर्यंत गुंतवणूक वाढेल व शेवटी B बिंदूत संतुलन होईल. याठिकाणी राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झालेली आहे. कारण B बिंदू हा वरच्या पातळीवर आहे. जर पुन्हा SOC मध्ये गुंतवणूक वाढविली तर $B_2$ पर्यंत पोहचता येईल त्यामुळे पुन्हा DPA ला प्रेरणा मिळून अर्थव्यवस्था C बिंदूपर्यंत जाईल म्हणजेच वरच्या पातळीवर संतुलन साध्य होईल. अशा प्रकारे विकास वाढत जाईल

**ब) SOC च्या कमतरतेतून विकासाची सुरूवात (DPA to SOC)**

**(SOC च्या कमतरेतून विकास) :**

हा मार्ग आकृतीमध्ये तुटक रेषेने दाखविला आहे. त्याचा मार्ग A - $B_1$ - B - $C_1$ - C - $D_1$ असा आहे. जर प्रथम DPA मध्ये $B_1$ पर्यंत वाढ केली तर संतुलनासाठी SOC मध्ये B पर्यंत गुंतवणूक करावीच लागेल. त्यामुळे याठिकाणी राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होईल. पुढे जर DPA मध्ये $C_1$ पर्यंत गुंतवणूक वाढवली तर SOC मध्येही वाढ करावी लागेल. त्यामुळे C बिंदूत संतुलन होईल व विकासाची प्रक्रिया अशीच पुढे चालू राहील.

हर्षमन यांच्या वरील विवेचनावरून एक महत्त्वपूर्ण गोष्ट लक्षात येते ती म्हणजे अर्थव्यवस्थेच्या विकासाचा मार्ग सरळ रेषेत असत नाही. तर तो नागमोडी मार्गाचा असतो. आर्थिक विकासासाठी प्रथम एका क्षेत्रात ठरवूनच असंतुलन निर्माण करावे लागते. त्यातूनच इतर क्षेत्रांवर त्याचा अनुभव परिणाम होऊन अर्थव्यवस्था संतुलनाकडे जाते असे हर्षमन यांनी स्पष्ट केले आहे.

असंतुलनातून विकासाच्या वरील दोन मार्गापैकी कोणता मार्ग अधिक फायदेशीर असेल याचेही स्पष्टीकरण हर्षमन यांनी दिले आहे. हर्षमनच्या मते असंतुलित विकासाच्या वरील दोन मार्गापैकी पहिला मार्ग म्हणजे SOC च्या कमतरतेतून विकास हा मार्ग विकासासाठी अधिक फायदेशीर ठरेल कारण या मार्गात प्रथम खाजगी गुंतवणूकीस चालना देण्याचा मोठ्या प्रमाणात प्रयत्न केला जातो. त्यातून अर्थव्यवस्थेला गती प्राप्त होते

व नंतर सरकारी गुंतवणूक केल्यास खाजगी गुंतवणूकीस अधिक प्रेरणा मिळून अर्थव्यवस्था विकसित होते.

**असंतुलित विकास सिद्धांताचे मुल्यमापन :**

१) पॉल स्ट्रीटन यांच्या मते असंतुलित विकासाच्या तत्वामध्ये गुंतवणूकीची रचना, दिशा आणि योग्य वेळ यांचा विचार केलेला नाही.

२) या पद्धतीत गुंतवणूक करताना उपभोग्य वस्तुंच्या उत्पादनाकडे दुर्लक्ष होते. कारण असंतुलन निर्माण करताना सहसा मुलभूत व अवजड उद्योगांना प्राधान्य देण्यात येते.

३) असंतुलित विकास या मार्गाने अर्थव्यवस्थेतील विशिष्ट क्षेत्रेच विकसीत होऊन अन्य क्षेत्रे अविकसीत राहण्याची शक्यता असते. त्यामुळे अर्थव्यवस्थेचा एकांगी विकास होतो. अशी टीका या असंतुलित विकास तत्त्वावर करण्यात येते.

४) असंतुलित विकासाचे तत्त्व हे विकसीत देशांचा विकास विचारात घेऊन मांडले आहे. त्यामुळे विकसनशील देशांना हे तत्त्व कितपत लागू होईल याबाबत शंका व्यक्त केली जाते.

**सारांश :** असंतुलित विकास तत्वावर वरीलप्रमाणे टिका करण्यात येत असल्या तरीदेखील अविकसीत देशांच्या विकासासाठी हे तत्त्व योग्य व महत्त्वपूर्ण समजले जाते. रशियाने सर्वप्रथम या तत्वाचा अवलंब केलेला आहे. भारतात देखील खासकरून दुसऱ्या पंचवार्षिक योजना काळात या तत्वाचा अंगिकार केलेला दिसून येतो. ज्यावेळी देशाची अर्थव्यवस्था विकासाच्या प्राथमिक अवस्थेत असते तेव्हा असंतुलित विकास तत्वाचा वापर योग्य ठरतो.

**३.२.५ सारांश :**

कोणत्याही राष्ट्राने आपला आर्थिक विकास साधत असताना विकासाची व्यूहरचना कशी असावी याबाबतचे मार्गदर्शन आर्थिक विकास सिद्धांतामधून मिळते. बहुसंख्य राष्ट्रांनी आपल्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये अर्थशास्त्रज्ञांनी मांडलेल्या विविध आर्थिक प्रतिमानांचा अवलंब केलेला आढळून येतो. यावरून आपणास आर्थिक विकासाच्या सिद्धांतांचे महत्त्व लक्षात येते.

प्रस्तुत घटकामध्ये चर्चा करण्यात आलेल्या अनुक्रमे डेव्हीड रिकार्डो, मिर्दाल, रोस्टो तसेच संतुलित व असंतुलित विकास सिद्धांत मांडणाऱ्या रोडान, नर्क्स, सिंगर व हर्षमान या सर्वांनी मांडलेल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांताना विकासाच्या प्रक्रियेत महत्त्वाचे स्थान आहे. रिकार्डो यांनी आपल्या सिद्धांतामधून आर्थिक विकासामधील भांडवल संग्रहणाचे महत्त्व आणि नफ्याची भूमिका विशद केलेली आहे. मिर्दाल यांनी चक्रियकार्य वितरण संबंध आणि वर्धमान प्रक्रियेमधून विकासाची प्रक्रिया स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. विकासातून निर्माण होणाऱ्या विस्तारक आणि प्रतिसारक परिणामांची त्यामधून कल्पना येण्यास मदत होते. तसेच एखाद्या राष्ट्राचा विकास कोणत्या अवस्थेमधून होत असतो. याबाबत रोस्टो यांनी विकासाच्या विविध अवस्था सांगितलेल्या आहेत. तसेच देशाचा विकास हा संतुलनातूनच होतो असे रोझेस्टीन रोडान आणि रॅग्नर नर्क्स यांनी आपल्या सिद्धांतातून स्पष्ट केले आहे. याउलट कोणत्याही देशाचा विकास हा असंतुलनामधून केला जावा असे सिंगर आणि हर्षमन यांनी

आपल्या असंतुलित विकास सिद्धांतातून स्पष्ट केले आहे.

## ३.३ पारिभाषिक शब्दांचा अर्थ :

१) स्थैतिकता : अर्थव्यवस्थेला प्राप्त झालेला स्थिरावस्था

२) चक्रिय कार्यकारण संबंध : विविध चलांचा परस्परांशी असणारा चक्रिय संबंध

३) प्रतिसारक परिणाम : एका प्रदेशातील विकासाचे इतर प्रदेशांच्या विकासावरील प्रतिकूल परिणाम

४) विस्तारक परिणाम : एका प्रदेशातील विकासाचे इतर प्रदेशांच्या विकासावरील अनुकूल परिणाम

५) उड्डाणावस्था : अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या किमान अटी पूर्ण होतात अशी अवस्था

## ३.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :

१) सनातनवाद्यांच्या मते आर्थिक विकासात ------ चे स्थान अतिशय महत्त्वाचे असते.

अ) श्रमिकांचे ब) जमिनदारांचे क) भांडवलदारांचे ड) वरील सर्व

२) रिकार्डो यांनी नफ्याचा संबंध ------ बरोबर जोडला आहे.

अ) खंड ब) वेतन क) व्याज ड) यापैकी सर्व

३) रिकार्डो यांच्यामते वेतन वाढल्यास ------ मध्ये घट होते.

अ) खंड ब) वेतन क) नफा ड) यापैकी नाही

४) मिर्दाल यांचा ------ हा प्रसिद्ध ग्रंथ मानला जातो.

अ) राष्ट्राची संपत्ती ब) दास कॅपीटल क) रोजगार सिद्धांत ड) एशियन ड्रामा

५) आंतरराष्ट्रीय प्रादेशिक विषमता ही संकल्पना ------ यांनी मांडली.

अ) रिकार्डो ब) मिर्दाल क) रोस्टो ड) हर्षमन

६) एका प्रदेशातील आर्थिक विकासाचे दुसऱ्या प्रदेशातील विकासावर जे प्रतिकूल परिणाम होतात त्यास ------ म्हणतात.

अ) विस्तारक परिणाम ब) प्रतिसारक परिणाम क) विस्थापन परिणाम ड) वरील सर्व

७) एका प्रदेशाच्या आर्थिक विकासाचे दुसऱ्या प्रदेशाच्या आर्थिक विकासावर होणाऱ्या अनुकूल परिणामास ------ परिणाम म्हणतात.

अ) प्रतिसारक ब) विस्तारक क) विस्थापन ड) सर्व

८) रोस्टो यांनी आर्थिक विकासाच्या ------ अवस्था सांगितल्या.

अ) दोन ब) चार क) पाच ड) सहा

९) रोस्टो यांच्या मते ------ हे परंपरागत समाज या अवस्थेचे वैशिष्ट्य असते.

अ) दैववादी दृष्टीकोन ब) शेतीवरील अवलंबन क) स्थैतिक अर्थव्यवस्था ड) वरील सर्व

१०) रोस्टो यांच्या मते उड्डाणावस्थेचा कालावधी ------ वर्षाचा असतो.

अ) १० ते २० वर्षे ब) २० ते ३० वर्षे क) ३० ते ४० वर्षे ड) २० ते ४० वर्षे

११) रोस्टो यांच्या मते ------ ही उड्डाणावस्थेची किमान आवश्यक अट असते.

अ) निव्वळ गुंतवणुकीचा उच्च दर ब) प्रधान क्षेत्राचा विकास क) संस्थात्मक रचना
ड) यापैकी नाही.

१२) ------ यांनी संतुलित विकासाच्या संदर्भात पादत्राण उद्योगाचे उदाहरण दिले आहे.

अ) रॅग्नर नर्क्स ब) सिंजर क) रोझिस्टीन रोडान ड) हर्षमान

१३) नर्क्स यांच्या मते देशाच्या आर्थिक विकासातील एक प्रमुख अडथळा म्हणजे ------ होय.

अ) भांडवल तुटवडा ब) दारिद्रयाचे दुष्टचक्र क) आर्थिक विषमता ड) छुपी बेकारी

१४) असंतुलित विकास तत्वाचा पुरस्कार करणाऱ्यांमध्ये ------ चा समावेश होतो.

अ) रोझिस्टीन रोडान ब) हर्षमन क) नर्क्स ड) वरील सर्व

**३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

| | | | |
|---|---|---|---|
| १) क | ५) ब | ९) ड | १३) ब |
| २) ब | ६) ब | १०) ब | १४) ब |
| ३) क | ७) ब | ११) ड | |
| ४) ड | ८) क | १२) क | |

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) आर्थिक विकासाबाबतचा रिकार्डो यांचा सिद्धांत स्पष्ट करा.

२) आर्थिक विकासाबाबत मिर्दाल यांचे विचार स्पष्ट करा.

३) रोस्टो यांच्या आर्थिक विकासाच्या अवस्थांचे स्पष्टीकरण करा.

४) संतुलित विकास तत्वाचे टिकात्मक परिक्षण करा.

५) असंतुलित विकास तत्वाचे परिक्षण करा.

**ब) टीपा लिहा.**

१) चक्रिय कार्यकारण संबंध

२) उड्डाणावस्था

३) रोडान यांचे पादत्राण उद्योगाचे उदाहरण

४) मिर्दाल यांची प्रादेशिक विषमता संकल्पना

५) प्रतिसारक व विस्तारक परिणाम

६) हर्षमन यांचे संतुलित विकास तत्त्व

७) विकासाचा सनातनवादी दृष्टीकोन

**३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ :**


१) Agrawal R. C. "Economics of Development & Planning" Lakshmi Narain Agrawal, Agra.

२) Dewett, Satish Wadhwan "Economics of Growth & Development" S. Chand & co Ltd, New Delhi.

३) Jhingan M. L. "The Economics of Development and Planning" ($40^{th}$ Revised Edition)Vrinda Publication Ltd - 1997

४) Jhingan M. L. "Advanced Economics Theory" Vrinda Publication Ltd

५) Mishra & Puri "Growth and Development" S. Chand & co New Delhi (2016)

६) डॉ. विजय कविमंडन ''विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन'' श्री मंगेश प्रकाशन नागपूर.

७) डॉ. जे. एफ. पाटील ''वृद्धी व विकासाचे अर्थशास्त्र'' फडके प्रकाशन कोल्हापूर.

८) डॉ. मृणालिनी फडणवीस ''विकासाचे अर्थशास्त्र व सिद्धांत'' विद्या प्रकाशन नागपूर.

९) डॉ. र. पु. कुरूलकर ''विकासाचे अर्थशास्त्र व सिद्धांत'' विद्या प्रकाशन नागपूर

१०) डॉ. जी. एन. झांबरे ''भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरण अर्थशास्त्र'' पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स कोल्हापूर.

११) डॉ. ज्योत्स्ना देशपांडे ''विकासाचे अर्थशास्त्र'' पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स कोल्हापूर.


***

# घटक ४
# आर्थिक विकासाची संसाधने
## ( Resources for Economic Development )

**अनुक्रमणिका**


४.० उद्दिष्टे (Objectives)

४.१ प्रास्ताविक (Introduction)

४.२ विषय विवेचन (Delibration of the Subject)

४.२.१ भांडवल निर्मिती, तंत्रज्ञान आणि आर्थिक विकास
(Capital Formation, Technology and Economic Development)

४.२.२ मानवी भांडवल व आर्थिक विकास
(Human Capital and Economic Development)

४.२.३ परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक, परकीय संस्थात्मक गुंतवणूक, रोखा संग्रह व परकीय मदत
(FDI, FII, Portfolio and Aid)

४.२.४ आर्थिक विकासातील सरकारची भूमिका
(Role of State in Economic Development)

३.२.५ सारांश (Summary)

३.३ पारिभाषिक शब्द (Glossary)

३.४ स्वयं अध्ययन प्रश्न (Questions for Self Learning)

३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers of Self Learning Questions)

३.६ सरावासाठी स्वाध्याय (Assignment for Practice)

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके ( References for further Reading )


**४.० उद्दिष्टे : (Objectives)**

प्रस्तुत घटकाच्या अध्ययनाद्वारे आपणाला पुढील बाबींचे आकलन होईल.

१. आर्थिक विकासातील भांडवल निर्मिती आणि तंत्रज्ञानाची भूमिका.

२. मानवी संसाधनाचे आर्थिक विकासातील महत्व.

३. थेट परकीय गुंतवणूक, परकीय संस्थात्मक गुंतवणूक, रोखा संग्रह व परकीय मदत अशा विदेशी संसाधनांची भूमिका

४. आर्थिक विकासातील सरकारची भूमिका

## ४.१ प्रास्ताविक : (Introduction)

आर्थिक विकास ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. ही आर्थिक विकासाची प्रक्रिया उत्पादन, वितरण, उपभोग यांद्वारे पार पडत असते. मात्र त्याकरिता भांडवल निर्मितीची प्रक्रिया खूप महत्वाची असते. सर्व प्रकारच्या उत्पादन कार्याचे ते मूळ असते. उच्च उत्पादकता, गुणवत्तापूर्ण अशा तंत्रज्ञानाची त्याला सुयोग्य जोड असणे देखील तितकेच गरजेचे असते. परिणामी आर्थिक विकासामध्ये भांडवल व तंत्रज्ञान हे मुख्य स्त्रोत आहेत. मात्र या दोहोंच्या युक्ततम, वापराकरिता कुशल व उत्पादक असे मानवी संसाधन उपलब्ध असणे गरजेचे असते. आर्थिक विकासाची प्रक्रिया गतीमान, संतुलीत व शाश्वत होण्याकरिता विकसीत मानवी भांडवल हे संसाधन महत्वपूर्ण ठरते. या अंतर्गत घटकांसोबतच थेट विदेशी गुंतवणूक (FDI), विदेशी संस्थात्मक गुंतवणूक (FII), रोखा संग्रह व परकीय मदत या बाह्य साधनांचाही आर्थिक विकासात सहभाग महत्वपूर्ण असतो. विकसनशील देशांजवळ अंतर्गत स्त्रोतांचा अगोदरच अभाव असतो. परिणामी परकीय मदतीसोबतच सरकारद्वारे विकासाकरिता होणारी वित्तीय गुंतवणूक, पायाभूत सोयी यांचे देखील महत्त्व अनन्यसाधारण असे असते. आर्थिक विकासासाठीच्या अशा सर्व उपयुक्त संसाधनांचे स्वरुप, महत्त्व व भूमिका आपण प्रस्तुत घटकाच्या अध्ययनाद्वारे पाहणार आहोत.

## ४.२ विषय विवेचन : (Delibration of the Subject)

प्रस्तुत घटकांद्वारे आपण आर्थिक विकासाच्या प्रक्रियेसाठी लागणाऱ्या भांडवल, तंत्रज्ञान, मानवी संपदा, FDI, FII रोखा संग्रह, परकीय मदत व सरकारची भूमिका याची माहिती पाहणार आहोत. त्याचे सविस्तर विवेचन पुढीलप्रमाणे :

### ४.२.१ भांडवल निर्मिती, तंत्रज्ञान व आर्थिक विकास :
### (Capital Formation, Technology & Economic Development)

देश कोणताही असो, विकसीत वा विकसनशील त्या प्रत्येकासाठीच भांडवलनिर्मिती हा भाग खूप महत्त्वाचा असतो. जे देश विकसनशील वा अविकसीत आहेत. त्यांच्या विकास प्रक्रियेसाठी तर भांडवलनिर्मितीला खूपच महत्व आहे. प्रो कुझनेटस् यांच्या मते, 'भांडवलाची निर्मिती ही तर आर्थिक विकासाची पूर्वअट आहे'. विकसनशील देशांजवळ नैसर्गिक साधनसंपत्ती व मानवी श्रम विपुल प्रमाणात असून देखील पर्याप्त भांडवलनिर्मिती नसल्याने त्यांचा विकास कार्यासाठी पुरेपूर वापर करता येत नाही. थोडक्यात भांडवलनिर्मिती हीच आर्थिक विकासाची गुरुकिल्ली आहे. भांडवल म्हणजे केवळ 'पैसा' नसून प्रो. थॉमस म्हणतात, त्याप्रमाणे 'तो वस्तु व संपत्ती यांच्या निर्मिती करता वापरात आणाला जाणारा वैयक्तिक तसेच सामुहिक संपत्तीचा तो एक भाग आहे.' थॉमस यामध्ये जमिनीचा अंतर्भाव करत नाहीत. अविकसीत देशांच्या संदर्भात भांडवल निर्मितीचा विचार करत

असताना पा. लेविस असा आशावाद व्यक्त करतात की, अविकसित देशांच्या दृष्टिने बचत व गुंतवणुकीच्या दरामध्ये सातत्य ठेवणे फारसे अवघड नाही. त्यासाठी त्यांनी दृढ निश्चयाचे प्रयत्न करण्याची गरज आहे. प्रा.मायर व बाल्डवीन यांनी याकरिता विकसनशील देशांनी अंतर्गत उपभोग नियंत्रीत करुन बचतीच्या दरामध्ये वाढ करावी असे सुचविले. सरकारने त्यासाठी करारोपणाचा मार्ग अवलंबावा, उपभोगावरील आयात कमी करावी. प्रसंगी भाववाढ स्वीकारुन तुटीच्या अर्थ भरण्याद्वारे बचतीला उत्तेजन द्यावे. विविध क्षेत्रामधील छुपी बेकारी कमी करण्यावर भर द्यावा. अशा विविधांगी उपायांद्वारे भांडवल निर्मितीचा वेग वाढविता येतो.

*** भांडवल निर्मितीचा अर्थ : (Meaning of Capital Formation)**

भांडवल निर्मिती म्हणजे भविष्यातील उपभोग्य व भांडवली वस्तुंचे उत्पादन वाढविण्याकरीता समाजाकडील वर्तमानकाळातील उपलब्ध साधनसामग्रीच्या काही भागाचा उपभोग भांडवली वस्तूंच्या निर्मितीसाठी करण्याची प्रक्रिया होय.

भांडवलाची कमतरता हा आर्थिक विकासातील एक फार मोठा अडसर असतो. उत्पादन कार्यासाठी लागणारे भांडवल हे निसर्गनिर्मित नसून ते एक मानव निर्मिती संसाधन असते की जे वर्तमान उपभोगाच्या त्यागातून प्राप्त होते. भांडवल हे यंत्रसामग्री, उपकरणे यांप्रमाणे दृश्य स्वरुपातील असते. तसेच ते शिक्षण, ज्ञान, बुध्दीमत्ता, कौशल्य, आरोग्य, संशोधन असे अमुर्त देखील असते.

*** आर्थिक विकासातील भांडवल निर्मितीचे महत्व :**
**(Importance of Capital Formation in Economic Development)**

अल्पविकसीत देशांतील दारिद्र्य, बेरोजगारी, कुपोषण, विषमता, लोकसंख्यावाढ असे जटील प्रश्न सोडविण्याकरिता आर्थिक विकास होणे अत्यंत गरजेचे असते. मात्र त्याकरिता भांडवली संसाधनांची उपलब्धता व त्याद्वारे भांडवल निर्मिती होणे गरजेचे असते. त्यादृष्टीने आर्थिक विकास प्रक्रियेतील भांडवल निर्मितीचे महत्त्व पुढीलप्रमाणे :

**१) पायाभूत सुविधांचा विकास : (Development of Basic Infrastructure)**

प्रत्येक देशाच्या विकासाकरिता पायाभूत सुविधांची उपलब्धता असणे अत्यंत गरजेचे असते. कारण शिक्षण, आरोग्य, वाहतुक, दळणवळण, माहिती-तंत्रज्ञान अशा सर्व पायाभूत सुविधांची उपलब्धता असेल तरच विकासाची प्रक्रिया अधिकाधिक गतिमान होऊन तीचा वेग वाढतो. मात्र अशा पायाभूत सुविधांची निर्मिती, विस्तार, विकास करण्याकरीता प्रचंड प्रमाणात भांडवली गुंतवणूक करावी लागते.

**२) बेरोजगारीत घट : (Decreasing in Unemployment)**

भांडवलनिर्मितीची प्रक्रिया जसजशी गतीमान होत जाते, तसतसे उद्योग, व्यापार वाहतुक, दळणवळण अशा विविध क्षेत्रांमध्ये उत्पादन, विनीमय, उपभोग, गुंतवणूक यांना चालना मिळते. उत्पादन घटकांना मागणी वाढते. त्यातून रोजगाराच्या नवनव्या संधी निर्माण होतात. परिणामी बेकारीचा दर घटत जातो.

### ३) भाववाढ नियंत्रण : (Inflation Control)

विविध क्षेत्रांतील भांडवल निर्मितीतून वस्तू व सेवांच्या उत्पादनात वाढ होते. त्यातून रोजगार वाढतो. उत्पादन व उत्पन्न अशा दोहोंत वाढ होत गेल्यास बाजारातील मागणी पुरवठ्यातील असंतुलन जावून किंमत स्थैर्य निर्माण होते. परिणामी भाववाढ आटोक्यात येते. त्यातून उत्पादकाचा नफा तर वाढतोच शिवाय ग्राहकांचे वास्तव उत्पन्नही वाढते.

### ४) राष्ट्रीय उत्पन्नात वाढ : (Growth in National Income)

अर्थव्यवस्थेत जसजसा भांडवल निर्मितीचा वेग वाढू लागतो. तसतसे गुंतवणुकीचे प्रमाण देखील वाढत जाते. ही वाढलेली गुंतवणूक खाजगी व सार्वजनिक अशा दोन्ही क्षेत्रांमध्ये वाढत जाते. उद्योग, शेती, सेवा अशा क्षेत्रांमधील वाढलेली ही गुंतवणूक वस्तू व सेवांच्या उत्पादनात वाढ करते. त्यातून व्यक्तीगत व संस्थात्मक उत्पादकतेतही वाढ होते या सर्वांमधून आपोआपच राष्ट्रीय उत्पन्नातही वाढ होते.

### ५) तंत्र-वैज्ञानिक विकास : (Technological Development)

अर्थव्यवस्थेत भांडवल निर्मितींद्वारे शिक्षणाच्या सुविधा निर्माण होत जातात. त्यातून तंत्रशिक्षण, विज्ञान, खगोल यांमध्ये विकास होतो. त्याचा उत्पादन, वितरण, पायाभुत सुविधा निर्मितीत वापर होत जातो. संशोधनाद्वारे अनेक नाविन्यपूर्ण कल्पना, प्रकल्प उभे राहतात. मानवी व नैसर्गिक संसाधनांचा खुबीने वापर केला जातो. उत्पादन साधने, भांडवली स्त्रोत, मानव व नैसर्गिक संसाधने यांच्या पुरेपूर व युक्ततम वापराच्या दिशेने प्रगती होते.

### ६) आर्थिक कल्याणात वाढ : (Increasing in Economic Welfare)

भांडवल निर्मिती द्वारे गुंतवणुकीत व उत्पादनात जी वाढ होते. त्यातून उत्पन्न, उपभोग पातळीत वाढ घडून येते. परिणामी समाजाच्या राहणीमानाचा दर्जा उंचावतो. रोजगार निर्मितीतून बेकारी व उत्पन्न वाढीतून दारिद्र्य घटत जाते. आवश्यक वस्तूंचे उत्पादन वाढल्याने मुलभूत गरजांची परिपूर्ती वाढते. शिक्षण, आरोग्य, सेवा यांमध्ये विस्तार होत गेल्याने मानवी श्रमाचे कौशल्य, उत्पादकता व गतीशीलता वाढत जाते. यातून वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक अशा प्रत्येक स्तरावरील कल्याण वाढत जाते.

## * विकसनशील देशांमध्ये भांडवल निर्मितीचा दर कमी असण्याची कारणे : (Reasons of Low Rate of Capital Formation in Developing Country)

आर्थिक विकास घडून येण्याकरीता भांडवल निर्मिती ही पूर्वअट असते. बऱ्याच विकसनशील देशांमध्ये भांडवल निर्मितीचा वेग हा खूपच कमी असतो. परिणामी त्यांना अपेक्षीत विकास दर गाठता येत नाही. हा भांडवल निर्मितीचा दर विकसनशील देशात अल्प असण्यामागे पुढील कारणे आढळून येतात.

### १) अल्प उत्पादन क्षमता (Low Productivity) :

विकसनशील देशांमध्ये प्राथमिक क्षेत्राचे प्राबल्य असते. या क्षेत्रात श्रमप्रधान व परंपरागत पध्दतीने उत्पादन घेतले जाते. परिणामी उत्पादन खर्च, त्याचा कालावधी जास्त असतो. याउलट त्यातून होणारे उत्पादन व नफा अल्प असतो. शिवाय मोठ्या प्रमाणावर छुपी बेकारी असते. उपभोग प्रवृत्ती व गुंतवणूक दोन्ही अल्प

असतात. निरक्षरता जास्त असते. लोकसंख्यावाढीचा दरही जास्त असतो. या सर्वांमुळे उत्पादकता अल्प असते. त्यामुळे भांडवल निर्मितीला मर्यादा पडतात.

**२) अल्प उत्पन्न (Low Income) :**

विकसनशील देशातील अर्थव्यवस्थांमध्ये, प्राथमिक क्षेत्राचे प्राबल्य असते व त्या तुलनेत लोकसंख्या वाढीचा दर जास्त असतो. त्यामुळे रोजगारनिर्मितीचे प्रमाण अल्प व बेरोजगारीचे प्रमाण जास्त अशी स्थिती असते. त्यामुळे श्रम बाजारात रोजगारीचे दर अल्प राहतात. महागाईचा दर देखील जास्त असल्याने पैशातील व वास्तव असे दोन्ही उत्पन्नाचे दर अल्प राहतात. परिणामी बचत कमी राहून शेवटी भांडवल निर्मिती अल्प राहते.

**३) पायाभुत सुविधांची कमतरता : (Lack of Basic Infrastructure)**

कोणत्याही अर्थव्यवस्थेच्या विकासाकरिता जी भांडवल निर्मिती होणे गरजेचे असते. त्याकरिता अत्याधुनिक, पुरेशा पायाभूत सुविधांची उपलब्धता असणे ही पूर्वअट असते. मात्र अशा पायाभुत सुविधांची निर्मिती करणे विकसनशील देशांकरिता गुंतवणुकी अभावी शक्य होत नाही. कारण शिक्षण, आरोग्य, रेल्वे, रस्ते, विमान वाहतूक जल वाहतूक, माहिती तंत्रज्ञान, दळणवळण, विमा, वित्तपुरवठा, बाजारपेठा, संरक्षण, शांतता, सुव्यवस्था, प्रशासकीय सेवा, वीज, पाणी, इंधन अशा असंख्य मुलभूत सोयी सुविधा नसल्याने अशा देशांमध्ये भांडवल निर्मितीचा दर अल्प असतो.

**४) अतिरिक्त लोकसंख्या (Excess Population) :**

अल्पविकसीत देशांमध्ये दारिद्र्य, बेकारी, निरक्षरता, अंधश्रध्दा, जुनाट प्रथा, परंपरा, चालीरिती त्यांचे समाजावर प्राबल्य असते. त्यामुळे लिंगभेद, वर्णभेद इ. कारणांनी मुलांची संख्या जास्त असते. स्त्रीचे दुय्यम स्थान, तिला निर्णयप्रक्रियेत नसलेले स्थान, यांमुळे लोकसंख्या वाढत जाते. परिणामी बेकारी जास्त, उत्पन्न कमी, बचत कमी राहते. या सर्वातून भांडवल निर्मितीवर बऱ्याच मर्यादा पडतात.

**५) प्रचंड आर्थिक विषमता (High Economic Inequality) :**

विकसनशील देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक विषमता आढळून येते. ज्यामध्ये एकूण लोकसंख्येच्या फारच थोड्या लोकांकडे संपत्ती एकवटलेली असते व उरलेले बहुसंख्य लोक दारिद्र्यात जगत असतात. परिणामी बहुसंख्य लोकांची उपभोग व बचत प्रवृत्ती दोन्ही अल्प असते. त्यांची गुंतवणुकीची व उत्पादनाची क्षमता देखील अल्प असते. या सर्वांमुळे एकूण भांडवलनिर्मितीची गती व वेग अल्प राहतो.

**६) अपुरी भांडवली संसाधने (Inadequate Capital Resources) :**

भांडवलनिर्मिती होण्याकरीता जी भांडवली संसाधने असावी लागतात. ती विकसनशील देशांजवळ पर्याप्त प्रमाणात असत नाहीत. यामध्ये तंत्रवैज्ञानिक शिक्षण व प्रशिक्षणाच्या सोयी-सुविधा, तांत्रिक अवजारे, यंत्रे यांची कमतरता असते. अशी भांडवली साधने निर्माण करणे अथवा ती आयात करणे अशा देशांना शक्य नसते. कारण त्याकरिता करावी लागणारी भली मोठी गुंतवणूक त्यांच्या दृष्टीने अशक्य असते. परिणामी भांडवली संसाधनांचा अशा देशात तुटवडा भासतो. त्यातूनच मग पुढे भांडवल निर्मितीचा दर देखील अल्पच राहतो.

**७) राजकीय व सामाजिक अस्थिरता (Political & Social Unstability) :**

विकसनशील देशांमध्ये समाजात धार्मिक तेढ, प्रादेशिक वाद, जातप्रथा, वंशवाद, भाषावाद, लिंगभेद यांमुळे सामाजिक तणाव, दंगे सातत्याने घडत असतात. त्यातून राजकीय पक्ष, त्यांच्या विभिन्न विचारधारा यामुळे राजकीय, सामाजिक वातावरण सतत दुभंगलेले व अस्थिर असते. अशा वातावरणामध्ये गुंतवणूक, उद्यमशीलता, भांडवलनिर्मिती यांच्या वाढीला अनेक मर्यादा पडतात.

**८) वाढते करांचे दर : (Increasing Rate of Taxes)**

विकसनशील देशांमध्ये खाजगी क्षेत्र फारसे विकसीत झालेले नसते. उद्योगांचा विकासही जेमतेमच झालेला असतो. एकूण अर्थव्यवस्थेत प्राथमिक क्षेत्राचे प्राबल्य असते. परिणामी सरकारला आपल्या राजकोषीय धोरणांद्वारे व्यापक प्रमाणात राजकोषीय खर्च करावा लागतो. मात्र त्याकरिता सरकार जनतेवर मोठ्या प्रमाणावर कर आकारते. परिणामी त्यातून एका बाजूला उत्पन्न घटून बचत मंदावते. त्यातून गुंतवणुकीवर विपरीत परिणाम होतो. तर दुसरीकडे उत्पादनातील नफा घटून उत्पादकतेत घट होते, या दोन्ही नकारात्मक परिणामामुळे अंतिमत: बचत, गुंतवणूक अल्प राहून भांडवलनिर्मितीचा दर घटतो.

**९) वित्तीय बाजारपेठांचा अपुरा विकास (Inadequate Development of Financial Markets):**

कोणत्याही अर्थव्यवस्थेला विकासाची पातळी गाठण्याकरिता भांडवल निर्मितीचा जो एक किमान स्तर वाढावा लागतो. त्याकरिता संघटीत व सुदृढ अशी वित्तीय बाजारपेठ असणे गरजेचे असते. व्यक्ती, संस्था, उद्योग, व्यापारी, व्यावसायीक, सरकार अशा सर्वांच्या वित्तीय गरजा पुरवू शकेल अशी बँकिंग, वित्तीय संस्था, विमा, म्युच्युअल फंड, शेअर्सची बाजारपेठ असणे गरजेचे असते. बहुतांश विकसनशील देशांमध्ये अशा वित्तीय रचनेचाच अभाव असल्याने तिथे भांडवल निर्मितीवर मर्यादा पडतात.

**१०) आर्थिक मागासलेपणा (Economic Backwardness) :**

विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्था या बहुअंशी आर्थिकदृष्ट्या मागास असतात. अर्थव्यवस्था ही कृषी व ग्रामीण संरचनेवर आधारलेली असते. उद्योगांचा फारसा विकास झालेला नसतो. सेवा क्षेत्र तर बाल्यावस्थेत असते. मुख्यत्वे श्रमप्रधान व पारंपरिक तंत्राद्वारे उत्पादनकार्य चालू असते. व्यक्तीगत, संस्थात्मक व सरकारवरील कर्जांचे प्रमाण मोठे असते. भाववाढ, लोकसंख्यावाढ, बेकारी, निरक्षरता, कुपोषण, दारिद्र्य, विषमता अशा समस्यांनी समाज ग्रासलेला असतो. परिणामी अशा परिस्थितीत आर्थिक मागासलेपणा वाढत जातो व त्यातून भांडवल निर्मिती अल्प राहते.

अशाप्रकारे आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतील एक मुख्य साधन असलेले 'भांडवल' म्हणजे काय. त्या भांडवल निर्मितीचे आर्थिक विकासातील असलेले महत्व व विकसनशील देशांच्या दृष्टीने त्याचा दर कमी राहण्याची कारणे दिसून येतात.

## * तंत्रज्ञान व आर्थिक विकास (Technology & Economic Development) :

आधुनिक काळातील उत्पादन पध्दतीमध्ये तंत्रज्ञान या घटकाला अनन्यसाधारण असे महत्व प्राप्त झालेले आहे. विज्ञानाच्या प्रगती बरोबर तांत्रिक प्रगतीसुध्दा घडून आली. ज्यातून उत्पादनात प्रचंड प्रमाणात वाढ घडून आली. उत्पादन खर्च घटून नफ्याचे प्रमाण वाढत गेले. हे सर्व तांत्रिक प्रगतीचे फलीत असल्याचे दिसून येते. या दृष्टीने तंत्रज्ञानाची व्याख्या पुढीलप्रमाणे :

**तंत्रज्ञानाची व्याख्या :**

आर्थिक वस्तु व सेवांची उत्पादन क्षमता वाढविणारे सर्व प्रकारचे ज्ञान म्हणजे तंत्रज्ञान होय. ज्याद्वारे वस्तु उत्पादनात वाढ होते.

थोडक्यात, सध्याच्या काळात तंत्रज्ञानाला महत्वपूर्ण स्थान मिळाले आहे. सध्याच्या अर्थव्यवस्थाही गतीशील आहेत, यामध्ये नित्य नव्याने विविध शोधांची भर पडत असते. शास्त्रीय संशोधनाचा उत्पादन कार्यात प्रत्यक्ष वापर करुन नवनवीन उत्पादने बाजारात आणली जातात. शिवाय या वैज्ञानिक शोधांमुळे ज्ञानात भर पडते. तर दुसरीकडे त्यातून विकसीत होणाऱ्या तंत्रज्ञानामुळे आर्थिक विकासात भर पडते. तंत्रज्ञानाचा उत्पादन कार्यामध्ये व्यवहार्य वापर करुन नवनवी उपकरणे बनविणे यालाच प्रो. शुंपीटर यांनी तांत्रिक प्रगती असे म्हटले आहे. बरेचसे शास्त्रीय शोध हे त्या त्या विषयातील व क्षेत्रांतील शास्त्रज्ञांनी लावलेले असले तरी या शोधांचा व्यवहार्य पातळीवर प्रत्यक्ष वापर करण्याचे काम तंत्रज्ञ करीत असतात. तर हे तंत्रज्ञ ज्या वस्तू व सेवांची निर्मिती करतात. त्यांचे मोठी भांडवली गुंतवणूक करुन मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्याचे काम हे संयोजक म्हणजेच उद्योजक करीत असतात. बौध्दीक संपदा हक्काद्वारे तंत्रज्ञान विकासाला चालना व प्रोत्साहन मिळते, तंत्रज्ञानाद्वारे तयार होणाऱ्या वस्तु संयोजकाद्वारे आणल्या जातात.

पारंपारिक अर्थशास्त्राची सर्वच मांडणी ही 'मागणी नुसार वस्तु व सेवांचा पुरवठा होतो' या तत्वावर झालेली दिसून येते. मात्र आजच्या आधुनिक व जागतिकीकरणाच्या जगात अगोदर मोठ्या प्रमाणावर वस्तुंचे उत्पादन केले जाते व नंतर त्याची आकर्षक जाहीरात करुन मागणी निर्माण केली जाते. मानवाची उपजत प्रवृत्ती ही प्रयोगशील असल्याने तो नवनव्या गोष्टींचा स्वीकार करतो. शिवाय तो इतरांचे अनुकरणही चटकन करतो. शेजाऱ्याने जर एखादी नविन वस्तू आणली तर ती आपल्याकडेही असावी असे सर्वांना वाटते. यातूनच बाजारातील वस्तूंच्या पुरवठ्याला मागणी निर्माण होते व नवनव्या वस्तुंचा पुरवठा होत राहतो. यातुन स्वस्त उत्पादन तंत्राचा, अधिक उत्पादनक्षम तंत्राचा विकास होतो. वाहतुक, दळणवळण, माहिती-तंत्रज्ञान यांमध्येही अमुलाग्र बदल व सुधारणा होत जातात. तसेच ग्राहकांना आकर्षीत करुन वस्तु व त्याची माहिती पोहोचविणारी नवनवी जाहिरात तंत्रे विकसीत होत आहेत.

**तंत्रज्ञानाचे फायदे :**

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतील तंत्रज्ञानाचे होणारे फायदे पुढीलप्रमाणे :

१. उत्पादनाच्या वक्राचे स्थान बदलून उत्पादनाचा खर्च कमी होतो.

२. दळणवळणाची व्याप्ती वाढून त्याचा खर्च घटतो व त्यामध्ये सुलभता येते.

३. तांत्रिक विकासातून बाजारपेठांचा विकास होतो.

४. तांत्रिक प्रगतीमुळे ग्राहकांचा उपभोग वाढून मागणीत मोठी वाढ होते.

५. तंत्रज्ञानातून उत्पादन खर्च घटतो, नफा वाढतो, परिणामी वस्तु व सेवांच्या पुरवठ्यातही वाढ होते.

६. लोकांना नवनवीन वस्तु व सेवांचा नियमित रास्त दरांत व गुणवत्तापूर्ण पुरवठा होत राहिल्याने त्यांच्या राहणीमानाचा दर्जा व उत्पादकता यामध्ये वाढ घडून येते.

७. उत्पादकांना तांत्रिक प्रगतीने विविध प्रकारच्या बहीर्गत बचती मिळतात. उदा. संशोधन, सेवा, माहिती इ.

८. तांत्रिक प्रगतीतून औद्योगिक विकासात भर पडून रोजगारनिर्मितीत वाढ होते.

**तंत्रज्ञानाची वर्गवारी :**

तंत्रज्ञान देश-काल-परिस्थितीनुसार ज्या पध्दतीने वापरले जाते. त्यानुसार त्याचे वर्गीकरण केले जाते. म्हणजे ज्या भागांत किंवा क्षेत्रात उत्पादन कार्यामध्ये श्रमाचा पुरवठा अपुरा असेल तो दुर्मिळ व महान असेल तेथे त्याची बचत करणरे, तंत्रज्ञान वापरले जाते. याउलट जिथे भांडवलाची संसाधनांची दुर्मिळता असते, तिथे श्रमप्रधान तंत्रज्ञान वापरले जाते.

**तंत्रज्ञानाच्या वापरातील मर्यादा :**

१) विकसीत देशांतील तंत्रज्ञान अविकसित देशांना जसेच्या तसे स्वीकारता वा वापरता येत नाही.

२) अविकसीत देशांत आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराकरिता कुशल तंत्रज्ञ व श्रमीक उपलब्ध नसतात.

३) तंत्रज्ञानाचा विकास करण्यासाठी लागणारे भांडवल वा ते विकसीत देशांतुन आयात करण्यासाठी लागणारे परकीय चलन अविकसीत देशांना जवळ असत नाही.

४) प्रत्येक देशाच्या सार्वभोमत्वाच्या व संरक्षणाच्या धोरणांमुळे नवीन तंत्रज्ञानाची आयात व वापर करण्यावर मर्यादा येतात.

५) स्वदेशी व देशांतर्गत संसाधनांच्या वापराचा आग्रह धरल्यामुळे तांत्रिक विकासाला मर्यादा येतात.

६) अप्रगत अर्थव्यवस्थांमध्ये प्रगत तंत्रज्ञानाच्या व्यावहारिक उपयोजनांमध्ये अनेक तांत्रिक अडचणी येतात.

७) ज्या देशांतील सामाजिक, आर्थिक, राजकीय स्थिती नव्या व प्रगत तंत्रज्ञानाच्या वापरावर व स्वीकारावर मर्यादा आणतात.

अशाप्रकारे एकूणच आर्थिक विकास प्रक्रिया येथील तंत्रज्ञानाचे स्थान, स्वरुप, महत्व आपणांस समजावून घेता येते.

**४.२.२ मानवी संसाधने व आर्थिक विकास :**

आजच्या आधुनिक अर्थव्यवस्थांमध्ये उद्योग, शेती, सेवा, परकीय क्षेत्र व सरकारी क्षेत्र या सर्वांमध्ये

मानवी संसाधनांचे महत्व वाढलेले आहे. यामध्ये वस्तू व सेवांचे उत्पादन, वितरण व उपभोग या सर्वांसाठी गुणवत्तापूर्ण श्रमशक्ती, त्याची उत्पादन कौशल्ये यांचा अंतर्भाव होतो. आर्थिक प्रक्रियेमध्ये मानवी भांडवलांचा विचार दोन दृष्टिकोनातून केला जातो. तो म्हणजे वैयक्तिक व सामाजिक विकसीत अर्थव्यवस्थांमध्ये श्रमशक्तीची उत्पादकता वाढविण्याकरिता त्यांना योग्य शिक्षण, प्रशिक्षण देण्यासाठी भरीव गुंतवणूक केलेली असते.

**मानवी भांडवलाची आर्थिक विकासातील भूमिका :**

श्रमशक्तीची आर्थिक विकासातील भूमिका जाणून घ्यायची असेल तर जपान या देशाचे उदाहरण खूप बोलके आहे. दुसऱ्या महायुध्दात पराभूत झालेल्या या देशाची संपूर्ण अर्थव्यवस्थाच उध्दवस्त झालेली होती. त्यांनी आपल्या सर्व वसाहती गमावल्या होत्या. उद्योग, कारखाने, बंदरे, रेल्वे, विमानतळे अशा पायाभूत सुविधा देखील उध्दवस्त झालेल्या होत्या. या युध्दात या देशातील संपूर्ण तरुणाई नष्ट झाल्यात जमा होती. मात्र या सर्व गोष्टींवर मात करुन पुढील ४० वर्षात जपानने आश्चर्यकारकरित्या नेत्रदिपक अशी प्रगती केली. जपान लोखंडा बाबतीत संपूर्णपणे आयातीवर अवलंबून आहे. ९९% खनिज तेल हा देश आयात करतो, साधे लाकूड सुध्दा ६६% एवढ्या प्रमाणात त्यांना आयात करावे लागते. ९८% ॲल्युमिनियम देखील त्याला आयातीद्वारेच मिळतात. मात्र तरीही हा देश जर्मनीसारख्या देशाला कॅमेरे, स्वित्र्झलँडला घड्याळे, फ्रान्सला लागणाऱ्या सायकली, इंग्लंडला मोटार सायकली व अमेरिकेला मोटार गाड्यांसह इलेक्ट्रॉनिक्सची उपकरणे यांचा सर्वात मोठा पुरवठादार म्हणून पुढे येत आहे. ६६% लाकूड आयात करणारा जपान जगातील जहाज बांधणी उद्योगातील प्रथम क्रमांकांचा देश आहे. या सर्वांपाठीमागे जपानी माणसाची बुध्दीमत्ता,कष्ट आहेत. यावरुनच आपल्याला मानवी भांडवलाची महती लक्षात येते.

**मानवी भांडवल आणि भारत :**

भारतातील मानवी भांडवलाचा आर्थिक विकासासाठीची एक गरज म्हणून जो विकास घडून आला तो मुख्यत्वे स्वातंत्र्योत्तर काळात, सन १९५१ पासून पंचवार्षिक योजनाच्या माध्यमातून त्याची परिपूर्ती करण्याचा प्रयत्न झालेला होता. मात्र तरीही मानवी भांडवलाची स्थिती फारशी सुधारु शकली नाही. आजही देशामध्ये मोठ्या प्रमाणावर प्रादेशिक असमतोल आहे. परिणामी काही भाग पुढारलेले आहेत तर काही मागासलेले आहेत. नियोजनाचे, हरितक्रांतीचे, औद्योगिकीकरणाचे लाभ हे फारच थोड्या लोकांना मिळाले. नविन आर्थिक सुधारणा नंतर तर आर्थिक विषमता आणि संपत्तीचे केंद्रीकरण मोठ्या प्रमाणावर घडून आले. शेती उत्तरोत्तर उध्वस्त होत गेली. खेडी ओस पडू लागली. दुसरीकडे शहरे वाढत गेली. प्रदुषण, वाहतुक कोंडी इ. नवे प्रश्न उभे राहिले. गेल्या काही वर्षात सेवा क्षेत्र वाढले. मात्र त्याची रोजगार निर्मितीची क्षमता मुख्यत्वे अल्पच राहिली.

**मानवी भांडवलाची गरज :**

देश कोणताही असो त्या प्रत्येक देशाच्या आर्थिक विकासामध्ये मानवी भांडवल या घटकाचे महत्व अनन्यसाधारण असते. या मानवी भांडवलाकरिता पुढील बाबींची पूर्तता होणे गरजेचे असते.

**१) परिपूर्ण आरोग्य सुविधा :**

देशाच्या संपत्ती निर्मितीचा मुख्य केंद्रबिंदू हा 'मानवी संसाधन' असतो. त्यामुळे त्यांचे आरोग्य उत्तम

असणे, स्वास्थ्य चांगले राहणे अत्यंत गरजेचे असते. त्यासाठी औषधे, रसायने, दवाखाने, आधुनिक उपचार पध्दती इ. सुविधांची पुरेपूर उपलब्धता असणे गरजेचे असते. साथीचे रोग, त्यांचे नियंत्रण, प्रतिबंधात्मक उपाय, लसीकरण, वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छता इ. बाबी मानवी भांडवलाच्या सुदृढीकरण व सशक्तीकरणासाठी गरजेच्या असतात.

**२) पौष्टीक अन्नधान्याची उपलब्धता :**

देशाच्या विविध क्षेत्रांत महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या मानवी संसाधनांच्या निकोप वाढीकरिता, त्यांच्या उत्पादकतेला टिकवून त्यात वाढ करण्याकरिता त्यांना योग्य, नियमित व सकस असा अन्नधान्याचा पौष्टीक पुरवठा होणे अत्यंत गरजेचे असते. यामध्ये अन्नधान्य, डाळी, कडधान्ये, तेलबिया, फळे, भाजीपाला, दूध, अंडी, मासे, मांस इ. सर्व घटकांचा अंतर्भाव होतो. या सर्वांच्या अभावाने उपासमार, कुपोषण, भुकबळी यांसारखे प्रश्न उभे राहतात. यातुन आर्थिक विकासाला मर्यादा पडतात.

**३) शिक्षण व प्रशिक्षण :**

प्रत्येक अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांमध्ये जे मानवी भांडवल लागते. त्यासाठी जी कौशल्य, ज्ञान, बुध्दीमत्ता, शिक्षण गरजेचे आहे. त्याची सोय असणे गरजेचे असते. अविकसित देशांत तर अगदी अक्षर ओळख, अंकज्ञान इथपासून त्याची सुरुवात लागते. तंत्रज्ञान, वैद्यक, माहिती, मनोरंजन, कला, क्रिडा, साहित्य, यंत्रे, मशिनरी, शेती, उद्योग, व्यापार, विविध सेवा इ. क्षेत्रांत काम करण्यासाठी जी अंगभूत कौशल्ये विकसीत होणे गरजेचे असते, जे ज्ञान प्राप्त करणे गरजेचे आहे, ते शिक्षण व प्रशिक्षणातून देणे गरजेचे असते.

**✻ मानवी भांडवलावरील मर्यादा :**

देश-काल-स्थितीनुसार आर्थिक विकास प्रक्रियेमध्ये मानवी भांडवलावर पुढील मर्यादा येतात.

१) **वाढती लोकसंख्या :** आर्थिक विकासाची प्रक्रिया जसजशी गतीमान होत जाते. तसतशी लोकसंख्या वाढत जाते. ही वाढती लोकसंख्या संसाधनांवर ताण आणते, त्यातुन महागाई, बेरोजगारी वाढते.

२) **संसाधनांचा अपुरा वापर :** अविकसीत देशांमध्ये अपुरे भांडवल, जुने तंत्रज्ञान, अपूर्ण बाजार यांमुळे संसाधनांचा वापर हा पुरेपूर केला जात नाही.

३) **वित्तीय स्त्रोतांचा अपुरेपणा :** आर्थिक विकासाकरिता वित्तीय स्त्रोत, त्यांची उपलब्धता, पुरवठा यांची कमतरता असते की, मानवी भांडवलाच्या विकासावर व त्यांच्या वापरावर खूप मर्यादा येतात.

४) **बौध्दीक संपदेचे वहन :** अविकसीत देशांमध्ये असलेली संधींची कमतरता, बुध्दीजीवी वर्गाला त्यांच्या गुणवत्तेनुसार वाव नसणे, यांमुळे हे बौध्दीक भांडवल विकसीत देशांकडे जाते. यातून अविकसीत देशांतील मानवी भांडवलाच्या विकासावर मर्यादा येतात.

**✻ मानवी भांडवलाच्या विकासासाठी उपाय :**

वरीलप्रमाणे मानवी भांडवलावर काही मर्यादा असल्या तरी पुढील उपायांचा अवलंब करुन सुधारणा

करता येतील.

१. लोकांकरिता पोषणयुक्त व पुरेपूर आहार उपलब्ध करुन देणे.

२. मुलभूत गरजा व पायाभूत सुविधा यांची उपलब्धता करुन देणे.

३. आरोग्य सुविधा व शिक्षण यांवर भर देणे.

४. वैज्ञानिक व तांत्रिक विकासाला चालना देणे.

५. माहिती तंत्रज्ञान आणि वाहतुक-दळणवळणांमध्ये वाढ करणे.

६. स्पर्धात्मकता वाढविणे.

७. शांतता, सुव्यवस्था व कायदा यांची शाश्वती देणे.

अशाप्रकारे वरील उपायांद्वारे आर्थिक विकासातील मानवी भांडवलाचा सहभाग वाढवून आर्थिक विकासाची प्रक्रिया गतीमान करता येते.

### ४.२.३ परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक, परकीय संस्थात्मक गुंतवणूक, रोखा संग्रह व परकीय मदत :

सध्याच्या आधुनिक काळामध्ये अल्पविकसीतच नव्हे तर सर्वच राष्ट्रांना आपला आर्थिक विकासाचा वृध्दीदर टिकवून तो सातत्याने वाढविण्याकरिता परकीय गुंतवणूकीची गरज भासू लागली आहे. बहुतेक विकसनशील अर्थव्यवस्थांमध्ये मानवी भांडवल व नैसर्गिक संसाधने ही विपुल प्रमाणात उपलब्ध असतात. मात्र भांडवलाची कमतरता आणि कालबाह्य व जुनाट तंत्रज्ञान यांमुळे देशात उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीचा पुरेपूर वापर होत नाही. अशाप्रकारे आर्थिक विकासामध्ये जेव्हा देशी साधने अपुरी पडतात. तेंव्हा परकीय गुंतवणूकीचे महत्व पुढे येते. अशा, परकीय गुंतवणूकीमुळे विकसनशील देशांतील प्राथमिक क्षेत्रांतील उद्योगांचा विकास होऊन त्यांच्या निर्यातीला मोठ्या प्रमाणावर चालना मिळते. त्यातुन इतर क्षेत्रांच्या विकासासाठी लागणारा कच्चा माल, तंत्रज्ञान यांची आयात करणे शक्य होते. या दृष्टीने महत्वपूर्ण ठरते.

आर्थिक विकासाच्या संसाधनातील स्त्रोत म्हणून विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक (FDI), परकीय संस्थात्मक गुंतवणूक (FII), रोखा संग्रह व परकीय मदत या संसाधनांचा अंतर्भाव होतो.

### विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक (FDI)

विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक याचा अर्थ परकीयांनी आपल्या देशातील उद्योग क्षेत्रात केलेली थेट गुंतवणूक होय. विकसीत देशांतील गुंतवणुकदार, व्यावसायीक, कंपन्या आपली गुंतवणुक अनेक विकसनशील राष्ट्रांमध्ये करीत असतात. अशी गुंतवणूक केवळ उद्योग, व्यवसाय, तंत्रज्ञान, यंत्रसामग्री या स्वरूपात असल्याने अशा गुंतवणुकीचा फायदा विकसनशील देशांना होतो. त्यांच्या आर्थिक विकासाला चालना मिळते.

### FDI ची काही महत्वाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

१) FDI मुळे देशांत निव्वळ गुंतवणुकीत वाढ होते.

२) FDI मधील गुंतवणुक थेट भौतीक संपत्तीत होत असते.

३) FDI मधील गुंतवणुकीमुळे अर्थव्यवस्थेची उत्पादनक्षमता तसेच रोजगारात वाढ होते.

४) FDI मधील गुंतवणुक काढून घेणे सहज शक्य नसल्यामुळे अशी गुंतवणुक शाश्वत असते.

५) FDI मुळे अर्थव्यवस्थेच्या ठराविक क्षेत्रात भांडवलनिर्मिती होते.

६) FDI मुळे तंत्रज्ञान, बौध्दीक भांडवल, व्यवस्थापन कौशल्य यांचा विकास घडवून आणण्यास मदत होते.

७) FDI मुळे विदेशी कंपन्यांना थेट देशात विविध वस्तूंचे उत्पादन सुरु करता येते. त्यामुळे देशातील उद्योगांना स्पर्धा करणे कठीण होते.

**FDI चे महत्व :**

विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीचे, अर्थात FDI चे विकसनशील राष्ट्रांच्या दृष्टीने असणारे फायदे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) विकसनशील देशांत FDI मुळे पायाभुत सुविधांचा उदा. रस्ते, रेल्वे, विद्युतनिर्मिती, बंदरे इ. चा विकास घडून येण्यास मदत होते.

२) विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीमुळे विकसनशील राष्ट्रांत मोठ्या प्रमाणात खेळते भांडवल येते. त्यामुळे विविध क्षेत्रांच्या विकासाला हातभार लागतो.

३) FDI मुळे अनेक विदेशी कंपन्या स्थापन होऊन देशांत मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होते.

४) FDI मुळे अविकसित तसेच विकसनशील राष्ट्रांमध्ये प्रगत तंत्रज्ञान व कौशल्याचा विकास घडून येतो.

५) FDI मुळे कृषी क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होऊन कृषीची प्रगती होते.

६) थेट परकीय गुंतवणुकीमुळे विकसनशील देशांतील आर्थिकदृष्ट्या तोट्यात असणाऱ्या उद्योगांना अर्थसाहाय्य मिळून त्यांना हातभार मिळतो.

**FDI चे तोटे :**

FDI चे वरीलप्रमाणे जसे फायदे आहेत. त्याप्रमाणे विकसनशील राष्ट्रांना काही तोटेही सहन करावे लागतात. त्यापैकी काही तोटे पुढीलप्रमाणे :

१) विदेशी कंपन्यांच्या गुंतवणुकीमुळे (FDI) विकसनशील राष्ट्रांमधील अस्तित्व धोक्यात येण्याची शक्यता असते.

२) FDI मुळे स्वदेशी किंवा विकसनशील राष्ट्रांतील उद्योजकांची वाढ खुंटते. कारण विदेशी कंपन्यांच्या स्पर्धेत त्यांना टिकाव धरणे अवघड जाते.

३) FDI मुळे अर्थव्यवस्था परकीयांच्या ताब्यात जाण्याचा धोका असतो. कारण त्यातुन परराष्ट्रांवरील अवलंबीत्व वाढते.

४) FDI मुळे कृषी क्षेत्रामध्ये शेतमाल किंमतीमध्ये अनिश्चितता निर्माण होऊन कृषी क्षेत्राच्या विकासात अडथळा निर्माण होईल.

५) FDI मधून जो नफा प्राप्त होतो. तो परकीय कंपन्या आपल्या मायदेशी पाठवितात. त्यातुन विकसनशील राष्ट्रांचे आर्थिक स्थैर्य धोक्यात येते.

६) FDI मध्ये केली जाणारी गुंतवणुक अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रांत न झाल्यास क्षेत्रीय असंतुलन निर्माण होईल. विशेषत: उद्योग व सेवा क्षेत्रात अधिक परकीय गुंतवणुक झाल्यास शेती क्षेत्र दुर्लक्षीत होते.

**परकीय संस्थात्मक गुंतवणुक (FII) :**

परकीय संस्थात्मक गुंतवणुकीस अप्रत्यक्ष गुंतवणुक तसेच पोर्टफोलीओ गुंतवणुक असे म्हणतात. जेंव्हा विदेशातील कंपन्या किंवा गुंतवणुकदार भारतीय शेअर बाजारच्या माध्यमातून शेअर्स, बॉण्डस्, म्युचअल फंडस्, इ. स्वरूपात जी गुंतवणुक करतात तिला परकीय संस्थात्मक तसेच पोर्टफोलीओ गुंतवणुक असे म्हणतात. FII मधूनच पुढे पोर्टफोलीओ गुंतवणुक (FPI) ही व्यापक संकल्पना अस्तित्वात आली. अलीकडे FDI आणि FII या दोन्हींमध्ये कोणताही फरक केला जात नाही.

**FII आणि FPI ची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :**

१) FPI मुळे देखील FDI प्रमाणेच देशाच्या निव्वळ गुंतवणुकीमध्ये वाढ होते.

२) FPI मधील गुंतवणुक ही वित्तीय संपत्तीशी संबंधीत असतात.

३) FPI मधील गुंतवणुकीदारांचा व्यवस्थापनात सहभाग नसतो.

४) FPI च्या माध्यमातून केवळ वित्तीय गुंतवणुक येते.

५) या प्रकारामधील गुंतवणुक ही सट्टेबाजी स्वरुपाची असते. ही गुंतवणुक उद्योग-व्यवसायाशी संबंधीत नसते.

६) जर देशात अस्थिर परिस्थिती असेल तर FPI मधील गुंतवणुकदार आपली गुंतवणुक लगेच काढून घेतात.

७) FPI मधून भांडवलाची उपलब्धता अल्प प्रमाणात होते.

अशा प्रकारे FDI, FII आणि FPI अशा प्रकारच्या गुंतवणुकीचा समावेश परकीय भांडवली स्त्रोतांमध्ये होतो. अशा प्रकारच्या विदेशी भांडवलातुन विकसनशील देशांच्या आर्थिक विकासासाठी उपयोग होत असतो. विकसनशील देशांमध्ये जेव्हा देशांतर्गत भांडवली स्त्रोतांची कमतरता भासते. तेव्हा अशा प्रकारच्या विदेशी भांडवली स्त्रोतांचा वापर केला जातो.

*** परकीय मदत :**

परकीय खाजगी गुंतवणुकीबरोबरच परकीय भांडवली मदतीच्या स्वरूपात विकसनशील राष्ट्रांना मदत

मिळत असते. अशी मदत त्या दोन संबंधीत देशांचे परस्पर संबंध व करार यांद्वारे दिली जाते. आजवर अमेरिका, रशिया इ. राष्ट्रांनी भारताला अशा प्रकारची मदत बऱ्याचदा दिली आहे. विशेषत: दुसऱ्या महायुध्दानंतर अनेक राष्ट्रांच्या पुर्नउभारणी व विकासासाठी विविध आंतरराष्ट्रीय संस्थांची स्थापना करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणे निधी, यांसारख्या संस्थांचा समावेश होतो. या संस्थाद्वारे विकसनशील राष्ट्रांना आपला आर्थिक व सामाजिक विकास घडवून आणण्यासाठी आर्थिक मदत दिली जात असते. मात्र या मदतीचा वापर कसा होतो. यावर या संस्था लक्ष ठेवतात. या संस्थांमुळे जगातील विविध देशांमध्ये परस्पर सहकार्याची भावना वाढीस लागली आहे. त्यातुनच आता अनेक अविकसीत व विकसनशील देश मोठे विकास प्रकल्प हाती घेत आहेत.

विदेशी मदत याचा अर्थ अनुदान अथवा परतफेड न करावी लागणारी रक्कम असा होत नाही. तर विदेशी मदत म्हणजे एक प्रकारचे कर्जच असते. काही निश्चित व विशिष्ट अशा अटींवर ही मदत दिली जाते. त्यामुळे विदेशी मदत म्हणजे विदेशी भांडवलांचा वापर असतो. अशा विदेशी भांडवलाचा वापर विविध देशांमध्ये फार पूर्वीपासूनच केला जात आहे. पूर्वी अशी मदत देण्याबाबत इंग्लंड हा देश खूप आघाडीवर होता. आता ती जागा अमेरिकेने घेतली आहे. अशा विदेशी मदतीशिवाय अविकसित व विकसनशील देशांना आपला आर्थिक विकास साध्य करणे शक्य होत नाही. त्यामुळेच काही मोजके देश वगळता जगातील बहुतेक राष्ट्रांनी आपल्या विकासाकरिता विदेशी मदत घेतलेली आहे.

***	विदेशी मदतीचे लाभ :**

विदेशी मदतीचे अविकसीत वा विकसनशील राष्ट्रांना होणारे लाभ पुढीलप्रमाणे :

**१)	भांडवलाची कमतरता दूर होण्यास मदत :**

विकसनशील राष्ट्रांचा आपला आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी प्रचंड प्रमाणता भांडवलाची गरज असते. मात्र तेवढे पुरेसे भांडवल त्यांच्याकडे नसते. भांडवलाची कमतरता हे विकसनशील राष्ट्रांचे वैशिष्ट्य मानले जाते. परकीय मदतीमुळे विकसनशील राष्ट्रांची भांडवलाची गरज भरुन काढता येते.

**२)	तांत्रिक विकासाचे फायदे :**

अप्रगत राष्ट्रांचा तांत्रिक विकास फारसा झालेला नसतो. अशा देशांत उत्पादनासाठी जुन्या तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. त्यामुळे त्यांचा उत्पादन खर्च जास्त असतो. परिणामी अशा देशांमध्ये भांडवल-उत्पादन गुणोत्तर जास्त असते. म्हणजे उत्पादनाच्या प्रती नगासाठी जास्त भांडवल लागते. याचे प्रमुख कारण म्हणजे मागासलेले तंत्रज्ञान होय. विदेशी मदतीद्वारे अशा प्रकारचा तांत्रिक मागासलेपणा दूर करता येतो. विदेशी मदतीच्या साहाय्याने विदेशातुन नविन तंत्रज्ञान, यंत्रे यांची आयात करणे शक्य होते.

**३)	पायाभुत सुविधांच्या निर्मितीला हातभार :**

पायाभुत सुविधांच्या निर्मितीशिवाय विकासाला खऱ्या अर्थाने सुरुवात होत नाही. उदा.रस्ते, रेल्वे, विमान सेवा, जल वाहतुक, विज निर्मिती इ. चा विकास व निर्मितीकरिता मोठ्या प्रमाणावर भांडवलाची आवश्यकता असते. विदेशी मदतीद्वारे अशा पायाभूत सुविधा निर्मितीमध्ये गुंतवणूक करता येते. अशा गुंतवणुकीमुळे

अर्थव्यवस्थेतील इतर क्षेत्रांमध्ये देखील आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरु होते.

**४) व्यापारातील तुट कमी करता येते :**

विकसनशील राष्ट्रांमधील आयातीचे प्रमाण हे निर्यातीपेक्षा जास्त असल्याने त्यांचा आंतरराष्ट्रीय व्यापार सातत्याने तुटीचा होतो. आयातीवर मोठ्या प्रमाणावर खर्च होत असल्याने नवीन उद्योग, व्यवसायांची उभारणी करणे अडचणीचे होते. विदेशी मदतीच्या माध्यमातून नविन उद्योग व्यवसायांची उभारणी करुन अस्तित्वातील उद्योगांची उत्पादनक्षमता वाढवून निर्यातीत वाढ करता येते. त्यामुळे व्यापारातील तुट कमी होण्यास थोड्या फार प्रमाणात मदत होते.

**५) नैसर्गिक साधनसामग्रीचा पुरेपूर वापर होतो :**

विकसनशील देशांत नैसर्गिक साधनसामग्री विपुल प्रमाणात असते. मात्र ती वापराविना पडून असते. कारण या देशांत भांडवलांची कमतरता असते. अशा नैसर्गिक संसाधनांचा वापर करण्याकरिता त्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणुक करावी लागते. विदेशी मदतीमुळे नविन क्षेत्रांचा शोध घेऊन त्यामध्ये उपलब्ध नैसर्गिक संसाधनांचा वापर करुन विकासाला चालना दिली जाते. शिवाय याद्वारे क्षेत्रीय वा प्रादेशिक विषमतेला दूर केले जाते.

**६) राहणीमानांचा दर्जा उंचावणे :**

विदेशी आर्थिक मदतीमुळे अल्पविकसीत देशांमध्ये नविन क्षेत्रांचा विकास होतो. त्यातुन रोजगाराच्या नवनवीन संधी निर्माण होतात. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे कामगारांची उत्पादकता वाढते. वेतनात वाढ होऊन श्रमिकांचे उत्पन्न वाढते. त्यातून राहणीमानाचा दर्जा उंचावतो.

अशा प्रकारे विकसनशील राष्ट्रांच्या आर्थिक विकासामध्ये विदेशी मदत अतिशय महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडते. अलिकडील काळात अविकसीत व विकसनशील राष्ट्रांतील विकास घडवून आणण्याकरिता विदेशी मदतीला पर्याय नाही.

**※ विदेशी मदतीचे तोटे :**

परकीय मदतीचे विकसनशील राष्ट्रांना जसे फायदे असतात तसे त्याचे काही प्रतिकुल परिणामही झालेले आहेत. त्यातुन अशा परकीय मदतीचे विकसनशील देशांना होणारे तोटे पुढीलप्रमाणे :

**१) परावलंबन वाढण्याचा धोका :**

देशाचे परावलंबन कमी करुन देशाला आत्मनिर्भर बनविणे हे प्रत्येक देशाच्या आर्थिक विकासाचे उद्दिष्ट असते. सर्व देश आपली अर्थव्यवस्था स्वावलंबी व्हावी म्हणून प्रयत्न करीत असतात. अर्थव्यवस्थेला आत्मनिर्भर वा स्वावलंबी बनविण्यासाठी विदेशी मदत घेणे जरी गरजेचे असले तरी देखील अशा आर्थिक मदतीमुळे कायमचेच परावलंबन निर्माण होण्याची शक्यता असते. थोडक्यात अतिरिक्त वा सततच्या परकीय मदतीमुळे देशावर आर्थिक परावलंबीत्व येण्याचा धोका संभवतो

**२) अर्थव्यवस्थेच्या अंतर्गत व्यवहारांत हस्तक्षेप :**

विकसनशील राष्ट्रे विदेशी मदतीवर अवलंबून असल्याने या राष्ट्रांच्या अंतर्गत आर्थिक व्यवहारांमध्ये बऱ्याचदा मदत पुरविणारे विकसीत देश ढवळाढवळ करतात असा अनुभव आहे. कारण आर्थिक मदत हे महत्वाचे

शस्त्र त्यांच्या हातात असते. जर अशा हस्तक्षेपाला विकसनशील राष्ट्रांनी विरोध केला तर मदत बंद करण्याची धमकी दिली जाते.

### ३) प्रादेशिक असमतोलाची शक्यता :

विदेशी मदतीच्या अंतर्गत नफ्याचा हेतु दडलेलाच असतो. त्यामुळे ज्या क्षेत्रातुन जलद व मोठ्या प्रमाणावर नफा मिळेल अशा क्षेत्रांसाठी परकीय मदत केली जाते. त्यामुळे इतर क्षेत्रे मागास राहतात. त्यातुन मोठ्या प्रमाणावर क्षेत्रीय असंतुलन निर्माण होण्याची शक्यता असते.

### ४) विकसनशील राष्ट्रांचे आर्थिक शोषण वाढते :

विदेशी मदतीच्या नावाखाली विकसीत देशांतील काही कंपन्या अल्पविकसीत देशांत आपले व्यवसाय, उद्योग सुरु करतात. यामागे त्यांचा मुळ उद्देश नफा कमविणे हाच असतो. शेतीचे आधुनिकीकरण करण्याच्या नावाखाली विदेशी कंपन्या विकसनशील राष्ट्रांमध्ये प्रचंड मोठी गुंतवणूक करतात. परंतु प्रत्यक्षात त्यातुन अशा देशातील शेतीचा विकास झालेला दिसून येत नाही असा अनुभव आहे. कारण या कंपन्या आपल्या फायद्यासाठी येथील संसाधनांचे फार मोठ्या प्रमाणावर शोषण करतात.

### ५) जाचक अटी व निर्बंध :

विकसीत राष्ट्रे विकसनशील राष्ट्रांना जी आर्थिक मदत देतात. ती जर बिनशर्त असेल तर अशी मदत या देशांकरिता वरदान ठरते. मात्र वास्तवात असे होत नाही. विकसीत देश गरीब देशांना आर्थिक मदत देताना विशिष्ट अटी, शर्ती व निर्बंध ठेवूनच अशी मदत देऊ करतात. यातुन विकसनशील व गरीब देशांच्या आर्थिक स्वातंत्र्यावर गदा येते. त्यातुन त्यांच्या आर्थिक विकासात अडथळे निर्माण होतात.

थोडक्यात विदेशी मदत जेवढी आकर्षक व फायदेशीर दिसते. तेवढी ती असतेच असे नाही. मात्र तरीही भांडवलाअभावी अनेक विकसनशील राष्ट्रांना अशी मदत घ्यावीच लागते व थोड्या फार प्रमाणात तिचे तोटे देखील सोसावे लागतात.

## ४.२.४ आर्थिक विकासातील सरकारची भूमिका :

कोणत्याही अर्थव्यवस्थेचे प्रारंभीक स्वरुप हे व्यक्तीवादी असते. मात्र व्यवस्थापनात आलेल्या अडचणींवर मात करण्यासाठी समुहवाद उदयाला येतो. क्रमाक्रमाने या समुहवादाचे रुपांतर भांडवलवादात होते. मात्र ही भांडवलशाही देखील तिच्या अंगभूत दोषांनी भरुन जाते. परिणामी हे दोष दूर करण्यासाठी शासन संस्थेला हस्तक्षेप करणे गरजेचे होते. सरकारचा हा हस्तक्षेप व त्याचे नियंत्रण यातुनच आर्थिक नियोजन आकाराला येत जाते. याच क्रमाने सरकारी धोरणांच्या माध्यमातून बऱ्याच देशांत आर्थिक नियोजनाचा स्वीकार केलेला दिसून येतो. यातुनच आता कल्याणकारी राज्यनिर्मिती मध्ये सरकारची भूमिका सर्वमान्य होताना दिसत आहे. आर्थिक विकासातील सरकारची ही भूमिका पुढीलप्रमाणे :

### १) संस्थात्मक रचनेतील बदल :

अविकसीत देशांतील संस्थात्मक रचनेवर धर्म आणि सांस्कृतिक भिन्नता या घटकांचा प्रभाव असतो.

जातीव्यवस्था, एकत्र कुटुंब पध्दती, सामाजिक दृष्टिकोन, मूल्य पध्दती, परंपरा इ. ची घट्ट पकड असते. यात सुधारणा घडवून आर्थिक विकास गाठण्यासाठी सरकार महत्वाची भूमिका पार पाडते. आर्थिक विकासाबरोबर देशात विविध मार्गांनी नवनवीन संधी निर्माण होतात. नवीन वस्तुंची निर्मिती होऊ लागते. प्रचलित वस्तुंचा खर्च कमी करणे, नविन रस्ते, जलमार्ग, दळणवळण विषयक प्रगती व व्यावसायिक प्रगती घडून येते. युध्द किंवा भाववाढ यांमुळे जेव्हा मागणीत घट होते, परकीय पर्यटनात वाढ होते, गुंतवणूक आणि व्यापाराच्या संधी विस्तारत जातात, यामुळे पूर्वीच्या संस्थात्मक संरचेनमध्ये सुधारणा घडून येतात. नैसर्गिक व मानवी संसाधनांचा पुरेपूर वापर केला जातो. शिक्षण प्रसार घडून येतो. कायदा व सुव्यवस्था निर्माण होते.

**२) संघटनात्मक बदल :**

संघटनात्मक बदल होणे हा आर्थिक विकासातील सरकारच्या भूमिकेचा आणखी एक महत्त्वपूर्ण भाग आहे. सरकार आपल्या कार्यातून देशातील बाजारपेठांचे स्वरुप व आकारमान यात बदल घडवून आणते. श्रम बाजारांचा देखील विकास होतो. विविध वित्तीय संस्थांचा विकास करुन सरकार कृषी व औद्योगिक विकासाला चालना देते. यामध्ये मध्यवर्ती बँक, राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका, विविध महामंडळे यांचा समावेश असतो. कामगार संघटना, वेतन निश्चिती, कामगारांची सुरक्षितता, त्यांचे प्रशिक्षण या बाबी कायदेशिररित्या निश्चित होतात. या सर्वांमुळे श्रमिकांची कार्यक्षमता, उत्पादकता वाढते. त्यातुन त्यांचे उत्पन्न वाढून राहणीमानांचा दर्जा सुधारतो.

अविकसीत देशातील श्रमाची गतीक्षमता अल्प असते. बहुसंख्य श्रमीक हे खेड्यात असतात. शेती क्षेत्रात यांमुळेच छुपी बेकारी आढळते. ग्रामीण भागातील श्रमीकांना रोजगार संधींची माहिती उपलब्ध होत नसते. सरकार याबाबत माहिती व सेवा उपलब्ध करुन देते. त्यातुन ग्रामीण, श्रमीकांची गतीक्षमता वाढते, मात्र ग्रामीण भागातुन शहरांकडे श्रमीकांचे नोकरी, व्यवसायाकरिता जे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होते. त्यातुन शहरीकरणाच्या अनेक समस्या निर्माण होतात. या समस्यांच्या निराकरणांमध्ये सरकार महत्वपूर्ण भूमिका पार पाडते. राहण्याची घरे, पिण्याचे पाणी, वीज यांची उपलब्धता करुन देणे. झोपडपट्टी, वाहतुक कोंडी इ. वर नियंत्रण इ. कार्ये सरकार पार पाडते.

**३) सामाजिक व आर्थिक वरकड सोई :**

अविकसीत देशांमध्ये सामाजिक व आर्थिक वरकड सोयींची पूर्तता सरकार करते. देशाच्या दिर्घकालीन आर्थिक प्रगतीसाठी रस्ते, रेल्वे, जल वाहतुक, वीज, शिक्षण, तंत्रज्ञान इ. सोयी-सुविधांसाठी नितांत गरज असते. या सर्व गोष्टींकरिता मोठ्या प्रमाणावर भांडवलाची गरज असते. अशी मोठी भांडवली गुंतवणुक करणे, खाजगी उद्योजकांच्या कुवतीच्या बाहेरचे काम असते. अशी गुंतवणुक नफ्याची शाश्वती न देणारी व धोकादायक स्वरुपाची असते. त्यांचा फळधारणा काळही प्रदिर्घ असतो. त्यामुळे अशा गुंतवणुकी सरकारलाच पुढाकार घेऊन कराव्या लागतात.

सामाजिक व आर्थिक वरकड सोयी निर्माण करण्यासाठी सरकार नियोजनपूर्वक योजना राबविते. त्यासाठी सरकार प्राधान्यक्रम निश्चित करते.

### ४) कृषीविकास :

अविकसीत देशांचा कृषी हा मुख्य व्यवसाय असतो. या देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नात सर्वाधिक वाटा हा शेती क्षेत्राचाच असतो. मात्र ही शेती स्थितीशील अवस्थेत असते. या क्षेत्रात गुंतलेल्या लोकांचे एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील योगदानही अल्प असते. उदा. आज भारतातील ६५% लोक शेती क्षेत्रात कार्यरत आहेत. मात्र त्या तुलनेत एकूण GDP मध्ये त्यांचा वाटा हा फक्त १४% आहे. यामागील मुख्य कारणे म्हणजे अल्प भांडवल, लहान धारणाक्षेत्र, पारंपारीक तंत्र, छुपी बेकारी, पाणी-वीज यांचा तुटवडा, विपणनातील अडथळे इ. आढळून येतात.

या देशांतील शेतकरी वर्ग हा मुख्यत्वे गरीब, अशिक्षीत, दैववादी, अंधश्रध्दाळू असतो. परिणामी त्यांच्याजवळ उत्पादकतेसंबंधी प्रेरणा, व्यावसायिक वृत्ती यांचा अभाव असतो. सरकार यासाठी विविध उपाययोजना व सुधारणा कार्यक्रम हाती घेणे यातुन कृषीची उत्पादकता वाढते. त्यातून रोजगारनिर्मिती, उद्योगांना कच्चा माल, देशाची अन्न सुरक्षितता अशी उद्दिष्ट्ये साध्य होतात. शिवाय परकीय व्यापार, नैसर्गिक व मानवी साधनांचा पुरेपूर वापर केला जातो.

### ५) औद्योगिक विकास :

देशातील औद्योगिकरणाला चालना मिळून त्याचा विकास व्हावा याकरिता सरकार पुढाकार घेते. अशा देशांत मानवी श्रम व नैसर्गिक संसाधने न वापरता पडून असतात. मात्र ती विपुल प्रमाणात उपलब्ध असतात. सरकार त्यांच्या युक्त वापराच्या दिशेने प्रयत्न करते.

प्रसंगी सरकार महत्वाचे उद्योग स्वत:च्या ताब्यात घेते. उदा. खाणी, उर्जा, अवजड उद्योग, रेल्वे, संरक्षण इत्यादी अशा देशांतील बहुसंख्य खाजगी उद्योजक उपभोग्य व भांडवली वस्तु ज्या प्राथमिक स्वरुपाच्या असतात. त्यांच्या उत्पादन कार्यामध्ये गुंतलेले असतात. मात्र धरणे, रेल्वे, विमानतळे, लोह-पोलाद निर्मिती, वीजनिर्मिती, संशोधन यांमध्ये जी मोठी व महत्वपूर्ण गुंतवणुक करावी लागते. ती सरकारद्वारे केली जाते. या सर्वांमुळेच विकासाला गती मिळते.

### ६) मौद्रीक व राजकोषीय धोरण :

सरकार आपल्या उत्पन्न व खर्चाद्वारे रोजगारनिर्मिती घडवून आर्थिक विकासाचे उद्दिष्ट्य साध्य करते. अर्थव्यवस्थेत जेव्हा मागणीची कमतरता असते तेव्हा सरकार पायाभूत सुविधा, सामाजिक सोयी, मदत, अर्थसहाय्यक अशा रूपात आर्थिक मदत करते. यातुन लोकांचा खर्च कमी होतो व त्यातुन लोकांच्या हातात पैसा खेळता राहतो. लोक वस्तु व सेवांना मागणी करतात व यातुनच उत्पादन व इतर गोष्टींना चालना मिळते. यातुन रोजगारवृध्दी घडून येते.

दुसरीकडे देशाची मध्यवर्ती बँक आपल्या मौद्रीक साधनांद्वारे भाववाढ नियंत्रण व पैशाचे मूल्य स्थिर राहील याची दक्षता घेते. त्यासाठी भाववाढीच्या काळात मध्यवर्ती बँक CRR, SLR, रेपो, रिव्हर्स रेपो, बँक दर यांद्वारे पैशाचा पुरवठा संकुचीत करते. याउलट मंदीच्या काळात या साधनांद्वारे पैशाच्या पुरवठ्याचा विस्तार करते. कारण भाववाढ ही आर्थिक विकासाला मारक ठरते.

अशा प्रकारे सरकार आर्थिक विकासाची प्रक्रिया गतीमान करण्याच्या हेतूने वरील भूमिका पार पाडत असते.

## ४.३ सारांश :

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासामध्ये संसाधनांची भूमिका खूपच महत्वपूर्ण असते. यामध्ये भौतिक संसाधने व मानवी भांडवल यांचा अंतर्भाव होतो. या दोन्ही भांडवलांच्या गुणात्मकतेवर त्या देशाच्या आर्थिक विकासाची रुपरेषा ठरत असते. या सर्वांमध्ये भांडवल निर्मितीची प्रक्रिया देखील तितकीच महत्वपूर्ण असते. तंत्रज्ञानाची या सर्वांमधील भूमिका देखील महत्वपूर्ण असते. उद्योग, शेती, सेवा अशा सर्वच क्षेत्रांना आर्थिक विकास प्रक्रियेत आणण्याकरिता हे घटक महत्वपूर्ण ठरतात.

मानवी भांडवलाची गतीशीलता, शिक्षण, प्रशिक्षण यांमध्ये वाढ करुन त्याचा आर्थिक विकासामध्ये पुरेपुर वापर करणे गरजेचे असते. अलिकडील आधुनिक काळात परकीय थेट गुंतवणूक, परकीय संस्थात्मक गुंतवणूक यांची भूमिका देखील महत्वपूर्ण ठरत आहे.

आर्थिक विकास प्रक्रियेतील शासनाची भूमिका हा सर्वात महत्वपूर्ण घटक आहे. शेती, उद्योग, सेवा अशा विविध क्षेत्रांच्या विकासाकरिता लागणारी पायाभूत संरचना, सोयी-सुविधा यांची निर्मिती सरकार करते, रस्ते, रेल्वे, विमान, जल वाहतुक यांच्या सोयी, शिक्षण, प्रशिक्षण, तांत्रिक विकास, वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा विकास करणे, कायदा-शांतता, सुव्यवस्था यांमध्ये वाढ करणे या बाबींद्वारे सरकार विकासाला चालना देते.

## ४.४ पारिभाषिक शब्द :

* **भांडवल निर्मिती :** देशातील उत्पादन शक्तीचा काही भाग उपभोगासाठी न वापरता उत्पादन साधनांच्या निर्मितीसाठी वापरणे.
* **अंतर्गत स्त्रोत :** देशांतील संसाधने
* **बहिर्गत स्त्रोत :** परकीय साधने
* **चलन मूल्य :** पैशाचे मूल्य

## ४.५ स्वयंअध्ययनाचे प्रश्न :

१) मनुष्यनिर्मित उत्पादनाचा एक घटक म्हणजे ................. होय.

अ) भांडवल  ब) वनस्पती  क) हवा  ड) पाणी

२) आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत ............. ची गरज असते.

अ) साधनसामग्री  ब) सरकारी हस्तक्षेप  क) भांडवल  ड) वरील सर्व

३) .......... राष्ट्रांत भांडवलनिर्मितीचा दर अल्प असतो.

अ) विकसीत  ब) अल्पविकसीत  क) आशियायी  ड) यापैकी नाही

४) भांडवलनिर्मितीसाठी ................. ची आवश्यकता असते.

अ) उत्पादन  ब) बचत  क) तंत्रज्ञान  ड) वरील सर्व

## ४.६ स्वयंअध्ययनासाठीचा प्रश्नांची उत्तरे :

**१) - अ  २) - ड  ३) - ब  ४) - ड**

## ४.७ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) टीपा लिहा.**

१) भांडवल निर्मिती

२) आर्थिक विकास

३) मानवी भांडवल

४) विदेशी थेट गुंतवणूक

**ब) दिर्घोत्तरी प्रश्न**

१) आर्थिक विकास आणि भांडवल निर्मिती यांतील सहसंबंध स्पष्ट करा.

२) आर्थिक विकास प्रक्रियेतील मानवी भांडवलाची भुमिका स्पष्ट करा.

## ४.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :


१) Misra & Puri (2016) - Growth & Development, Himalaya Publishing House.

२) Jhlingan M.L. (2005) The Economics of Development & Planning Vrinda Publication Private Ltd., New

३) श्रीधर देशपांडे, विनायक देशपांडे - भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण आणि विकास)

४) विजय कवीमंडन - विकासाचे अर्थशास्त्र व नियोजन - श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर.

५) जे. एफ. पाटील - वृध्दी व विकासाचे अर्थशास्त्र - फडके प्रकाशन, कोल्हापूर.

६) सौ. मृणालिनी फडणवीस - विकासाचे अर्थशास्त्र व सिध्दांत, विद्या प्रकाशन, नागपूर

७) र. पु. कुरुलकर - विकासाचे अर्थशास्त्र व सिध्दांत - विद्या प्रकाशन, नागपूर

८) Jhingan M. L. J - "Advanced Economic Theory Vrinda Publication (R) Ltd., New Delhi.

९) Agrawal - R. C. Economic of Development & Planning Lakshmi Narain Agrwal, Agra.

१०) Dewett K. K. and Satish Wadhwan, "Economics of Growth & Development" S. Chand & Co., Ltd., New Delhi.

११) झामरे जी. एन. - भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र

१२) देशपांडे ज्योत्सना - विकासाचे अर्थशास्त्र, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी, नागपूर.


***

घटक १

# आर्थिक नियोजनाची ओळख

## Introduction to Economic Planning

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ आर्थिक नियोजनाचा अर्थ, आवश्यकता, आर्थिक नियोजनाविरूद्ध युक्तीवाद

१.२.२ नियोजनाचा उगम किंवा उत्पत्ती

१.२.३ आर्थिक नियोजनाचे प्रकार

१.२.४ नियोजनाच्या यशस्वीतेसाठी आवश्यक अटी

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द

१.५ स्वयं अध्ययन प्रश्न

१.६ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

### १.० उद्दिष्टे

आर्थिक नियोजन ही संकल्पना समजून घेण्यासाठी खालील बाबींचा अभ्यास करता येईल.

१. आर्थिक नियोजनाचा अर्थ, उद्दिष्टे, आवश्यकता, विरोधी युक्तीवाद समजून घेणे.

२. आर्थिक नियोजनाचे स्वरूप, नियोजनाची उत्पत्ती/उगम समजून घेणे.

३. आर्थिक नियोजनाचे प्रकार, नियोजन यशस्वीतेच्या अटी समजून घेणे.

## १.१ प्रास्ताविक

आधुनिक युग हे प्रामुख्याने नियोजनाचे युग आहे. नियोजन ही विस्तृत व व्यापक संज्ञा असून सद्य परिस्थितीमध्ये आर्थिक समस्या सोडविण्याचे एक प्रभावी साधन म्हणून दीपस्तंभासारखे काम करत आहे. प्लेटो या महान तत्ववेत्याने आपल्या प्रसिद्ध ''रिपब्लिक'' या ग्रंथात नियोजन या संकल्पनेचा उल्लेख केलेला दिसून येतो. त्या काळांपासून या संकल्पनेचा वापर सुरू झाला. पहिल्या महायुद्धानंतर सोव्हिएट रशियाने १९२८ साली स्टॅलीनच्या मार्गदर्शनाखाली, आर्थिक नियोजनाचा प्रत्यक्ष वापर पंचवार्षिक योजनेसाठी करून अल्पावधीत आर्थिक प्रगती घडवून आणली. याचा प्रभाव जगातील अनेक राष्ट्रांवर झाला सर्वच देशांनी आर्थिक घडी बसविण्यासाठी नियोजनाची संकल्पना वापरलेली दिसून येते. सर अलबर्ट वॉटसन यांच्या मते, देशाचे सार्वभौमत्व व आधुनिकता यांचे चिन्ह म्हणून राष्ट्रगीत व राष्ट्रध्वजाबरोबर राष्ट्रीय नियोजनाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. नियोजनाचा संबंध हा भविष्यकाळासाठी असतो जेव्हा एखादे उद्दिष्ट ठराविक वेळेमध्ये पूर्ण करण्यासाठी जे जाणीवपूर्वक आणि पद्धतशीर प्रयत्न केले जातात त्यांना नियोजन म्हणतात. प्रा. ख्रिस्तीएन स्कोनहेडस् यांनी त्यांच्या लिखानात नियोजन ही संकल्पना प्रथम वापरली तर प्रा. लेविस यांच्या 'Principles of Economics' या पुस्तकात नियोजनाची संकल्पना वेगवेगळ्या अर्थानी वापरली. सर्वसामान्यपणे सर्व प्रकारचा शासनाचा हस्तक्षेप म्हणजे नियोजन असे म्हटले जाते. परंतु नियोजनाचा असा अर्थ घेणे चुकीचे आहे कारण नियोजनाची उद्दिष्टे लक्षात घेतली तर प्रत्येक क्षेत्रात शासनाचा हस्तक्षेप असलेच असे नाही. या उलट एखाद्या क्षेत्रातील शासनाचा हस्तक्षेप म्हणजे नियोजन असेही म्हणता येत नाही. आर्थिक नियोजन या संकल्पनेने आधुनिक काळात राज्यकर्ते, अर्थशास्त्रज्ञ, विचारवंत व सर्वसामान्य लोकांचे लक्ष वेधून घेतले आहे. सर्वसामान्यावर याचा इतका प्रभाव पडला आहे की नियोजन हे साध्य नसून ते सर्व आर्थिक समस्या सोडविण्याचे महत्त्वाचे साधन म्हणून ओळखले जाते. हे आर्थिक धोरणाचे महत्त्वाचे अंग, प्रभावी साधन म्हणून लोकशाही राष्ट्रे, विकसीत व अविकसीत राष्ट्रे, भांडवलशाही व साम्यवाद राष्ट्रे यांनी कमी अधिक प्रमाणात स्वीकारले आहे. प्रा. रॉबिनसनच्या मते, ''सर्वच आर्थिक व्यवहारात नियोजनाची आवश्यकता असते''. आर्थिक नियोजनाची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी शासनाला दीर्घ कालावधीसाठी भविष्य कालावधीमध्ये जाणीवपूर्वक आणि पद्धतशीर प्रयत्नं करावे लागतात. त्यामुळे नियोजन ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे असे म्हणता येईल. 'आर्थिक नियोजन' आणि 'योजना' हा शब्द एकाच अर्थाने वापरला जातो. यामध्ये साम्य आहे. आर्थिक नियोजन ही एक शिस्त असून ती दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे तर आर्थिक योजना हा एक कार्यक्रम आहे. योजना म्हणजे निश्चीत कालावधीमध्ये किती व कोणते आर्थिक कार्यक्रम पार पाडावयाचे आहेत याचा आराखडा त्यामध्ये असतो तर नियोजनामध्ये अनेक योजना समाविष्ट असतात. म्हणजे योजना हा नियोजनाचा एक भाग आहे असे म्हणता येते.

## १.२ विषय विवेचन :

प्रस्तुत घटकात आर्थिक नियोजनाचा अर्थ, व्याख्या, प्रकार, नियोजनाची आवश्यकता, आर्थिक नियोजनाविरूद्ध युक्तीवाद, नियोजनाचा उगम किंवा उत्पत्ती, नियोजनाच्या यशस्वीतेसाठी पूर्व अटी यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

### १.२.१ आर्थिक नियोजनाचा अर्थ : (Meaning of Economc Planning)

आर्थिक नियोजनाच्या अर्थाविषयी, नियोजनाच्या स्वरूपाविषयी अर्थशास्त्रज्ञामध्ये फार मतभेद दिसून येतात. कारण नियोजनाविषयी एखादी सर्वमान्य व्याख्या करणे अत्यंत कठिण आहे किंवा तशी करताही येत नाही कारण संकल्पना स्पष्ट करताना अत्यंत संकुचित अर्थापासून अत्यंत व्यापक अर्थ सांगीतले जातात. वेगवेगळ्या अर्थशास्त्रज्ञांनी नियोजनाच्या व्याख्या वेगवेगळ्या दृष्टीकोनातून वेगवेगळ्या मुद्यांच्या आधारे केल्या आहेत. त्यामुळे आर्थिक साहित्यात आर्थिक नियोजन हा शब्द अत्यंत शिथीलपणे वापरला गेला आहे.

ब्रिटीश अर्थशास्त्रज्ञ फ्रेडरीच ऑगस्त हायेक (F. A. Hayek) यांच्या मते, 'समाजवाद व नियोजन ह्या दोन्ही संकल्पना एकाच अर्थाने वापरल्या जातात परंतू या दोन्हीमध्ये फरक आहे. मर्यादित समाजवाद व मोठ्या प्रमाणात नियोजन या उलट मोठ्या प्रमाणात समाजवाद व मर्यादित नियोजन असेही नियोजनाचे तंत्र वापरले जावू शकते. मॉरीस डॉब व आर. जी. हॉट्रे यांचेही असेच मत आहे. समाजवाद व नियोजन ह्या दोन्ही संकल्पना वेगवेगळ्या आहेत पण नियोजनाला मुक्त अर्थव्यवस्थेपेक्षा समाजवाद अधिक जवळचा आहे.

**आर्थिक नियोजनाच्या व्याख्या (Definitions)** :

नियोजनाच्या एकत्र मुद्देसूद व्याख्या करण्यामध्ये खालील अडचणी उद्‌भवतात.

**१. आर्थिक संस्थांची संरचना :**

प्रत्येक देशामध्ये आर्थिक संस्थांची संरचना भिन्न भिन्न असते. उत्पादन घटकांची मालकी कोणाकडे आहे याबाबत भिन्नता आहेत. साम्यवादी देशामध्ये उत्पादन घटकांची मालकी ही सरकारची असते. त्यामुळे आर्थिक व्यवहारांचे नियंत्रण नियोजन मंडळामार्फत अर्थात शासनाकडून केले जाते. याउलट भांडवलशाही देशामध्ये उत्पादन घटकांची मालकी ही खाजगी दिसून येते. त्या ठिकाणी नियोजनावर अवलंब कमीत कमी दिसून येतो. तर भारताने ही संमिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केलेला दिसून येतो.

देशातील उत्पादन साधनसामग्रीची मालकी कोणाकडे आहे यावरून नियोजनाचे स्वरूप व आशय यामध्ये बदल झालेला दिसून येतो. थोडक्यात समाजवाद, साम्यवाद, भांडवलशाही या अर्थव्यवस्थेमध्ये नियोजनाचा ज्या पद्धतीने अवलंब केला जातो त्यावरून नियोजनाचे अर्थ लावला जातो. त्यामुळे त्यांच्या व्याख्येमध्ये मतभेद दिसून येतात.

**२. विकासाची पातळी :**

देशातील दरडोई उत्पन्न व गुंतवणूक-उत्पन्न यावरून तो देश विकसीत आहे, विकसनशील आहे की गरीब आहे हे ठरविले जाते. ज्या देशामध्ये उत्पन्नाची पातळी कमी असते अशा देशामध्ये सुरूवातीला विकासाची गती प्राप्त करण्यासाठी मूलभूत पायाभूत सुविधा यामध्ये रस्ते, वीज, पाणी, वाहतूक व दळणवळण यांच्या गुंतवणूकीला प्राधान्य दिले जाते. याउलट विकसीत देशामध्ये गुंतवणूकीला कमी महत्त्व असते तर उपभोग्य पातळीत व तंत्रज्ञान क्षेत्रात अधिक प्रगती साधणे यावर भर दिला जातो. विकासाची उद्दिष्टे काय आहेत यावरून व्याख्येमध्ये सुद्धा मतभिन्नता दिसून येते.

### ३. साहित्य व व्यवहार :

नियोजनाची संकल्पना बौद्धिक व व्यावहारिक पातळीवर अस्तीत्वात आलेली कल्पना आहे. नियोजनाची उद्दिष्टे, तंत्रपद्धती, व्याप्ती यांच्यामध्ये फरक पडल्यामुळे नियोजनाच्या प्रकारामध्ये सुध्दा फरक पडलेला दिसून येतो. रशियाने १९२९ मध्ये नियोजनाचा अवलंब केल्यानंतर अनेक विचारवंतानी त्यावर टीका केली होती. एफ. ए. हायेक यांनी हा ''गुलामगिरीचा रस्ता'' आहे अशा शब्दात नियोजनाचा समाचार घेतला तर कार्ल मार्क्स यांनी आपल्या लिखानात भांडवलशाही मधील दोषांच्या संदर्भात विवेचन केले.

**व्याख्या :**

१. डिकिन्सन यांच्या मते, ''एखाद्या निश्चीत सत्तेद्वारे विचारपूर्वक संपूर्ण अर्थव्यवस्थेचा अभ्यास करून कोणत्या वस्तूचे किती, कसे, केव्हा उत्पादन करावयाचे, उत्पादनाचे वाटप कसे व कोणामध्ये करावयाचे याबाबत घेतले जाणारे निर्णय म्हणजे आर्थिक नियोजन होय.''

२. प्रा. रॉबीन्सन यांच्या मते, ''महत्तम कल्याणकारी राज्याचे उद्दिष्ट साध्य करण्याचे एक साधन म्हणजे आर्थिक नियोजन होय.''

३. मिसेस बार्बरा वूटन यांच्या मते, ''आर्थिक विकासाच्या संदर्भात आर्थिक अग्रक्रमाची हेतूपुरस्कर व नियोजनबध्द केलेली निवड होय.''

४. प्रा. हर्मन लेव्ही यांच्या मते, ''मागणी पुरवठ्यामधील संतुलन, स्वयंप्रेरीत, अदृश्य हा नियंत्रण बाह्य घटकाद्वारे साध्य होऊ देण्याऐवजी उत्पादन किंवा विभाजन अथवा दोन्हीचे जाणीवपूर्वक नियंत्रण करून साध्य होऊ देणे म्हणजे आर्थिक नियोजन होय.''

५. भारतीय नियोजन मंडळाच्या मते, ''देशातील संसाधनाचा पूर्व नियोजीत सामाजिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी संघटीत करून त्यांचा महत्तम लाभदायक उपयोग करण्याच्या दृष्टीने स्विकारलेली पद्धत म्हणजे आर्थिक नियोजन होय.''

६. प्रा. हायेक यांच्या मते, ''मध्यवर्ती सत्तेने अर्थव्यवस्थेतील उत्पादन प्रक्रियेला दिशा देणे.''

७. डॉ. डाल्टन यांच्या मते, ''पूर्व नियोजीत उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी आर्थिक क्रियांना राष्ट्रातील विपूल संसाधनावर अधिकार असणाऱ्या व्यक्तीनी जाणीवपूर्वक दिशा देण्याच्या व्यापक प्रक्रियेला आर्थिक नियोजन म्हणतात.''

८. लॉरविन यांच्या मते, ''अशी आर्थिक संघटना होय की ज्यामध्ये वेगवेगळ्या औद्योगिक संस्थांना एका समन्वीत एककाच्या स्वरूपात संचलीत करण्यात येते आणि ज्याच्या सहाय्याने विशिष्ठ काळामध्ये लोकांच्या जीवनामध्ये सुधारणा घडवून आणण्याकरीता उपलब्ध साधनांचा पर्याप्त वापर केला जातो त्याला आर्थिक नियोजन म्हणतात.''

९. एफ. इवीग यांच्या मते ''नियोजन हे शहराचे सार्वजनीक कामाचे किंवा राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेच्या वेगवेगळ्या विभागाचे फक्त नसते तर ते संपूर्ण अर्थव्यवस्थेचे असते.''

१०.ऑस्कर लॉज, ''समाजासमोरील आर्थिक नियमांची वागणूक व समाजाच्या आर्थिक प्रगतीच्या दिशा मानवी इच्छेनुसार ठरविणे म्हणजे नियोजन होय.''

वरील व्याख्यांचा अभ्यास करता आर्थिक नियोजनाची वैशिष्ट्ये खालील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

**आर्थिक नियोजनाची वैशिष्टे :**

१. आर्थिक नियोजनामध्ये योजना करणे, योजनेची अंमलबजावणी करणे त्याचे मुल्यमापन करणे या तिन्ही गोष्टींचा अंतर्भाव असतो.

२. वरील तिन्ही कार्य करण्याकरीता आर्थिक नियोजनासाठी केंद्रीय सत्ता आवश्यक असते.

३. आर्थिक नियोजन ही चिरंतर चालणारी प्रक्रिया आहे.

४. एकत्रित व सामुहीक स्वरूपाचे प्रयत्न आर्थिक नियोजनासाठी आवश्यक असतात.

५. आर्थिक नियोजनाची उद्दिष्टे आर्थिक सामाजिक व राजकीय स्वरूपाची असतात.

६. आर्थिक विकासाची गती वाढविणे हे आर्थिक नियोजनाचे उद्दिष्ट असते.

७. आर्थिक नियोजनामध्ये सरकारला हस्तक्षेप करावा लागतो.

८. आर्थिक नियोजनासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात.

९. आर्थिक नियोजनामध्ये विशिष्ट कालावधी निश्चीत केला जातो. या टप्प्यामध्ये विशिष्ट उद्दिष्टे साध्य केली जातात.

१०.आर्थिक नियोजनामध्ये ठरविलेली उद्दिष्टे व ती गाठण्यासाठी ठरविलेली साधने हाच प्रत्येक योजनेचा मुलभूत ढाचा असतो.

**आर्थिक नियोजनाची उद्दिष्टे :**

आर्थिक नियोजनाचा अर्थ असा आहे की अपेक्षित उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या साधनसंपत्तीचे योग्य संघटन व पर्याप्त वापर करणे होय. प्रा. जॉन इ. इलियट यांच्या मतानुसार नियोजनाची कृती ही हेतूपुर्वक असते. हेतू किंवा उद्दिष्टाशिवाय नियोजन पूर्ण होत नाही. आर्थिक नियोजन हे साध्य नसून ते सामाजिक आर्थिक राजकीय उद्दिष्टे पूर्ण करण्याचे महत्त्वाचे साधन आहे. त्यामुळे नियोजनाच्या उद्दिष्टांचे वर्गीकरण खालील तीन गटात करता येईल.

**अ) आर्थिक उद्दिष्टे :**

१. संतुलित विकास करणे.

२. जलद औद्योगिक विकास करणे.

३. पूर्ण रोजगार निर्माण करणे.

४. आर्थिक सुरक्षितता उपलब्ध करून घेणे.

५. युद्धपश्चात अर्थव्यवस्थेची पुर्नरचना करणे.

६. आर्थिक स्थैर्य निर्माण करणे.

७. आर्थिक समानता प्रस्थापित करणे.

८. देशाला आत्मनिर्भर बनविणे.

९. प्रादेशिक असमतोल दूर करणे.

१०. लोकांच्या राहणीमानात वाढ घडवून आणणे.

**ब) सामाजिक उद्दिष्टे :**

१. सामाजिक समता प्रस्थापित करणे.

२. सामाजीक सुरक्षितता निर्माण करणे.

३. सामाजिक न्याय प्रस्थापित करणे.

४. सामाजिक समतोल प्रस्थापित करणे.

५. सर्वांना समान संधी उपलब्ध करून देणे.

**क) राजकीय उद्दिष्टे :**

१. अंतर्गत शांतता व सुरक्षितता टिकवून ठेवणे.

२. राजकीय स्थैर्य निर्माण करणे.

३. साधनसंपत्तीवर नियंत्रण ठेवणे.

४. राजकीय सार्वभौमत्व टिकविणे.

**आर्थिक नियोजनाची आवश्यकता :**

आर्थिक नियोजन हे केवळ तत्वज्ञान नसून ते जलद अर्थिक विकास घडवून आणणारे एक आधुनिक प्रभावी साधन व विश्वसनीय तंत्र म्हणून उदयास आले. या तंत्राचा वापर करून ठरविलेली उद्दिष्टे साध्य करून जलद अर्थिक विकास करता येतो. याबाबत जगातील कोणत्याही देशाचे दुमत असण्याचे कारण नाही. त्यांचे महत्त्व सर्व देशांना पटलेले असून भांडवलशाही स्वीकारलेल्या देशांना ज्या गोष्टी साध्य करण्यासाठी बराच कालावधी लागला. त्या गोष्टी नियोजनाद्वारे अगदी कमी कालावधीमध्ये रशियासारख्या देशांनी साध्य करून दाखविल्या. हे

पाहून विकसीत देशाबरोबर अविकसीत राष्ट्रे प्रभावीत झाली. अर्थव्यवस्थेतील समस्या सोडविण्यासाठी ठरावीक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी अर्थिक नियोजनाशिवाय पर्याय नाही त्यामुळे नियोजनाची आवश्यकता भासते.

### १. मुक्त अर्थव्यवस्थेचे दोष दूर करणे :

मुक्त किंवा अनियोजित अर्थव्यवस्थेला भांडवलशाही अर्थव्यवस्था असेही म्हणतात. मुक्त अर्थव्यवस्थेमध्ये उत्पादकांना आपले आर्थिक व्यवहार करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असते. नियोजनाचा अभाव असल्याने या व्यवस्थेत आर्थिक विषमता, कामगाराचे शोषण, ग्राहकाचे शोषण, असमतोल आर्थिक विकास, दारिद्र्य, प्रादेशिक असमतोल, व्यापारचक्राची निर्मिती यासारखे प्रश्न निर्माण होतात. मुक्त अर्थव्यवस्थेचा आणखी एक प्रमुख दोष म्हणजे अर्थव्यवस्थेमध्ये ज्या महत्त्वाच्या घटकावर नियंत्रण असायला हवे ते घटक बाजार यंत्रणेच्या स्वाधीन असतात. त्याचे वाईट परिणाम अनेक देशावर झाले. सन १९२९-३४ च्या जागतिक मंदीने अमेरिका व ब्रिटन हे भांडवलशाही देश हादरून गेले. परंतू याच काळात साम्यवादी देशामध्ये कोणतेच प्रतिकूल परिणाम घडून आले नाहीत. त्याचे श्रेय नियोजन या घटकाला मिळते. आर्थिक नियोजनाच्या माध्यमातून उत्पादन, उपभोग, विनीमय, वितरण यावर नियंत्रण ठेवले जाऊन अर्थव्यवस्थेतील असमतोल दूर करण्यास मदत होते. यासारखे निर्माण झालेले दोष दूर करण्यासाठी आर्थिक नियोजनाची गरज भासते.

### २. व्यापार चक्रावर नियंत्रण :

भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये व्यापारचक्राची निर्मिती होत असते. उद्योजक महत्तम नफा मिळविण्याच्या हेतूने उत्पादन उत्पादित करत असतात. बाजारयंत्रणेच्या ताब्यात असणारी अर्थव्यवस्था, मागणी व पुरवठ्यामधील असंतुलन, महत्तम नफ्याची प्रेरणा या घटकातील बदलामुळे अर्थव्यवस्थेमध्ये असंतुलन निर्माण होते व तेजी-मंदीचे व्यापारचक्र निर्माण होऊन आर्थिक विकासामध्ये अडथळे निर्माण होतात. व्यापारातील हे दुष्परिणाम टाळण्यासाठी आर्थिक नियोजनाची गरज भासते. सन १९२९ मध्ये निर्माण झालेल्या जागतिक मंदीमुळे इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका या संपन्न राष्ट्रांना जोरदार हादरे बसले. परंतू नियोजनाचा मार्ग अवलंबलेल्या सोव्हिएट रशियाच्या अर्थकारणावर त्याचा मुळीच परिणाम दिसून आला नाही. योजनाबद्ध रितीने राष्ट्रीय नियोजनाचा व्यापक प्रमाणावर अंगीकार करून व्यापारचक्रावर नियंत्रण ठेवून या दुष्टचक्रातून बाहेर पडता येते हे दाखवून दिले.

### ३. आवश्यकतेनुसार उत्पादन व किंमत स्थैर्य :

अनियोजित अर्थव्यवस्थेमध्ये उत्पादन विषयीचे सर्व निर्णय उद्योजक घेत असतात. व्यक्तिगत नफा मिळविणे ही उद्योजकाची एकमेव प्रेरणा असते. हा हेतू ठेवून गुंतवणूक केली जाते. समाजाची गरज आणि बाजारपेठेमध्ये असलेली परिस्थीती याकडे दुर्लक्ष केल्यामुळे काही वस्तूचे उत्पादन मागणीपेक्षा जास्त होते तर काही वस्तूचे उत्पादन मागणी पेक्षा कमी होऊन वस्तूंच्या किंमतीत अस्थैर्य निर्माण होते. याउलट नियोजित अर्थव्यवस्थेत उत्पादनाबाबतचे निर्णय केंद्रीय सत्तेद्वारे घेतले जातात. त्यामध्ये समाजाची गरज किंवा ग्राहकाची मागणी विचारात घेऊन सर्व निर्णय घेण्यात येत असल्यामुळे मागणी व पुरवठ्याबाबत संतूलन निर्माण करून किंमत पातळीत स्थैर्य निर्माण होण्यास मदत होते ही स्थिरता निर्माण होण्यासाठी नियोजन हे महत्त्वाची भूमिका बजावते.

### ४. दूरदृष्टी :

अनियोजित अर्थव्यवस्थेत दुरदृष्टीचा अभाव आढळून येतो त्यांच्या व्यक्तिगत स्वार्थापोटी अल्प कालावधीमध्ये घेतलेले निर्णय दीर्घकालावधीसाठी संपूर्ण अर्थव्यवस्थेला घातक ठरू शकतात. उदा. अल्पकालीन लाभ पाहून भूमीमध्ये एकच प्रकारचे पीक सतत घेतले जाते. त्यामुळे जमिनीची उत्पादकता कमी होते. मात्र जर भूमीची उत्पादकता टिकवायची असेल तर पिक पालट (Rotation of crops) केले तर जमिनीची उत्पादकता वाढू शकते. या सर्व गोष्टी आर्थिक नियोजनाद्वारे आपल्याला दूरदृष्टीने समजू शकतात. त्यासाठी आर्थिक नियोजन महत्त्वपूर्ण आहे.

### ५. रोजगार संधी निर्माण करणे :

अविकसीत देशामध्ये बेरोजगाराची संख्या मोठी असते. त्यांना रोजगार मिळवून देणे ही सरकारची जबाबदारी असते. रोजगार संधीत वाढ करण्यासाठी देशातील खाजगी क्षेत्र व सार्वजनिक क्षेत्रात आर्थिक नियोजन राबविणे आवश्यक असते. रोजगार निर्मिती झाली म्हणजे लोकांची क्रयशक्ती वाढते, क्रयशक्तीमुळे मागणी वाढते, मागणीमुळे उत्पादन वाढते. पुन्हा रोजगार निर्मिती होऊन आर्थिक विकास होतो. ही प्रक्रिया राबविण्यासाठी आर्थिक नियोजन अपरिहार्य ठरते.

### ६. साधन संपत्तीचा योग्य उपयोग :

भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये व्यक्तिगत नफा मिळविणे ही उद्योजकाची प्रेरणा असते. त्यामुळे देशातील नैसर्गिक, मानवी व वित्तीय साधन सामग्रीचा पर्याप्त वापर केला जात नाही. तिथे स्पर्धा, महत्तम नफा या कारणामुळे साधन संपत्तीचा दुरूपयोग होतो. हा टाळण्यासाठी आर्थिक नियोजनाची भूमिका महत्त्वाची ठरते. आर्थिक नियोजनामुळे व्यक्ती स्वार्थाला बाजूला ठेवून दूरदृष्टीचा विचार करून सर्व निर्णय घेतले जातात. त्यामुळे देशातील दुर्मिळ नैसर्गिक सामग्रीचा काळजीपूर्वक व पर्याप्त वापर होतो. यासाठी आर्थिक नियोजन महत्त्वाचे ठरते.

### ७. मुलभूत पायाभूत सुविधांचा विकास करणे :

आर्थिक विकासासाठी मुलभूत व पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी मोठी गुंतवणूक करणे गरजेचे असते. रस्ते, वाहतूक, रेल्वेमार्ग, पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण या क्षेत्रामध्ये गुंतवणूक करण्यास खाजगी उद्योजक तयार नसतात. यासाठी सरकारला पुढाकार घेऊन लोखंड, पोलाद व इतर उद्योगामध्ये मोठी गुंतवणूक करावी लागते. आर्थिक विकासाच्या दृष्टीकोनातून ही गुंतवणूक फार महत्त्वाची असते.

### ८. लोककल्याण साध्य करण्यासाठी :

देशातील लोकांचे जास्तीत जास्त कल्याण साध्य करण्यासाठी आर्थिक नियोजनाचा कार्यक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावित असतो. समाजातील सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटक व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांच्या विकासासाठी नियोजनाचा मार्ग महत्त्वपूर्ण व गरजेचा असतो. आर्थिक नियोजनाचा आणि नियंत्रित घटकांचा वापर करून देशातील लोकांसाठी कल्याणकारी योजना राबविणे आणि विकासाचे फायदे समाजातील सर्व घटकांपर्यंत

पोहचविण्यासाठी नियोजनाची सुरूवात करणे अत्यंत महत्त्वपूर्ण व गरजेचे असते.

**९. अर्थव्यवस्थेतील मूलभूत व आर्थिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण प्रश्न सोडविण्यासाठी :**

देशातील उपलब्ध साधनसंपत्तीचा पुरेपूर वापर होतो की नाही आणि जर तो होत नसेल तर त्याचा वापर कसा व कोणत्या क्षेत्रासाठी करता येईल व जास्तीत जास्त फायदा कसा मिळविता येईल. या मिळालेल्या फायद्यातून आर्थिक प्रश्न कसे सोडविता येतील या सर्व बाबींचा विचार आर्थिक नियोजनाद्वारे होऊ शकतो. देशामध्ये कोणत्या वस्तूंचे किती प्रमाणात, केव्हा व कुठे आणि कशा पद्धतीने उत्पादन करावे व त्यासाठी कोणत्या उत्पादन तंत्राचा वापर करावा व उत्पादनाचे वाटप कसे करावे व कोणाकोणामध्ये करावे व उत्पादकता व श्रमीकांची क्षमता वाढते का आणि ती वाढविण्यासाठी कोणत्या पद्धतीच्या उपाययोजना कराव्यात इत्यादी मूलभूत व आर्थिक प्रश्नांची सोडवणूक योग्यरित्या करण्यासाठी आर्थिक नियोजन हा घटक महत्त्वपूर्ण असतो.

**१०. भांडवल संचय वाढविण्यासाठी :**

गरीब देशातील निकृष्ट राष्ट्रीय उत्पन्न, बचत व गुंतवणूक यामध्ये जाणीवपूर्वक वाढ घडवून आणण्यासाठी, भांडवल निर्मितीचा वेग वाढविण्यासाठी आर्थिक नियोजनाशिवाय तरणोपाय नाही. कारण भांडवल निर्मितीच्या दरावर आर्थिक विकास अवलंबून असतो. दारिद्र्यामुळे गरीब देशातील लोकांचे उत्पन्न कमी असते, उत्पन्न कमी म्हणून बचत कमी, त्यामुळे भांडवल संचय कमी म्हणून गुंतवणूक कमी. भांडवल गुंतवणूक कमी त्यामुळे उत्पादन कमी म्हणून उत्पन्न कमी त्याचा परिणाम बचत व भांडवल गुंतवणूक कमी हे दारिद्र्याचे दुष्टचक्र भेदण्यासाठी विदेशातून भांडवलाची आयात करून किंवा अंतर्गत सक्तीचा बचतीचा मार्ग अवलंबून भांडवल निर्मितीचा वेग वाढवून विकास साध्य करणे यासाठी आर्थिक नियोजनाची गरज असते.

**११. संतुलित आर्थिक विकास करणे :**

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये संतुलित प्रादेशिक विकास होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. भारतामध्ये काही राज्ये ही आर्थिकदृष्ट्या प्रगत आहेत तर काही राज्ये मागासलेली आहेत. दरडोई उत्पन्नाचा निकष पाहता महाराष्ट्र, पंजाब, केरळ, हरियाणा, गुजरात ही राज्ये इतर राज्याच्या तुलनेत प्रगत आहेत तर झारखंड, ओरिसा, मध्यप्रदेश, बिहार ही राज्ये मागासलेली आहेत. हा प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी आर्थिक नियोजनाच्या सहाय्याने शेती, उद्योग, व्यापार, वाहतूक, सिंचन क्षेत्राचा जाणीवपूर्वक प्रयत्न करून संतुलित विकास साध्य करता येतो. याकामी आर्थिक नियोजन ही महत्त्वाची भूमिका पार पाडते.

**१२. तांत्रिक ज्ञानाच्या विकासासाठी :**

देशामध्ये आधुनिक उद्योगाचा विकास होण्यासाठी तंत्रवैज्ञानिक ज्ञानाची गरज असते. अविकसीत देश तांत्रीक ज्ञानाच्या दृष्टीकोनातून मागासलेले असतात. शेती उद्योग, व्यापार, दळणवळण, बांधकाम इ. क्षेत्रामध्ये या देशामध्ये तांत्रिक कौशल्याचा अभाव दिसून येतो. अशावेळी नियोजनाद्वारे सरकारला योजनाबद्ध प्रयत्नातून देशाअंतर्गत तांत्रिक शिक्षणाच्या सोई निर्माण करण्याबरोबर परदेशातून तंत्रज्ञानाची आयात करणे शक्य होऊन आर्थिक विकास साध्य करता येतो.

**१३. पिळवणूक प्रक्रियेला पायबंद :**

अनियोजीत अर्थव्यवस्थेमध्ये सर्व प्रकारच्या उत्पादक साधनावर मूठभर लोकांची मालकी असते. उत्पादक साधनाची मालकी ज्याच्याकडे आहे अशा व्यक्ती इतरांची पिळवणूक करीत असतात. कारखानदार कामगारांची, सधन शेतकरी शेतमजूराची, व्यापारी ग्राहकांची पिळवणूक करतात. समाजामधील दुर्बल, वंचित, असंघटित वर्गाची पिळवणूक सतत सुरू असते. याला निर्बंध घालवण्यासाठी नियोजनाची गरज भासते. नियोजनाच्या माध्यमातून सहकारी क्षेत्राचा विकास, मक्तेदारी प्रतिबंधक कायदा, किमान वेतन, कामाचे तास यांबाबतचे कायदे करून दुर्बल घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला जातो.

**१४. गळे कापू स्पर्धेचे उच्चाटन :**

अनियोजित अर्थव्यवस्थेमध्ये घेतले जाणारे महत्त्वाचे आर्थिक निर्णय हे बाजारपेठेमधील स्पर्धेची परिस्थिती लक्षात घेऊन घेतले जातात. कारखानदारांमध्ये स्पर्धेची तिव्रता वाढून गळेकापू स्पर्धा निर्माण होते. त्यामध्ये कमकुवत कारखानदारांची आहुती पडते. एकाच कारखानदाराची मक्तेदारी निर्माण होऊन ग्राहकांचे प्रचंड नुकसान होते. अशा शक्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आर्थिक नियोजनाची आवश्यकता भासते. नियोजनाद्वारे मागणी पुरवठ्यावर नियंत्रण ठेऊन ग्राहकांच्या हितसंबंधाना संरक्षण मिळते. दुर्बल घटकांना अर्थसहाय्य व न्याय मिळतो. अशा रीतीने कौशल्यपूर्ण नियोजन तंत्राचा अवलंब केल्याने बाजारपेठेमधून गळेकापू स्पर्धेचे उच्चाटन होते.

**१५. ऐदी वर्गाचा शेवट :**

प्रत्येक देशामध्ये शारीरिक अथवा बौद्धिक परिश्रम न करता इतर लोकांचे शोषण करून चैनीचे जीवन जगणारा एक वर्ग समाजात अस्तित्वात होता. समाजातील घटकांचे शोषण करून बांडगुळासारखा ऐषआरामी जीवन जगणाऱ्या वर्गाचे वैभव वाढत होते. तर दुसऱ्या बाजूला काबाडकष्ट करणारा वर्ग हालाखीचे जीवन जगत होता. नियोजनामुळे कुळ कायदे, सावकार उच्चाटन कायदे यशस्वी राबविल्यामुळे श्रमजीवी, कामगार, शेतकरी या वर्गाला आर्थिक व सामाजिक सुरक्षितता प्राप्त झाली. जमीनदार, सावकार यासारख्या ऐदी जीवन जगणाऱ्या वर्गाचा शेवट झाला.

भारताचा विकास हा नियोजनाच्या मार्गानेच होवू शकतो हे सर्वमान्य झाले असून ही सर्व प्रकारचा मागासलेपणा दूर करण्यासाठी सुरू केलेली व्यापक चळवळ आहे. भारताचे माजी अर्थमंत्री श्री. टी. टी. कृष्णमाचारी यांच्या मते, अध्यात्मिक क्षेत्रात परमेश्वराला जे महत्त्व आहे तेच आर्थिक क्षेत्रात नियोजनाला आहे. सर विश्वेश्वरयाच्या यांनी ''नियोजन करा अथवा नष्ट व्हा'' असा संदेश भारत वासियांना दिला.

**आर्थिक नियोजनविरोधी युक्तिवाद :**

अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी नियोजन आवश्यक असले तरी अनियोजित अर्थव्यवस्थेचा देखील विकास होतो. आर्थिक नियोजनविरोधी युक्तीवाद पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट केला आहे.

### १. अंमलबजावणीतील समस्या :

अंमलबजावणीतील समस्या हा नियोजित अर्थव्यवस्थेविरोधी मांडला जाणारा महत्त्वाचा मुद्दा आहे. एखाद्या अर्थव्यवस्थेचे नियोजन करणे हे तितकेसे सुलभ नसते. त्याचबरोबर नियोजन केलेल्या विविध घटकांची अंमलबजावणी करण्यामध्ये अनेक समस्या निर्माण होतात. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे नियोजनाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असणारी सांख्यिकीय माहिती ही अद्ययावत, पर्याप्त व पुरेशी नसते. त्यामुळे नियोजनाच्या अंमलबजावणीमध्ये अनेक समस्या निर्माण होताना दिसून येतात. याउलट अनियोजित अर्थव्यवस्थेत संयोजक आपल्या अंगभूत सामर्थ्यानुसार लाभ वा हानीची जोखीम पत्करण्यास तयार असतो. त्यामुळे अनियोजित अर्थव्यवस्था नैसर्गिक पद्धतीने विकसित होण्यास मदत होते. नियोजित अर्थव्यवस्थेत नियोजन करण्याची एखादी चूक संपूर्ण अर्थव्यवस्थेला संकटात घेवून जाऊ शकते. नियोजित अर्थव्यवस्थेसाठी कुशल कामगार व प्रशिक्षित कर्मचाऱ्याची आवश्यकता भासते. परंतु अविकसीत आणि मागसलेल्या देशांमध्ये कुशल कामगार व प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध होणे अवघड बाब आहे.

### २. लाल फितीचा धोका :

नियोजित अर्थव्यवस्थेत लाल फितीचा वा नोकरशाहीचा धोका मोठ्या प्रमाणात असतो. नियोजनाच्या अंमलबजावणीमध्ये नोकरशाहीची भूमिका महत्त्वाची असते. त्यातूनच दफ्तर-दिरंगाई, अकार्यक्षमता, लाचलुचपत इत्यादी वाढत जाते. नियोजनाच्या व्यवस्थापणामध्ये मोठ्या प्रमाणात अकार्यक्षमता वाढते. अर्थव्यवस्थेतील विविध घटकांच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या कोणतेही ठोस कारण नसताना अडकवून ठेवल्या जातात. थोडक्यात, अविकसीत व मागासलेल्या देशांमध्ये नियोजनाचा अवलंब करावयाचा असेल तर नोकरशाहीवरती वचक असणारे सरकार अस्तित्वात असणे गरजेचे असते. परंतु असे सरकार अभावानेच आढळते.

### ३. आर्थिक स्वातंत्र्याचा संकोच :

नियोजनाच्या यशस्वीतेसाठी कठोर नियंत्रणे व कडक शिस्त यांचा अवलंब करणे आवश्यक असते. सरकारच्या अशा नियंत्रणामुळे आर्थिक स्वातंत्र्याचा संकोच होतो असे आर्थिक नियोजनविरोधी बाजू मांडताना म्हटले जाते. नियोजित अर्थव्यवस्थेमध्ये पूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य राहत नाही. त्यामुळे व्यक्ती स्वातंत्र्याची व उपभोक्त्यांच्या सार्वभौम शक्तीची गळचेपी होते. नियोजित अर्थव्यवस्थेत व्यक्ती स्वातंत्र्याला मर्यादा पडत असल्याने व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य देखील धोक्यात येते. थोडक्यात सरकारच्या कठोर नियंत्रणामुळे नियोजन हे गुलामगीरीकडे नेणारा मार्ग आहे असे म्हटले जाते.

### ४. कष्टकऱ्यांना मोबदला नाही :

नियोजित अर्थव्यवस्थेविरोधी मांडला जाणारा आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कष्टकरी किंवा श्रमीकांनी उत्पादनात वाढ घडवून आणली तरी यांना कोणत्याही प्रकारचा अधिकचा मोबदला किंवा प्रलोबन नसते. कारण नियोजित अर्थव्यवस्थेमध्ये प्रामुख्याने काम करणारे हे सरकारी नोकर असतात आणि त्यांना नियमित ठराविक वेतन मिळत असते. उत्पादनातील वाढीचा लाभ हा कामगारांना मिळत नाही. उलट कामगारांना कमी वेतनाबरोबरच

कोणत्याही शासकीय सुविधा दिल्या जात नाहीत. खाजगी क्षेत्रामध्ये कार्यक्षमपणे काम करणाऱ्यांना अधिकचा आर्थिक मोबदला दिला जात नाही. त्यामुळे नियोजित अर्थव्यवस्थेत कार्यक्षमपणे काम करणाऱ्या कामगारांच्या कार्यक्षमतेवर अनिष्ट परिणाम होतो.

**५. नियोजन आखणी अवघड :**

नियोजनाची आखणी करणे हे अवघड काम आहे त्याचबरोबर भारतासारख्या मोठ्या अर्थव्यवस्थाचे नियोजन आखणी करणे आणि त्याची अंमलबजावणी करणे हे काम खूपच अवघड आहे. सर्व स्तरातील लोकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे हे नियोजनाचे उद्दिष्ट असते. परंतु या सर्वांच्यासाठी विकासाभिमुख नियोजन आखणी करणे सुलभ नसते. उदा. मोठे धरण बांधावयाचे असेल तर विस्थापित होणाऱ्या लोकांचा प्रश्न निर्माण होतो. अशा प्रकारे विविध विकास उपक्रम राबविताना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. थोडक्यात नियोजन आखणी करणे हे वाटते तितके सुलभ नसते.

**६. सरकारी नियंत्रणे :**

सामान्यपणे नियोजित अर्थव्यवस्थेत सरकारी नियंत्रणे अधिक असतात. सरकारकडून निर्णय घेतले जातात आणि त्याची अंमलबजावणी केली जाते. त्यामुळे पोषक समाजनिर्मिती होण्यास मर्यादा येतात. प्रा. हायेक यांच्या मते, केंद्रीय नियोजन व्यवस्था ही गुलामगिरीला प्रोत्साहन देत असते. त्यातून व्यक्तीच्या आर्थिक स्वातंत्र्याचा संकोच होतो. केंद्रीभूत नियोजन व्यवस्थेमुळे सरकारच्या नियंत्रणामध्ये वाढ होवून किंमत यंत्रणेवरती अनिष्ठ परिणाम होतात.

**७. स्वयंचलिततेचा अभाव :**

नियोजित अर्थव्यवस्थे विरोधात मांडला जाणारा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे स्वयंचलिततेचा अभाव होय. नियोजित अर्थव्यवस्थेत आर्थिक बदल हे घडवून आणले जातात. त्यामुळे किंमत यंत्रणा प्रभावीपणे काम करू शकत नाही. नियोजनामुळे आर्थिक बदलातील सरकारचा हस्तक्षेप वाढल्यामुळे स्वयंचलिततेचा अभाव दिसून येतो. अनेक अर्थशास्त्रज्ञांच्या मते, बाजारातील मागणी व पुरवठ्यानुसार उत्पादन होण्याऐवजी सरकारच्या नियोजनाच्या अनुषंगाने उत्पादन घेतले जाते. यामुळे अर्थव्यवस्थेवरती प्रतिकूल परिणाम दिसून येतात.

**८. नियोजनावरील वाढता खर्च :**

नियोजन ही बाब प्रचंड खर्चीक व वेळखाऊ असून श्रम, पैसा व वेळ यांचा अपव्यय आहे असे मत नियोजन विरोधी मुद्दा मांडताना म्हटले जाते. नियोजनाच्या अंमलबजावणीसाठी मोठ्या प्रमाणात कर्मचारी लागतात. याशिवाय प्रत्येक विभागानुसार अधिकारी व कर्मचारी नियुक्त करावे लागतात. यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च होतो. याउलट, अनियोजित अर्थव्यवस्थेत किंमत यंत्रणेचा आधारावर आचारलेली असून तिचे कार्य आपोआप घडून येते. थोडक्यात नियोजित अर्थव्यवस्थेमध्ये नियोजनावरील खर्च वाढत जात असतो तर अनियोजित अर्थव्यवस्थेत हा खर्च नसतो.

### १.२.२ नियोजनाचा उगम / उत्पत्ती (Genesis of Planning)

नियोजनाची संकल्पना सुमारे २४०० वर्षाइतकी जुनी कल्पना आहे. महान तत्ववेता प्लेटो यांच्या ''रिपब्लिक'' या प्रसिद्ध ग्रंथामध्ये नियोजन या संकल्पनेचा उल्लेख केलेला आढळून येतो. नंतरच्या कालावधीमध्ये अनेक लेखक व विचारवंतांनी ही संकल्पना विकसीत केलेली दिसून येते.

ज्या पद्धतीने आज नियोजनाचा अर्थ समजला जातो किंवा नियोजनाची संकल्पना ज्या अर्थाने आज वापरली जाते ती तुलनात्मकदृष्ट्या अलिकडच्या काळातील आहे. कारण कार्ल मार्क्स यांनी मांडलेल्या समाजवादी विचारसरणीमध्ये त्याचे प्रतिबिंब काही प्रमाणात दिसून येते. एकोणीसाव्या शतकाच्या शेवटी भांडवलशाही विकासाबरोबर समाजामध्ये वाढलेले दारिद्र्य आणि विषमता हा विचारवंतांचा व तज्ञांचा चिंतेचा विषय बनून राहिला. त्यादृष्टीने ही विषमता कमी करून समता प्रस्थापित करण्यासाठी सरकारने हस्तक्षेप करून त्यावर काही उपाय योजावेत असे सुचविण्यात आले. परंतु सुरूवातीला सरकारी हस्तक्षेप या कल्पनेला बराच विरोध झाला; परंतु सरकारी हस्तक्षेप म्हणजे आर्थिक नियोजन असा त्याचा अर्थ अभिप्रेत नव्हता.

आर्थिक नियोजन या संकल्पनेची शास्त्रशुद्ध मांडणी नॉर्वेजियन प्राध्यापक ख्रिस्तीयन शॉन हेडर यांनी सन १९१० साली आपल्या लहानश्या प्रबंधात केली. पहिल्या महायुद्धाच्या काळात जर्मनी या देशाने आर्थिक नियोजनाचा प्रत्यक्ष अवलंब केला. आवश्यक साधनसामुग्रीची जुळवाजुळवी करून युद्धजन्य प्रयत्न करण्यात आला. युद्ध प्रयत्नाचा भाग म्हणून इंग्लंडनेही पहिल्या महायुद्धात नियोजनाचा अवलंब केला. याचा अर्थ या काळात गुंतलेल्या सर्वच राष्ट्रांनी कमी अधिक प्रमाणात आर्थिक नियोजनाचा अवलंब केला. परंतु ही एक हंगामी स्वरूपाची योजना होती. कालांतराने युरोपमधील बहुसंख्य राष्ट्रांनी नियोजनाचा हा प्रयोग सोडून त्यांनी परंपरागत धोरणाचा अवलंब केला.

सोव्हिएट रशियाने पहिल्यांदा सन १९२८ साली नियोजनाचा स्वीकार केला. मागासलेल्या कृषी प्रधान देशाचे उद्योगप्रधान देशामध्ये रूपांतर करणे हे उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून, रशियाने पहिल्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार केला व त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी सन १९२८ साली सुरू झाली हा प्रयोग अनेक राष्ट्रांच्या पचनी पडला नाही त्यामुळे अनेक राष्ट्रांनी त्यावर टीका केली. अशा परिस्थितीमध्ये एक महत्त्वपूर्ण घटना घडली ती म्हणजे सन १९२९-३० मध्ये जागतिक मंदीचा तडाखा सर्वच राष्ट्रांना बसला त्यानंतर दुसऱ्या महायुद्धाच्या काळात सन १९३९ ला जगातील अनेक देशाची अर्थव्यवस्था उदध्वस्त झाली या दोन घटनामुळे आर्थिक विकासाच्या प्रश्नाकडे जाणकारांचे व विचारवंताचे लक्ष वेधले या महायुद्धात जगातील सर्वच देशाची आर्थिक राजकीय आणि सामाजीक घडी विस्कटून एक प्रकारची अस्थिरता निर्माण झाला ती दूर करण्यासाठी प्रत्येक देशाचा सर्वांगीण विकास होणे गरजेचे आहे. तरच जगामध्ये शांतता, सुबत्ता, स्थैर्य निर्माण होईल हे सर्वांनाच मान्य झाले.

भांडवलशाही अर्थव्यवस्था स्विकारलेल्या राष्ट्रामध्ये सुद्धा आर्थिक विकासासाठी नियोजनाचा वापर केला जावू लागला. ढासळलेल्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी योजना आखल्या जावू लागल्या. लॉर्ड केन्स यांनी सुद्धा आपल्या लिखानामध्ये भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक नियोजनाचा परिणामकारकता प्रतिपादन

केली. यानंतरच्या काळात जर्मनी व इटलीमध्ये आर्थिक नियोजनाचा शिस्तबद्ध पद्धतीने वापर केला गेला. युद्ध समाप्तीनंतर अशियात राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नियोजनाचे वारे त्या देशातही वाहू लागले. त्या देशांनी जलद आर्थिक विकासासाठी नियोजनाचा स्विकार केला याचा अर्थ विकास हे उद्दिष्टे मानून अविकसीत देशांनी आर्थिक धोरण राबविले.

भारतामध्ये सन १९५१ मध्ये पंचवार्षिक योजनेची सुरूवात झाली असली तरी नियोजनाद्वारे आर्थिक विकास साध्य करण्याचा प्रयत्न स्वातंत्र्यपूर्व काळातही झाला होता. सन १९३५ मध्ये डॉ. बॉले व प्रा. रॉर्बटसन यांनी भारतामध्ये आर्थिक योजना आखण्यासंदर्भात सूचित केले होते. त्यापूर्वी सन १९३४ मध्ये तर विश्वेश्वरय्या यांनी आर्थिक विकासासंदर्भात १० वर्षाचा कार्यक्रम "Planned Economy for India" या पुस्तकात मांडला होता. नियोजनाच्या संदर्भात विचार मांडणारे ते पहिले भारतीय पुस्तक होते. याचा परिणाम आर्थिक नियोजनाबाबत भारतीय विचारवंतामध्ये विचारमंथन सुरू झाले. त्याचा भाग म्हणून प्रा. एन. एस. सुब्बाराव यांचे 'Some Aspects of Planning' एस. लोकनाथन यांचे 'Principles of Planning' व के. एन. सेन यांचे 'Economic Reconstruction' ही पुस्तके प्रकाशीत झाली.

**सर विश्वेश्वरय्या योजना (Sir Visvesvarayya Plan) :**

सन १९३४ मध्ये मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांनी (म्हैसूर संस्थानाचे दिवाण) यांनी Planned Economy for India या ग्रंथात नियोजनाची संकल्पना मांडली. त्यामध्ये त्यांनी भारताच्या आर्थिक विकासाच्या १० वर्षाच्या योजनेचे प्रारूप मांडले. या ग्रंथामुळे भारतातील नियोजनासंदर्भात अनेक विचारवंताचे लक्ष वेधले गेले. यापूर्वी विश्वेश्वरय्या यांनी म्हैसूर संस्थानाच्या औद्योगिक विकासाबाबत धोरण ठरविले. जलसिंचनाच्या योजना, कावेरी नदीवरील कृष्णसागर धरण बांधकामाबाबत धोरण ठरवून नियोजनाच्या वेगवेगळ्या योजना आखल्या होत्या. सन १९३६ साली त्यांनी, ''नियोजन करा किंवा नष्ट व्हा'' असा संदेश दिला. भारताने जलद आर्थिक विकास साध्या करावयाचा असेल तर नियोजनातून विकासाकडे जाणारा मार्ग पत्करला पाहिजे असे प्रतिपादन केले. आर्थिक नियोजन ही यशाची गुरूकिल्ली असून भारताला नियोजन करणे किती गरजेचे आहे याबाबत सूचीत केले.

या योजनेमध्ये शेती व उद्योग व्यवसायाचा विकास करणे यावर भर देण्याचे ठरले. त्यानुसार शेतीच्या विकासकामी ५०० कोटी रूपये व उद्योगासाठी २००० कोटी रूपये येणाऱ्या १० वर्षाच्या कालावधीमध्ये खर्च करण्याचे उद्दिष्टे ठेवले. याचा परिणाम देशातील राष्ट्रीय उत्पन्न दुप्पट होईल. त्याचबरोबर शेतीवरील अवलंबीत्व ५ कोटींनी कमी होऊन औद्योगिक क्षेत्रामध्ये ३.५ कोटी लोकांना रोजगार संधी निर्माण करून देता येईल असा अंदाज व्यक्त करण्यात आला. अशा नियोजनामुळे एकाचवेळी शेती व उद्योग व्यवसायांचा विकास केल्यामुळे शेतीवरील अवलंबित्व कमी होऊन उद्योग व व्यापार क्षेत्रामध्ये रोजगार संधी निर्माण होतील. त्यामुळे दारिद्र्य व बेरोजगारी कमी होण्यास मदत होईल. परंतू या काळात ब्रिटीश सत्तेचे साम्राज्य भारतावर असल्याने या विचाराकडे फारसे लक्ष देण्यात आले नाही.

**फिक्की योजना : Federation of Indian Chamber of Commerce and Industry (FICCI Plan)**

सन् १९३४ मध्ये भारतातील अनेक उद्योजकापैकी एका उद्योजक गटाने फिक्कीच्या माध्यमातून एक राष्ट्रीय

योजना सुचविली. या योजनेचे अध्यक्ष एन. आर. सरकार हे होते. या गटाने देशाला नियोजनाची गरज असून त्यासाठी देशामध्ये National Planning Commission स्थापन करण्याच्या सूचना केल्या. परंतू या सूचनेला एन. जी. रानडे व दादाभाई नौरोजी यांनी विरोध केला. कारण या योजनेमध्ये उद्योजक आपले हित जोपासतील त्याचा तोटा देशाला भोगावा लागेल. यांच्या मते देशातील जे कमकुवत विभाग आहेत त्यावर सरकारचे नियंत्रण व ताबा असला पाहिजे ते अशा उद्योजकांच्या ताब्यात जाणे योग्य ठरणार नाही.

या योजनेत मुक्त अर्थव्यवस्थेला विरोध करण्यात आला. सन १९२९ च्या जागतीक मंदीच्या तडाख्यात जगाला सावरण्यासाठी प्रमुख वेगवेगळ्या देशांनी केन्सवादी विचारसरणीचा दृष्टिकोन स्वीकारला. फिक्कीनेही यासंदर्भात ब्रिटिश सरकारला सल्ला दिला की तुम्ही याच मार्गाचा अवलंब करावा.

**काँग्रेस योजना (Congress Plan) :**

सन १९३८ साली हरिपूर याठिकाणी काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनाचे अध्यक्षपद सुभाषचंद्र बोस यांनी भूषविले होते. गांधीजींच्या प्रेरणेने या अधिवेशनामध्ये राष्ट्रीय नियोजन समितीची स्थापना करण्यात आली. त्याचे अध्यक्ष पं. जवाहरलाला नेहरू हे होते. या कमिटीमध्ये १५ सदस्य व २९ उपसमिती एकूण ३५० सभासद असतील असे गठित करण्यात आले. देशाचा सर्वांगीण विकास करण्याचे उद्दिष्ट या योजनेचे होते. या समितीकडे भारतासाठी एक राष्ट्रीय आर्थिक योजना आखण्याची जबाबदारी सोपविणेत आली. समितीने नियोजन आराखडा तयार करण्याचे कामही सुरू केले होते. परंतू १९३९ मध्ये दुसऱ्या महायुद्धाची सुरूवात झाली होती त्यामुळे देशामध्ये राजकीय अस्थीरता निर्माण झाली. त्यामुळे या समितीच्या कामकाजात खंड पडला.

**गांधी योजना (Gandhi Plan) :**

ही योजना महात्मा गांधी यांच्या तत्वज्ञानावर अधारित असल्यामुळे महात्मा गांधी यांनी भारताच्या दृष्टीकोनातून आर्थिक विकासाबाबत जे मत मांडले होते तो विचार धरून प्रा. एस. एन. अगरवाल यांनी सन १९४४ मध्ये आर्थिक विकासाबाबत आराखडा तयार केला. या आराखड्यास गांधीवादी योजना असे म्हणतात.

प्रा. अगरवाल यांनी देशाची आर्थिक रचना ही विकेंद्रित असावी. मोठ्या उद्योगांना प्राधान्य देण्याऐवजी शेतीच्या विकासावर लक्ष केंद्रीत करून शेतीला पूरक असणाऱ्या लघु, कुटीर, हस्तकला इ. उद्योगामध्ये मोठी भांडवल गुंतवणूक करावी, भांडवल प्रधान तंत्राऐवजी श्रमप्रधान तंत्राचा अवलंब करावा. खेड्यातील लोकांना रोजगार मिळेल, विकासाची गंगा तळागाळापर्यंत पोहचेल, प्रत्येक गाव स्वयंपूर्ण होईल या दृष्टीकोनातून या योजनेवर २५०० कोटी रूपये खर्च अपेक्षीत होता. त्यामध्ये शेतीच्या विकासासाठी ३३.६%, मुलभूत उद्योगासाठी २८.६%, सार्वजनिक उपयुक्त साठा ११.४%, ग्रामीण उद्योगासाठी १०%, शिक्षणासाठी ९%, आरोग्य सुविधेसाठी ७.४% खर्च करावेत असे सूचित केले. मात्र ही योजना आर्थिकदृष्ट्या सदोष व वास्तववादी नसल्यामुळे या योजनेस व्यापक प्रमाणात पाठींबा मिळाला नाही.

**मुंबई योजना (Bombay Plan)**

जानेवारी १९४४ मध्ये देशाच्या विकासासाठी मुंबई मधील प्रमुख आठ उद्योगपती एकत्रित येऊन भारताच्या विकासासाठी आर्थिक नियोजनाचा आराखडा (A Plan of Economic Development for India) तयार केला.

हा आराखडा तयार करण्यामध्ये श्री. जे. आर. डी. टाटा, डॉ. जॉन मथाई, श्री. ए. डी. श्रॉफ, श्री. जी.डी. बिर्ला, पुरूषोत्तम ठाकुरदास, कस्तुरभाई लालाभाई, सर दलाल, लाला श्रीराम यांचा प्रामुख्याने समावेश होता. ही योजना तयार करण्यामध्ये टाटा-बिर्ला या उद्योगपतीनी पुढाकार घेतल्याने याला टाटा-बिर्ला या नावानेही ओळखले जाते. तसेच यास उद्योगपतींची योजना असेही संबोधले जाते.

या योजनेचा कालावधी १५ वर्षे इतका होता. ही योजना तीन पंचवार्षिक योजनेत विभागली होती. शेती, उद्योग, वाहतूक व दळणवळण, मुक्त शिक्षण, गृहबांधणी, उपभोग वस्तूची निर्मिती, रोजगार निर्माण यांचा विकास करणे हे उद्दिष्ट होते. शेती, उद्योग, वाहतूक यावरती १०००० कोटी रूपये खर्च अपेक्षित धरला होता. यापैकी विदेशातून २३०० कोटी रूपये परकीय कर्जे, ७०० कोटी रूपये परकीय गंगाजळी, १००० कोटी रूपये देशातील बचत, ३०० कोटी रूपये खाजगी बचत, तुटीचा अर्थभरण्याच्या माध्यमातून ३४०० कोटी रूपये असे एकूण ७००० कोटी रूपये उपलब्ध करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले.

शेतीसाठी १२४० कोटी रूपये खर्च करून तीन पंचवार्षिक योजनेत म्हणजे १५ वर्षात १३% वाढ घडवून आणणे. उद्योग क्षेत्रावर ४४८० कोटी रूपये, व्यापारावर ९४० कोटी रूपये, मुक्त शिक्षण, घरबांधणी, स्वछता यावर ३३४० कोटी रूपये खर्च करून विकास करणे हे उद्दिष्ट होते.

परंतु या योजनेवर अनेक तज्ज्ञांनी टिका केली कारण शेती क्षेत्रावर केल्या जाणाऱ्या खर्चापेक्षा उद्योग क्षेत्रावर केला जाणारा खर्च जास्त होता. त्यामुळे शेती क्षेत्राकडे दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट होते. तुटीच्या अर्थभरण्यामुळे उभ्या केलेल्या निधीमुळे देशात भाववाढ होईल ही भिती तज्ज्ञांनी व्यक्त केली.

**जनता योजना (People's Plan) :**

श्री. मानवेंद्रनाथ यांनी मुंबई योजनेला उत्तर व पर्याय म्हणून पुरस्कृत केलेल्या योजनेला 'जनता योजना' म्हणतात. या योजनेमध्ये १० वर्षाच्या कालावधीमध्ये १५००० कोटी रूपये खर्च करण्याचे लक्ष्य होते. लोकांना अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा देण्याबरोबरच देशातील शेतीचे राष्ट्रीयीकरण, कर्जमुक्त ग्रामीण भाग, राहणीमान सुधारून लोकांच्या कल्याणात वाढ करणे ही लक्ष्ये योजली होती.

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये भारतामध्ये विकासाच्या नियोजनाबाबत अनेक प्रयत्न झाले. परंतु त्यास म्हणावे तेवढे यश प्राप्त झाले नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशामध्ये अनेक बदल घडून आले. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली १५ मार्च १९५० मध्ये नियोजन मंडळाची स्थापना करण्यात आली. पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून देशाचा आर्थिक विकास साध्य साधणे हे उद्दिष्ट ठरवून आजपर्यंत भारतात १२ पंचवार्षिक व काही वार्षिक योजना यशस्वीरित्या पूर्ण झाल्या. देशाचा सर्वांगीण विकास करण्यामध्ये नियोजन यशस्वी झाले असले तरी त्यामध्ये काही उणीवा राहिलेल्या आहेत.

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी १ जानेवारी, २०१५ रोजी 'नियोजन आयोग' रद्द करून त्याऐवजी 'निती आयोगाची' (NITI) स्थापना केल्याचे जाहीर केले.

### १.२.३ आर्थिक नियोजनाचे प्रकार

दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक अशियाई, आफ्रिकन व द. अमेरिका राष्ट्रे स्वतंत्र होत गेली. त्यानंतर त्या राष्ट्रापुढील निर्माण झालेले सामाजिक, आर्थिक प्रश्न व समस्या सोडविण्यासाठी आर्थिक नियोजनाचे तंत्र हे अत्यंत उपयुक्त व फायदेशीर ठरते. हे सैद्धांतिक अनुभवाने व व्यावहारिक पातळीवर सिद्ध झालेले आहे व तो सर्वमान्य झालेला असून त्याचा कमी अधिक प्रमाणात वापर विकसीत देशाबरोबर अविकसीत देशामध्ये झाला आहे. देशाने नियोजनाचा कोणता प्रकार स्वीकारावा हे या देशातील सामाजिक, राजकीय, अर्थिक परिस्थिती काय आहे हे लक्षात घेऊन ठरावावे लागते. प्रा. रॉबीन्स यांनी आपल्या Economic Planning and International Order या पुस्तकात विवेचन करताना ते म्हणतात आज जगातील सर्व राष्ट्रापुढे नियोजन असावे की असू नये हा प्रश्न राहीला नसून कोणत्या प्रकारचे नियोजन असावे एवढाच निवडीचा प्रश्न आहे. नियोजनाचा एखादा विशिष्ट प्रकार सर्वच देशात स्वीकारला जाणे शक्य नाही किंवा एखाद्या अर्थव्यवस्थेत एकाच पद्धतीचा अवलंब केला आहे. हे ही दाखविणे अवघड आहे. उदा. भारतीय अर्थव्यवस्थेत नियोजनाचा उल्लेख लोकशाही नियोजन, मिश्र नियोजन, रचनात्मक नियोजन असा केला जातो.

**१) कार्यात्मक नियोजन आणि रचनात्मक नियोजन (Functional Planning and Structural Planning)**

**अ) कार्यात्मक नियोजन :**

अर्थरचनेमध्ये कोणताही मुलभूत बदल न करता समाजरचना अधिक मजबूत करण्यासाठी केल्या जाणाऱ्या नियोजनास कार्यात्मक नियोजन म्हणतात. अर्थव्यवस्थेमधील निर्माण झालेले दोष दूर करणे एवढाच कार्यात्मक नियोजनाचा उद्देश असतो. हे अल्पकालीनं नियोजन असून या रचनेमध्ये कोणत्याही चौकटीला धक्का न लावता हळूहळू बदल घडवून आणले जातात त्यामुळे पूर्वीची रचना अधिक सक्षमपणे काम करेल असे वाटते. कार्यात्मक नियोजनामुळे फार मोठे बदल न घडून येता केवळ किरकोळ बदल घडून येतात.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये बाजार यंत्रणेमध्ये जे दोष निर्माण होतात त्यामुळे अर्थिक विकासास खीळ बसण्याची परिस्थीत उद्भवते. अशावेळी अर्थव्यवस्थेतील दोष दूर करण्यासाठी कार्यात्मक नियोजनाचा अवलंब आवश्यक असतो.

**कार्यात्मक नियोजनाचे फायदे :**

१. कार्यात्मक नियोजनामध्ये सरकारी हस्तक्षेप कमी असतो.

२. भांडवलशाही देशांना नियोजनाचे हे तंत्र उपयुक्त ठरते.

३. या तंत्रात रचनेला धक्का न लावता त्यामध्ये बदल घडवून आणून आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यात येतो.

४. कार्यात्मक नियोजनामुळे देशाच्या अर्थकारणात बदल घडून येतात.

५. उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी जाणीपूर्वक प्रयत्न केले जातात. त्यामुळे कार्यात्मक नियोजन हे फार प्रभावी ठरते.

**कार्यात्मक नियोजनातील दोष :**

१. कार्यात्मक नियोजनाची व्याप्ती मर्यादित असते.

२. यामध्ये केली जाणारी उपाययोजना तात्पुरती असते त्यामुळे काही कालावधीनंतर पुन्हा तेच प्रश्न निर्माण होतात.

३. कार्यात्मक नियोजनामध्ये फक्त छोटासा बदल करणे हाच उद्देश असतो.

**ब) रचनात्मक नियोजन (Structural Planning)**

जेव्हा नियोजनाचा उद्देश रचना बदलण्याचा असतो अशा नियोजनास रचनात्मक नियोजन असे म्हणतात. अर्थव्यवस्थेमध्ये जुन्या कालबाह्य व्यवस्थेची जागा नवीन प्रणाली व्यवस्था घेते ही रचना लोकांच्या कल्याणासाठी, देशाच्या हितासाठी, लोकांच्या उद्दिष्टे पूर्तीसाठी फायदेशीर असते. या नियोजनाचे महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे देशातील दारिद्र्य, विषमता, अज्ञान, बेकारी, महत्तम कल्याण साधणे इ. प्रश्नांची सोडवणूक करून दीर्घकालीन आर्थिक व सामाजिक क्रांती घडवून आणणे हे असते. सरकारचा रचनेमध्ये दुरूस्ती करणे हा हेतू नसून सर्व क्षेत्रामध्ये हस्तक्षेप करून ठरविलेल्या उद्दिष्टांची पूर्तता करून नवीन अर्थिक रचना निर्माण करणे हा असतो.

रशियाने प्रथम नियोजनाचा स्वीकार केला. याठिकाणी नियोजनाची सुरूवात रचनात्मक तंत्राने झाली. जुन्या रचनेमध्ये क्रांतीकारी बदल करून खाजगी मालकी हक्क, जमिनदारी पद्धत नष्ट करण्यात आली, उत्पादन घटकावर सरकारची मालकी, शेती व उद्योगाचे राष्ट्रीयीकरण असे रचनात्मक बदल करण्यात आले. भारतामध्ये सुद्धा स्वातंत्र्यपूर्व काळातील रचना बदलून नवीन बदल करण्यात आले. बँकांचे राष्ट्रीयीकरण, काही उद्योगावर सरकारची मालकी असे मुलभूत बदल हे रचनात्मक स्वरूपाचे म्हणावे लागेल.

**रचनात्मक नियोजनाचे फायदे :**

१. रचनात्मक नियोजनामध्ये सर्व क्षेत्रामध्ये एकाचवेळी बदल घडवून आणले जातात.

२. कार्यक्षम अर्थव्यवस्था निर्माण करण्यामध्ये रचनात्मक तंत्र महत्त्वाची भूमिका पार पाडते.

३. आर्थिक विकास साधणे, क्षेत्राचा संतुलीत विकास करणे या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी हे तंत्र उपयोगी पडते.

या तंत्राचा वापर चुकीच्या पद्धतीने झाल्यास त्याचा अर्थव्यवस्थेवर दुष्परिणाम खालील पद्धतीने होतात.

**दोष :**

१. जनतेच्या सहकार्यावर रचनात्मक नियोजनाचे यश अवलंबून असते ते नाही मिळाल्यास योजना अपयशी होतात.

२. देशातील रचनात्मक नियोजनामध्ये वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये कडक शिस्त व निर्बंध लादल्यामुळे त्याचा परिणाम म्हणून लोकांच्या स्वातंत्र्यावर गदा येते. अर्थिक विकासासाठी पोषक वातावरण नष्ट होते, अर्थव्यवस्थेवर

त्याचे प्रतिकूल परिणाम होतात.

३. रचनात्मक नियोजनामुळे सत्तेचे केंद्रीकरण होवून लोकशाहीवर विपरित परिणाम होतो.

४. रचनात्मक नियोजनामध्ये तंत्राचा वापर करणे हे जोखमीचे असते.

**२) केंद्रित नियोजन आणि विकेंद्रित नियोजन (Centralised and Decentralised Planning) :**

**अ) केंद्रित नियोजन :**

केंद्रिय नियोजनामध्ये नियोजनाचा आराखडा तयार करणे, सुक्ष्म घटक तपासणे, योजनाची कार्यवाही करणे, प्रकल्पांची क्रमवारी लावणे, करण्यात येणारी गुंतवणूक, वेतनाचा दर, नियोजनाचे सातत्य, योजनाच्या कामकाजावर देखरेख करणे, विविध कार्यामध्ये एकसुत्रता निर्माण करणे इ. बाबत सर्व अधिकार केंद्रीत सत्तेकडे किंवा मध्यवर्ती नियोजन मंडळाकडे सोपविले जातात तेव्हा त्यास केंद्रीय नियोजन असे म्हणतात. हे नियोजन वरून खालपर्यंत झिरपत जात असल्यामुळे यासंबंधी घेतले जाणारे निर्णय सर्वांस बंधनकारक असतात. असे नियोजन चीन, रशिया या साम्यवादी देशामध्ये दिसून येते. साम्यवादी देशातील अर्थिक नियोजन हे केंद्रीय सरकारच्या अंतर्गत मार्गदर्शनाखाली केले जात असल्याने तो मध्यवर्ती नियोजनाचा आदर्श प्रकार सांगता येईल.

**केंद्रिय नियोजनाचे गुण :**

१. यामध्ये घेण्यात येणारे निर्णय केंद्रिय स्तरावरून घेतले जातात. मध्यवर्ती सत्ता संबंधित घटकाशी वेगवेगळ्या स्तरावर चर्चा करून निर्णय घेते व या संस्था बदलही सूचवू शकतात. त्यामुळे व्यापक अर्थाने राष्ट्रीय संदर्भात विचार झाल्याने राष्ट्रीय हित जपले जाते.

२. केंद्रिय सत्तेला राष्ट्राच्या एकूण परिस्थितीचे ज्ञान असते. विशेषत: कार्याच्या संदर्भात संसाधने किती उपलब्ध आहेत. त्याबाबत देशाचे लक्ष्य काय आहे. यासंदर्भात वस्तुनिष्ठ निर्णय घेतले जातात. त्यामुळे राष्ट्रीय अर्थकारणात एक प्रकारची शिस्तबद्धता येते.

३. केंद्रिय पद्धतीने करण्यात येणाऱ्या नियोजनामध्ये सरकार हितसंबंधाकडून होणारा विरोध कितीही प्रखर असला तरी तो सहजपणे मोडून काढू शकते.

**दोष :**

१. केंद्रिय नियोजन पद्धतीमध्ये योजना सत्तेच्या हातात सर्व अधिकाराचे केंद्रिकरण झालेले असते त्यामुळे अधिकाराचा दुरूपयोग होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

२. केंद्रिय पद्धतीमध्ये आखलेल्या योजनेमध्ये लोकांच्या गरजांचे, अपेक्षेचे, वेदनांचे प्रतिबिंब आढळत नाही, कारण वरून खाली येणारी ही योजना असते.

**ब) विकेंद्रित नियोजन :**

विकेंद्रित नियोजनामध्ये तळापासून वर पर्यंत नियोजन केले जाते. या नियोजन प्रकारात आर्थिक निर्णयाचे

विकेंद्रिकरण झालेले असते. या नियोजनामध्ये सर्व निर्णय एकाच पातळीवरून न घेता वेगवेगळ्या पातळीवरून घेतले जातात. लोकांचे प्रश्न, समस्या, गरजा, अडचणी या विचारात घेऊन आर्थिक नियोजनाचा आराखडा तयार केला जातो. आर्थिक नियोजनाचा ढाचा तयार करणे, अमंलबजावणी करणे हे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थाकडे दिले जातात. उदा. गावातील ग्रामपंचायत, गावामधील सर्व घटकाचा आढावा घेऊन गावची योजना तयार करणे अशा सर्व ग्रामविकास योजनेचे एकत्रिकरण करून जिल्हा नियोजन आराखडा तयार केला जातो. त्याचे एकत्रीकरण करुन राज्य नियोजन आराखडा तयार केला जातो. त्यावर देशाच्या नियोजनाची बांधणी केली जाते.

**गुण :**

१. या पद्धतीमध्ये जनतेच्या गरजा विचारात घेऊन उद्दिष्टे, स्वरूप ठरविले जाते. त्यामुळे ही जनतेची योजना ठरते.

२. या नियोजन प्रक्रियेमध्ये सत्तेचे केंद्रिकरण घडून येत नाही. त्यामुळे सत्तेचा दुरूपयोग होतो, याची शक्यता कमी असते.

३. सामान्य जनतेला ही योजना आपलीशी वाटते त्यामुळे या योजनेस लोकांचे सहकार्य प्राप्त होते.

**दोष :**

१. या नियोजन पद्धतीमध्ये योजनेची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी बराच कालावधी लागतो.

२. या नियोजन पद्धतीमध्ये भांडवलशाही व्यवस्थेच्या सर्व उणिवा मूळ स्वरूपात कायम राहतात.

३. वेगवेगळ्या उद्योजकानी उत्पादन किती करावे याबाबत घेतले गेलेले निर्णय गुप्त राहिल्यामुळे मागणी व पुरवठ्यामध्ये असमतोल निर्माण होतो. कधी समाजाच्या गरजेपेक्षा जास्त उत्पादन होते तर कधी गरजेपेक्षा कमी उत्पादन होते.

४. या नियोजन पद्धतीमध्ये व्यक्तिगत व वर्गीय हितसंबंध जोपसण्याकरिता समाजाचा व्यापक हितसंबंधाचा बळी दिला जातो.

केंद्रिय नियोजन व विकेंद्रित नियोजन या दोन्ही पद्धतीमध्ये त्याचे फायदे आणि उणिवा दिसून येतात. कोणत्याही एका पद्धतीचा वापर करून देशाच्या जलद अर्थिक विकास साधण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे अवघड जाते. भारतासारख्या भौगोलिकदृष्ट्या विस्तृत क्षेत्र असलेल्या देशामध्ये दोन्ही पद्धतीचा समन्वय साधणे आवश्यक असते. कारण भारतात नियोजन मंडळ स्थानीक व प्रादेशिक संस्थांच्या सहकार्याने योजना तयार करते आणि केंद्र सरकार, राज्य सरकार, जिल्हा परिषदा व स्थानीक स्वराज्य संस्थाच्या माध्यमातून योजनांची अंमलबजावणी करते. थोडक्यात भारतामध्ये केंद्रिय व विकेंद्रिय नियोजनाचा समन्वय साधण्याचा प्रयत्न होतो.

### ३) साम्यवादी / हुकूमशाही / आदेशात्मक नियोजन :

आदेशात्मक नियोजनात केंद्रीय सत्तेचे संपूर्ण अर्थव्यवस्थेवर कडक व व्यापक नियंत्रण असते. याचा अर्थ आदेशात्मक नियोजन केंद्रभूत नियोजन असते. देशातील उत्पादन साधन सामुग्रीवर सरकारची मालकी असल्यामुळे

देशातील उत्पादन व विभाजन संदर्भातील निर्णय शासन अर्थव्यवस्थेचा सूक्ष्म अभ्यास करून घेते. या नियोजनामध्ये मध्यवर्ती सरकार योजना तयार करते. त्याची उद्दिष्टे निश्चित करते. त्याची अंमलबजावणी करण्यासाठी सूचना व आदेश देणे व नियोजन सशक्त होण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करते. साम्यवादी रशियाचे आर्थिक नियोजन हे आदेशात्मक नियोजनाचे चांगले उदाहरण होय.

आदेशात्मक नियोजनात सक्तीचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. अर्थव्यवस्थेच्या शेती, उद्योग, व्यापार, वाहतूक, बँकिंग यंत्रणा इ. महत्त्वाची क्षेत्रे सरकारच्या ताब्यात असतात. कोणत्या क्षेत्रावर भर द्यावयाचा, उत्पादनाचे प्रमाण कसे असावे इ. बाबतचे निर्णय केंद्रीय सत्ता योग्य रितीने घेते. त्यामुळे लोकांना आवश्यक असणाऱ्या वस्तू व सेवांचा तुटवडा भासत नाही. आदेशात्मक नियोजनामध्ये कोणत्या उपभोग्य वस्तूचे उत्पादन करावयाचे, लोकांच्या उपभोगात कोणत्या वस्तू असाव्यात याबाबतीत सक्तिचे निर्णय लादले जातात. सरकारला याठिकाणी नफा मिळविणे हे उद्दिष्टे नसून लोकांच्या कल्याणात वाढ घडवून आणून समाज हित साध्य करणे हे असते.

लोकांच्या उपभोग स्वातंत्र्यावर मर्यादा पडतात. नागरीकांना अर्थिक स्वातंत्र मिळू शकत नाही. म्हणून या पद्धतीस हुकुमशाही नियोजन असेही म्हटले जाते. टिकाकारांच्या मते आदेशात्मक नियोजनाचा अवलंब करणारी अर्थव्यवस्था ही नियोजीत अर्थव्यवस्था नसून ती नियंत्रीत अर्थव्यवस्था असते.

कोलीन क्लार्क यांच्या मते, आदेशात्मक नियोजन पद्धतीचा स्विकार केल्यास उत्तेजनात्मक नियोजनापेक्षा अधिक प्रगती साध्य होईलच असे नाही. प्रा. अलम घोष यांच्या मते, भारताने नियोजनाचा स्विकार केला. पहिल्या तीन पंचवार्षिक योजनेत अर्थिक नियोजन हे आदेशात्मक स्वरूपाचे होते. परंतु भारतातील लोकशाही पद्धतीमुळे कोणत्याही बाबतीत अतिरेकी स्वरूपाची सक्ती झाली नाही.

**आदेशात्मक नियोजनाचे दोष :**

१. आदेशात्मक नियोजनामध्ये उपभोकत्याला निवडीचे स्वातंत्र्य नसते. त्याच्या सार्वभौमत्वावर मर्यादा येतात. प्रा. हायेक यांच्या The Road to Serfdom या पुस्तकामध्ये ते म्हणतात व्यक्तिच्या जीवनाच्या सर्व क्षेत्रावर नियंत्रण येते. त्यामुळे एका अर्थाने तो गुलामगिरीचा मार्गच मानावा लागेल.

२. या नियोजनामध्ये नोकरशाहीला व सत्तेच्या केंद्रिय सत्तेला मोठा वाव मिळतो.

३. कोणत्याही देशातील अर्थपद्धती गुंतागुंतीची असल्यामुळे आदेशात्मक नियोजन हे नेहमीच असमाधानकारक ठरते.

४) लोकशाही नियोजन आणि हुकूमशाही नियोजन (Democratic Planning and Totalitarian Planning) :

**अ) लोकशाही नियोजन :**

लोकशाही ही देशाचा राज्यकारभार चालविणारी प्रणाली आहे. लोकशाही व्यवस्थेच्या ढाच्यामध्ये करण्यात येणाऱ्या नियोजनाला लोकशाही नियोजन म्हणतात. अब्राहम लिंकन यांच्या मते, लोकशाही नियोजन

हे लोकांच्याकडून केले जाणारे आणि लोकांचे आणि लोकांच्या महत्तम कल्याणाकरीता असलेले नियोजन होय. या नियोजनामध्ये लोकांचे आर्थिक, सामाजिक, राजकीय स्वातंत्र्य व हित अबाधित राखले जाते. लोकशाही नियोजनामध्ये लोकांची भूमिका, सहभाग, सहकार्य आवश्यक असते.

लोकशाही पद्धतीने निवडून आलेले शासन/सरकार व लोकशाही प्रशासन हे लोकशाही नियोजनाचे महत्त्वाचे घटक असतात. लोकशाही नियोजनाच्या आराखड्याची अंमलबजावणी करण्यापूर्वी तो विधानसभा व संसदेपुढे पटलावरती ठेवला जातो. लोक प्रतिनिधींची वर्तमानपत्र, वृत्तवाहिनी, माध्यमातून त्यावर चर्चा होते. अनेक तज्ञांचे, विचारवंताचे मत विचारात घेतले जाते. त्यामध्ये काही बदल सूचित केले जातात. याचा अर्थ लोकशाहीमध्ये आर्थिक नियोजन हे लोकांवर लादले जात नाही तर ते लोकांच्या गरजातून निर्माण होते.

आर्थिक नियोजनावर टीका करणाऱ्या तज्ज्ञांच्या मते, ज्या देशात आर्थिक नियोजन केले जाते त्याठिकाणी लोकशाहीचे अस्तीत्व राहत नाही. उदा. रशिया, चीन या देशामध्ये विस्तृत स्वरूपाचे नियोजन करण्यात आले. परंतु त्याठिकाणी निकोप लोकशाही दिसून आली नाही. याउलट अमेरिका व इंग्लंडमध्ये लोकशाहीची बीजे खोलवर रूजलेली आहेत. इथे लोकशाही नियोजन अस्तीत्वात आहे. परंतू याठिकाणी व्यापक सर्वस्पर्शी दीर्घकालिन नियोजन केले जात नाही. याचा अर्थ असा निघतो की लोकशाही व नियोजन यामध्ये विरोध आहे. अशी धारणा होते. प्रा. हायेक, जी लिप्पसन यांच्या मते, लोकशाही चौकटीत नियोजन असू शकत नाही. तर प्रा. गुन्नार मिर्डाल यांच्या मते, अविकसीत देशामध्ये जलद आर्थिक विकासातील आदेशात्मक नियोजनाचा स्विकार केला पाहिजे.

**लोकशाही नियोजनाची वैशिष्टे :**

१. लोकशाही नियोजनामध्ये लोकशाहीची सर्व मूल्ये जपली जातात.

२. लोकशाही नियोजनामध्ये अस्तीत्वात असलेल्या सर्व घटकांना नियोजनामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागते.

३. लोकशाही नियोजनामध्ये व्यक्तीहित व समाजहित जपले जाते.

४. लोकशाही नियोजनामध्ये कल्याणकारी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीला अग्रक्रम दिला जातो.

५. लोकशाही नियोजनामध्ये तळापासून नियोजन या तंत्राचा उपयोग केला जातो.

६. लोकशाही नियोजनामध्ये राष्ट्रीयीकरण साधनाचा काळजीपूर्वक वापर करून घेता येतो.

७. लोकशाही नियोजन हे मिश्र अर्थव्यवस्थेमध्ये करण्यात येते.

८. लोकशाही नियोजनामध्ये नागरीकांचे आर्थिक, सामाजिक, राजकीय हित सुरक्षित ठेवले जाते.

९. लोकशाही नियोजनाचे स्वरूप हे साम्यवादी केंद्रित नियोजनापेक्षा खूपच वेगळे असते.

### ब) हुकूमशाही नियोजन :

हुकूमशाही राजव्यवस्थेत करण्यात येणाऱ्या आर्थिक नियोजनाला हुकूमशाही नियोजन असे म्हणतात. देशामधील सर्व सत्ता एका व्यक्तीच्या हातात केंद्रीत झालेली असते. त्याच्या इच्छेनुसार सर्व निर्णय घेतले जातात तेव्हा अशा व्यक्तिला हुकुमशहा म्हणतात. योजना आखणे, योजनाची अंमलबजावणी करणे, साधनाच्या विभागणी बाबत धोरण इ. सर्व बाबतीत या सत्तेचे निर्णय अंतिम असतात. आर्थिक नियोजन हे साध्य नसून साधन आहे. याचा उपयोग कोणही करू शकतो. लोकांनी निवडून दिलेले लोकशाही शासन या मार्गाचा अवलंब करते किंवा एखाद्या व्यक्तिच्या हातात सत्ता असलेल्या देशामध्ये वेगवेगळे उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आर्थिक नियोजन या साधनाचा वापर केला जातो.

जगातील वेगवेगळ्या देशामध्ये हुकुमशाही आर्थिक नियोजनाचा प्रत्यक्षात वापर केला आहे. ॲडॉल्फ हिटलर यांने १९३३ मध्ये नाझी सत्तेचा विस्तार करण्यासाठी जर्मनीमध्ये केलेले नियोजन, राजकीय महत्वकांक्षेपोटी मुसोलिनीने केलेले नियोजन, इराणचा बादशहा सद्दाम हुसेन यांनी देशाची युद्धक्षमता वाढविण्यासाठी केलेले नियोजन ही सर्व हुकूमशाही नियोजनाची उदाहरणे आहेत. त्याचबरोबर चीनने आखलेले साम्राज्यवादाचे धोरण, हेही हुकूमशाही नियोजनाचा भाग आहे.

**हुकूमशाही नियोजनाची वैशिष्टे :**

१. हुकूमशाही नियोजनामध्ये लोकांना आर्थिक, सामाजिक, राजकीय स्वातंत्रे गमवावी लागतात.

२. लोकशाही घटकाचे अस्तित्व हुकुमशाहीमध्ये नष्ट होते.

३. जनतेच्या महत्तम कल्याणाच्या दृष्टीने आखण्यात येणारी कार्यक्षम उद्दिष्टे हा हुकूमशाही नियोजनाचा हेतू नसतो. प्रत्यक्षात हुकूमशाही सत्ता वाढविणे सत्तेचा वापर करून व्यक्तिगत स्वार्थ साधून घेणे आणि हुकूमशाही ऐश्वर्यात वाढ करणे हा हेतू असतो.

४. हुकुमशाही नियोजनात वरच्या स्तरावरून नियोजन तंत्राचा अवलंब केला जातो. यामध्ये लोकांच्या मनाचा विचार केला जात नाही. योजनांची कार्यवाही करण्यासाठी आदेशात्मक तंत्राचा वापर केला जातो.

५. हुकूमशाही नियोजनामध्ये देशाचे उत्पन्न, उत्पादनाची पातळी वाढविण्यासंदर्भात प्रयत्न केले जातात. मात्र उत्पन्न वितरणामध्ये वाटप असमान झाल्यामुळे अशा प्रकारच्या नियोजनामुळे आर्थिक विषमतेची दरी अधिकच रूंदावते.

६. हुकूमशाही नियोजनामध्ये लष्करी सामर्थ्य वाढविण्यासाठी आवश्यक असणारे उद्योग तसेच श्रीमंत व्यक्तीच्या चैनीच्या वस्तूचे उत्पादन केले जाते.

**५) अल्पकालीन नियोजन आणि दीर्घकालीन नियोजन (Short Term Planning and Perspective Planning) :**

**अ) अल्पकालिन नियोजन :**

ज्या आर्थिक नियोजनामध्ये नियोजनाचा कालावधी एक वर्ष, दोन वर्षे किंवा तीन वर्षे इतका असतो अशा प्रकारच्या कालावधीमध्ये करण्यात येणाऱ्या नियोजनाला अल्पकालिन नियोजन असे म्हणतात. नियोजनाचा कालावधी अल्प असल्यामुळे अशा नियोजनामध्ये योजनेचे स्वरूप, योजनेची उद्दिष्टे, विशेष महत्त्वाचे प्रश्न, जे तातडीचे आहेत असे प्रश्न सोडविण्यावर ताबडतोब भर दिला जातो.

जेव्हा देशामध्ये अर्थिक व राजकीय संकटे येतात किंवा आकस्मित आपत्ती येण्याची शक्यता असते. त्यामुळे संपूर्ण जनजीवन विस्कळीत होते. उदा. परकीय आक्रमण, महापूर, नैसर्गिक आपत्ती, कोरोनासारखे महाभयंकर रोग, अशावेळी देशातील सर्व साधनाचा पर्याप्त वापर करण्यासाठी ज्या तात्काळ व महत्त्वाचे समस्या आहेत. त्यांचा अग्रक्रम ठरवून नियोजन करावे लागते. इथे अर्थव्यवस्थेची पुर्णबांधणी करावी लागते. या प्रकारचे करण्यात येणारे नियोजन हे अल्पकालीन नियोजन असते. अशा नियोजनाला आणीबाणी नियोजन असेही म्हणतात.

**वैशिष्टे :**

१. अल्पकालिन नियोजनामध्ये वर्तमान काळ विचारात घेतला जातो.

२. अल्पकालिन नियोजनाचा कालावधी अल्प असतो.

३. काही प्रसंगी अल्पकालिन नियोजन हे आणीबाणी नियोजन ठरू शकते.

४. देशामधील महत्त्वाच्या व तातडीच्या समस्या सोडविण्यासाठी अल्पकालिन नियोजन करू शकतो. या समस्या सुटल्यानंतर नियोजनाची प्रक्रिया पुढे सुरू राहत नाही.

५. अल्पकालिन नियोजनामुळे काही अल्पकालिन फायदे मिळवता येतील. परंतु या नियोजनामुळे अर्थव्यवस्थेत रचनात्मक बदल घडवून आणता येत नाहीत.

६. दीर्घकालीन उद्दिष्टे साध्य करण्याचा एक मार्ग म्हणजे अल्पकालिन नियोजन होय.

**ब) दीर्घकालीन नियोजन :**

देशाच्या आर्थिक विकासाचा दृष्टीकोन दृष्टीपटलावर ठेवून जेव्हा १५, २० किंवा २५ वर्षाच्या दीर्घ कालावधीसाठी योजना तयार केली जाते. तेव्हा त्यास दीर्घकालीन नियोजन असे म्हणतात. दीर्घकालीन योजनाची कल्पना १९२०-२१ साली रशियामध्ये स्थापन केलेल्या गोएलशे या राज्य विद्युत मंडळाच्या योजनेवरून जन्मास आली. दीर्घकालीन नियोजनामध्ये देशाच्या आर्थिक ढाच्यामध्ये बदल करून जलद अर्थिक विकास साध्य करण्यासाठी निश्चित केलेल्या उद्दिष्टे पूर्तीसाठी, आर्थिक सामाजिक समता, सुरक्षितता, कल्याणकारी राज्य निर्मिती, शिक्षण, लोकसंख्या, आरोग्य या लक्ष्याची विभागणी करून छोट्या छोट्या योजना तयार करून लक्ष्ये

साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो. यासाठी नियोजनाची विभागणी चार, पाच, सहा वर्षाच्या योजनामध्ये विभागली जाते. अशा प्रकारे अल्पकालिन योजनाद्वारे दीर्घकाळासाठी ठरविण्यात आलेली साध्ये टप्प्या टप्प्याने पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो. याचा अर्थ दिर्घकालीन योजना ही अल्पकालिन योजनेचा आराखडा ठरविते आणि अल्पकालिन योजना ही दीर्घकालिन नियोजनाची लक्ष्ये व कार्यक्रम निश्चित करते.

भारतीय नियोजन मंडळाच्या मते, ''दीर्घकालीन नियोजन म्हणजे दीर्घकाळात केल्या जाणाऱ्या विकासाचा तो कच्चा ढाचा असतो.'' दीर्घकालीन नियोजनामुळे राष्ट्रीय उद्दिष्टांना आकार प्राप्त होतो तर अल्पकालीन नियोजनामुळे या आकाराला मूर्त स्वरूप देण्याचा प्रयत्न केला जातो.

**दीर्घकालिन नियोजनाची वैशिष्टे :**

१. भविष्यकालीन विचार करून समाजाचे उज्वल हित लक्षात घेऊन करण्यात येणारे प्रयत्न असतात.

२. राष्ट्रीय पातळीवरून ह्या प्रकारचे नियोजन करण्यात येते तसेच अर्थव्यवस्थेतील सर्व क्षेत्राकडे पूर्णपणे लक्ष केंद्रीत केले जाते.

३. हे नियोजन दीर्घकालिन स्वरूपाचे असते.

४. अल्पकालिन नियोजन हे अल्प कालावधी नियोजन असते तर दीर्घकालीन नियोजन हे कायम स्वरूपाचे नियोजन असते.

५. दीर्घकालीन नियोजन हे रचनात्मक स्वरूपाचे नियोजन असते.

६. दीर्घकालीन नियोजनाची उद्दिष्टे व्यापक असतात ती सामाजीक, राजकीय, आर्थिक अशा प्रकारची असतात.

## ६) प्रादेशिक नियोजन, राष्ट्रीय नियोजन व आंतरराष्ट्रीय नियोजन (Regional, National and International Planning) :

### अ) प्रादेशिक नियोजन :

देशातील प्रादेशिक गरजा लक्षात घेऊन जेव्हा राष्ट्रीय नियोजनाचा आराखडा तयार केला जातो. तेव्हा त्यास प्रादेशिक नियोजन म्हणतात. प्रादेशिक नियोजन हा राष्ट्रीय नियोजनाचा एक भाग असून त्यामध्ये प्रादेशिक वैशिष्ट्यांचा समावेश दिसून येतो. एखादा भूप्रदेश, भौगोलिक दृष्ट्या मागासलेला असेल व एखाद्या भूप्रदेशामध्ये नैसर्गिक साधन सामुग्री विपूल असेल अशावेळी केंद्रीय सत्तेकडून मागासलेल्या क्षेत्राचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी प्रादेशिक नियोजनाचा मार्ग अवलंबून त्या विभागाचा विकास करण्याचा प्रयत्न केला जातो. यासाठी या विभागाला स्वतंत्र योजना आखण्याचे धोरण, कार्यवाही व अंमलबजावणीसाठी स्वातंत्र्य दिलेले असते. परंतू ती योजना राष्ट्रीय नियोजनाच्या चौकटीत असावी अशी अट असते. श्री. जे. आर. बेलरबॉय यांच्या मते, ''प्रादेशिक योजना ही अधिक व्यापक असलेल्या राष्ट्रीय योजनेशी सुसंगत असली पाहिजे.'' या नियोजनाचा वापर जगामध्ये कमी अधिक प्रमाणात झालेला दिसून येतो. रशियासारख्या साम्यवादी देशाबरोबर भांडवलशाही

देशामध्ये सुद्धा प्रादेशिक नियोजनाची भूमिका महत्त्वाची ठरते. भारतासारख्या विकसनशील देशात प्रादेशिक भिन्नता, असंतुलन, विषमता या समस्या दुर करण्यासाठी प्रादेशिक नियोजन महत्त्वाची भूमिका पार पाडते.

**ब) राष्ट्रीय नियोजन :**

देशातील सर्व प्रदेश आणि संपूर्ण जनतेसाठी जेव्हा नियोजनाची आखणी करून त्याची अमंलबजावणी केली जाते. तेव्हा त्यास राष्ट्रीय नियोजन असे म्हणतात. या नियोजनामध्ये देशातील विविध साधनसामुग्रीचा पर्याप्त व कार्यक्षम वापर केला जातो म्हणजे समान उद्दिष्टे, समान तत्वे व हितसंबंध विचारात घेऊन मौद्रीक धोरण व राजवित्तीय धोरणाचा पर्याप्त वापर करून निश्चीत केलेली उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्नाबरोबर ही योजना यशस्वी होण्यासाठी सरकार लोकांना आदेश देत असते. लोकांना हे नियोजन आपलेसे वाटत असल्यामुळे या नियोजनास लोकांचे सहकार्य मिळत असते. देशामध्ये प्रादेशिक व आंतरराष्ट्रीय नियोजन करण्यापूर्वी पहिल्यांदा राष्ट्रीय नियोजन अस्तीत्वात असणे आवश्यक आहे.

**क) आंतरराष्ट्रीय नियोजन :**

जेव्हा जगाच्या पातळीवर नियोजनाचा विचार झाल्यास त्यास आंतरराष्ट्रीय नियोजन म्हणतात. हा शब्द दोन अर्थांनी वापरला जातो.

ज्यावेळी दोन किंवा त्यापेक्षा अधिक राष्ट्रांच्या नियोजित अर्थव्यवस्था नियोजनासाठी एक भौगोलिक क्षेत्र समजून नियोजनाच्या हेतूने एकत्र येतात. व्यावहारिक दृष्टिकोन ठेवून एकत्रित नियोजनाचा अवलंब करतात तेव्हा त्यास आंतरराष्ट्रीय नियोजन म्हणतात उदा. इराक, सिरीया, इजिप्त यांचा समावेश यात होतो.

जेव्हा दोन किंवा अधिक राष्ट्रे स्वत:ची चलनपद्धती, जकात, कररचना पद्धत कायम ठेवून काही अर्थिक प्रश्नाबाबत एकत्र येतात व एकमेकास मदत करतात तेव्हा त्यास आंतरराष्ट्रीय नियोजन म्हणतात.

**७) वित्तीय नियोजन व भौतिक नियोजन (Financial Planning and Physical Planning) :**

**अ) वित्तीय नियोजन :**

''वित्तीय नियोजन म्हणजे किंमत पातळीचा वर्तमान व भविष्यकाळाचा विचार करून योजनेसाठी कराव्या लागणाऱ्या पैशातील खर्चाची जुळवाजुळव करणे होय.'' वित्त भरपूर प्रमाणात उपलब्ध असेल तर नियोजनाची वास्तव उद्दिष्टे साध्य करणे सोपे जाते अशा प्रकारच्या नियोजनात पैशाचा पुरवठा किती उपलब्ध आहे त्यानुसार नियोजनाची उद्दिष्टे साध्य केली जातात.

मागणी व पुरवठ्यामधील एकूण उत्पन्न व एकूण खर्च यामधील समतोल साधणे हे वित्तीय नियोजनाचे महत्त्वाचे तत्व आहे. त्याबरोबर परकीय येणी-देणी, किंमत स्थैर्य यामध्ये समतोल साधून या गोष्टी वित्तीय नियोजनास पूर्ण कराव्या लागतात. थोडक्यात वित्तीय नियोजनामध्ये मागणी व पुरवठ्यामध्ये समन्वय साधून किंमतवाढ रोखून आर्थिक स्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो.

**वित्तीय नियोजनाच्या मर्यादा :**

१. कर रूपाने वित्तीय साधनसामुग्री गोळा केल्यास लोकांच्या बचत करण्याच्या क्षमतेवर प्रतिकूल परिणाम होतो.

२. अविकसीत देशात पैशाचा वापर करणारे क्षेत्र व पैसा न वापरणारे क्षेत्र वस्तुविनीमय अशी दोन आर्थिक क्षेत्रे असतात. यामुळे एका बाजूस वस्तुचा तुटवडा दुसऱ्या बाजूस चलनवाढ हे दोन अडथळे निर्माण होतात त्यामुळे वित्तीय नियोजन करणे अवघड होते.

३. देशामध्ये वस्तूचा पुरवठा वाढविण्यासाठी वस्तूची आयात करावी लागते. त्याचा परिणाम व्यापारावर प्रतिकूल होते त्यामुळे वित्तीय नियोजन करणे अवघड जाते.

४. वित्तीय नियोजनाचा वापर एका क्षेत्रापुरता यशस्वी होते परंतू संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठी अविकसीत देशात राबविणे अनेक कारणांनी अडचणीचे ठरते.

**ब) वास्तव, भौतिक किंवा वस्तुनिष्ठ नियोजन**

आर्थिक विकासाच्या दृष्टीकोनातून कोणत्याही आर्थिक प्रकल्पासाठी वेगवेगळी वास्तव साधनसामुग्री लागते. देशात भुमी, श्रमिक, यंत्रसामुग्री, वीज, कच्चामाल, खनिजे ही सामुग्री किती आहे त्याची गुणवत्ता व कार्यक्षमता किती आहे याचा विचार करून ठरविलेली वास्तव उद्दिष्टे साध्य करण्यासाठी केलेली योजना म्हणजे वास्तव नियोजन होय.

भारतीय नियोजन मंडळाच्या मते, उत्पन्न आणि रोजगार महत्तम राहण्याच्या दृष्टीकोनातून अपेक्षित असलेल्या उत्पादन घटकाच्या वाटपाच्या वास्तव उत्पादन घटकाच्या बाबत आराखडा तयार करणे म्हणजे वास्तव किंवा भौतिक नियोजन होय.

वास्तव नियोजनात जी उद्दिष्टे ठरविली जातात त्यामध्ये शेती, उद्योग व सेवांचे किती उत्पादन करणे आवश्यक आहे, त्यासाठी किती प्रमाणात श्रम, कच्चा माल व यांत्रिक साधने आवश्यक असतील व त्यातून उत्पन्नात, रोजगारात व गुंतवणूकीत किती भर पडेल. त्याची पातळी कशी राहील याबाबत विचार करावा लागतो. उदा. पोलादाचे एक टन अधिक उत्पादन करण्यासाठी किती कोळसा, लोखंड, मनुष्यबळ, वीज याबाबत विचार करून लक्ष्य ठरवून त्यासाठी किती भौतिक साधनाची गुंतवणूक करावी लागेल याबाबत नियोजन करणे. मॉरीस डॉब यांच्या मते वास्तव नियोजन म्हणजे अर्थव्यवस्थेतील वस्तूच्या उत्पादनाचा व वाटपाचा एकत्रीत आराखडा असतो. रशियाने भौतिक नियोजनाचा वापर करून विकास साध्य केला आहे.

**वास्तव / भौतिक / नियोजनाच्या मर्यादा :**

**१) योग्य आकडेवारीचा अभाव :** अविकसीत देशामध्ये उपलब्ध साधन सामुग्रीबद्दल निश्चीत व योग्य माहीती नसते त्यामुळे अपुऱ्या आकडेवारीच्या अधारे केलेले नियोजन अयशस्वी होते.

**२) अविकसीत देशामध्ये तांत्रिक क्षेत्र मागासलेले असते :** निसर्गातील बदलामुळे शेतीवर होणारे अनिष्ठ परिणाम उत्पादनात घट तसेच वीज टंचाईमुळे औद्योगिक उत्पादनामध्ये घट मुलभूत पायाभूत सुविधांचा अभाव त्यामुळे या सर्व घटकामध्ये समन्वय साधने कठीण जाते.

३) नियोजनाच्या भौतिक उद्दिष्टांमध्ये कमतरता निर्माण झाली तर भाववाढ होण्याची शक्यता असते.

४) अविकसीत देशामध्ये वित्तीय साधनसामुग्रीचा विचार न करता नियोजनाचा आराखडा तयार केल्यास योजना यशस्वी होत नाही.

**८) प्रेरित किंवा उत्तेजनात्मक नियोजन (Indicative Planning) :**

उत्तेजनात्मक नियोजन हे पूर्णपणे लोकशाही नियोजनाचा प्रकार आहे असे म्हणता येईल कारण या नियोजनामध्ये ठरविलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कोणत्याही प्रकारची सक्ती न करता अर्थव्यवस्थेमधील विविध क्षेत्रांत उत्तेजन किंवा प्रोत्साहन देऊन ही उद्दिष्टे पूर्ण केली जातात.

या नियोजन प्रकारामध्ये लोकांना उत्पादन, उपभोग व व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य असते. अपेक्षित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी लोकांचे मन वळविले जाते. विशिष्ठ आर्थिक प्रयत्नासाठी लोकांना उद्युक्त केले जाते. बँकिंग विषयक, चलनविषयक, व्यापारविषयक धोरणाचा अवलंब करून लोकांना विशिष्ठ पद्धतीने उत्तेजीत केले जाते.

उत्तेजनात्मक नियोजनामध्ये किंमत विषयक धोरणास अनन्य साधारण महत्त्व आहे. यासाठी प्रेरीत अंमलबजावणीचे साधन म्हणून अंदाजपत्रकाचा वापर केला जातो. शासनास एखाद्या वस्तूचे उत्पादनामध्ये वाढ व्हावी असे वाटत असेल. त्यावेळी मालावरील कराचे दर कमी केले जातात. त्याबरोबर शासनाकडून अशा उत्पादनास अर्थिक मदत केली जाते. याउलट एखाद्या वस्तूचे उत्पादन अधिक वाढू नये असे वाटत असेल तर अशावेळी सरकार त्या उत्पादनावर जादा कर आकारणी करेल. बाजारपेठेमध्ये एखाद्या वस्तूची कृत्रिम टंचाई निर्माण झाली असेल किंवा वस्तूची खूपच टंचाई निर्माण झाली असेल अशावेळी शासनातर्फे सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून त्या वस्तूचा रास्त किमंतीला वस्तूचा पुरवठा केला जातो. त्यामुळे वस्तूच्या किमंतीवर नियंत्रण ठेवले जाते. प्रेरीत नियोजन पद्धतीत मध्यवर्ती बँकेचे चलनविषयक धोरण हे महत्त्वपूर्ण कार्य पूर्ण करणे, बचत व गुंतवणूकीसाठी मध्यवर्ती बँकेचा व्याजदर अत्यंत महत्त्वाचा ठरतो. त्यादृष्टीने पतचलनाच्या धोरणावर संख्यात्मक व गुणात्मक साधनांचा वापर वेळोवेळी केला जातो.

**प्रेरित नियोजनातील दोष / उणिवा :**

१. नियोजित आर्थिक विकासाला बळ देण्यासाठी भांडवल, गुंतवणूकीचा वेग वाढविण्याच्या दृष्टीकोनातून शासनाचे चलन विषयक धोरण अपुरे पडते.

२. उत्पादक व उपभोक्त्यांना ज्या प्रकारे वागावे अशी शासनाची अपेक्षा असते त्यासाठी ज्या आर्थिक प्रेरणा शासनाकडून दिल्या जातात त्या गरजेच्या मानाने कमी असतात, नियोजनाच्या उद्दिष्टासाठी ती अपूरी पडतात.

३. प्रेरित नियोजनामध्ये बाजार यंत्रणेला अनन्यसाधारण महत्त्व असते. या नियोजनात मागणी व पुरवठा यामध्ये

समतोल साधने शक्य होत नाही. त्यामुळे काहीवेळा अतिरिक्त उत्पादन होते तर काही वेळा कमी उत्पादन होते.

### ९) कायमचे नियोजन व तात्पुरते नियोजन (Permanent Planning and Emergency Planning) :

ज्या नियोजनामध्ये तत्व व्यवहार म्हणून आर्थिक नियोजनाचा कायम स्वीकार केला जातो त्याला कायमचे नियोजन म्हणतात. यामध्ये दीर्घकाळ विचारात घेऊन उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी नियोजन केले जाते. अशा प्रकारचे राबविले जाणारे नियोजन हे रशिया, चीन, पोलंड या देशामध्ये दिसून येते. याची व्याप्ती मोठी असून ती विशिष्ठ सामाजिक व आर्थिक तत्वावर अधारलेली आहे.

तात्पुरते नियोजन हे कमी कालावधीसाठी असते. देशामध्ये तत्कालीन ज्या समस्या उद्‌भवत असतात अशा समस्या हातण्यासाठी उदा. दुष्काळ, युद्ध, भाववाढ, मंदी यासारख्या परिस्थितीमध्ये तात्पुरत्या स्वरूपाच्या नियोजनाचा स्वीकार केला जातो.

### सार्वत्रिक नियोजन व अंशतः नियोजन (Comprehensive Planning and Partial Planning) :

देशातील शेती, उद्योग, वाहतुक, दळणवळण या विविध क्षेत्रातील एका क्षेत्रापैकी एखाद्या विशिष्ट घटकाचे नियोजन केले जाते. तेव्हा त्यास अंशिक नियोजन म्हणतात. अर्थव्यवस्थेतील सर्व घटकांचा विचार न करता त्यातील एका घटकाचा विचार या नियोजनात केला जातो. उदा. शेतीचे संपूर्ण नियोजन न करता त्यातील पिकांच्या लागवडी (Crop Planning) संबंधी किंवा उद्योगातील दगडी कोळशाच्या पुरवठ्याचे नियोजन इ. प्रा. लेविस यांच्या मते, ''अंशिक नियोजन हे तुकड्या तुकड्यांनी केले जाणारे नियोजन असते.''

सार्वत्रिक नियोजन म्हणजे अर्थव्यवस्थेतील सर्व साधनसामुग्रीचा, सर्वक्षेत्र घटकांचा विचार करून नियोजनाचा आराखडा तयार केला जातो. त्यास सार्वत्रीक नियोजन म्हणतात. अंशिक नियोजनापेक्षा सार्वत्रिक नियोजन हे नियोजनाच्या दृष्टीकोनातून अधिक यशस्वी व कार्यक्षम ठरते.

## १.२.४ नियोजनाच्या यशस्वीतेसाठी आवश्यक अटी (Necessary Conditions for the Success of Planning)

विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया असून ती अविरतपणे कार्य करीत असते. नियोजनाशिवाय तरणोपाय नाही, नियोजन करा किंवा नष्ट व्हा, नियोजन हीच यशाची गुरूकिल्ली आहे. याचा प्रत्यक्षात वापर करून कमी कालावधीमध्ये यश संपादन करणाऱ्या रशियाने ही बाब जगाच्या दृष्टीपटलावर आणून दिली याचा प्रभाव विकसीत व अविकसीत राष्ट्रावर होऊन मुक्त भांडवलशाही देशानीही त्याचा कमी अधिक प्रमाणात स्वीकार केल्याने नियोजनाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले. नियोजनाशिवाय अविकसीत देशाचा विकास होणे कठीण आहे हे जरी सत्य असले तरी नियोजनाचे यश संपादन करण्यासाठी कोणती पद्धत योग्य व उपयुक्त आहे ही बाब अतिशय महत्त्वाची आहे.

### १) विश्वसनीय सांख्यिकीय माहितीची उपलब्धता :

कोणत्याही देशाला नियोजन यशस्वी करावयाचे असेल तर नियोजनकर्त्यांना देशातील विविध घटकांसंदर्भात

वस्तुस्थिती ज्ञात असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. देशांतर्गत असणारी नैसर्गिक साधन संपदा, लोकसंख्या, कच्चामाल, भांडवल, रोजगार उपभोग प्रवृत्ती, बचत प्रवृती, गुंतवणूकीची रचना, परकीय विनीमय साठा, उत्पादन तंत्र, सध्याची स्थिती इ. बाबतची वस्तुनिष्ठ पुरेशी विश्वसनीय बिनचूक माहिती उपलब्ध असणे आवश्यक आहे. ही माहिती मिळाल्याखेरीज नियोजन करणे अशक्य असते. चुकीची व अपूरी माहितीच्या आधारे नियोजनामध्ये अनेक अडथळे निर्माण होतात. हे टाळण्यासाठी देशांतर्गत विविध संघटनाच्या माध्यमातून सांख्यिकीय आकडेवारी गोळा करणे क्रमप्राप्त आहे. भारतामध्ये ही माहिती स्टॅटीकल ऑरगनायझेशन, आर.बी.आय., श्रम मंत्रालय, एन.एस.एस., शेती व उद्योग मंत्रालय यांचेकडून विश्वसनीय माहितीचे संकलन केले जाते. मिळालेल्या आकडेवारीच्या आधारे नियोजनाची अचूक आखणी व अंमलबजावणी करणे शक्य होते. विश्वसनीय आकडेवारी शिवाय कोणत्याही देशाने नियोजनाचा मार्ग स्वीकारू नये यशस्वी नियोजनासाठी विश्वसनीय सांख्यिकीय आकडेवारी, संशोधन, कार्यक्षम शासन प्रणाली इ. गोष्टी महत्त्वाच्या असतात.

**२) प्रभावी शक्तीशाली शासन / सरकार :**

नियोजन यशस्वी व्हायचे असेल तर देशातील सरकार व प्रभावी नेतृत्व भक्कम असावे लागते. योजनेची बांधणी व अमंलबजावणी करण्याचे अधिकार त्या सत्तेला असतील तरच नियोजनाला यश मिळू शकते. साम्यवादी रशिया १९२८ मध्ये नियोजनाचा स्वीकार करून कमी कालावधीमध्ये जादा विकास ही संकल्पना यशस्वी करून दाखविली त्याचे श्रेय प्रभावीपणे केलेली नियोजनाचे आखणी अंमलबजावणी बरोबरच प्रभावी साम्यवादी शासन व्यक्तिला मिळालेले अधिकार होय. लोकशाही तत्वप्रणालीमध्ये केंद्रिय नियंत्रण प्रभावी राहत नाही. रशियाचा झालेला विकास पाहून भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी नियोजनातून विकासाकडे ही संकल्पना घेऊन योजना आयोगाची स्थापना केली. या नियोजन मंडळामध्ये शेतीतज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ, गणितीय तज्ज्ञ यांची नेमणूक करून नियोजनाचा आराखडा, अंमलबजावणी करण्याचे संपूर्ण अधिकार नियोजन मंडळाकडे सोपवून भारताने ही लोकशाही समाजवादाचा अवलंब केला.

सरकार कोणत्याही पक्षाचे असले तरी विकासाची प्रक्रिया सुरू केली, केंद्रिय सत्ता प्रभावी स्थिर भक्कम असेल तर नियोजन यशस्वी होण्यासाठी कोणतीही अडचण निर्माण होत नाही.

**३) निश्चीत स्वरूपाची उद्दिष्टे :**

नियोजन कार्यक्रम हाती घेण्यापूर्वी नियोजनाची उद्दिष्टे स्पष्ट अचूक व निश्चीत स्वरूपाची असणे आवश्यक आहे. त्याखेरीज नियोजनाला यश प्राप्त होत नाही. अशी उद्दिष्टे ही आर्थिक, सामाजिक व राजकीय स्वरूपाची असतात. नियोजनकारांना नियोजनाचा कार्यक्रम हाती घेण्यापूर्वी उद्दिष्टांना प्राधान्यक्रम द्यावा लागतो. त्यासाठी उद्दिष्टांचे स्वरूप स्पष्ट व निश्चीत असावे लागते. जेणेकरून कोणत्या उद्दिष्टांना प्राधान्यक्रम देता येईल हे ठरविणे सोपे जाते व त्याबाबत नियोजनाची आखणी करता येते. उदा. सर्वसामान्य लोकांच्या राहणीमानात वाढ करणे, रोजगार संधी निर्माण करणे, बेरोजगारी दूर करणे, उत्पन्नातील विषमता कमी करणे, प्रादेशिक समतोल राखणे, आत्मनिर्भरता, पर्यावरणीय समतोल अशी असणारी उद्दिष्टे भारतीय नियोजनात आढळतात. निश्चीत स्वरूपाची उद्दिष्टे ठरवून जर नियोजनाचे कार्य हाती घेतले तर त्यास यश प्राप्ती मिळते.

## ४) लक्षाची निश्चिती आणि अग्रक्रम :

योजनाच्या यशस्वीतेसाठी अचूक लक्ष्ये (Target) निश्चीत करून त्याला अग्रक्रम देणे महत्त्वाचे आहे. उद्दिष्टे निश्चिती संदर्भात कोणती उद्दिष्ट्ये महत्त्वाची व कोणती कमी महत्त्वाची या संदर्भात प्राधान्यक्रम ठरवावा लागतो. उद्दिष्टांचे परिमाणीकरण (Quantification) केल्यावर ती उद्दिष्टे लक्ष ठरतात. उद्दिष्टे मांडून चालत नाही तर ती साध्य करण्यासाठी त्यामध्ये स्पष्टता असणे महत्त्वाचे आहे. उद्दिष्ट व लक्ष्ये हे शब्द ह्याच अर्थाने वापरले जातात परंतू त्यामध्ये साम्य दिसून येते. देशातील दरडोई उत्पन्न वाढविणे हे उद्दिष्टे ठरविले तर त्यास उद्दिष्ट म्हणता येईल. परंतू दरवर्षी ६% ने वाढवायाचे असे म्हणतो. त्यावेळी ६% ही दर लक्ष्य (Target) असते. जाणीवपूर्वक प्रयत्न आणि कृतीशिवाय लक्ष्ये प्राप्ती होत नाही. यासाठी लक्ष्य पुर्ततेसाठी योग्य धोरण, नियोजन साधणे यांची सांगड घालावी लागते नाहीतर लक्ष्ये ही केवळ अंदाज म्हणून राहतात.

## ५) नियोजनाचा कालावधी :

कोणतीही योजना ही कालबद्ध असणे आवश्यक आहे. नियोजनाचा कालावधी किती असावा याबाबत मतभिन्नता दिसून येते. प्रत्येक देशामध्ये हा कालावधी भिन्न भिन्न स्वरूपाचा असतो. सोव्हीएट रशियामध्ये पाच ते सात वर्षे, फ्रान्समध्ये चार वर्षे तर भारतामध्ये तो पाच वर्षे इतका आहे. ठरविलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी वार्षिक, अल्पकालीन, मध्यम योजनाचा कालावधी हा अपूरा पडतो. त्यासाठी दीर्घकालीन योजनेचा लाभ मोठ्या प्रमाणात होतो. त्यामुळे दिर्घकालीन योजना आखणे हे विकासाच्या दृष्टीने इष्ट ठरते. निश्चीत उद्दिष्टे प्राप्त होण्यासाठी, महत्त्वाचे प्रकल्प पूर्ण होण्यासाठी आवश्यक असणारा कालावधी लक्षात घेऊन योजनेचा कालावधी निश्चीत करावा.

## ६) योजनेचे समन्वय व सातत्य :

योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करीत असताना योजनेमधील विविध घटकामध्ये समन्वय व सातत्य असणे महत्त्वाचे आहे. कारण योजनेचे यश या घटकावरती अवलंबून असते. देशातील प्राथमिक, द्वितीय व तृतीय क्षेत्र यांचा समन्वय साधणे हे विकासाच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्त्वाचे आहे. औद्योगिक विकास साध्य करत असताना लघु व कुटिर उद्योगावर वाईट परिणाम होणार नाही याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले पाहिजे. शेती, शेतीपूरक व्यवसायांचा विकास करून त्यामध्ये समन्वय साधला पाहिजे. थोडक्यात अर्थव्यवस्थेतील शेतीक्षेत्र, औद्योगिक क्षेत्र, सेवा क्षेत्रामध्ये समन्वयाची भूमिका असणे महत्त्वाचे आहे.

नियोजनाची उद्दिष्टे स्पष्ट केली, धोरणे ठरविली म्हणजे नियोजन पूर्ण झाले असे होत नाही. नियोजन ही दीर्घकाळ व चिरंतर चालणारे प्रक्रिया आहे. एक योजना संपली की दुसरी योजना सुरू होते. त्यामध्ये सातत्य असणे हे देशाच्या नियोजनाच्या दृष्टीने फायदेशीर ठरते. उदा. शेती व औद्योगिक धोरण योग्य वेळी जाहीर केले. त्याचा शेतकरी व उद्योजकांना फायदा होऊन उत्पादनाबाबत योग्य निर्णय घेतल्यामुळे उत्पादनातील सातत्य टिकवून राहील.

### ७) तज्ज्ञांची समिती :

नियोजन यशस्वी होण्यासाठी केवळ नियोजन तंत्राचा अवलंब करणे पुरेसा नाही तर त्या क्षेत्रातील तज्ज्ञ घटकाची आवश्यकता लागते. सरकारला विविध कार्यक्रमाची धोरणे ठरवित असताना अनेक समस्या उद्‌भवत असतात त्या समस्याचे निराकरण करण्यासाठी त्या क्षेत्रातील तज्ज्ञ सल्लागारांची गरज भासते. त्यामध्ये अर्थतज्ज्ञ, शेतीतज्ज्ञ, सहकार तज्ज्ञ, सांख्यिकीय तज्ज्ञ यांचा सहभाग महत्त्वाचा असतो. जेणेकरून सरकारपुढे वेळोवेळी ज्या उद्‌भवणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी तज्ज्ञ व जाणकार गटाची आवश्यकता असते.

### ८) विकेंद्रीकरणाच्या धोरणाचा अवलंब :

देशाच्या विकासाच्या दृष्टीकोनातून उद्योगधंद्याचे व इतर क्षेत्राचे विकेंद्रीकरण होणे ही विकासाच्या दृष्टीकोनातून महत्त्वाची गोष्ट आहे. विविध योजनांची अंमलबजावणी ही निव्वळ केंन्द्रीय स्तरावर न होता ती राज्यस्तरीय व स्थानिक पातळीवर होणे आवश्यक असते. योजना तयार करीत असताना स्थानिक घटक विचारात घेऊन त्याचा आधार घेणे क्रमप्राप्त ठरते. त्यादृष्टीने भारतातील प्रादेशिक नियोजनाचा प्रयोग प्रशंसनीय आहे. स्थानिक स्तरावर नियोजन करून त्याची अंमलबजावणी करणे उदा. हागणदारीमुक्त गाव मोहीम हे त्याचे आदर्श उदाहरण सांगता येईल. विकासाची गंगा तळागाळापर्यंत पोहचवायची असेल तर विविध योजनांचे विकेंद्रीकरण होणे गरजेचे आहे.

### ९) व्यवस्थापनातील काटकसर :

विकासाच्या योजना तयार झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्यासाठी जी यंत्रणा उभी केलेली असते त्यावर होणारा खर्च काटकसरीने केला तर ती योजना निश्चीतपणे यशस्वी होत असते. विविध योजनावर केला जाणारा खर्च हा करांच्या माध्यमातून लोकांकडून गोळा केला जातो हा खर्च लोकांच्या कल्याणकारी योजना राबविण्यासाठी होत असेल, त्याचे योग्य व्यवस्थापन, काटकसरीचा वापर, पैशाची उधळपट्टी नसेल तर ती योजना यशस्वी होते.

### १०) जनतेचे सहकार्य :

नियोजनाच्या कार्यक्रमामध्ये शासनाबरोबर लोकांचा सक्रिय सहभाग असणे हे नियोजनाच्या यशप्राप्तीसाठी आवश्यक बाब आहे. जनतेला फायदेशीर ठरणारे असे रस्ते, पाणी, शिक्षण, गृहबांधणी, शेती, विहरी व इतर असे लोकाभिमूख सार्वजनिक उपक्रम हाती घेतल्यास जनतेचा पाठींबा व सहभाग वाढेल. विकासाच्या प्रक्रियेमध्ये कोणतीही अडचण उद्‌भवणार नाही प्रा. लेविस यांच्या मते लोकांचा असणारा उत्साह व सहभाग हा एका अर्थाने यशस्वी नियोजनाचे वंगण व आर्थिक विकासाच्या इंजिनचे पेट्रोल मानता येईल.

देशामध्ये सामाजिक, राजकीय, आर्थिक स्थिरता, धार्मिक बंधुभाव, लोकाभिमुख उपक्रम, तज्ज्ञ घटक, उद्दिष्टांची स्पष्टता, लोकांमधील जाणीवजागृती असे सकारात्मक घटक निर्माण झाल्यास लोकांचा सहभाग वाढून नियोजन यशस्वीरित्या पूर्ण होते.

## १.३ सारांश :

आर्थिक विकासासाठी नियोजन हे अत्यंत प्रभावी माध्यम असून नियोजन ही दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. नियोजनाचे स्वरूप व व्याप्ती ही देशातील उत्पादन साधनसामुग्रीची मालकी कोणाकडे आहे यावरून ठरते. सर्वसाधारणपणे देशातील उपलब्ध साधनसामुग्रीचा पर्याप्त वापर करण्यासाठी पुर्वनियोजन करून महत्तम लाभदायक उपयोग करण्याच्या दृष्टीने स्विकारलेली पद्धती म्हणजे आर्थिक नियोजन म्हणता येईल. सामाजिक व आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी नियोजनाचा प्रभावी वापर केला जातो. भारतामध्ये सन १९५१ मध्ये पंचवार्षिक योजनेची सुरूवात झाली असली तरी नियोजनाद्वारे आर्थिक विकास साध्य करण्याचा प्रयत्न स्वातंत्र्यपुर्व काळातही झाला आहे. नियोजनाचे विविध प्रकार असून देशाने नियोजनाचा कोणता प्रकार स्विकारावा हे या देशातील सामाजिक, राजकीय व आर्थिक परिस्थिती विचारात घेवून ठरवावे लागते. नियोजन ही दीर्घकालिन प्रक्रिया असून नियोजनाची अपेक्षित उद्दिष्टे साध्य होण्यासाठी दीर्घकाळ वाट पहावी लागेल हे निश्चित.

## १.४ पारिभाषिक शब्द :

१) प्रेरित : उत्तेजनात्मक

२) मुक्त : स्वतंत्र

३) भौतिक : वास्तव, वस्तुनिष्ठ

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्न

### अ) खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.

१. नियोजन ही संकल्पना सर्वप्रथम ........ यांनी मांडली.

अ) रूसो ब) प्रा. रॉबिन्सन क) प्लेटो ड) यापैकी नाही

२. जागतीक स्तरावर अर्थिक नियोजनाची सुरूवात प्रथम ....... या देशामध्ये झाली.

अ) भारत ब) रशिया क) अमेरिका ड) यापैकी नाही

३. नियोजनाच्या विरोधी ............. हा मुद्दा मांडला जातो.

अ) कष्टकऱ्यांना मोबदला नाही ब) लाल फितीचा धोका

क) अर्थिक स्वातंत्र्याचा संकोच ड) वरील सर्व

४. अर्थिक नियोजन ही एक शिस्त असून ती ............ चालणारी प्रक्रिया आहे.

अ) अल्पकाळ ब) दीर्घकाळ क) समकाळ ड) यापैकी नाही

५. ........ मते सर्वच अर्थिक व्यवहारात नियोजनाची आवश्यकता असते.

अ) प्रा. रॉबीन्सन ब) प्रा. बेन क) डॉ. डाल्टन क) प्रा. डिकीन्सन

६. ……… यांनी नियोजन करा किंवा नष्ट व्हा असा संदेश दिला.

अ) महात्मा गांधी ब) एम. विश्वेश्वरय्या क) रूसो ड) यापैकी नाही

७. आदेशात्मक नियोजनात ……….. सत्ता नियोजनाचे सर्व कार्यक्रम ठरविते.

अ) व्यक्तीची ब) मध्यवर्ती क) समाजाची ड) यापैकी नाही

८. वास्तव नियोजनालाच ……….. नियोजन म्हणतात.

अ) भौतीक ब) प्रादेशिक क) राष्ट्रीय ड) यापैकी नाही

९. नियोजनाच्या यशस्वीतेसाठी ………… ही पूर्व अट ठरते.

अ) प्रभावी शासन ब) योजनेचे सातत्य क) निश्चीत उद्दिष्टे ड) वरील सर्व

१०. ……… यांच्या मते वास्तव नियोजन म्हणजे अर्थव्यवस्थेतील वस्तूंच्या उत्पादनाचा व वाटपाचा एकत्रीत आराखडा असतो.

अ) रूसो ब) प्लेटो क) प्रा. मॉरीस डॉब ड) यापैकी नाही

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. आर्थिक नियोजन म्हणजे काय? अविकसीत देशासाठी नियोजनाची आवश्यकता स्पष्ट करा.

२. नियोजनाच्या यशस्वीतेसाठी आवश्यक पूर्व अटी कोणत्या ?

३. आर्थिक नियोजनाच्या विविध प्रकारांची थोडक्यात माहिती द्या.

४. आर्थिक नियोजनाविरोधी युक्तीवाद स्पष्ट करा.

५. स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतातील विविध अर्थिक योजनांचा उगम सांगा.

**क) लघुत्तरी प्रश्न.**

१. सर विश्वेश्वरय्या योजना

२. मुंबई योजना

३. भौतीक नियोजन व वित्तीय नियोजन

४. रचनात्मक व कार्यात्मक नियोजन

५. आदेशात्मक नियोजन

**ड) वस्तुनिष्ठ प्रश्न (विधाने चूक की बरोबर सांगा)**

१. वित्तीय नियोजनातील उद्दिष्टे पैशाच्या स्वरूपात मांडली जातात.

२. आंशिक नियोजन हे तुकड्या तुकड्यांनी केले जाणारे नियोजन असते.

३. विकेंद्रीत नियोजन हे वरून खाली झिरपत जाणारे नियोजन असते.

४. आर्थिक नियोजन साध्य नसून साधन आहे.

५. जागतीक स्तरावर अर्थिक नियोजनाची सुरूवात प्रथम भारत या देशामध्ये झाली.

## १.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

### अ) वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे (योग्य पर्याय निवडा)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | क) प्लेटो | २. | ब) रशिया |
| ३. | ड) वरील सर्व | ४. | ब) दीर्घकाळ |
| ५. | अ) रॉबीन्सन | ६. | ब) एम. विश्वेश्वरय्या |
| ७. | ब) मध्यवर्ती | ८. | अ) भौतीक |
| ९. | ड) वरील सर्व | १०. | क) मॉरीस डॉब |

### ड) वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे (चूक की बरोबर)

१) बरोबर २) बरोबर ३) चूक ४) बरोबर ५) चूक

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


१. भोसले के. एम. आणि काटे के. बी. (२०१६). ''अर्थिक विकास व नियोजन'', फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२. देशमुख प्रभाकर (१९८७). ''अर्थिक धोरण आणि नियोजन'', पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

३. Jhingan, M. L. (2007). "The Economics of Development and Planning", 39th Revised and Enlarged Edition, Published by Vrinda Publications (P) Ltd., B-5 Ashish Complex.

४. Kavimandan, Vijay (1990). "Economics of Development and Planning", Fourth Edition, Published by Shri. Shantadurga Niwas, Navi Ramdas Peth, Nagpur - 440010.

५. Lekhi R.K. (2010). Fourtenth Revised Edition, Published by Kalyani Publisherr, B-1/1292, Tajinder Nagar, Ludhiana-141008.

६. Mishra S.K. and Puri V.K. (1989). "Develoment and Planning (Theory and Practice)". Fourth Revised Edition, Published by Himalaya Publishing House (Bombay-Nagpur-Delhi), Ramdoot. Dr. Bhalerao Marg, Girgaon, Bombay-400004.

७. पंडीत शांता आणि सुर्यवंशी एम. एच. (१९८०). विकासाचे व नियोजनाचे अर्थशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

८. पाटील ज. फा. आणि ताम्हणकर पी. जे. (१९८०). ''आर्थिक विकास व नियोजन, भाग-२'', प्रकाशक कुलकर्णी, ए. ए. कॉन्टीनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे-३०.

९. Seth M.L. (1969). "Theory and Practice of Economic Planning", Fourth Edition (Throughly Received and Enlarged). Published by S. Chand and Co., Ram Nagar, New Delhi-55.


***

# घटक २

# आर्थिक नियोजनातील समस्या

**ISSUES IN ECONOMIC PLANNING**

**अनुक्रमणिका**


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

२.२.१ उत्पादन तंत्राची निवड : श्रम प्रधान भांडवल प्रधान

२.२.२ भांडवल - उत्पादन गुणोत्तर : महत्त्व आणि परिणाम करणारे घटक

२.२.३ आदान-प्रदान विश्लेषण : अर्थ आणि उपयोग

२.३ सारांश

२.४ पारिभाषीक शब्द

२.५ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.८ क्षेत्रीय कार्य

२.९ संदर्भ ग्रंथ


## २.० उद्दिष्ट्ये

प्रस्तुत घटकाच्या अध्ययनाद्वारे पुढील उद्दिष्ट्ये साध्य करता येतील.

* आर्थिक नियोजनाच्या दरम्यान उत्पादन - तंत्र निवडीची निर्मिती होणारी समस्या सोडविण्यासाठी श्रम प्रधान, भांडवल प्रधान उत्पादन तंत्र समजावून घेता येईल.
* भांडवल-उत्पादन गुणोत्तर अर्थ आणि घटक समजावून घेता येतील.
* आदान-प्रदान विश्लेषण अर्थ आणि उपयोग समजावून घेता येईल.
* प्रकल्प मूल्यमापनाचा अर्थ आणि महत्त्व समजावून घेता येईल.

## २.१ प्रास्ताविक :

आर्थिक विकासासाठी 'आर्थिक नियोजन' हे एक उपयुक्त साधन मानले जाते. जगातील बहुतांश विकसनशील आणि विकसित राष्ट्रे आर्थिक नियोजनाद्वारे आर्थिक विकास तसेच आर्थिक वृद्धीचा उच्चतर दर गाठण्याकरिता प्रयत्नशील असल्याचे दिसून येतात. सर्वसाधारणपणे सर्वच प्रकारच्या अर्थव्यवस्थांमध्ये आर्थिक नियोजनाची भूमिका व त्याची कार्यपध्दती समजावून घेणे महत्त्वाचे असते. आर्थिक नियोजनाद्वारे आर्थिक विकास ही व्यूहरचना यशस्वी करण्याकरिता देशातील नागरिकांना विकास नियोजनाची संकल्पना, नियोजनाच्या कार्यवाही दरम्यान विचारात घ्यावी लागणारी काही आर्थिक विश्लेषण तंत्रे, त्यामधील सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे कोणत्या प्रकारच्या उत्पादन तंत्राची निवड करावयाची याबाबत देशादेशांत मतभिन्नता आढळते. अविकसित देशात नैसर्गिक साधनसामग्री विपुल असते परंतु भांडवलाची टंचाई असते. त्यामुळे उपलब्ध भांडवलाचा अधिकाधिक काटकसरीने चांगला वापर करून आर्थिक विकास कसा साधता येईल याचा विचार नियोजन करताना करावा लागतो. कारण त्याद्वारे आर्थिक नियोजनांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना व कार्यक्रमांची अंमलबजावणी यशस्वीरित्या करता येणे शक्य होते, आवश्यक ठरते. विशिष्ट उत्पादन किमान खर्चात करणारे अथवा विशिष्ट साधनांपासून कमाल उत्पादन करणारे तंत्र सर्वोत्कृष्ट तंत्र होय. साधारणतः श्रम आणि भांडवल या दोन घटकांच्या संदर्भात उत्पादन तंत्राचा विचार केला जातो.

## २.२ विषय विवेचन :

आपण घटक क्र. १ मध्ये आर्थिक नियोजनाची ओळख म्हणजे काय याचा अभ्यास केला आहे. प्रस्तुत घटक क्र. २ मध्ये आर्थिक नियोजनातील चर्चेचे विषय याचा अभ्यास करीत असताना काही आर्थिक विश्लेषण तंत्रे आणि त्यांचा वापरा दरम्यान निर्माण होणाऱ्या समस्यांचा आढावा घेण्यात आला आहे. त्यामध्ये श्रमप्रधान उत्पादन तंत्र, भांडवलप्रधान उत्पादन तंत्र, भांडवल उत्पादन गुणोत्तर, महत्त्व आणि घटक, आदान-प्रदान विश्लेषण अर्थ आणि उपयोग तसेच प्रकल्प मूल्यमापन अर्थ आणि महत्त्व इत्यादी घटकांचा अभ्यास या घटकामध्ये केला आहे.

### २.२.१ उत्पादन तंत्राची निवड – आर्थिक नियोजन :

**(The Choice of Technique Economic Planning )**

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत मर्यादित साधनसामग्रीच्या सहायाने ठरविलेली उद्दिष्ट्ये गाठावी लागतात. परंतु त्याचबरोबर विकास प्रक्रियेत समतोलही गाठावा लागणे, देशाची सद्यपरिस्थितीत वर्तमान विकासाची पातळी ज्या बाबीचा विचार करून भविष्यकालीन दिशा ठरविली जाते. त्यादृष्टीने आर्थिक नियोजन महत्त्वाचे ठरते. देशातील उपलब्ध साधनसामग्रीचा आढावा घेऊन विशिष्ट काळात ठराविक पूर्वनिश्चित उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी आणि देशातील एकूण साधनसामग्रीचा सामाजिकदृष्ट्या जास्तीत जास्त फायदेशीर उपयोग करून घेण्यासाठी लोकांच्या सहकार्याने योजना आखणे व तिची काटेकोर अंमलबजावणी करणे म्हणजे आर्थिक नियोजन होय. सध्याच्या काळात कल्याणकारी राज्याच्या कल्पनेनं प्रत्येक आर्थिक

क्षेत्रात सहकाराचा हस्तक्षेप हा अनिवार्य झाला आहे. प्रत्येक देशाने आपली आर्थिक परिस्थिती लक्षात घेवून विकास मार्गातील अडथळे दूर करण्यासाठी नियोजनाच्या मार्गाचा अवलंब करावा लागतो. एकूणच प्रगत आणि अप्रगत राष्ट्रांना उपलब्ध साधनसामग्रीचा वापर करताना देशात उपलब्ध असलेल्या उत्पादन घटकांचा विचार करून कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त उत्पादन करणाऱ्या उत्पादन तंत्राची (Choice of Technique in Production) निवड करावी लागते.

**उत्पादनातील तंत्राची निवड (Choice of Techniques in Production)**

विकासाची अनेक तंत्रे असतात परंतु कोणत्या तंत्राचा वापर करावयाचा हे त्या त्या देशातील परिस्थितीवर अवलंबून असते. उत्पादनाच्या विभिन्न साधनांचा एकमेकांशी संयोग घडवून आणून जास्तीत जास्त उत्पादन करणे शक्य असते. आपल्या जवळील साधनसामग्रीचा उत्तम उपयोग करून आर्थिक विकासास कशी गती घ्यावयाची ही अविकसित देशापुढील प्रमुख समस्या असते. अशा देशांमध्ये श्रम मुबलक परंतु भांडवल मात्र दुर्मिळ अशी परिस्थिती असते. श्रमप्रधान तंत्र परंपरागत असते तर भांडवलप्रधान तंत्र आधुनिक असते. विकसनशील देशांना हलक्या उद्योगांवर भर घ्यावयाचे की, अवजड उद्योगांवर, शेतीविकासाला प्राधान्य द्यावयाचे की, औद्योगिक विकासाला, ह्यातून एक पर्याय निवडावा लागतो परंतु अखेरीस विकास घडवून आणताना श्रमप्रधान तंत्राचा अवलंब करावा की, भांडवलप्रधान तंत्राचा याबाबत निर्णय घेणे आवश्यक ठरते.

**उत्पादन तंत्र अर्थ :**

विशिष्ट सेवा अथवा उत्पादन प्राप्त करण्याच्या दृष्टीने वेगवेगळ्या घटकांचे जे प्रमाण एकत्र करण्याच्या अथवा अशा उत्पादन घटकांचा विशिष्ट प्रमाणात मेळ घालण्याचा तंत्रास उत्पादनतंत्र असे म्हणतात.

थोडक्यात प्राप्त उत्पादन घटकांच्या वापरातून उत्पादन तंत्राचे पुढील दोन प्रकारात वर्गीकृत करण्यात येते.

* **श्रमप्रधान उत्पादन तंत्र**

* **भांडवलप्रधान उत्पादन तंत्र**

वरील दोन्ही उत्पादन तंत्राच्या निश्चिती विषयीचे स्पष्टीकरण या घटकांमध्ये करण्यात आले आहे.

* **श्रमप्रधान उत्पादन तंत्र : (Labour Intensive Technique in Production )**

जेव्हा भांडवलाच्या जोडीस मोठ्या प्रमाणात श्रमाच्या मात्रा वापरल्या जातात तेव्हा त्या उत्पादन तंत्रास श्रमप्रधान उत्पादन तंत्र असे म्हणतात. या उत्पादन तंत्रात भांडवलापेक्षा श्रमाचा वापर अधिक केला जातो. प्रा. नर्क्स, लेविस, मायर इत्यादी अर्थतज्ज्ञांनी अविकसित देशांनी भांडवलप्रधान उत्पादन तंत्राचा स्विकार करू नये असे मत मांडले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या तज्ज्ञांनीही अशाच प्रकारचे मत व्यक्त केले आहे. श्रमप्रधान तंत्राचा अंगिकार केल्यास उत्पादन विढविण्यासाठी भांडवलाचे प्रमाण वाढविण्याची

आवश्यकता नसते. श्रमाचा वापर पूर्वीपेक्षा अधिक जास्त करून उत्पादन घेता येते. अविकसित देशातील अतिरिक्त लोकसंख्या व भांडवलाची कमतरता या समस्यांचा पार्श्वभूमीवर श्रमप्रधान उत्पादन तंत्र अधिक समर्पक ठरते. अशा देशात श्रमप्रधान तंत्र वापरल्याने जास्तीत जास्त लोकांना रोजगार मिळू शकतो. अर्थव्यवस्थेतील मानवी साधनांचा उपयोग योग्य प्रकारे केला जातो. रोजगारी वाढल्याने उपभोगाच्या प्रमाणात वाढ होते. परिणामी गुंतवणूक चालना मिळून विकास अधिक वेगाने होण्यास मदत होते.


थोडक्यात, ज्या उत्पादन पद्धतीत उत्पादनाच्या एका मात्रेसाठी अधिक प्रमाणात श्रमशक्तीचा वापर केला जात असून भांडवलाचा वापर कमी प्रमाणात केला जातो, त्यास श्रमप्रधान उत्पादन तंत्र असे म्हणतात.

या तंत्रामध्ये भांडवलाऐवजी श्रमाचे प्रतिस्थापन करण्यास बराच वाव असतो. अप्रगत राष्ट्रात भांडवलाची टंचाई असल्याने शेती, लघुउद्योग, उपभोग्य वस्तूची निर्मिती करणारे उद्योग इत्यादीत भांडवलाचा वापर कमी करून त्याऐवजी श्रमशक्तीची प्रतिस्थापना करण्यात येते. परिणामी या उत्पादन तंत्राच्या अंमलबजावणीमुळे उत्पादकता वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. याचे परिदृश्य आकृती २.१च्या सहायाने स्पष्ट करता येईल.

**आकृतीच्या सहायाने स्पष्टीकरण :**

श्रमप्रधान उत्पादन तंत्राचे स्पष्टीकरण आकृती २.१ च्या सहाय्याने करता येईल. आकृतीमध्ये 'अय' अक्षावर भांडवल तर 'अक्ष' या अक्षावर श्रम दाखविले आहे. श्रम व भांडवल यांच्या सहकार्याने सुरुवातीस होणारे उत्पादन 'न न' या वक्राने दाखविले आहे. त्यावेळी 'स' या बिंदूने 'अ ब' भांडवल तर 'अ म' श्रमिकांचा वापर केला जात होता. जेव्हा नवीन उत्पादन वाढ होते तेव्हा ती वाढ 'न$_१$ न$_१$' या वक्राने आकृतीमध्ये दाखविले आहे. यातील नवीन श्रम व भांडवल संतुलन बिंदू स$_१$ हा आहे. यातील 'स' बिंदूने पूर्वीएवढेच 'अ, ब' भांडवल कायम ठेवून 'म म$_१$' एवढ्या जादा श्रमिकांचा वापर केला. अर्थातच या स्थितीत श्रमिकांचे कौशल्य वाढविणे आणि भांडवलसंचय वाढविणे ही उद्दिष्ट्ये साध्य झाली. श्रमप्रधान तंत्राचा अवलंब केल्यास भांडवलाच्या बचतीची प्रक्रीया सुरू होते.

**आकृती २.१ श्रमप्रधान उत्पादन तंत्र**



अविकसित राष्ट्रांनी सुरुवातीस श्रमाला प्राधान्य देणाऱ्या तंत्राचा स्वीकार केल्यास जसजसा आर्थिक विकास होईल तसतसे भांडवलाचे संचयन वाढत जाईल म्हणजेच विकासाच्या नंतरच्या काळात भांडवलप्रधान उत्पादन तंत्र स्विकारून लाभ प्राप्त करता येईल. परंतु विकासाच्या सुरुवातीस भांडवलप्रधान तंत्र योग्य नसून श्रमप्रधान तंज्ञाचा स्विकार योग्य ठरू शकतो.

**श्रमप्रधान उत्पादन तंत्राचे फायदे/लाभ :**

श्रमप्रधान उत्पादन तंत्राचे काही फायदे, लाभ लक्षात घेऊन या तंत्राचे समर्थन पुढील बाबीवरून स्पष्ट करता येईल.

१) बेकारी कमी करण्यास श्रमप्रधान उत्पादन तंत्र उपयुक्त ठरते.

२) श्रमप्रधान तंत्रामुळे अतिरिक्त श्रमशक्तीचा पर्याप्त वापर करणे शक्य होते.

३) अविकसित देशात अतिरिक्त लोकसंख्येमुळे श्रमपुरवठा जास्त असतो, परिणामी स्वस्त श्रमपुरवठ्यामुळे उत्पादन खर्चात घट होते.

४) उत्पादनाचे समान वितरण घडून येते.

५) श्रमप्रधान तंत्र स्वीकारल्यास भांडवलाची बचत होते.

६) भांडवलाची कमतरता असलेल्या व श्रमाची मुबलकता जास्त असणाऱ्या राष्ट्रांना श्रमप्रधान तंत्राचा अधिक फायदा होतो.

७) औद्योगिक विकेंद्रीकरणाचे फायदे मिळवता येतात.

८) एकूण उपभोग पातळीत वाढ घडून येते.

९) विदेशी चलनाची बचत होते.

१०) भाववाढीवर नियंत्रण ठेवणे शक्य होते.

११) आधारभूत संरचनेवरील खर्चात बचत होते.

**(ब) भांडवलप्रधान उत्पादन तंत्र (Capital Intensive Technique in Production) :**

जेव्हा श्रमाच्या जोडीस भांडवलाच्या मात्रा मोठ्या प्रमाणात वापर करून उत्पादन घेतले जाते तेव्हा त्या उत्पादन तंत्रास भांडवल प्रधान उत्पादन तंत्र असे म्हणतात. यामध्ये भांडवलाच्या वापरासाठीच फक्त श्रमिकांचा वापर केला जातो.


जेव्हा उत्पादनाच्या एका एककासाठी वापरल्या जाणाऱ्या भांडवलाचे प्रमाण अधिक असते परंतु त्या मानाने श्रमप्रमाण कमी असते अशा उत्पादन तंत्राला भांडवल प्रधान उत्पादन तंत्र असे म्हणतात. या उत्पादन तंत्रास सापेक्षतेने भांडवलाचा वापर अधिक केला जातो. उत्पादनाच्या प्रति एककामागे भांडवलाचे

प्रमाण अधिक राहते. प्रा. मिंट यांच्या मते, श्रमावरील कमी खर्च व वाढती उत्पादकता यामुळे भांडवलाद्वारे मिळणारे निव्वळ उत्पादन जास्त असते. प्रा. लेबिस्टीन, प्रा. हर्शमन, प्रा. गॅलेन्सन इ. अर्थतज्ञ भांडवलप्रधान तंत्राचे पुरस्कर्ते म्हणून ओळखले जातात. त्यांच्या मते, अविकसित देशांच्या विकासाकरिता भांडवलप्रधान तंत्र अधिक योग्य ठरते. या तंत्राचा वापर केल्यास आधुनिक तंत्रज्ञान उपयोगात आणता येते. हे तंत्र अधिक उत्पादनक्षम असल्याने कमी उत्पादन खर्च व जास्तीत जास्त उत्पादकता असा दुहेरी फायदा प्रवर्तकास मिळतो. नफ्याचे प्रमाण वाढते. प्रवर्तकांमध्ये बचत प्रवृत्ती अधिक असल्याने भांडवल उभारणीस प्रोत्साहन मिळते आणि आर्थिक विकास शीघ्र गतीने होण्यास वाढत्या भांडवल निर्मितीचा हातभार लागतो.

**आकृतीच्या सहाय्याने स्पष्टीकरण :**

भांडवलप्रधान उत्पादन तंत्राचे आकृतीच्या सहाय्याने स्पष्टीकरण करता येईल. आकृती २.२ मध्ये 'अय' अक्षावर भांडवलाचे प्रमाण तर 'अक्ष' अक्षावर श्रमसंख्या मोजली आहे.

**आकृती २.२ : भांडवलप्रधान उत्पादन तंत्र**




श्रम व भांडवल यांच्या सहकार्याने सुरुवातीस होणारे उत्पादन 'न न' या वक्राने दाखविले आहे. त्यावेळी 'स' बिंदूत 'अ म' इतके श्रम आणि 'अ ब' इतके भांडवल वापरले आहे. जेव्हा नवीन उत्पादन वाढ होते. तेव्ही ती वाढ 'न१न१' या नवीन वरच्या पातळीवरील वक्राने दर्शविली आहे यातील नवीन श्रम व भांडवल संतुलन बिंदू 'स१' हा आहे. या वक्रावरील 'स१' बिंदूत पूर्वीएवढेच 'अ म' श्रम वापरले

आहेत. आणि भांडवल मात्र ‘ब ब$_{१}$’ नगांनी अधिक वापरले आहेत. म्हणून यास ‘भांडवलप्रधान उत्पादन तंत्र’ असे म्हणतात. म्हणजेच भांडवलप्रधान उत्पादन तंत्राचा अवलंब केल्यास श्रम बचतीची प्रक्रिया सुरू होते.

अविकसित राष्ट्रांमध्ये जलद आर्थिक विकास साध्य करण्यासाठी भांडवलप्रधान उत्पादन तंत्र हे श्रमप्रधान उत्पादन तंत्रापेक्षा अधिक कार्यक्षम ठरते. दीर्घकालीन आर्थिक विकासाच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी, देशातील वास्तव उत्पन्नात वेगाने वाढ घडवून आणण्यासाठी भांडवलप्रधान तंत्र श्रेष्ठ ठरते.

**भांडवलप्रधान उत्पादन तंत्राचे फायदे/लाभ :**

भांडवलप्रधान उत्पादन तंत्राचे फायदे / लाभ लक्षात घेऊन या तंत्राचे समर्थन पुढील बाबीवरून करता येते.

१) भांडवलप्रधान उत्पादन तंत्रामुळे उत्पादनाची रचना बदलणे शक्य होते. परिणामी उत्पानाचा दर्जा सुधारतो व दर्जेदार वस्तूंचा पुरवठा करणे शक्य होते.

२) प्रा. हर्शमन यांच्या मते, या तंत्रामुळे कामगारांची कार्यक्षमता वाढते व उत्पादनाचा वेग वाढतो.

३) अविकसित देशांत अतिरिक्त श्रमपुरवठ्याची स्थिती कायम नसते. यासाठी श्रमबचत करणारे किंवा भांडवलप्रधान तंत्र प्रारंभापासून वापरणे योग्य ठरते.

४) नवनिर्मितीला चालना मिळून तांत्रिक प्रगतीला वेग येतो.

५) आधारभूत संरचनेची उपलब्धता ह्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असल्याने भांडवलप्रधान तंत्राने त्या उभारता येतात.

६) नवीन तंत्रज्ञान वापराने उत्पादन खर्चात घट होते.

७) आर्थिक विकासाला पोषक वातावरण निर्माण होते.

८) विस्तारक परिणाम (Spread Effect) व्यापक प्रमाणावर घडवून आणण्यासाठी भांडवलप्रधान तंत्र उपयुक्त ठरते.

९) मुलभूत व अवजड उद्योगांच्या निर्मितीसाठी भांडवलप्रधान तंत्र उपयुक्त ठरते.

१०) आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत टिकून राहण्यासाठी भांडवलप्रधान उत्पादनाचे तंत्र हे श्रमप्रधान तंत्राऐवजी अधिक कार्यक्षम ठरते.

थोडक्यात, वरील दोन्ही उत्पादन तंत्राचे प्रभावीपणे समर्थन केले जाते. दोन्ही तंत्राचे काही फायदे ही आहेत, परंतु या दोन्हीपैकी कोणते उत्पादन तंत्र श्रेष्ठ हे ठरविणे थोडेसे कठीण आहे. कारण एका तंत्राचा वापर करून दुसऱ्या तंत्राकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. विकसनशील देशात कोणत्याही एकाच प्रकारचे तंत्र वापरण्याचे कारण नाही. कृषीक्षेत्रात विशिष्ट परिस्थिती लक्षात घेऊन श्रमप्रधान तंत्र वापरणे

अधिक सोयीचे असते. तर कुटीरोउद्योग, छोटे उद्योग, विकेंद्रीकरणास हे सहाय्यभूत ठरतात. ह्या उद्योगास श्रमप्रधान तंत्र पोषक आहे तसेच उपभोग्य वस्तूंचे उत्पादन करताना ह्या तंत्राचा उपयोग करता येतो. परंतु मुलभूत, आधारभूत, अवजड उद्योगांसाठी तसेच भांडवली वस्तूंच्या निर्मितीस भांडवलप्रधान तंत्र उपकारक ठरते. अर्थातच यावरून असा निष्कर्ष काढता येईल की, अर्थव्यवस्थेत कोणत्या वस्तूंचे उत्पादन वाढविण्यावर भर द्यावयाचा आहे त्यावरून उत्पादन तंत्र ठरविता येते. परकीय चलन मिळविण्याच्या हेतूने उत्पादनावर भर द्यावयाचा असल्यास भांडवलप्रधान उत्पादन तंत्राचा अवलंब करावा लागेल आणि जर देशी उपभोगासाठी वस्तूंचे उत्पादन करावयाचे असेल तर श्रमप्रधान उत्पादन तंत्रास अधिक झुकते माप द्यावे लागेल. म्हणजेच देशात एकाचवेळी निर्यातक्षम वस्तूंची निर्मिती आणि अंतर्गत उपभोग्य वस्तूंची निर्मिती करणाऱ्या मध्यममार्गी तज्ञांचा अवलंब करावा लागेल.

### २.२.२ भांडवल उत्पादन गुणोत्तर महत्त्व आणि प्रभावीत करणारे घटक (Capital output ratio Importance and Factors Affecting COR) :

भांडवल हे आर्थिक विकासाचे महत्त्वाचे साधन असून आर्थिक विकास हे साध्य आहे. मनुष्याने निर्माण केलेल्या व नवीन अर्थोत्पादनासासाठी उपयोगात आणलेल्या संपत्तीचा भाग म्हणजे भांडवल होय. भांडवल हे मनुष्यनिर्मित उत्पादनाचे साधन आहे. देशाला आर्थिक विकासासाठी भांडवल या घटकांची अत्यंत आवश्यकता असते. बोहेम बावेर्क यांच्या मते, भांडवलामुळे उत्पादनात अप्रत्यक्षपणा आणणे शक्य होते. परिणामी श्रम, नैसर्गिक साधने उपभोग्य वस्तूंच्या दृष्टीने जास्त उत्पादक बनतात. नवीन उत्पादन तंत्राचा व यंत्राचा उत्पादनात वापर करण्यासाठी भांडवल मोठ्या प्रमाणात आवश्यक असते. अविकसित राष्ट्रांच्या विकासकार्याच्या सुरुवातीस मुलभूत व अवजड उद्योगांची उभारणी करण्यासाठी रेल्वेमार्गाचे जाळे निर्माण करण्यासाठी भांडवलाची आवश्यकता होती. विकसनशील देशांकडे ही पुरेशा प्रमाणात भांडवलाची उपलब्धता नसते. त्यामुळे उपलब्ध भांडवलाचा अत्यंत काळजीपूर्वक वापर करणे आवश्यक ठरते. त्यासाठी उपलब्ध भांडवलाचा अंदाज घेऊन उत्पादनाचे विशिष्ट उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कोणकोणत्या क्षेत्रात किती भांडवल गुंतवणूक करावी? हे ठरवावे लागते. म्हणजेच भांडवल व उत्पादन यांचे एक विशिष्ट प्रमाण असते. या विशिष्ट प्रमाणाला भांडवल गुणांक (Capital co-efficient) असे ही म्हणतात. अर्थातच उपलब्ध भांडवलाचा पर्याप्त वापर करणे आणि ते अधिक फायदेशीर क्षेत्रात गुंतविणे ज्या तत्त्वाद्वारे शक्य होते. त्या तत्त्वाला 'गुंतवणूक निकष' असेही म्हणतात. योग्य भांडवलाचे प्रमाण वापरून भांडवलाचा कार्यक्षमपणे वापर करणे तसेच भांडवल उत्पादन प्रमाणाचे उपयोग व महत्त्व आणि भांडवल उत्पादन प्रमाणावर परिणाम करणारे काही घटक यांचा उहापोह करणे हे देशाच्या अर्थिक विकासासाठी भांडवल या आर्थिक घटकांची उपलब्धता व सिद्धता स्पष्ट करते.

**भांडवल उत्पादन गुणोत्तर प्रमाण संकल्पना (Concept of Capital Output Ratio) :**

उत्पादनाचा एक नग तयार करण्यासाठी किती भांडवलाची आवश्यकता असते हे दर्शविणारा घटक/प्रमाण म्हणजे भांडवल उत्पादन प्रमाण होय.

थोडक्यात, भांडवल गुंतवणूकीचे मूल्य आणि उत्पादनाचे मूल्य यातील कार्यात्मक संबंध दर्शविणारे गुणोत्तर म्हणजे भांडवल उत्पादन प्रमाण (COR) होय.

भांडवल उत्पादन प्रमाणावरून एका विशिष्ट प्रमाणात उत्पादन वाढ करण्यासाठी किती भांडवल गुंतवणूक करावी लागेल हे स्पष्ट करते. भांडवल उत्पादन प्रमाण हे एखाद्या देशाला अर्थव्यवस्थेत २.१ असे जेव्हा आपण म्हणतो. तेव्हा त्याचा अर्थ १ कोटी रुपयांचे उत्पादन करण्यासाठी २ कोटी रुपयांच्या भांडवलांची गुंतवणूक करावी लागते. समग्र आर्थिक नियोजनाच्या दृष्टीने समग्र अर्थव्यवस्थेतील उत्पादन मूल्य व त्यासाठी लागणारे भांडवल या संदर्भात भांडवल उत्पादन प्रमाण स्पष्ट केले जाते. यावरून विशिष्ट कालखंडात संभाव्य उत्पादन वाढीसाठी किती भांडवल गुंतवणूक करावी लागेल याचा अंदाज येतो म्हणून यास 'भांडवल गुणांक' असे म्हणतात. सामान्यतः उत्पादन मात्रापेक्षा त्यासाठी आवश्यक असणाऱ्या भांडवलाच्या मात्रा या काही पटीने अधिक असतात. कारण भांडवली वस्तू या टिकाऊ असल्याने त्याचा वापर अनेकवेळा करता येतो.

**भांडवल – उत्पादन गुणोत्तर / प्रमाण प्रकार :**

भांडवल उत्पादन प्रमाण हे वेगवेगळ्या देशात, विभिन्न व्यवसायात, विभिन्न कालखंडात वेगवेगळे असते. यावरून प्रा. पॉल स्ट्रीटेन (Paul Steeten) यांनी COR चे अकरा प्रमाणात वर्गीकरण केले आहे. यामध्ये सरासरी भांडवल उत्पादन प्रमाण, सीमांत भांडवल उत्पादन प्रमाण, समग्र अथवा देशपरत्वे भांडवल उत्पादन प्रमाण, विभागीय भांडवल उत्पादन प्रमाण इ. विशेषतः नियोजनातील उपयोगाच्या दृष्टीने हे सर्व प्रकार महत्त्वाचे नाहीत. त्यातील महत्त्वाच्या दोन प्रकारचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे अभ्यासत आहोत.

**१) सरासरी भांडवल उत्पादन प्रमाण गुणोत्तर (Average Capital - Output Ratio) :**

एका विशिष्ट कालखंडात देशात जी एकूण गुंतवणूक करण्यात आली आणि जे काही एकूण उत्पन्न प्राप्त झाले त्यातील संबंध या गुणोत्तराने दर्शविला जातो. अर्थातच भांडवल संचयाला एकूण वार्षिक उत्पन्नाने भागल्यास सरासरी भांडवल उत्पादन प्रमाण कळते. ही बाब सूत्र स्वरूपात स्पष्ट करता येते.

$ACOR = \frac{K}{Y}$ स.भा.उ.प्र. = $\frac{\text{क}}{\text{य}}$

संक्षिप्त चिन्हांचा अर्थ

$ACOR = \frac{K}{Y}$ सभाउप्र = सरासरी भांडवल उत्पादन प्रमाण

K / क = भांडवलाची एकूण मात्रा

Y / य = उत्पादनाचे पैशातील मूल्य

सरासरी भांडवल उत्पादन प्रमाणावरून अर्थव्यवस्थेतील गुंतवणूकीसाठी उपलब्ध असणारा भांडवल साठा व त्यापासून प्राप्त होणाऱ्या चालू उत्पन्नाचा ओघ यांच्यातील परस्पर संबंध स्पष्ट होतो. म्हणजेच सरासरी भांडवल उत्पादन गुणोत्तराच्या सहाय्याने सध्या अस्तित्वात असलेल्या एकूण भांडवलाची मात्रा

व त्यापासून प्राप्त होणाऱ्या संपत्तीचे पैशातील मूल्य यातील सहसंबंध दर्शविला जातो. समजा, एखाद्या देशातील उपलब्ध भांडवलाचा साठा १००० कोटी रुपये आहे, त्यापासून देशातील उत्पादन झालेल्या वस्तूंचे पैशातील मूल्य १०० कोटी रुपये असले तर वरील सूत्रानुसार

$$ACOR = \frac{K}{Y} \quad ACOR = \frac{1000}{100} = 10$$

म्हणजेच 10 : 1 आहे. याचा अर्थ १ (एक) रूपयांच्या वस्तूंची निर्मिती करण्यासाठी १० रुपयांची भांडवल गुंतवणूक करावी लागते.

**२) सीमांत/वाढीव भांडवल – उत्पादन गुणोत्तर : (Marginal/ Incremental Capital - Output Ratio) (ICOR)**

विशिष्ट कालखंडात राष्ट्रीय उत्पन्नातील ठराविक वाढ होण्यासाठी किती अधिक भांडवल गुंतवणूकीत वाढ करावी लागेल. हे समजण्यासाठी नियोजनकारांना सीमांत भांडवल उत्पादन प्रमाण माहित असणे आवश्यक आहे. म्हणून विशिष्ट काळातील गुंतवणूक वाढ व त्यामुळे झालेली उत्पन्नातील वाढ यातील संबंध दर्शविणारे गुणोत्तर म्हणजे सीमांत भांडवल प्रमाण होय. यालाच वाढीव भांडवल उत्पादन प्रमाण (Incremental Capital - Output Ratio) असेही म्हणतात. गुंतवणूकीतील वाढीमुळे उत्पन्नात वाढ घडून येण्यासाठी काही कालावधी जावा लागतो. त्यामुळे पहिल्या कालावधीतील निव्वळ उत्पादन व त्या विशिष्ट काळातील निव्वळ भांडवल निर्मिती यातील संबंध म्हणजे वाढीव भांडवल उत्पादन प्रमाण होय.

प्रा. हिगिन्सच्या मते, एकाच कालावधीत भांडवलातील वाढ व उत्पादनातील वाढ यांचा सहसंबंध म्हणजे वाढीव भांडवल उत्पादन प्रमाण होय. सूत्ररूपाने ही बाब पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**सूत्र**

$$(ICOR) = \frac{\Delta k}{\Delta y} = \frac{\Delta I}{\Delta y}$$

$$\text{सी.भा. उ.प्र.} = \frac{\Delta \text{क}}{\Delta \text{य}}$$

$$\text{सी.भा. उ.प.} = \frac{\Delta \text{क}}{\Delta \text{य}}$$

सी.भा. उ.प्र. = सीमांत / वाढीव भांडवल उत्पादन प्रमाण

$\Delta$ क = गुंतवणूकीतील वाढ (बदल)

$\Delta$ य = उत्पन्नातील वाढ (बदल)

या समीकरणात $\Delta K = \Delta I$ म्हणजे भांडवल गुंतवणूकीतील बदल होय. भांडवलाच्या सीमांत उत्पादकतेत इतर घटक जसे भूमी, श्रम, संयोजक स्थिर गृहीत धरले जाते. केवळ भांडवलाच्या एका

मात्रेने वाढ केली असता उत्पादनात किती भर पडली हे निश्चितपणे विचारात घेतले जाते.

समजा राष्ट्रीय उत्पन्नात २ कोटी रुपयांनी वाढ घडवून आणण्यासाठी भांडवल गुंतवणूक ५ कोटी रुपयांनी वाढवावी लागत असेल तर वरील सुत्राप्रमाणे

सीमांत भांडवल उत्पादन प्रमाण = $\frac{5}{2}$ = 2.5

∴ 1 : 2.5 असेल

सीमांत भांडवल उत्पादन प्रमाण निश्चित केल्यानंतर देशातील बचतीचा दर निश्चितपणे माहित असेल तर साधारणतः आर्थिक विकास किती वेगाने होईल याचा अंदाज करता येतो. ही बाब पुढील समीकरणाच्या सहाय्याने स्पष्ट करता येईल.

आर्थिक विकासाचा वेग (दर) = राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा वेग = $\frac{\text{बचत}}{\text{सीमांत भांडवल उत्पादन प्रमाण}}$

समजा, देशामध्ये 10 कोटी रु. ची बचत उपलब्ध असेल व सीमांत भांडवल उत्पादन प्रमाण 1 : 2.5 असेल तर त्या

देशाचा आर्थिक विकासाचा वेग = $\frac{\text{10 कोटी रु.}}{2.5}$ = 4 राहील.

अर्थातच, त्या देशाचे राष्ट्रीय उत्पन्न प्रतिवर्षी 4 कोटी रुपये या वेगाने वाढेल वरील समीकरणाने विशिष्ट वेगाने राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करण्यासाठी किती बचत करावी लागेल हे सुद्धा समजते.

∴ आवश्यक बचत = राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ × सीमांत भांडवल उत्पादन प्रमाण

समजा दरवर्षी राष्ट्रीय उत्पन्नात ४ कोटी रुपयांनी वाढ करण्याचे उद्दिष्ट असेल तर देशात एकूण किती बचत करावी लागेल हे सीमांत भांडवल उत्पादन प्रमाण ८ असेल तर

आवश्यक बचत ४ कोटी × ८ कोटी रुपये = ३२ कोटी रुपये.

याचा अर्थ ४ कोटी रुपयांनी राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करण्याचे उद्दिष्ट असेल तर ३२ कोटी रुपये बचत करणे आवश्यक आहे.

एकंदरीतच विशिष्ट कालखंडात भांडवलाची गरज जाणण्यासाठी वाढीव भांडवल उत्पादन प्रमाण (ICOR) ची संकल्पना महत्त्वाची ठरते. जरी काही मर्यादा येत असल्या तरी वाढीव भांडवल उत्पादन प्रमाण (ICOR) ने भांडवली गरजांचा अंदाज येऊ शकतो. विविध देशात व विविध कालखंडात ICOR चे प्रमाण वेगवेगळे आढळते, म्हणून ICOR ही संकल्पना विकसनशील देशांना मर्यादीत प्रमाणातच उपयोगी पडते.

प्रा. हिगिन्स यांनी काही देशांच्या अनुभवावरून ICOR व इतर घटकांसंबंधी काही निष्कर्ष काढले आहेत ते पुढीलप्रमाणे –

१) वाढत्या औद्योगिकरणाबरोबर ICOR घटत जातो. प्राथमिक विकासावस्थेत दीर्घकालीन गुंतवणूकीचे फायदे मिळतात व उत्पादनात वाढ होते व ICOR घटतो.

२) पुनर्रचनेच्या काळात ICOR कमी असू शकतो कारण अस्तित्वात असलेली अनेक साधने पुन्हा उपयोगात येतात.

३) येथे लोकसंख्या अधिक वेगाने वाढते तेथे ICOR कमी असण्याची शक्यता असते.

थोडक्यात सीमांत भांडवल प्रमाण ही एक गतिशील संकल्पना असून त्यावरील काही मर्यादा विचारात घेऊन देशातील भांडवलाची गरज जाणण्याचे ते एक उपयुक्त साधन ठरते. आवश्यक असणारी आकडेवारी जर दीर्घकाळाच्या संदर्भात माहिती देणारी असेल तर ICOR अधिक वास्तव असेल.

**भांडवल गुणोत्तर / प्रमाणाचे महत्त्व व उपयोग : (Importance of COR) :**

१) राष्ट्रीय उत्पन्नाच्या अभिवृद्धीसाठी नियोजनात ठरविलेली उद्दिष्ट्ये किती सुसंगत आहेत हे तपासण्यासाठी ICOR ही संकल्पना उपयोगी पडते तसेच उत्पादन, भांडवल, गुंतवणूक, अभिवृद्धी यांची उद्दिष्ट्ये प्राप्त होण्यासाठी भांडवल उत्पादन प्रमाण वापरता येते. हेरॉड – डोमर प्रतिमानात या संकल्पनेचा वापर केला आहे.

२) विशिष्ट गुंतवणूकीमुळे सामान्यतः उत्पादनात किती भर पडते याची प्रचिती येते.

३) इच्छित विकास दरात सुसंगतता आणण्यासाठी ICOR ही संकल्पना उपयोगी पडते.

४) भांडवल उत्पादन प्रमाण व बचत उत्पादन प्रमाण जर माहीत असेल तर अभिवृद्धीचा दर समजू शकतो. तसेच भांडवल उत्पादन प्रमाण माहीत असेल तर विशिष्ट अभिवृद्धीचा दर प्राप्त करण्यासाठी बचत उत्पन्न प्रमाण किती असले पाहिजे हे समजते.

५) उत्पादनातील भांडवलाचे महत्त्व प्रतिपादन करण्यासाठी भांडवल उत्पादन प्रमाणाची संकल्पना उपयोगी पडते.

६) विशिष्ट उत्पादनाकरिता किती भांडवल बचत करावे लागेल हे समजते त्यावरून प्रयत्नांची दिशा व अंदाज करता येतो.

थोडक्यात, नियोजनाची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी भांडवल उत्पादन गुणोत्तर / प्रमाण संकल्पना उपयोगी पडते. यावरून COR चे महत्त्वही स्पष्ट होते.

**भांडवल उत्पादन गुणोत्तर / प्रमाणावर परिणाम करणारे घटक : (Factors affecting on COR)**

भांडवल उत्पादन गुणोत्तर प्रमाणावर अनेक घटकांचा अनुकूल व प्रतिकूल परिणाम होतो यातील काही महत्त्वाचे घटक पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) भांडवल संचय :**

गुंतवणूकीचे प्रमाण हे देशातील भांडवल संचयनावर अवलंबून असते. परिणामी भांडवल संचयनातील बदलाचा परिणाम हा सीमांत भांडवल उत्पादन प्रमाणावर होतो. ज्यावेळी भांडवलात जसजशी वाढ होत जाईल त्या प्रमाणापेक्षा राष्ट्रीय उत्पन्नात अधिक वाढ होण्याची शक्यता असेल तर सीमांत भांडवल उत्पादन प्रमाण हे कमी राहते.

**२) गुंतवणूकीचा दर :**

नव्याने होणारी गुंतवणूक अधिक असेल तर भांडवल उत्पादन गुणोत्तर जास्त असते कारण नवीन गुंतवणूक ही नवीन तंत्रज्ञाबरोबर केली जाते.

**३) गुंतवणूकीचे स्वरूप :**

गुंतवणूकीचे स्वरूप हा भांडवल उत्पादन प्रमाणावर परिणाम करणारा एक महत्त्वाचा घटक आहे. भांडवल गुंतवणूक केल्यानंतर उत्पादन होण्यास बराच कालावधी लागणार असेल तर भांडवल-उत्पादन प्रमाण जास्त राहते.

**४) गुंतवणूकीचे प्रकार :**

गुंतवणूकीचा प्रकार हा सरकारी धोरणावर अवलंबून असतो. जर सार्वजनिक व सेवा क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्याचे जर सरकारचे धोरण असेल तर COR चे प्रमाण जास्त राहते. तसेच जर गुंतवणूक शेती व्यवसायाचा विकास अथवा कुटीर उद्योगांचा विकास करण्याचे सरकारचे धोरण असेल तर COR कमी राहील.

**५) नैसर्गिक साधनसामग्रीची उपलब्धता व गुणवत्ता :**

भांडवल उत्पादन गुणोत्तरावर (COR) परिणाम करणारा हा एक महत्त्वाचा घटक मानला जातो. ज्या देशात नैसर्गिक साधनसामग्री मुबलक असते तेथे भांडवल उत्पादन गुणोत्तर कमी राहते कारण भांडवलाऐवजी या साधनसामग्रीचा उपयोग करता येणे शक्य असते. तसेच देशातील कच्चा माल हा जास्त गुणवत्तेचा व दर्जेदार असेल तरीही हे प्रमाण कमी राहील.

**६) गुंतवणूक केलेले भांडवल :**

भांडवली वस्तूंचे आयुर्मान विचारात घेऊन दरवर्षी राष्ट्रीय उत्पन्नाच्या विशिष्ट प्रमाणातील गुंतवणूकीवरून भांडवल उत्पादन प्रमाण निर्धारित केले जाते. साधारणपणे राष्ट्रीय उत्पन्नाच्या सम प्रमाणात प्रतिवर्षी गुंतवणूक होत असेल तर संबंधित देशातील भांडवल उत्पादन गुणोत्तर समान राहते.

**७) संघटन व व्यवस्थापकीय कौशल्य :**

ज्या देशात संघटन कौशल्य चांगले असते त्या देशातील श्रमिक यांत्रिकीकरणाचा योग्य वापर करतात त्यामुळे त्या देशात COR कमी राहतो. याऊलट त्या देशात उपलब्ध साधनसामग्रीचा पर्याप्त वापर होत नसल्याने भांडवल उत्पादन प्रमाण जास्त राहील.

**८) तांत्रिक प्रगती :**

तांत्रिक प्रगती झाली तर COR मध्ये वाढ होते. तसेच तांत्रिक प्रगती ही भांडवल प्रधान असेल तर COR जास्त राहतो. उलट श्रमप्रधान तंत्राचा अवलंब केल्यास COR कमी राहतो.

**९) औद्योगिकीकरण :**

औद्यौगिकीकरणामुळे COR वाढतो. तसेच शहरीकरण वाढते. परिणामी ग्रामीण क्षेत्राकडून शहरी विभागाकडे कामगार गतिशील होतात. त्यामुळे शहरी विभागात अधिक भांडवल गुंतवणूक करावी लागते.

**१०) मागणीचे स्वरूप :**

भांडवल उत्पादन गुणोत्तरावर मागणीच्या स्वरूपाचा परिणाम होतो. जेंव्हा लोकांच्या आवडीनिवडी बदलतात तेंव्हा मागणीत बदल होतो. त्यासाठी नव्याने भांडवल गुंतवणूक करावी लागते परिणामी भांडवल उत्पादन प्रमाण वाढते.

**११) उत्पादन घटकांच्या किंमती :**

व्याजाचा दर कमी असेल व वेतनपातळी अधिक असेल भांडवलाचा वापर अधिक होतो परिणामी भांडवल उत्पादन प्रमाण अधिक राहते.

**१२) अतिरिक्त उत्पादनक्षमता :**

भांडवल उत्पादन प्रमाण हे उद्योगव्यवसायात वापरलेल्या यंत्रसामग्रीचा किती वापर होतो यावर अवलंबून असते. अतिरिक्त उत्पादनक्षमता जास्त असेल तर भांडवल उत्पादन प्रमाण जास्त राहते. जसजसा या अतिरिक्त उत्पादन शक्तीचा अधिकाधिक वापर होईल तसतसे भांडवल उत्पादन प्रमाण हे कमी होते.

**१३) दुय्यम वस्तूंची निर्मिती :**

उद्योगांमध्ये वाया जाणाऱ्या साधनांपासून जर दुय्यम वस्तूंची निर्मिती केली तर भांडवलात विशेष वाढ न करता एकूण उत्पादनात वाढ होते. त्यामुळे भांडवल उत्पादन प्रमाण कमी राहील. उदा. : साखर कारखान्यातील ऊसाच्या चिपाडापासून कागद, मळीपासून मद्यार्क, पशुखाद्य तयार करता आले तर त्यांचा उत्पादन खर्च कमी राहून भांडवल उत्पादन गुणोत्तर कमी राहते.

**१४) तेजी–मंदी :**

तेजीच्या काळात किंमती वाढून नफ्याचे प्रमाण जास्त राहते व गुंतवणूकीसाठी उत्साहाचे वातावरण तयार होते. त्यामुळे अस्तित्वात असलेल्या भांडवलाचा जास्तीत जास्त वापर करून उत्पादनात वाढ होते. साहजिकच तेजीच्या काळात भांडवल उत्पादन प्रमाण कमी होण्याची प्रवृत्ती असते. याऊलट मंदीच्या काळात प्रभावी मागणीच्या कमतरतेमुळे भांडवलाचा पूर्ण उपयोग होत नाही. त्यामुळे उत्पादनाचे प्रमाण घटते व भांडवल–उत्पादन गुणोत्तर / प्रमाण वाढते.

**१५) आयात निर्यातीचा परिणाम :**

देशाच्या आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याच्या समतोलातील अडचणी दूर करण्यासाठी मोठ्या प्रमाणात परकीय चलन प्राप्त करण्यासाठी जेव्हा निर्यात क्षेत्रात गुंतवणूक वाढते तेव्हा भांडवल उत्पादन गुणोत्तरात वाढ होते. तसेच भांडवली वस्तूंच्या आयातीसाठी मोठ्या प्रमाणात खर्च केला जातो. तेव्हा भांडवल उत्पादन गुणोत्तरात वाढ होते.

**१६) सामाजिक व आर्थिक घटकांवरील खर्च :**

विकसनशील राष्ट्रांना सुरुवातीच्या काळात सामाजिक व आर्थिक बाबींवर मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. त्यामुळे भांडवल उत्पादन गुणोत्तर जास्त राहते. जसजसा आर्थिक विकास होईल तसतसा या बाबींचा अधिकाधिक उपयोग होऊन भांडवल उत्पादन प्रमाण घटत जाते.

**१७) क्षेत्रिय बदल :**

अर्थव्यवस्थेतील विभिन्न क्षेत्रातील भांडवल उत्पादन प्रमाण वेगवेगळे असते. अशा स्थितीत जर एका क्षेत्राचे महत्त्व कमी होऊन दुसऱ्या क्षेत्राचे महत्त्व वाढले तर त्याचा परिणाम हा भांडवल उत्पादन प्रमाणावर होतो. उदा. अर्थव्यवस्थेतील शेतीचे महत्त्व कमी होऊन औद्योगिक क्षेत्राचे महत्त्व वाढले तर श्रमप्रधान उत्पादन तंत्राऐवजी भांडवल प्रधान तंत्र वापरले जाऊन भांडवल उत्पादन प्रमाणात वाढ होते.

**१८) लोकसंख्या :**

लोकसंख्या अधिक असणाऱ्या देशात भांडवल उत्पादन प्रमाण कमी असते. उदा. : शेतीप्रधान देशात लोकसंख्या जास्त असल्याने तेथे साध्या अवजारांचा वापर करून शेती लागवडीखाली आणली जाते. त्यामुळे भांडवल उत्पादन प्रमाण कमी राहते.

**१९) रोजगार विषयक धोरण :**

भांडवल उत्पादन प्रमाणावर सरकारच्या रोजगारविषयक धोरणाचा परिणाम होतो. सरकारचे धोरण हे अस्तित्वात असलेल्या उद्योगात बेरोजगार लोकांना सामावून घेण्याचे असेल तर भांडवल उत्पादन प्रमाण कमी राहील. याउलट या लोकांना सामावून घेण्यासाठी नवीन गुंतवणूक वाढविण्याचे धोरण असेल तर भांडवल उत्पादन गुणोत्तर जास्त राहील.

**२०) पायाभूत संरचना व बाह्य बचती :**

पायाभूत सुविधांमध्ये वाहतूक व दळणवळणाची साधने, विद्युतशक्तीचा पुरवठा, रस्ते, कालवे, पाटबंधारे तसेच प्रशासकीय सेवा, कायदा व सुववस्थेच्या सेवा इत्यादींचा समावेश होतो. या सोयी सवलतीच्या उपलब्धतेवर ही भांडवल उत्पादन प्रमाण अवलंबून असते. अशा पायाभूत सेवांचा व्याप जितका अधिक व कार्यक्षम असेल त्या प्रमाणात बाह्य बचतीचा निर्मिती होत असते. त्यामुळे भांडवल उत्पादन गुणोत्तर कमी राहते.

थोडक्यात वरील विवेचनावरून प्रगत व अप्रगत राष्ट्रात भांडवल उत्पादन प्रमाण कमी असावे की अधिक असावे याबाबत एक निष्कर्ष काढता येणार नाही परंतु परिस्थितीनुसार ते ठरविणे योग्य ठरेल.

याशिवाय पूर्ण रोगजारातील भांडवल उत्पादन गुणोत्तर व अपूर्ण रोजगारातील भांडवल उत्पादन गुणोत्तर वेगवेगळे असते. तसेच खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील भांडवल उत्पादन गुणोत्तर भिन्न असते. त्यामुळे भांडवल उत्पादन गुणोत्तरावर मर्यादा पडतात. विकास योजनातील सुसंगतता व गरजा अजमावण्यासाठी भांडवल उत्पादन गुणोत्तर उपयुक्त ठरत नाही. नियोजनाच्या या साधनाच्या मर्यादा लक्षात घेऊन त्या प्रकारची दक्षता घ्यावी लागते.

सामान्यतः अल्पकाळात भांडवल उत्पादन गुणोत्तराचा अंदाज चुकीचा ठरत असेल तर दीर्घकाळातही तो बरोबर ठरतो म्हणून विकसनशील देशांच्या नियोजनात ही भांडवल उत्पादन गुणोत्तर संकल्पना उपयुक्त ठरते.

### २.२.३ आदान-प्रदान विश्लेषण - अर्थ आणि उपयोग :
### (Input-Output Analysis - Meaning and Uses ) :

फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ क्वेस्ने यांनी सर्वप्रथम आदान-प्रदान तंत्राचा वापर केला. आदान-प्रदान विश्लेषणाला निविष्टी-उद्दिष्टी विश्लेषण असेही म्हणतात. त्याने टेब्लो इकॉनॉमिक (Tablea-Economique) चा विकास केला. आदान-प्रदान पैशातील प्रवाहाचे स्पष्टीकरण करण्यासाठी हार्वर्ड विद्यापीठातील अर्थशास्त्रतज्ञ प्रा. लिऑन्टीफ यांनी सन १९५१ हे तंत्र अर्थशास्त्रात वापरले. गतिमान अर्थव्यवस्थेत उत्पादक क्षेत्रांमध्ये साधनसामग्रीच्या गुंतवणूकीत घडून येणारे बदल तसेच साधन सामग्री बाबतची त्यांची परावलंबत्वाची स्थिती अर्थव्यवस्थेच्या सर्वसाधारण समतोल पातळी दरम्यान कशा रितीने कार्यरत असते याचे विश्लेषण करण्यासाठी आदान-प्रदान विश्लेषण तंत्र उपयुक्त मानले जाते.

**आदान-प्रदान विश्लेषणाचा अर्थ (Meaning of Input-Output Analysis ) :**

आदान-प्रदान विश्लेषणाचा अर्थ समजून घेत असताना आपण आदान आणि प्रदान या दोन संकल्पनांचा अर्थ समजावून घेणे महत्त्वाचे आहे. प्रो. जे. आर हिक्स यांच्या मते आदान म्हणजे वस्तू जी उपक्रमासाठी आणली जाते तर प्रदान म्हणजे अशी वस्तू जी त्याने विकली जाते. आदान प्राप्त केले जाते. पण प्रदान उत्पादन केले जाते. अशा रितीने आदान उद्योगसंस्थेच्या खर्चाचे प्रतिनिधित्व करते व प्रदान प्राप्तीचे प्रतिनिधित्व करते. आदानाची पैशातील मूल्याची बेरीज म्हणजे उद्योगसंस्थेचा एकूण खर्च आणि प्रदानाची पैशावरील मूल्यांचे बेरीज म्हणजे एकूण महसूल होय.

आदान-प्रदान विश्लेषणाची व्याख्या करताना विल्यम जे बॅमोल यांच्या मते - 'सर्वसाधारण समतोल स्थितीत असणाऱ्या अर्थव्यवस्थेमधील अनुभवजन्य उत्पादन विषयक बाबीच्या कार्याचा आढावा घेण्याच्या प्रयत्नाशी निगडीत असणारी संकल्पना म्हणजे आदान-प्रदान विश्लेषण होय.' (Input-Output analysis - is the name given to the attempt to take account of general equilibrium phenomena in the empirical analysis at production.)

या तीन स्पष्टीकरणात तीन तिरप्या टाईपात (Italicised) छापलेले घटक दिसून येतात. ते आदान-प्रदान विश्लेषणाच्या मुलभूत वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकतात.

वरील विश्लेषणानुसार आदान-प्रदान विश्लेषण असे स्पष्ट करते की, येथे एकत्रित आर्थिक पध्दतीने औद्योगिक परस्परसंबंध व आंतर-अवलंबित्व सांगते. एखाद्या उद्योगाचे आदान हे दुसऱ्या उद्योगाचे प्रदान असू शकते. म्हणून त्यांचे परस्परांशी असलेल्या परस्परसंबंधाने संपूर्ण अर्थव्यवस्थेतील पुरवठा व मागणी यामधील समतोलाकडे नेते. उदा. कोळसा हा पोलाद उद्योगासाठी आदान आहे आणि पोलाद कोळसा उद्योगासाठी आदान आहे. जरी दोन्हीही त्यांच्या संबंधित उद्योगाचे प्रदान आहेत. आर्थिक कार्यक्रमाचा प्रमुख सहभाग यामध्ये मध्यस्थित वस्तूचे (आदान) उत्पादन करणे आणि पुढे अंतिम वस्तू (प्रदान) उत्पादनात वापर करणे याचा समावेश असतो. अशा रितीने निरनिराळ्या उद्योगात वस्तूंचा प्रवाह पाण्यातील भोवऱ्याप्रमाणे वाहत असतो. पुरवठ्याच्या बाजूला मध्यस्थित उत्पादनाच्या मोठ्या प्रमाणातील आंतर-उद्योग प्रवाह आणि मागणीच्या बाजूला अंतिम वस्तूंचा समावेश असतो. आदान-प्रदान विश्लेषणाला असे आवश्यक असते. एकत्रित अर्थव्यवस्थेचा एकूण उत्पादनाचे पैशातील मूल्य हे आंतर उद्योग आदानाच्या पैशातील मुल्याची बेरीज आणि आंतर-उद्योग प्रदानाच्या पैशातील मुल्याच्या बेरजेबरोबर असले पाहिजे. त्यातून समतोल निर्माण होतो.

**आदान-प्रदान विश्लेषणाची वैशिष्ट्ये (Features) :**

आदान-प्रदान विश्लेषणाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

**१) समतोलावर लक्ष** : आदान-प्रदान विश्लेषण अर्थव्यवस्थेवर लक्ष केंद्रित करते जे समतोलावर असते. ते अधिक समतोल विश्लेषणाला लागू होत नाही ते सर्वसाधारण समतोलावर जोर देते. ते अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रे, उपक्षेत्रे अगर औद्योगिक घटक असे सहसंबंधित आहेत ते शोधते.

**२) उत्पादन तांत्रिक समस्या** : ते स्वतःच मागणी विश्लेषणाची संबंधित नव्हते ते केवळ उत्पादनाच्या तांत्रिक समस्येशी संबंधित असते. आदान-प्रदान विश्लेषण जास्त उत्पादनाशी संबंधित असते. फक्त तांत्रिक समस्येशी ते संबंधित नसते.

**३) अनुभवाधिष्ठित** : ते अनुभवाधिष्ठित अन्वेषणावर आधारित असते.

गृहिते (Assumptions) हे विश्लेषण पुढील गृहीतांवर आधारित असते.

१) संपूर्ण अर्थव्यवस्था दोन क्षेत्रात विभागलेली असते. (अ) अंतर उद्योग क्षेत्र व (ब) अंतिम मागणीची क्षेत्र.

२) सर्वसाधारणपणे कोणत्याही आंतर-उद्योग क्षेत्राचे एकूण उत्पादन इतर आंतर उद्योग क्षेत्राने आदान म्हणून वापरणे शक्य असते ते स्वतः अथवा अंतिम मागणी क्षेत्रानेही शक्य होते.

३) संयुक्तपणे दोन उत्पादने उत्पादन केली जात नाहीत. प्रत्येक उद्योग फक्त एकच एकजिनसी

उत्पादन उत्पादित करतो.

४) किंमती, उपभोक्ता मागणी आणि घटक-पुरवठा दिलेला असतो.

५) येथे स्थिर अनुमान प्रमाण नियम असतो.

६) उत्पादनाच्या बहिर्गत बचती व बेबचती नसतात.

७) आदानाचे संयोग निश्चित प्रमाणात कडकपणे कामावर लावले जातात. आदान-प्रदानाच्या पातळीला स्थिर प्रमाणात राहतात. येथे असेही मानले जाते की, विविध साधनांमध्ये पर्याय नसतो आणि तांत्रिक प्रगती नसते. उत्पादनाचे निश्चित आदान गुणक असतात.

*** आदान-प्रदान विश्लेषणाची सारणी (Tables) :**

वेसिली डब्ल्यु लिऑन्टीफ यांनी आदान-प्रदान विश्लेषण स्पष्ट करण्यासाठी सारणीचा उपयोग केला आहे. त्यात सर्वसाधारण समतोल स्थितीत असणाऱ्या अर्थव्यवस्थेतील प्रत्येक आदानाकरिता असलेली मागणी आणि त्या क्षेत्राकडून निर्माण केलेल्या प्रदानांचा इतर क्षेत्रांकडून आदानाच्या स्वरूपात करण्यात येणारा वापर तसेच त्याकरिताची कुटुंब संस्थेकडून अंतिम उपयोगासाठी असलेली मागणी यांचे विश्लेषण मांडले आहे. एखाद्या विशिष्ट वर्षात सर्वसाधारण समतोलातील अर्थव्यवस्थेतील वेगवेगळ्या क्षेत्रांची आदानासाठी असणारी मागणी त्यांच्याकडून निर्माण झालेली प्रदाने तसेच त्या प्रदानांचा अंतिम उपभोगासाठी येणारा उपयोग याचे आदान-प्रदान विश्लेषण मांडता येते. आणि अर्थव्यवस्थेतील लोकांचे आदान-प्रदान विषयक परस्परांवरील अवलंबित्व यांचे विश्लेषण एका तक्त्यात मांडता येते. हा तक्ता कसा असतो. याचे एका उदा. सहाय्याने स्पष्टीकरण करता येते. सर्वसाधारण समतोल स्थितीतील अर्थव्यवस्थेत तीनच क्षेत्रे कार्यरत असतात. असे गृहित मानून हा तक्ता मांडला आहे. त्यात शेती क्षेत्र, उद्योग क्षेत्र आणि तिसरे अंतिम उपयोगाकरिता वस्तू व क्षेत्रांची मागणी करणारे कुटुंब क्षेत्र मिळाले आहे. शेती, उद्योग व कुटुंब क्षेत्राकडून खरेदी केली जाणारी आदाने आडव्या ओळीमध्ये दर्शविलेली आहेत आणि या तीन क्षेत्राकडून विक्री हेतूने निर्माण केलेली प्रदाने उभ्या स्तंभाद्वारे दर्शविलेली आहेत.

**आदान-प्रदान तक्ता / सारणी** (किंमत कोटी रूपयांत)

| खरेदी क्षेत्र | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अर्थ व्यवस्थेची क्षेत्रे | | | शेतीला आदाने | उपभोगाला आदाने | कुटुंब क्षेत्राला आदान | एकूण उत्पादन विक्री उत्पन्न |
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ |
| विक्री क्षेत्र | १ | कृषी क्षेत्र | ५० | १५० | १०० | ३०० |
| | २ | उद्योग क्षेत्र | १०० | २५० | १५० | ५०० |
| | ३ | मूल्य निर्मिती | १५० | १०० | ०० | २५० |
| | | एकूण आदाने (एकूण उत्पादन खर्च) | ३०० | ५०० | २५० | १०५० |

**तक्ता/सारणीचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे -**

वरील तक्ता / सारणी मध्ये पहिल्या आडव्या ओळीत शेती क्षेत्राकडून एका वर्षात एकूण ३०० कोटी रुपये किंमतीची प्रदाने (उत्पादन / उत्पन्न) निर्माण केले जातात असे दर्शविले आहे. त्यापैकी १०० कोटी रुपये किंमतीची प्रदाने कुटुंब संस्थेकडून प्रत्यक्षपणे उपभोगाकरिता वापरली जातात. उर्वरित प्रदानापैकी ५० कोटी रुपये किंमतीची प्रदाने शेती क्षेत्राकडून तर १५० कोटी रुपये किंमतीची प्रदाने उद्योग क्षेत्राकडून 'आदाने' म्हणून वापरली जातात. तसेच दुसऱ्या आडव्या ओळीद्वारे असे व्यक्त होते की, उद्योग क्षेत्राकडून एका वर्षात एकूण ५०० कोटी रुपये किंमतीची प्रदाने निर्माण केली जातात. त्यापैकी १५० कोटी रुपये किंमतीची प्रदाने कुटुंब क्षेत्राकडून अंतिम उपभोगाकरिता वापरली जातात. उर्वरित प्रदानापैकी १०० कोटी रुपये किंमतीची प्रदाने शेती क्षेत्राकडून व २५० कोटी रुपये किंमतीची प्रदाने उद्योग क्षेत्राकडून 'आदाने' म्हणून वापरली जातात.

उभ्या ओळीमधील स्तंभ क्र. ३ मध्ये असे दर्शविले आहे की शेती क्षेत्राकडून एकूण ३०० कोटी रुपये किंमतीची आदाने उत्पादनाकरिता वापरली जातात. त्यातील ५० कोटी रुपये किंमतीची शेती क्षेत्राने स्वतः निर्माण केलेली प्रदाने १०० कोटी रुपयांची उद्योग क्षेत्राने निर्माण प्रदान आणि शेती क्षेत्राने वापरलेल्या उत्पादन घटकांचे दिलेले मोबदले १५० कोटी रुपये किंमतीचे आहेत. याचा अर्थ, शेती क्षेत्र ३०० कोटी रुपये किंमतीची प्रदाने निर्माण करण्यासाठी ३०० कोटी रुपयांची आदाने वापरते. तसेच उभ्या ओळीतील स्तंभ क्र. ४ मधील आकडेवारी असे स्पष्ट करते की उद्योग क्षेत्राकडून एकूण ५०० कोटी रुपये किंमतीची

वापरली जातात. त्यापैकी १५० कोटी रुपये किंमतीची आदाने शेती क्षेत्राकडून खरेदी केली असतात. २५० कोटी रुपये किंमतीची आदाने उद्योग क्षेत्राची स्वतःची आणि १०० कोटी रुपये उत्पादन घटकांचे मोबदले स्वरूपात वापरलेली असतात. उभ्या स्तंभ क्र. ५ मधील आकडेवारी असे स्पष्ट करते की, अर्थव्यवस्थेतील एकूण प्रदानापैकी कुटुंब क्षेत्राकडून व सरकारकडून अंतिम उपभोगाकरिता २५० कोटी रुपयांची आदाने वापरली जातात. प्रत्येक क्षेत्राकडून वापरली जाणारी आदाने आणि निर्माण करण्यात येणारी प्रदाने यांच्यात समानता प्रस्थापित होऊन एकूण अर्थव्यवस्थेत सर्वसाधारण समतोल साधला जातो.

आदान-प्रदान तक्त्याद्वारे अ) अर्थव्यवस्थेची कार्यपध्दती व साधनसाम्रग्रीचा एका क्षेत्राकडून दुसऱ्या क्षेत्राकडे सुरू राहणारा प्रवाह आणि ब) अर्थव्यवस्थेतील क्षेत्रनिहाय अंतर्गत स्थैर्य आणि क्षेत्रा-क्षेत्रामधील संबंधाद्वारे बाह्य स्थिरता कशा रितीने निर्माण होते याचे स्पष्टीकरण मिळते.

**आदान-प्रदान विश्लेषणाची गृहिते :**

१) अर्थव्यवस्थेचे दोन क्षेत्रामध्ये विभाजन झालेले असते.

२) प्रत्येक क्षेत्राकडून केवळ एकाच प्रकारचे व एकजिनसी उत्पादन घेतले जाते.

३) कोणत्याही दोन क्षेत्रांद्वारे संयुक्तपणे उत्पादन घेतले जात नाही.

४) उत्पादनाचे तंत्र स्थिर असते व उत्पादनाबाबत प्रतिफळाचा दर स्थिर असतो.

५) उत्पादन क्षेत्रात बाह्य बचती व बाह्य बेबचती निर्माण होत नाहीत.

**विकास नियोजनातील वापर : (Uses is Development Planning)**

विकास नियोजनाच्या कार्यवाही दरम्यान स्थितीशील प्रतिपादनातील साधनसामग्रीच्या प्रवाह गुणांक (Flow Coefficients) तसेच गतिशील अर्थवव्यवस्थेतील भांडवल गुणांक (Capital Coefficient) यांच्यातील मुलभूत संबंधाबाबतची कार्यप्रणाली ज्ञात असणे आवश्यक असते. आदान-प्रदान तक्त्याद्वारे नियोजनकारांना विविध उत्पादन क्षेत्रामधील आदान-प्रदान विषयक आंतर संबंध व आंतर अवलंबित्व (Inter dependancy) आणि एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील रचनात्मक संबंध याबाबतच्या स्थितीचे आकलन होण्यास मदत होते. याच माहितीचा आधार घेऊन व उपयोग करून नियोजन मंडळास एका क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या आदानांचा इतर क्षेत्रांना होणारा लाभ व त्या क्षेत्रावरील परिणाम समजतात. त्यामुळे संपूर्ण अर्थव्यवस्थेकरिता राबविण्यात येणाऱ्या नियोजनबद्ध विकासासाठीची गुंतवणूक विषयक व्युहरचना करणे शक्य होते.

नियोजनबद्धरित्या घडून आणावयाच्या आर्थिक विकास प्रक्रियेत आर्थिक विकासाच्या वाढत्या दराबरोबर विविध क्षेत्रांची भांडवली साधनसामग्रीची मागणी वाढत जाते. त्या मागणीत बदल होतात. अशा परिस्थितीत अर्थव्यवस्थेतील भांडवलाची उपलब्धता याचा वापर आणि क्षेत्रा-क्षेत्रामधील आदान-प्रदानाचा प्रवाह यांचे योग्यरित्या नियोजन करण्यासाठी व विश्राम प्रक्रिया गतिमान करण्यासाठी आदान-प्रदान विश्लेषण मार्गदर्शक ठरते.

डॉ. अलोक घोष यांच्या मते अर्थव्यवस्थेतील विशिष्ट मुलभूत परिस्थिती व नियोजित कार्यक्रमांचा कालखंड गृहित मानल्यास आदान-प्रदान प्रवाह गुणांक व भांडवल गुणांक यांचे जास्तीत जास्त अचूक मापन करण्यासाठी  आदान-प्रदान विश्लेषण उपयुक्त ठरते. आणि याबरोबर अंतिम उपभोग वाढीची मागणी विषयक आकडेवारी उपलब्ध झाल्यास नियोजनकारांना अर्थव्यवस्थेतील विविध उत्पादक क्षेत्राममधील पर्याप्त उत्पादन पातळी किती असणे त्याचे मापन करता येते.

एकंदरीत विकास नियोजनामधील कार्यक्रमांची कार्यक्षमपणे तसेच यशस्वीरित्या आखणी व अंमलबजावणी होण्याकरिता आदान-प्रदान तक्ता विश्लेषण खालील बाबतीत उपयुक्त ठरते.

१. नियोजनाद्वारे पूर्ण करावयाचा प्रकल्पाकरिता प्रशिक्षित व कुशल श्रमिकांची आवश्यकता, त्यांना द्यावे लागणारे मोबदले इत्यादी बाबीविषयीचे अंदाज तयार करता येतात.

२. नियोजनात समाविष्ट प्रकल्पांमधून उत्पादनावरील अपेक्षित पातळी राखण्यासाठी भांडवलीसाधन सामग्रीची जमवाजमव करण्याबाबतच्या नियोजना संदर्भात हे विश्लेषण मार्गदर्शक ठरते.

३. अर्थव्यवस्थेतील व्यक्तीगत उत्पादन उद्योग संस्थांना उत्पादन विषयक अंदाज तयार करण्यासाठी हे विश्लेषण उपुयक्त ठरते.

४. अर्थव्यवस्थेतील उत्पादन पातळीत वाढ घडवून आणण्यासाठी देशांतर्गत आदानांची उपलब्धता आणि प्रत्यक्ष आवश्यकता यांचा आढावा घेऊन विदेशातून किती भांडवली साधन सामुग्रीची आयात करणे गरजेचे आहे. याबाबत नियोजनकारांना हा तक्ता मार्गदर्शक ठरतो.

**आदान-प्रदान विश्लेषणांच्या मर्यादा (Limitations of Input Output Analysis) :**

आदान - प्रदान विश्लेषणावर अनेक मर्यादा पडतात तसेच हे विश्लेषण अनेक गृहितांवर आधारित आहे. त्यामुळे व्यवहारात त्याच्या वापरावर अनेक मर्यादा येतात. अलिकडे विकसनशील नियोजनासाठीचा विश्लेषणाचा  वापर वाढत आहे. पण विकसनशील नियोजनाच्या वापराविषयी या विश्लेषणावर काही मर्यादा येतात त्या पुढीलप्रमाणे.

१. आदान-प्रदान विश्लेषण हे लिऑन्टीफच्या मूलभूत गृहितांवर आधारित आहे. जे उत्पादनाच्या आदान-गुणकाच्या स्थैर्यावर आधारित आहे. जे स्थिर अनुमाप प्रमाण व उत्पादनाचे तंत्र यामध्ये विभाजित झाले आहे.  अर्थात स्थिर अनुमाप प्रत्याय हे स्थिर अर्थव्यवस्थेत चांगले असते पण जेव्हा स्थिर अर्थव्यवस्थेत उत्पादनाचे  तंत्र स्थिर असते, हे गृहित वास्तवात नसते.

२. आदान-प्रदान विश्लेषण हे आंतर - उद्योग विश्लेषण गतिमान आहे असे मानत नाही. ते गतिशील  प्रतिमानातही नसते ते आपणास बदलत्या अटीनुरुप तांत्रिक गुणक कसा बदलतो हे सांगू शकत नाही. म्हणून या  विश्लेषणावर मर्यादा येतात.

३. उत्पादनाचे निश्चित गुणक गृहित घटक पर्याप्ततेच्या शक्यतेकडे दुर्लक्ष करते. अगदी अल्प

काळातही नेहमी काही पर्यायाची शक्यता असते. अर्थात दीर्घ कालावधीत सापेक्षतेने पर्यायाची शक्यता अधिक असते.

४. काही उद्योग भांडवली रचना म्हणून ओळखले जातात. काहींना भारी भांडवलाची आवश्यकता असते. तर इतर काही भांडवल वापरत नाहीत अशा भिन्नभिन्न स्थितीत उत्पादनाचे तंत्रज्ञान वापरणे यामुळे उत्पादनाचे स्थिर गुणक गृहित अवास्तव ठरते.

५. आदान-प्रदान प्रतिमान कितीही सुलभ केले तरी ते अर्थव्यवस्थेच्या उत्पादन बाजूवर अतिरिक्त भार देते. ते आपणास अर्थव्यवस्थेचा उत्पादन बाजूवर अतिरिक्त भार देते. ते आपणास अर्थव्यवस्थेत आदान व प्रदान विशिष्ट रचनेत का असतात हे सांगू शकत नाही.

६. आदान-प्रदान प्रतिमानातील ताठरपणामुळे अडथळे, वाढता खर्च अशी परिस्थिती निर्माण होते.

७. रेखीय समीकरणाचे गृहित जे एका उद्योगाचे आदान हे इतरांचे आदान असते यासी संबंधित असते. हे अवास्तव वाटते. ज्याअर्थी घटक बहुतांशी अविभाज्य असल्यास प्रदानातील वाढीने त्याच प्रमाणात आदानातील वाढीची आवश्यकता नेहमीच नसते.

८. आदान-प्रदान विश्लेषणातील किंमत समन्वयासाठी योजना नाही जी त्यास अवास्तव बनविते. गतिमान आदान-प्रदान विश्लेषणात काही संकल्पनात्मक अडचणी समाविष्ट असतात.

९. आदान-प्रदान प्रतिमान गुंतवणुकीचा सगर्भता पश्चायन (Gestation lag) याकडे लक्ष देण्यात अपयशी ठरते आहे. जी गतिमान प्रक्रियेत आवश्यक घटक असते. धोरणात्मक दृष्टिकोनातून विचार केला असता ही महत्त्वाची मर्यादा आहे कारण पश्चायनची बिगर मांडणी काही वेळा गंभीर भार निर्माण करते.

१०. आदान-प्रदान प्रतिमान मोठ्या प्रमाणात औद्योगिक प्रगत देशात वापरले जातात. जेथे आंतर-उद्योग व्यवहार मोठ्या प्रमाणात असतात. प्राथमिक शेतीप्रधान अर्थव्यवस्थेत प्रदानाचा मोठा भाग हा प्रगत अंतिम मागणी भागविण्यासाठी अगर निर्यातीसाठी वापरला जातो. कारण अशा अर्थव्यवस्थेत आंतर-उद्योग व्यवहार अल्प असतात. ते आदान-प्रदान प्रतिमानाचा अल्प वापर करतात.

११. आदान-प्रदान नियोजन साधन म्हणून लागू करताना आणखी एक मर्यादा येते ती म्हणजे हे विश्लेषण असे गृहित धरते की, प्रत्येक उद्योग क्षेत्रात एकच उत्पादन प्रक्रिया असते. वास्तवात ही बाब अशक्य असते. आदान-प्रदान प्रतिमानाची रोजगार प्रकल्पासंबंधात उपयोगिता मर्यादित नसते.

अशा प्रकारे आदान-प्रदान विश्लेषणावर अनेक मर्यादा येतात. विशेषतः विकसनशील देशात अनेक प्रकारच्या अटी पाळणे शक्य नसते म्हणून विकसनशील विकासात आदान-प्रदान तंत्राचा वापर करण्यावर मर्यादा येतात तरीही नियोजनकारांना हे विश्लेषण उपयुक्त ठरते.

### २.२.४ प्रकल्प मुल्यमापन – अर्थ आणि महत्त्व :
### (Evaluation Project - Meaning and Importance)

प्रकल्प मूल्यमापन ही नियोजनातील महत्त्वाची प्रक्रिया आहे. आर्थिक नियोजनाद्वारे आर्थिक विभागाची निर्धारित उद्दिष्ट्ये साद्य करण्यासाठी विकास योजनांची (Development Plans) आखणी व अंमलबजावणी केली जात असते. तेव्हा विविध सेवाभावी प्रकल्प तयार केले जातात. अशा प्रकल्पावर सरकारी तिजोरीतून पैसे खर्च केले जातात. या खर्चामधून पूर्ण होणाऱ्या प्रकल्पांचा अपेक्षित लाभ (Benefit) देशातील नागरिकांना किती व कसा मिळणार आहे? त्याचे पूर्ण अनुमान करणे आवश्यक असते. नियोजन अंतर्गत केल्या जाणाऱ्या गुंतवणूकीचे, खर्चाचे (Cost) आणि त्यातून निर्माण होणाऱ्या सर्व संभाव्य लाभांचे अचूक मोजमाप केल्याने, नियोजनकारांना नियोजित प्रकल्पांबाबत सशक्त व परिणामकारक निर्णय घेण्यास मदत होते. नियोजन विषयक सशक्त निर्णय प्रक्रियेसाठीचे एक उपयुक्त साधन म्हणून प्रकल्प मुल्यमापन विषयक विश्लेषण संकल्पनेकडे पाहिले जाते. म्हणून पाठीमागील दोन ते तीन दशकांपासून विकास नियोजनाच्या कार्यक्रमाकरिता प्रकल्प मूल्यमापन विश्लेषण निकष लावला जात आहे. प्रकल्प मूल्यमापन विश्लेषणात प्रामुख्याने प्रकल्पांवरील खर्च आणि त्यापासूनचे त्याचे फायदे यांचे जास्तीत जास्त शास्त्रीयपणे विश्लेषण मांडलेले असते. म्हणून प्रकल्प मूल्यमापन विश्लेषणास खर्च लाभ विश्लेषण (Cost - Benefit Analysis) म्हणून देखील संबोधले जाते.

**प्रकल्प मुल्यमापनाचा अर्थ : (Meaning of Project Evaluation)**

प्रकल्प मूल्यमापन ही अधिक विशेष नियोजन प्रक्रिया आहे. ज्यामध्ये व्यक्तिगत वस्तू आणि प्रकल्पाकरिता पद्धतशीर उद्दिष्ट्ये बहुव्याप्ती मूल्यमापन यांचा समावेश असतो. हे असे मानते की प्रकल्पाचे मूल्यमापन अगर मूल्यनिर्धारण असते. ज्यामध्ये तांत्रिक, आर्थिक, वित्तीय आणि व्यवस्थापकिय कार्याच्या कार्यक्षमतेचा विचार केला जातो. प्रकल्पात बाहेरील तज्ञांच्या गटाच्या कामकाजाच्या तपासणीचा अंतर्भाव असतो. त्यामुळे त्यांची साध्ये व दोष शोधता येतात आणि त्यांचे कार्य सुधारण्यासाठी दोषांवर मात करण्यासाठी मार्ग व साधने सुचविता येतात. अशा रीतीने प्रकल्प मूल्यमापन हे नियोजित सामाजिक कार्याचे परिणामातील बदल शोधण्याच्या पद्धतीशी संबंधित असते. ज्यामुळे नियोजन आवर्त पुढे जाईल. ही एक सुयोग्य अभ्यासपद्धती आहे जी तर्कसंगत कार्याचे बरोबर असणारी बाब असते. विकास कार्याचा तो अंतर्गत हिस्सा असतो.

**व्याख्या :**

प्रो. हायमनच्या मते, प्रकल्प मूल्यमापनाचा संदर्भ नियोजित सामाजिक कार्याच्या परिणामाविषयी तथ्य (वस्तुस्थिती) शोधण्याच्या प्रक्रियेशी असतो. ज्यामध्ये योजनेचे आवर्तन वर नेण्याकडे असते. ही तर्कसंगत (समुवंशीक) कार्याची योग्य पद्धतीशास्त्र विषयक काम असते. (Project evaluation refers to the procedures of fact finding about the result of planned social action which in then moves the spiral of planning ever upword. It is the proper methodological accompaniment of rational action - Prof. Heymen.)

मिश्रा आणि पुरी यांनी (Development and Planning : Theory and Practice ) या ग्रंथात प्रकल्प मुल्यमापनास (Evaluation) 'प्रकल्प मूल्यांकन' (Project Appraisal) असे देखील संबोधले आहे. त्यांच्या मते ''नियोजन अंतर्गत केल्या जाणाऱ्या सार्वजनिक गुंतवणूकीचे प्रमाणित दृष्टिकोनानुसार (Standard approach) विश्लेषण करण्यासाठी उपयोगात आणले जाणारे तंत्र म्हणजे प्रकल्प मुल्यमापन होय. सार्वजनिक तंत्राद्वारे केल्या जाणाऱ्या गुंतवणूक विषयक विश्लेषणात प्रकल्पाचा आर्थिक खर्च आणि त्यातून निर्माण होणाऱ्या आर्थिक सामाजिक लाभाचे मुल्यांकन करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या प्रचलित प्रकल्प मुल्यमापन असे म्हणतात.''

ए.आर. प्रेस्ट व आर. तुर्वे (A.R. Prest and R. Turvey) यांनी (Cost-Benefit Analysis) या लेखात असे म्हटले आहे की, विकास नियोजनामधील सार्वजनिक गुंतवणूकीद्वारे सुरु करावयाच्या वेगवेगळ्या प्रकल्पांचे सामाजिक दृष्टीकोनातून मुल्यांकन हेतूने खर्च-लाभ तत्त्वाच्या आधारे विश्लेषण म्हणजे 'प्रकल्प मूल्यमापन' होय.

**प्रकल्प मुल्यमापनाचे टप्पे : (Stages)**

प्रकल्प मूल्यमापन प्रक्रिया पार पाडत असताना ते कार्य एका विशिष्ट चाकोरीबद्धरित्या पार पाडावे लागते. प्रत्यक्ष मुल्यमापनाचे स्पष्टीकरण व अर्थ समजावून घेण्यासाठी प्रकल्प मुल्यमापन पद्धतीचा अभ्यास उपयुक्त ठरतो. या दृष्टीकोनातून हे कार्य पुढील घटकांशी व त्याच्या विश्लेषणाशी संबंधित असते.

१) प्रत्यक्षात प्रकल्प सुरु करण्यापूर्वी परिस्थितीचे परिक्षण करणे, आढावा घेणे.

२) मूल्यमापन करणे जेव्हा प्रकल्प कार्यरत असतो तेव्हा यामध्ये किती काम झाले आहे आणि किती शिल्लक राहिले आहे याचा शोध घेणे.

३) पुढे त्याच्या कार्यात सुधारणा होण्यासाठी मार्ग व साधने सुचविणे आणि त्यातील पळवाटा बुझविणे.

४) जेव्हा प्रकल्प पूर्ण होतो व त्यांचे कार्य पूर्णपणे होते तेव्हा प्रकल्पाने साध्य केलेल्या साध्याचे मुल्यमापन करणे.

**खर्च (परिव्यय) लाभ विश्लेषण : (Cost-Benefit-Analysis)**

खर्च (परिव्यय) लाभ विश्लेषण ही प्रकल्प मुल्यमापनाची सर्वाधिक लोकप्रिय पद्धत आहे. विविध प्रकल्पांचे खर्च-लाभ विश्लेषणाचा विचार करणे आणि त्यानंतर कमी खर्च असणारी उत्पन्नाचा अधिक लाभ देणाऱ्या पद्धतीची निवड करणे, प्रो. मार्नलिन यांनी खर्च-लाभाची भूमिका अशी विशद केली आहे, पाच वार्षिक योजना क्षेत्रात साधनसामग्रीच्या विल्हेवाटीने वृध्दीच्या व्यापक व्युहरचनेचे निर्धारण करतात. परंतु योजनेतील अंतर्भूत वृद्धीची व्युहरचना अनेक डावपेचासंबंधी प्रश्न न सोडविता सोडून देते आणि हेच डावपेचासंबंधीचे निर्णय जे खर्च लाभ विश्लेषणाचे खर्चाची व्याप्ती दर्शवितात. नियोजित

अर्थव्यवस्थेत प्रकल्प मुल्यमापनासाठी ते उत्तम कसोटी पुरविते. ते योजना अधिसत्तेला (अधिकार मंडळाला) लाभाचे सध्याचे मुल्य व प्रकल्पाचा खर्च यामधील विविध महत्ततेने इष्टतम सामग्री वाटप साध्य करण्यासाठी अचूक गुंतवणूक निर्णय घेण्याचे साधन पुरविते. अशा प्रकारे खर्च- लाभ विश्लेषण हे सर्वसामान्य चलन विषयक एककाच्या संदर्भात वर्णन करण्याचे आशय (अभिप्राय) आणि धोरणाचे सामाजिक फायदे व तोटे याविषयी अधिकतम सांगणे. कार्याचा उद्देश अशा प्रकारे व्यक्त केला जातो. निव्वळ सामाजिक लाभ (Net Social Benefit-NSB) = लाभ (Benefit) वजा (-) खर्च (Cost) जेथे लाभ व खर्च हे आदानाच्या छाया किंमत अगर (लेखांकन किंमतीच्या संदर्भात मोजली जाते मात्र बाजारातील किंमतीने नव्हे. अशा रितीने खर्च-लाभ विश्लेषणाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे प्रकल्पात साधनसामग्री अशा प्रकारे प्रवाहित करावयाची की, समाजाला निव्वळ लाभासाठी महत्तम उत्पन्न प्राप्त करता येईल.''

**खर्च - लाभ विश्लेषणासाठी कसोटी (Criteria for Cost-Benefit-Analysis) :**

खर्च-लाभ विश्लेषणासाठी अर्थशास्त्रज्ञांनी पुढील निर्णय नियम किंवा कसोट्या सांगितल्या आहेत.

**१) निव्वळ विद्यमान (सांप्रत) मूल्य कसोटी-(The Net Present Value Criterion-NPV)**

प्रकल्प मुल्यमापनासाठी ही महत्त्वाची कसोटी आहे. निव्वळ विद्यमान मूल्य (NPV) = लाभाचे विद्यमान मुल्य-चल परिव्यय (खर्च) व परिरक्षा खर्चाचे वर्तमान मूल्य - आरंभातील खर्च (NVP= Present Value of Benefit- Present value of Operating and Maintaining cost-Initial Outlay) लाभाचे निव्वळ विक्षपात मुल्य कसोटी अशीही व्यक्त केली जाते. लाभाचे निव्वळ विद्यमान मूल्य (NPV) = लाभाचे स्थुल विद्यमान मूल्य (Gross Present Value of Benefit) खर्चाचे स्थूल वर्तमान मूल्य (Gross present value of costs)

जर NPVB < O असेल तर प्रकल्प सामाजिकदृष्ट्या फायदेशीर असतो. जर अनेक प्रकल्प परस्परांशी निगडित असतील अपवर्जक (अनन्य) असतील तर लाभाचे उच्च निव्वळ विद्यमान मूल्य देणारा प्रकल्प निवडला जातो.

समाज हा भविष्यकाळापेक्षा विद्यमान काळाला अधिक पसंती देतो. त्यासाठी भविष्यकाळील लाभाची कसर व प्रकल्पाचा खर्च आवश्यक बनतो. कसर घटक हा पुढीलप्रमाणे केला जातो.

$D = \frac{I}{(1+i)\,t}$ जेथे -- = i = सामाजिक कसर दर व t = कालावधी दर्शविला जातो.

अशा रीतीने NPV =

$$\left[ \frac{B_1}{(1+i)^1} + \frac{B_2}{(1+i)^2} + \frac{B_a}{(1+n)^a} \right] - \left[ \frac{C_1}{(1+i)^1} + \frac{C_2}{(1+i)^2} + \frac{C_a}{(1+i)^a} \right]$$

येथे $B_1, B_2 .... B_n$ हे वर्ष १, २ .... एन मधील स्थूल वर्तमान लाभाची (माला) आहे.

$C_1, C_2 .... C_n$ हे वर्ष १, २ .... एन मधील स्थूल विद्यमान खर्चाची श्रेणी आहे.

i हे वार्षिक गणनासाठी कसरीचा सामाजिक दर आहे. प्रकल्पात निवड करताना दोन नियमांचा अवलंब केला जातो ते असे.

(अ) फक्त त्याच प्रकल्पाची निवड करावी जेथे खर्चाच्या विद्यमान मूल्यापेक्षा लाभाचे विद्यमान मूल्य अधिक असते. जेथे सूचकपणे दर्शविले जाते.

$$\frac{B_1}{(I+i)^1} + \frac{B_2}{(1+i)^2} + \frac{B_n}{(1+i)^n} > \frac{C_1}{(1+i)^1} + \frac{C_2}{(1+i)^2} + \frac{C_a}{(1+i)^a}$$

(ब) सर्व प्रकल्प जेथे खर्चाचे विद्यमान मूल्याचे गुणोत्तर लाभाच्या विद्यमान मूल्याचे गुणोत्तर १ पेक्षा अधिक (मोठे) असते, ते सूचकपणे पुढीलप्रमाणे दर्शविले जाते.

$$\frac{B_1}{(1+i)^1} + \frac{B_2}{(1+i)^2} + --- + \frac{B_n}{(1+i)^n} > \frac{C_1}{(1+i)^1} + \frac{C_2}{(1+i)^2} + --- + \frac{C_a}{(1+i)^a}$$

(NPV) कसोटी प्रकल्प मूल्यमापनासाठी अधिक योग्य मानला जातो.

**मर्यादा** : या कसोटीवर पुढील महत्त्वाच्या मर्यादा येतात.

१) प्रकल्प मूल्यांकनासाठी लाभ-खर्चाच्या संदर्भात स्पष्ट केली जाणारी NPV पद्धत अचूक पद्धत नाही. कारण ती काल सीमेकडे (कक्षेकडे) दुर्लक्ष करते.

२) भांडवली गुंतवणूक काही कालावधी गेल्यानंतर लाभ देते. म्हणून भविष्यकालीन लाभ व खर्च हा वर्तमानकालीन लाभ व खर्चाबरोबर समान होत नाहीत.

३) नेहमी समाज हा भविष्यकाळापेक्षा वर्तमानकाळाला अधिक पसंती देतो.

**२. परतावा कसोटीचा अंतर्गत दर (The Internal Rate of Return Criterion)**

ही कसोटी असे मानते की, परताव्याच्या शेकडेवारी (टक्केवारी) दर जो प्रकल्पाचा लाभाच्या व खर्चाच्या प्रवाहात गर्भित (सूचित) असतो. **प्रो. मार्जेलिन** (Marglin) परत परताव्याच्या अंतर्गत दराची (IRR) व्याख्या अशी करतो. जसा कसरदर जेथे परताव्याचे विद्यमान मूल्य वजा खर्च शून्य असतो. (IRR) गणनेसाठी पुढील गणितीय सूत्र सांगितले जाते.


$$\frac{B_1 - C_1}{(1+r)^1} + \frac{B_2 - C_2}{(1+r)^2} + --- + \frac{B_n - C_n}{(1+r)^n} = 0$$

येथे r = परताव्याचा अंतर्गत दर,

जेथे परस्पर अन्योन्य प्रकल्प असतील तेथे परताव्याचा उच्च दर असणारा प्रकल्प निवडला जावा.

प्रत्यक्षात परताव्याचा अंतर्गत दर (IRR) हा कसरीच्या सामाजिक दरावर अवलंबून असतो. प्रकल्पाची निवड ही कसर दरावर अवलंबून असते. जर प्रकल्पाचे निव्वळ विद्यमान मूल्य दिलेले असेल. ही बाब पुढील आकृतीने अधिक स्पष्ट केली आहे.

**आकृती २.३ : परतावा कसोटीचा अंतर्गत दर**




आकृती २.३ मध्ये 'अ क्ष' या अक्षावर कसरीचा दर मोजला आहे आणि 'अ य' अक्षावर (NPV) (निव्वळ विद्यमानमुल्ये) मोजले आहे. आकृतीत 'प प' हा प प्रकल्पातील गुंतवणूक दर्शवितो. आणि 'म म' हा वक्र म प्रकलापातील गुंतवणूक दर्शवितो. परताव्याचा अंतर्गत दर (IRR) प प्रकल्पाचा हा 'म' प्रकल्पापेक्षा उंचीवर आहे. अधिक आहे. कारण कसरदर 'अक$_२$' पेक्षा 'अक$_१$' अधिक आहे. आता 'अ क$_२$' येथे दोन्ही प्रकल्पांचा परताव्याचा अंतर्गत दर (IRR) समान आहे. परंतु जर कसरदर 'अ क$_२$' पेक्षा खाली गेला तर प्रकल्प 'म' ची निवड केली जाईल. कारण त्यांचा निव्वळ विद्यमान मुल्य (NPV) हे 'बत' एवढे अधिक आहे. अशाप्रकारे दोन प्रकल्पातील निवड ही कसरदरातील बदलत्या आकारावर केली जाते. त्यात परिवर्तन अगर पुनरंतरण (बदलणे आणि पुन्हा बदलणे) असे संबोधले जाते.

या विश्लेषणावर काही मर्यादा येतात त्या खालीलप्रमाणे -

१) एकदा आपण परताव्याचा दर प्रकल्पाच्या लाभकारकतेच्या गणनेसाठी गृहीत धरला तर त्यामध्ये बदल करणे शक्य होत नाही.

२) दीर्घकालानंतर जे प्रकल्प फळ देतात त्यांचा परतावा दराची गणना करणे कठीण असते जे अनेक वर्षे लाभाचे उत्पन्न देत नाहीत.

३) बऱ्याच वेळा पहिल्या कालावधीत अशा प्रकल्पावर यामध्ये पूर्ण गुंतवणूक खर्च केला जात नाही. त्यामुळे अशा घटकांतील त्यावरील परताव्याच्या अंतर्गत दराची (IRR) गणना करणे कठीण असते.

४) सार्वजनिक गुंतवणूकीकरिता परताव्याचा अंतर्गत दर (IRR) याचा उपयोग करणे योग्य निर्णय ठरत नाही. कारण या कसोटीची व्याख्या असे सूचित करते की, मध्यस्थित प्राप्ती व खर्च याची सुद्धा अंतर्गत दराने कसर कापली जाते. तथापि सार्वजनिक गुंतवणूकीला परताव्याची अंतर्गत दराने मध्यस्थित प्राप्ती व खर्चाची कसर कापणे (कटमिती) शक्य नसते.

५) जर प्रकल्प परस्परांशी संबंधित असतील तर ही कसोटी इतरांपेक्षा कमी भांडवली खर्च असणाऱ्या प्रकल्पाच्या बाजूने निर्णय देते. (अनुकूल असते) अशा प्रकारे ही कसोटी उच्च भांडवलप्रधान प्रकल्पांना लागू पडत नाही.

६) परताव्याचा अंतर्गत दराची (IRR) कसोटी ही असा गुंतुणूक प्रकल्पासाठी योग्य असते ज्यामध्ये ती पूर्णपणे इतरांपेक्षा स्वतंत्र असते. विविध प्रकल्पांना ज्यांच्या परताव्याच्या अंतर्गत दरावरून दर्जा दिला जातो आणि ज्या प्रकल्पाच्या परताव्याचा अंतर्गत दर (IRR) उच्च असतो त्याची निवड प्रथम केली जाते. तसेच इतर प्रकल्प ज्यांच्या परताव्याचा अंतर्गत दर कमी असतो. त्यांची निवड दर्जानुसार केली जाते. परंतु प्रकल्पात सार्वजनिक गुंतवणूकीत त्या एकमेकांशी स्वतंत्र नसतात. अनेकदा त्या वैकल्पिक असतात. म्हणून दोन वैकल्पिक गुंतवणुकीमधील निवड त्यांच्या परताव्याच्या वैकल्पिक अंतर्गत दराच्या आधारावर करणे अवघड असते.

७) प्रा.रिचर्ड नेयार्डच्या मते, जेथे प्रकल्प परताव्याच्या दराच्या दर्शविलेल्या क्रमाच्या दर्जाच्या आधारावर निवडले जात नाहीत. तेथे भांडवल वाटपाची समस्या उद्‌भवते असे प्रकल्प फक्त त्यांच्या निव्वळ विद्यमान मूल्याच्या आधारावर निवडले जातात.

**३. कसरीचा सामाजिक दर (The Social Rate of Discount)**


नियोजनकार जेथे निव्वळ विद्यमान मूल्य अगर परताव्याचा अंतर्गत दराचा वापर करतो तेथे सर्व खर्च व लाभाच्या वटवणीसाठीची कसरीच्या दराची आवश्यकता असते. अशा दराविषयीचा निवडीसंबंधी बराचसा वादविवाद निर्माण होतो असे वादविवाद निर्माण होण्याचे कारण कसरदाराला दोन समस्या सोडविण्याची आवश्यकता असते.

१) एक सार्वजनिक व खाजगी क्षेत्रात दोहोमध्ये योग्य साधनसामग्रीचे वाटप करणे व

२) दोन विद्यमान व भविष्यकालीन वस्तू व सेवांची या दोहोंमध्ये साधनसामग्रीच्या वाटपाची तरतूद

जेव्हा दुसरी समस्या सोडविण्यासासाठी दराचा वापर केला जातो. त्यासच सामाजिक कसरदर अगर सामाजिक पसंतीक्रम दर असे संबोधले जाते.

**आकृती २.४ कसरीचा सामाजिक दर**




सामाजिक कसरदर हे अधिमूल्य (हप्ता) असते. जो समाज भविष्यकालीन उपभोगाऐवजी वर्तमानकालीन उपभोगण्यास पसंती देत असतो. ही बाब आकृतीत दर्शविली आहे. आकृतीत अ क्ष या अक्षावर 'ब१' हा विद्यमान (वर्तमान) उपभोग दर्शविला आहे. आणि 'अय' या अक्षावर 'ब२' हा भविष्यकालीन उपभोग दर्शविला आहे. आकृतीत 'अ, ब१, ब२' हा वक्र रूपांतरण सीमा अगर गुंतवणूक शक्यता वक्र आहे. यामध्ये त्याच्या परताव्याच्या दरानुसार उजवीकडे डावीकडे प्रकल्पाच्या श्रेणीच्या व्यवस्थापनाचा समावेश आहे. म्हणजेच हा खर्च वर्तमान उपभोगाच्या त्यागाचा आहे. आणि भविष्यकाळातील उपभोगाच्या लाभाचा परतावा आहे. समाज विविध गुंतवणूक शक्यतेमधून निवड करील ज्यायोगे तो उच्च सामाजिक समवृत्ती वक्र सम वर पोहोचेल. समाज इष्टतम स्थितीला त्याच्या वर्तमानकालीन उपभोगाच्या त्यागावर पोहोचेल आणि भविष्यकालीन उपभोगातील त्याच्या लाभासाठी गुंतवणूक करील जेव्हा त्याचा 'ब१ ब२' हा रूपांतरण वक्र हा त्याच्या 'सम' या सामाजिक समवृत्ती वक्रावर 'प' या बिंदूत समतोल साधतो येथे हे लक्षात घेतले पाहिजे की, रूपांतरण वक्राचा उतार हा गुंतवणूकीवरील परताव्याच्या दराचे प्रतिनिधित्व करतो. आणि सामाजिक समवृत्ती वक्र हा पसंतीक्रमाच्या दराचे प्रतिनिधित्व करतो म्हणून सामायिक कसरदर हा 'प' बिंदूत गुंतवणुकीवरील परताव्याचा दर व काळ पसंतीक्रमाच्या दराच्या समतोलाने निर्धारित केला जातो.

कसरीचा सामाजिक दर हा अतिकल्पिक स्थिर दर आहे. हाती घेतलेल्या प्रकल्पावर कसरदराच्या निधीचा परिणाम होतो. आय. एम. डी. लिटलच्या मते जर कसरदर ५ टक्क्याने असेल तर तो दुपटीसाठी आर्थिक गुंतवणूक १० टक्के असावी लागते. त्याच वेळी उपभोगात तेवढीच घट करावी लागते जर कसरदर उच्च असेल तर अल्पकालीन प्रकल्प उच्च निव्वळ लाभासह पसंत केले जातात. याउलट जेव्हा कसरदर अल्प असतो. तेव्हा दीर्घकालीन प्रकल्प अल्प निव्वळ लाभासह निवडले जातात.

समस्या अशी असते की, सामाजिक परतावा दर कसा निवडावा हा दर मिश्र अर्थव्यवस्थेतील व्याजाचा बाजार दर नसतो. कारण भांडवल बाजाराची अनिश्चितता व अपूर्णता होय. रोख्याचे (प्रतिभूतीचे) व्याजदराचे तत्सम प्रकार असतात. म्हणून सामाजिक कसरदर हा दीर्घकालीन रोख्यावरील सरकारी कर्ज दराबरोबर असला पाहिजे कारण हे रोखे आवश्यक धोके रहित असतात. यामुळे बहुसंख्य अर्थशास्त्रज्ञ याच दराने कसरीचा सामाजिक दर मोजतात. परंतु टिकाकारांचे दीर्घकालीन सरकारी रोख्यावरील दर सामाजिक कसरदर म्हणून निवडण्याविरुद्धच समर्थन आहे. त्यांच्या प्रतिपादनानुसार विविध कालावधीसाठी संबंधित सरकारी रोख्यावरील असंख्य कर्ज दर असतात. म्हणून समस्या अशी असते की सामाजिक कसरदर म्हणून कोणता दर निवडावयाचा पुन्हा सरकारी कर्जदारावर चलनविषयक धोरण जो सामाजिक कसरदराच्या निवडीसाठी संबंध नसतो, अशा घटकांचा परिणाम होतो. अशा सामाजिक कसरदाराची निवड सार्वजनिक व खाजगी क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या विविध व्याजाच्या दराच्या अतिशय अवघड समस्येकडे घेऊन जाते. यामुळे गुंतवणूक क्षेत्रात अंतर्गत निधीच्या वाटण्यात पुष्कळशी कार्यक्षमता निर्माण होते याचा अर्थ असा की, समजा जर सरकाराला वाटते ऊर्जानिर्मितीची जबाबदारी घ्यावी व खाजगी क्षेत्रात वाटले. तेल निर्मितीची जबाबदारी घ्यावी. तर भूतपूर्व प्रकारचे दुय्यम (निकृष्ट) प्रकल्प हे नंतरच्या प्रकारच्या श्रेष्ठ प्रकल्पाची जागा घेतील. म्हणून अर्थशास्त्रज्ञ सामाजिक कसरदाराच्या परावर्तनास बाजार दराच्या वापरास नाकारतात.

**खर्च – लाभ विश्लेषणाचे मुल्यमापन (Evaluation of Cost-Benefit Analysis) :**

खर्च-लाभ विश्लेषणाचे मुल्यमापन खालील महत्त्वाच्या मुद्द्यांच्या आधारे केले जाते.

**अ) लाभाच्या आधारावर मुल्यमापन** : प्रकल्पाचे मुल्यमापन लाभाच्या आधारावर करताना त्यापासून उपर्जितचा विचार केला जातो. लाभाचा संदर्भ प्रकल्पापासून उपर्जित राष्ट्रीय उत्पादनाच्या प्रवाहातील भरीविषयी असतो. काही प्रमाणात प्रकल्प लाभदायक असतो तो लोकांचे उत्पन्न वाढवितो. उत्पन्नातील वाढ ही उत्पादनातील व उपभोगातील प्रत्यक्ष वाढीने मोजली जाते. हे लाभ वास्तव वा नाममात्र आणि प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष असतात.

**१) वास्तव लाभ** : खर्च-लाभ विश्लेषणात प्रकल्पातून प्रवाहित होणाऱ्या नाममात्र लाभापेक्षा वास्तव लाभाची आपण संबंधित असतो. नदी-खोरे प्रकल्प शेतकऱ्यांना सिंचन सुविधा वाढविण्याची शक्यता असते. पण जर त्याचवेळी राज्याने त्यांचेवर प्रचंड सुधारणा कर आकारला तर लाभ नाममात्र बनतो. प्रकल्पापासून जो काही लाभ उद्भवितो तो खजिन्यात जातो. परंतु जर त्याच प्रकल्पाने सिंचन

सुविधात वाढ केल्याशिवाय दर एकरी जमिनीची उत्पादकता वाढविणे आणि जेणेकरून शेतकऱ्यांच्या वास्तव उत्पन्नाची पातळी उंचावणे अशा अनेक इतर बहिर्गत बचतीकडे नेले तर ते वास्तव लाभाकडे नेले जाते.

**२) प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष लाभ** : प्रत्यक्ष लाभ म्हणजे प्रकल्पापासून जे लाभ त्वरित व प्रत्यक्ष प्राप्त होतात. त्या ताबडतोब उत्पादन व सेवांचे मुल्य असते जे प्रत्यक्ष खर्चात अंतर्भूत असते. बहुहेतू नदी-खोरे प्रकल्पाने अनेक प्रत्यक्ष व सत्वर लाभ प्राप्त होतात. जसे पुर नियंत्रण, सिंचन, जल वाहतूक सुविधा, मस्यव्यवसायाचा विकास, ऊर्जा इ. बहुहेतू प्रकल्प काही अप्रत्यक्ष लाभ अगर बाजूचे परिणाम निर्माण करतो. अप्रत्यक्ष अगर दुय्यम लाभ प्रत्यक्ष लाभाच्या मुल्यात भर घालतो परिणामी कार्यापासून रोखले जाते. अगर प्रकल्पाने प्रलोभित (प्रवृत्त) होते. उदा. भाक्रा-नानगल प्रकल्पाच्या बांधकाने हजारो लोकांना रोजगाराच्या संधी पुरविल्या. यामुळे नानगल शहर व भाक्रा धरण हे देशातील इतर भागांशी नवीन रेल्वे मार्ग बांधणीने जोडले गेले. नवीन रस्ते बांधले गेले. नानगल हे नवीन शहर निर्माण झाले. तेथे खत कारखाना सुरू करण्यात आला. ज्यायोगे अधिक कारखान्यांचे आश्रयस्थान बनले. भाक्रा-नानगल धरणाचा विकास पर्यटन केंद्रात झाला. ज्यायोगे उत्पन्न निर्मिती झाली. प्रा. बुटनच्या मते प्रकल्प मुल्यमापनात गुंतवणूकीच्या दरावरील, प्रकल्पाचा परिणाम लोकसंख्येच्या वृद्धीदरावरील परिणाम, लोकांचे कौशल्य संपादन, व व्यवसायातील कौशल्य याचाही समावेश केला पाहिजे हे सर्व अप्रत्यक्ष लाभ अगर बाजूचे परिणाम आहेत. जे कमी अधिक प्रमाणात प्रत्यक्ष लाभास आनुषंगिक आहेत.

**३) मूर्त आणि अमूर्त लाभ** : प्रकल्पातून मूर्त अगर अमूर्त लाभही उद्भवतात. मूर्त लाभ म्हणजे असे लाभ जे पैशाच्या संदर्भात गणना करता येतात व मोजता येतात तर अमूर्त लाभ हे पैशाविषयक संदर्भात मोजता येत नाहीत. उदा भाक्रा नानगल प्रकल्पातून प्रवाहित लाभ हे मूर्त लाभ व ते गणता येतात. अमूर्त लाभात व्यक्तिगत मुल्याचा समावेश असतो जेथे बाजार वा किंमत असत नाही. ते सकारात्मक वा नकारात्मक असतात. सकारात्मकतेत भाक्रा-नानगलचे नैसर्गिक सौंदर्य व मनोरंजनात्मक मूल्य आहे तर नकारात्मकतेत धरणाच्या परिणामाने लोकांना स्थानांतर करण्यास भाग पाडण्याच्या संदर्भात असतो.

**ब) खर्चाच्या आधारावर मूल्यमापन** : प्रकल्पाच्या खर्चाची गणना करणे अतिशय कठीण असते. कारण त्यांच्या बांधणीत विविध प्रकारच्या खर्चाचा समावेश असतो. खर्च याचा अर्थ प्रकल्पाच्या बांधणीत वापरल्या जाणाऱ्या साधनसामग्रीचे मुल्य होय.

**१) प्रकल्प खर्च** : प्रकल्पाची बांधणी, चालविणे, आणि उपयोग यातील सामधनसामग्रीच्या वापराचे मुल्य होय. हा श्रमिकांचा भांडवलाचा मध्यस्थित वस्तूंचा नैसर्गिक साधनसामग्रीचा विदेशी विनिमय इत्यादी खर्चाशी संबंधित असतो. तसेच यास प्रवृत्त अनिष्ट परिणामांसाठीच्या भत्त्याचाही समावेश असतो.

**२) सहयोगी खर्च** : आवश्यक वस्तू व सेवांचे मूल्यापलीकडील जे प्रकल्पाच्या खर्चात समाविष्ट असतात. ज्यायोगे प्रकल्पाचे उत्पादन व सेवा त्वरित वापरासाठी किंवा विकण्यासाठी उपलब्ध व्हावी यासाठी केले जाणारे खर्च उदा. शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात पिकांचे सिंचन, पाण्याकरिता कोणत्याही

खर्चापेक्षा इतर खर्च याचा पीक उत्पादनाच्या सहयोगी खर्चात अंतर्भाव होतो.

**३) प्राथमिक किंवा प्रत्यक्ष खर्च** : खर्च-लाभ विश्लेषणात आपण अधिक प्राथमिक वा प्रत्यक्ष खर्चाशी संबंधित असतो या खर्च प्रकल्पाच्या बांधणी, चालविणे, व उपयोगात आणण्याच्या योग्य खर्चाचा अंतर्भाव असतो. आणि प्रकल्पाचे सत्वर उत्पादन करून त्याचा वापर वा विक्री करण्यासाठी उपलब्ध करणे.

**४) वास्तव व नाममात्र खर्च** : खर्च हा वास्तव किंवा नाममात्र असू शकतो. जर गट समितीने क्षेत्रात कालवा खोदण्यासाठी लोकांकडून कर्ज घेतले तर तो नाम मात्र खर्च असतो. या संबंधात लोकांच्या सहभागात वास्तव त्यागाचा समावेश नसतो. फक्त लोकांपासून गट समितीकडे पैशाचे हस्तांतरण असते. परंतु त्या गटातील लोकांना स्वतः कालवा खोदण्यास सांगितले तर तो त्यांचा वास्तव खर्च होईल.

**५) प्रत्यक्ष किंवा दुय्यम खर्च** : प्रकल्पाचा अप्रत्यक्ष लाभ पुरविण्यासाठी पत्करलेल्या वस्तू व सेवांचे मूल्य होय. म्हणजे घरे, शाळा, दवाखाने, इत्यादीसाठी प्रकल्पाच्या ठिकाणी काम करणाऱ्या लोकांसाठी यामध्ये प्रकल्पाच्या सत्वर उत्पादनाच्या प्रक्रियेच्या खर्चाचासुद्धा समावेश होतो.

वरील प्रमाणे प्रकल्पाचे मूल्यमापन करताना आपणास त्याच्या एकूण लाभाचे व एकूण खर्चाची गणना व तुलना केली जाते. जर अपेक्षित लाभ खर्चापेक्षा अधिक असेल तरच तो प्रकल्प फायदेशीर असतो नाहीतर तोट्याचा असतो.

**खर्च – लाभ विश्लेषणाच्या मर्यादा (Limitations of Cost-Benefit Analysis) :**

खर्च-लाभ विश्लेषण हे प्रकल्प निवडण्याचे किंवा नाकारण्याविषयी शक्तिमान तंत्र आहे. प्रकल्पातून निर्माण होणारे विद्यमान व भविष्यकालीन लाभ व खर्च मोजण्याचे योग्य तंत्र आहे. तरीही या तंत्रावर काही पुढील प्रकारच्या मर्यादा येतात.

**१) खर्च निर्धारणातील अडचणी** : प्रकल्पाचा खर्च निर्धारण हे लाभ निर्धारणापेक्षा तुलनात्मकदृष्ट्या सोपे आहे. खर्च अंदाज हा तंत्रज्ञानाची निवड, वापरल्या जाणाऱ्या घटक सेवांचे ठिकाण व किंमत या आधारावर केला जातो. परंतु बाजार किंमती, विशेषतः उत्पादनाच्या त्या घटकांचे विकसनशील अर्थव्यवस्थेतील साधनसामग्रीच्या वाटपातील मार्गदर्शन अपुरे असते. कारण तेथे मुलभूत असमतोलाचे अस्तित्व असणे ज्याचा वेतनाच्या विद्यमान पातळीला भरीव बेरोजगारीचे अस्तित्व, प्रचलित व्याजदराला निधीची कमतरता आणि विनिमयाचा चालू दराला विदेशी निधीचा तुटवडा निर्माण होतो. वेतनदाराची समतोल पातळी ही बाजार वेतनापेक्षा पुष्कळशी कमी असते. जेव्हा व्याजदर समतोल हा संभवता बाजारापेक्षा खूपच अधिक असतो. या सर्व कारणाने खर्च निर्धारण करणे खूपच अडचणीचे असते.

**२) संधी खर्चाकडे दुर्लक्ष** : खर्च-लाभ विश्लेषण हे संधी खर्चाच्या समस्येकडेही दुर्लक्ष करते. ग्रिकीन व इनॉस यांनी मार्ग शोधला. जेव्हा ते सांगतात की जर सर्व किंमती संधी खर्चावर परावर्तित होतात. सर्व प्रकल्प ज्यात (B/c < I) आहेत ते निवडले जातात.

**३) लाभ निर्धारणातील अडचणी :** नवीन प्रकल्पातील अनिश्चिततेच्या अस्तित्वाने भविष्यकालीन किंमतीचे अचूक अंदाज करणे व त्याच्या उत्पादनाची मागणी व पुरवठा हे लाभ निर्धारण करताना अधिक अडचणीचे असते. लाभ निर्धारणातील दुसरी महत्त्वाची अडचण म्हणजे बाह्य बचतीचे निर्धारण होय. जर बाह्यबचतीच्या अस्तित्वाने सरासरी खर्चापेक्षा सीमांत खर्चाने उत्पादनाची विक्री करावी लागते जी तूट निर्माण करण्याकडे नेते. उपभोक्त्यावर कर आकारणे अगर सरकारी अंदाजपत्रकाच्या माध्यमाने ही तूट भरून काढण्याच्या प्रयत्नाने लाभ निर्धारण अधिक संदिग्ध बनते.

**४) कसरदर लहरी :** कोणत्याही प्रकल्पासाठी गृहीत कसरीचा सामाजिक दर लहरी असतो. जर लाभाच्या निव्वळ विद्यमान मुल्याची गणना करण्यासाठी लहरी मोठा कसरदर लागू केला तर प्रकल्पाचा दीर्घकालीन निकाल परिणामकारकपणे गणना करणे शक्य नसते. हा प्रकल्पाच्या परताव्याच्या अंतर्गत दरास समानतेने लागू केला जातो.

**५) संयुक्त लाभ व खर्चाकडे दुर्लक्ष :** खर्च-लाभ विश्लेषण हे प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या संयुक्त लाभ व संयुक्त खर्चाच्या समस्येकडे दुर्लक्ष करते. आपण नदी खोरे प्रकल्पातून अनेक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष लाभ प्रवाहित कसे होतात हे पाहिले आहे. पण असे लाभ वेगवेगळे मूल्यमापन करणे व गणना करणे कठीण असते. त्याचप्रमाणे त्यात संयुक्त खर्चाचा समावेश असतो जे वेगवेगळे करता येत नाही म्हणून ते लाभानुसार मोजावे लागतात.

**६) बाह्यतेची समस्या :** या विश्लेषणातील प्रकल्पाच्या आनुषंगिक परिणामाची गणना करणे कठीण असते. नदी खोरे प्रकल्पाचे तंत्र वैज्ञानिक व आर्थिक साठवण (अगर बाह्यता) महत्त्वाची असते. जसे पूरनियंत्रण योजनेचे परिणाम आणि इतर स्थानापेक्षा जवळच्या उत्पादकता जमिनीवर धरण बांधणे इत्यादी अशा प्रकल्पाच्या बाह्य परिणामांची गणना करणे कठीण असते.

**७) धोका व अनिश्चिततेसाठी समायोजन :** प्रकल्पात समाविष्ट धोका व अनिश्चिततेकरिता समायोजनाची समस्या निर्माण होते हे तीन मार्गांनी केले जाते. (अ) प्रकल्प आयुष्यांचे (कालावधीचे) अंतराच्या काळाची गणना करून (ब) कसरदार आणि (क) लाभ व खर्चातील देय भत्त्याचा विचार करून यासाठी सरकारी कर्ज दर वापर करणे चांगले असते. भारतीय नियोजन आयोगाच्या संशोधन कार्यक्रम समितीने असे सुचविले आहे की उत्पादकता दर ५ टक्के आणि भांडवल दुर्मिळता दर १० टक्के असावा.

**८) योग्य निर्णय नियम निवडण्यातील अडचणी :** प्रकल्प मूल्यमापनासाठी तीन निर्णय नियमांचा अवलंब केला जातो.

**अ)** निव्वळ विद्यमान मुल्य (NPV) कसोटी (ब) अंतर्गत परतावा दर (IRR) कसोटी (क) कसरीचा सामाजिक दर (SRD) या सर्व कसोटीचे त्यांचे स्वतःचे फायदे व तोटे आहेत म्हणून प्रकल्पाच्या मूल्यमापनासाठी कोणती कसोटी वापरावी याचा निर्णय घेणे कठीण असते. कारण चुकीच्या निवडीने चुकीचा अनुमान (निर्णयाकडे) नेले जाते.

**प्रकल्प मूल्यमापनाचे महत्त्व : (Importance of Project Evalution)**

**प्रकल्प मूल्यमापनाचे महत्त्व पुढील मुद्यांद्वारे स्पष्ट करता येईल.**

**१) प्रकल्पांचा तुलनात्मक अभ्यास करता येतो :** आपण नियोजनातील निश्चित केलेली उद्दिष्ट्ये गाठण्यासाठी अनेक प्रकारचे प्रकल्प कार्यान्वित करावे लागतात. एखाद्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी एकमेकांना पर्याय ठरू शकणारे काही प्रकल्प असू शकतात. उदा. देशातील उर्जेची गरज पूर्ण करण्यासाठी पाण्यापासून वीज निर्मिती करणारे, कोळशापासून वीज निर्मिती करणारे प्रकल्प सुरु करण्याचे पर्याय उपलब्ध असतात. यापैकी कोणताही पर्याय स्वीकारणे अधिक फायदेशीर ठरू शकते. या विषयी निर्णय घेण्यासाठी या प्रकल्पांचा तुलनात्मक अभ्यास करावा लागतो. असा अभ्यास प्रकल्प मुल्यमापन विश्लेषण तंत्राचा उपयोग करून करता येतो प्रकल्पांच्या तुलनात्मक अभ्यासास प्रकल्प मुल्यमापन उपयुक्त ठरते.

**२) प्रकल्पावरील गुंतवणूक खर्चाचे पुर्वानुमान निश्चित करता येते :** कोणताही एखादा खाजगी अथवा सार्वजनिक उपक्रमांतर्गत सुरु करावयाचा प्रकल्प पूर्णत्वाला जाण्यासाठी त्यावर वेगवेगळ्या स्वरूपाचा गुंतवणूक खर्च करावा लागतो. प्रकल्पांकरिता जमिन, संपादन, बांधकाम, मशनरी तंत्रज्ञान, कच्चामाल तसेच श्रमशक्ती इत्यादी चा वापर करावा लागतो. त्यासाठी प्रत्येक बाबींवर कराव्या लागणाऱ्या सर्व संभाव्य खर्चाचे स्वरूप, तसेच प्रकल्पावरील एकूण खर्च यांचे अनुमान, अंदाज नियोजनमंडळास तयार करावे लागतात. कोणत्याही निवडलेल्या प्रकल्पाच्या प्रारंभापासून ते त्याचे काम पूर्णत्वास जाण्यापर्यंतच्या दरम्यान त्यावर एकूण किती भांडवली खर्च करावा लागेल याची तपशिलवार माहिती मिळाल्यास नियोजनकारांना संबंधित प्रकल्पाकरिता भांडवल गुंतवणूक विषयक नियोजन करता येते. प्रकल्प मुल्यमापनासाठी वापरण्यात येणाऱ्या खर्च-लाभ विश्लेषणाचा नियोजनकारांना याबाबतीत मार्गदर्शक उपयोग होतो.

**३) प्रकल्पांचे दुष्परिणाम अधोरेखित करता येतात :** प्रकल्प मुल्यमापन विश्लेषणामध्ये प्रकल्पांचे लाभ निर्धारित करून त्याचे चलनीय स्वरूपातील प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष लाभ व दुष्परिणाम यांचे मापन केले जाते. प्रकल्प उभारणेकरिता वापरावी लागणारी साधनसामग्री, नैसर्गिक साधनसंपत्ती, त्यामुळे तिचा होणारा ऱ्हास निर्माण होणारे पर्यावरणीय प्रश्न इत्यादीचा प्रकल्प मूल्यमापन तज्ञ अभ्यासकांकडून आढावा घेतला जातो. प्रकल्पांपासून निर्मित लाभाप्रमाणेच त्याचे तोटे दुष्परिणाम निदर्शनास आले जातात. त्यामुळे नियोजनातील प्रकल्पांचा सर्व बाजूंनी अभ्यास होतो. आणि प्रकल्पांच्या अंमलबजावणीमुळे हमखास उद्‌भवणारे प्रश्न अथवा त्याचे संभाव्य तोटे यांचे पूर्ण अंदाज समजल्याने नियोजनकारांना प्रकल्प निवडीबाबत निर्णय घेणे सुलभ होते. प्रकल्पांची फेररचना, त्यांच्यातील तपशिल याबाबत सुधारणा करण्याची संधी प्रकल्प मुल्यमापनाद्वारे प्राप्त होते. राष्ट्रीय चिरंतन विकास उद्दिष्ट अबाधित ठेवण्यासाठी प्रकल्प मुल्यमापनातील खर्च लाभ विश्लेषण निर्णायक महत्त्वाची भूमिका पार पाडते.

**४) प्रकल्प-देखरेख कार्यक्षमता विषयक महत्त्व :** प्रकल्प मूल्यमापन विषयक विश्लेषण, प्रकल्पांचा उभारणी व कार्यवाही दरम्यानच्या काळात नियोजनकारांना समुद्रातील दिपस्तंभाप्रमाणे दिशादर्शकाचे कार्य करते. प्रकल्प उभारणीच्या काळात त्यावर होत जाणारा खर्च आणि प्रत्यक्षात त्यासाठीच वित्तीय,

भौतिक तरतूद यांची स्थिती नियोजनकारांना प्रकल्प मुल्यमापनाद्वारे वेळोवेळी समजण्यास मदत होते. त्यामुळे प्रकल्पासाठीचा निधीचा वापर करताना कोणती काळजी घेतली पाहिजे ते नियोजनकारांना समजण्यास मदत होते. अनावश्यक, चुकीच्या पद्धतीने होणारा खर्च टाळण्याबाबतचे नियोजन करता येते. प्रकल्पाची देखरेख करण्यासाठी त्यात कार्यक्षमता निर्माण करण्यासाठी प्रकल्प मुल्यमापन नियोजनकारांना उपयुक्त ठरते.

**५) बिगर-किफायतशीर प्रकल्पांची ओळख होते** : नियोजनाच्या माध्यमातून नागरिकांच्या समाजाच्या गरजांची प्रतिपूर्ती व्हावी आणि प्रकल्प राष्ट्रीय हित साधणारे असावेत अशी प्रकल्प सुरू करताना नियोजनकारांची भूमिका असते. अनेकवेळा समाजातील काही वर्गाच्या आग्रही मागणीची पूर्तता करण्यासाठी राजकीय हितसंबंध साधण्यासाठी काही प्रकल्पांचा नियोजनात समावेश करण्याचा राज्यकर्ते आग्रह धरतात. अशा प्रकल्पावर करावा लागणारा खर्च व त्याचे निव्वळ तसेच समग्र लाभ यांचा प्रकल्प मुल्यमापन अतिअल्प, जेमतेम असल्याचे निश्चित झाल्यास ते प्रकल्प राष्ट्रीय दृष्टीकोनातून बिगर किफायतशीर आहेत. अशी त्यांची ओळख नियोजमंडळास पटवून देता येते. प्रकल्प मुल्यमापनामुळे बिगर-किफायतशीर प्रकल्प ओळखणे शक्य होते.

देशांच्या अर्थव्यवस्थेत विशेषतः विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थेत प्रकल्प मुल्यमापन महत्त्वाचे आहे असे म्हणता येईल.

**२.३ सारांश** :

कोणत्याही देशामध्ये आर्थिक नियोजनाद्वारे जलद आर्थिक विकासाचे उद्दिष्टचे साध्य करता येत असले तरी त्याचा आराखडा तयार करण्यापासून ते त्याची अंमलबजावणी करण्यापर्यंतच्या टप्प्यांमध्ये अनेक गोष्टींचा समावेश असतो. त्यामध्ये उत्पादन तंत्राची निवड, भांडवल-उत्पादन गुणोत्तर, आदान प्रदान विश्लेषण आणि प्रकल्प मुल्यमापन याबाबत निर्माण होणाऱ्या समस्यांची नियोजनकारांची राष्ट्रीय स्वरूपातील विश्लेषण जाणून घ्यावी लागतात. विकास नियोजन विषयक कार्यक्रमांची आखणी, निवड करताना, विकास नियोजन विषयक समस्यांचा पुरेसा परिचय असला तरच योजनाची अपेक्षित उद्दिष्टचे गाठणे शक्य होते.

**२.४ पारिभाषिक शब्द** :

**१) नियोजन व्यूहरचना : (Planning Strategy)**

व्यूहरचनेस 'डावपेच' असे देखील म्हणतात. नियोजनाची व्युहरचना म्हणजे काही विशिष्ट उद्दिष्टचे साध्य करण्यासाठी प्रकल्पांचा जाणीवपूर्वक करण्यात येणारा आराखडा, उदा. बेकारी कमी करण्यासाठी श्रमप्रधान उत्पादन तंत्र वापरले की, बेकारी कमी होत जाऊन त्यातून दारिद्र्य कमी होण्यास मदत होते.

**२) समउत्पादन वक्र : (Isoquant Curve)**

उत्पादन विषयक समतोल स्थितीचे विश्लेषण करण्यासाठी वापरण्यात येणारे भूमितीय तंत्र, कोणत्याही

दोन उत्पादन घटकांच्या वापराचे प्रमाण कमी-अधिक केले तरी एकूण उत्पादन कार्याच्या हेतूने वापरण्यात येणाऱ्या यंत्रे व इतर साधन सामग्रीचे पैशातील मूल्य, भांडवल हे मानवाकडून निर्माण केले जाते व मानवी प्रयत्नांद्वारे त्यात वाढ घडवून आणता येते. उत्पादनाद्वारे निर्मित उत्पादक साधने म्हणजे भांडवल होय.

**३) भांडवल गुणांक : (Capital Co-efficients)**

गतिशील आर्थिक विश्लेषण भांडवलाची रचना प्रदानांच्या आकारमानातील बदलाबरोबर बदलत जाते. त्याचे विशिष्ठ दिलेल्या कालखंडात मापन करण्याकरिता या संकल्पनेचा वापर केला जातो.

**४) विस्तारक परिणाम : (Spread Effects)**

कोणत्याही एखाद्या क्षेत्रात आर्थिक अथवा सामाजिक सुधारणांच्या कार्यक्रमामुळे इतर क्षेत्रांमध्ये घडून येणारे अनुकूल, चांगले परिणाम म्हणजे विस्तारक परिणाम होय.

**५) प्रवाह गुणांक : (Flow Coefficients)**

स्थितीशील विश्लेषण पद्धतीत एका क्षेत्रातील आदाने व प्रदाने आणि इतर क्षेत्रामधील आदाने-प्रदाने यांच्यातील संबंध (Relationship) दर्शविण्याकरिता वापरली जाणारी संकल्पना एका क्षेत्रात वापरलेल्या आदानामुळे निर्माण होणाऱ्या प्रदानांचा प्रवाह, इतर क्षेत्राकडून आदाने या स्वरूपात किती प्रमाणात वापरला जातो. त्याचे मापन करण्यासाठी ही संकल्पना वापरता येते.

**२.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :**

**अ) पुढे दिलेल्या पर्यायापैकी योग्य पर्याय निवडून विधानेपूर्ण करा :**

१) श्रमप्रधान उत्पादन तंत्रात श्रमाचा अधिक तर भांडवलाचा...... वापर करण्यात येतो.

अ) शून्य ब) अधिक क) कमी ड) एकक

२) भांडवलप्रधान उत्पादन तंत्रात भांडवलाचा .... तर श्रमाचा कमीत कमी वापर करण्यात येतो.

अ) शून्य ब) अधिक क) कमी ड) एकक

३) ज्या उत्पादन तंत्रात भांडवलाच्या प्रति एककामागे अधिक श्रमिक लागतात त्यास..... उत्पादन तंत्र म्हणतात.

अ) श्रमप्रधान ब) भांडवल प्रधान क) मध्यावस्था ड) यापैकी नाही

४) भांडवलप्रधान उत्पादन तंत्राचा अवलंब केल्यास .... बचतीची प्रक्रिया सुरू होते.

अ) उत्पादन ब) उपभोग क) भांडवल ड) श्रम

५) मुलभूत व भांडवली वस्तू उत्पादनासाठी..............तंत्र वापरणे उपकारक ठरते.

अ) भांडवलप्रधान ब) श्रमप्रधान क) कृषीप्रधान ड) यापैकी नाही

६) उत्पादनातील भांडवलाचे महत्त्व प्रतिपादन करण्यासाठी..........संकल्पना उपयोगी पडते.

अ) उत्पादन खर्च प्रमाण ब) श्रम भांडवल प्रमाण

क) भांडवल उत्पादन प्रमाण ड) किंमत उत्पादन प्रमाण

७) भांडवली वस्तूंच्या आयातीसाठी मोठ्या प्रमाणात खर्च केला जातो तेव्हा भांडवल उत्पादन गुणोत्तरात..... होते.

अ) घट ब) वाढ क) ऋण ड) बदल

८) भांडवल उत्पादन प्रमाणावर परिणाम करणाऱ्या घटकांमध्ये ..... समावेश होतो.

अ) भांडवल संचय ब) गुंतवणूक दर क) गुंतवणूकीचा प्रकार ड) वरील सर्व

९) विकसित अर्थव्यवस्थेमधील भांडवल - उत्पादन गुणोत्तरासाठी अनुभवजन्य आकडेवारी..... यांनी संकलित केली आहे.

अ) लायबेन्स्टाईन ब) सायमन कुझनेट्स क) पॉल बॅशन ड) गुन्नार मिर्डाल

१०) विशिष्ट काळातील उपलब्ध एकूण भांडवल संचय आणि त्याच काळातील एकूण उत्पादन यांच्या गुणोत्तरास..... म्हणतात.

अ) सरासरी भांडवल उत्पादन गुणोत्तर ब) सीमांत भांडवल उत्पादन गुणोत्तर

क) स्थीर भांडवल-उत्पादन गुणोत्तर ड) यापैकी नाही.

११) आदान उद्योगसंस्थेच्या.............प्रतिनिधित्व करते.

अ) खर्चाचे ब) उत्पन्नाचे क) उपभोगाचे ड) व्यवसायाचे

१२) आदान-प्रदान विश्लेषण तंत्राचा शोध सर्वप्रथम.........यांनी लावला.

अ) आर्थर लेविस ब) प्रा. हर्शमन क) डब्ल्यू. डब्ल्यू लिऑन्टीफ ड) पॉल बॅरान

१३) कोणत्याही विकास कार्यक्रमाचा प्रकल्प मुल्यमापन हा ....... भाग असतो.

अ) अंतर्गत ब) बहिर्गत क) व्यावसायिक ड) अंतःस्थ

१४) प्रकल्पांच्या तुलनात्मक अभ्यासाकरिता ...... चा अभ्यास उपयुक्त मानला जातो.

अ) उत्पादनतंत्र निवड ब) आदान-प्रदान विश्लेषण

क) प्रकल्प मुल्यांकन ड) यापैकी नाही.

१५) खर्च-लाभ विश्लेषणासाठी.................. कसोटी विचारात घेतली जाते.

अ) कसरीचा सामान्य दर ब) परतावा कसोटीचा क) अंतर्गत दर ड) वरील सर्व

**२.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :**

**ब) पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगा :**

१) श्रमप्रधान उत्पादन तंत्राद्वारे विकसनशील देशांमधील बेकारीची समस्या सोडविण्यास मदत होते.

२) खर्च लाभ विश्लेषणाचा भांडवल-उत्पादन गुणोत्तर मापनाकरिता उपयोग केला जातो.

३) प्रा. पॉल बॅरान यांनी भांडवल प्रधान उत्पादन तंत्राचे समर्थन केले नाही.

४) आदान-प्रदान विश्लेषणाकरिता समउत्पादनतंत्र विश्लेषण उपयोगात आणले जाते.

५) विस्तारीत परिणाम संकल्पना गुन्नार मिर्डाल यांनी सर्वप्रथम मांडली आहे.

६) उत्पादनाचा एक नग तयार करण्यासाठी किती भांडवलाची आवश्यकता आहे हे दर्शविणारा घटक म्हणजे भांडवल उत्पादन गुणोत्तर होय.

७) आदान-प्रदान या विश्लेषणाने भांडवल श्रमिक व आयातीची प्रत्यक्ष आवश्यकता आणि अर्थव्यवस्थेच्या इतर क्षेत्रांची उपलब्ध आवश्यकता यांचा अंदाज करता येतो.

८) श्रमप्रधान उत्पादन तंत्रात भांडवली वस्तूंची निर्मिती करणे योग्य ठरते.

९) प्रकल्पात सुधारणा सुचविण्याचे मुख्य कार्य प्रकल्प मुल्यमापनामधून दिसून येते.

**२.६ सरावासाठी स्वाध्याय :**

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न :**

१) भांडवलप्रधान उत्पादनतंत्र म्हणजे काय? अल्पविकसित देशांना ते उपयुक्त आहे काय?

२) भांडवल-उत्पादन गुणोत्तर म्हणजे काय? भांडवल-उत्पादन गुणोत्तराचे नियोजनातील महत्त्व स्पष्ट करा.

३) आदान-प्रदान विश्लेषणाचा अर्थ सांगून त्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

४) प्रकल्प मुल्यमापन म्हणजे काय? प्रकल्प मुल्यमापन अहवालातील टप्पे स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा :**

१) श्रम प्रधान उत्पादन तंत्र

२) भांडवल प्रधान उत्पादन तंत्र

३) भांडवल - उत्पादन गुणोत्तर संकल्पनेचे महत्त्व

४) सरासरी आणि सीमांत भांडवल - उत्पादन गुणोत्तर

५) आदान-प्रदान विश्लेषण तक्ता

६) खर्च -लाभ विश्लेषणाचे मूल्यमापन

७) खर्च -लाभ विश्लेषणाच्या मर्यादा

८) प्रकल्प मूल्यमापनाचे टप्पे

९) आदान-प्रदान विश्लेषणाची सारणी

१०) कसरीचा सामायिक दर

**२.७ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

**अ)**

| | |
|---|---|
| १) (क) कमी | २) (ब) अधिक |
| ३) (अ) श्रमप्रधान | ४) (ड) श्रम |
| ५) (अ) भांडवलप्रधान | ६) (क) भांडवल उत्पादन प्रमाण |
| ७) (ब) वाढ | ८) (ड) वरील सर्व |
| ९) (अ) लायबेन्स्टीन | १०) (अ) सरासरी भांडवल उत्पादन गुणोत्तर |
| ११) (अ) खर्चाचे | १२) (क) डब्ल्यू.डब्ल्यू लिऑन्टीफ |
| १३) (अ) अंतर्गत | १४) (क) मुक्त मूल्यमापन |
| १५) (ड) वरील सर्व | |

**ब)**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) बरोबर | २) चूक | ३) चूक | ४) चूक | |
| ५) बरोबर | ६) बरोबर | ७) बरोबर | ८) चूक | ९) बरोबर |

**२.८ क्षेत्रीय कार्य :**

१) विद्यार्थ्यांनी तुमच्या गावात / शहरात सुरु असणाऱ्या खाजगी - सार्वजनिक क्षेत्रातील उत्पादन-तंत्र निवड विषयक स्थितीचा तुलनात्मक आढावा घ्या.

२) विद्यार्थ्यांनी तुमच्या गावात / शहरात सुरु असणाऱ्या खाजगी – सार्वजनिक क्षेत्रातील उत्पादन-तंत्र निवड विषयक स्थितीचा तुलनात्मक आढावा घ्या.

**२.९ संदर्भ ग्रंथ :**


१) Bengmin Higgins : Economic Development

२) Bhagloati J. and P. Desai : India - Planning for Industrilisation

३) M. L. Jhingam : Economic Development and Planning

४) डॉ. ज. फा. पाटील, पी. जे. ताम्हणकर : विकास व नियोजनाचे अर्थशास्त्र

५) भोसले, काटे : नियोजनाचे अर्थशास्त्र

६) शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर दूर शिक्षण केंद्र : नियोजनाचे अर्थशास्त्र


***

## घटक ३

# भारतातील नियोजन – १

# Planning in India - I


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

 ३.२.१ भारतातील नियोजन प्रक्रिया

 ३.२.२ भारतातील नियोजनाचे मूल्यमापन

 ३.२.३ नियोजन मंडळ व राष्ट्रीय विकास परिषद

 ३.२.४ निति आयोग- निर्मिती, उद्दिष्ट्ये, कार्ये, कामगिरी

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द

३.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

३.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.७ सरावासाठी स्वाध्याय

३.८ संदर्भग्रंथाची यादी


**३.० उद्दिष्ट्ये :**

* भारतातील नियोजन प्रक्रिया समजून घेणे.
* भारतातील नियोजनाच्या यश-अपयशाचा अभ्यास करणे.
* भारतीय नियोजन मंडळ व राष्ट्रीय विकास परिषद यांची सविस्तर माहिती घेणे.
* निति आयोगाची गरज, कार्ये व कामगिरी इ. चा अभ्यास करणे.

**३.१ प्रास्ताविक :**

प्रस्तुत घटक ३ मध्ये आपण भारताच्या आर्थिक विकासात नियोजनाचे योगदान विचारात घेणार आहोत.

त्याचबरोबर भारतामध्ये नियोजनाची सुरुवात कशी झाली तसेच विकास योजना राबविताना अवलंबिली जाणारी प्रक्रिया व त्यातील टप्पे याबाबत सविस्तर विवेचन केले आहे. नियोजन काळात देशात राबविलेल्या पंचवार्षिक योजनांचे सविस्तर मूल्यमापन या अभ्यास घटकामध्ये केले आहे. तसेच आत्तापर्यंत देशाच्या नियोजन प्रक्रियेत ज्यांनी खूप महत्वाची भूमिका पार पाडली ते नियोजन मंडळ व राष्ट्रीय विकास परिषद यांच्या बाबतीतील विस्तृत माहिती स्पष्ट केली आहे. देशाच्या बदलत्या गरजांनुसार व आवश्यकतांनुसार नियोजन मंडळाच्या जागी निर्माण केलेल्या निति आयोगाचे विस्तृत वर्णन प्रस्तुत अभ्यास घटकामध्ये केले आहे.

**३.२.१ भारतीय नियोजनाची सुरुवात :**

कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी आर्थिक नियोजन अपरिहार्य असते. भारतासारख्या विकसनशील देशाला तर आर्थिक नियोजन करणे ही अत्यावश्यक बाब आहे. तसेच भारताला ही संकल्पना नवीन नाही. कारण देशाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच आर्थिक नियोजानाबाबतचा विचार सुरु झाला होता. स्वातंत्र्य मिळण्याच्या तेरा वर्षे अगोदरच म्हणजे सन १९३४ साली सर विश्वेश्वरय्या यांनी भारतासाठी नियोजित अर्थव्यवस्था (Planned Economy for India) हा ग्रंथ लिहून आर्थिक नियोजानाबाबतचा आपला दृष्टीकोन स्पष्ट केला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सन १९४९ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसने तत्कालीन पंतप्रधान पं.जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन मंडळाची स्थापना केली.

'देशातील उपलब्ध साधनसामग्रीचा पर्याप्त उपयोग करून ठरविलेली सामाजिक व आर्थिक उद्दिष्टये साध्य करण्यासाठी राबविण्यात आलेली प्रक्रिया म्हणजे आर्थिक नियोजन होय.' अशी आर्थिक नियोजनाची व्याख्या करता येते.

भारतीय नियोजन मंडळाची स्थापना होण्यापूर्वी म्हणजे १९५० च्या कालखंडामध्ये नियोजनाच्या इतर विविध योजनांची आखणी आणि अंमलबजावणी करण्यात आली होती. त्या योजना पुढीलप्रमाणे आहेत.

**अ. मुंबई योजना :**

मुंबईतील आठ प्रसिद्ध उद्योगपतींनी एकत्र येऊन जी योजना तयार केली होती त्यास 'मुंबई योजना' म्हटले जाते. त्यालाच टाटा-बिर्ला योजना म्हणूनही ओळखले जाते. ही योजना सन १९४४ मध्ये तयार केली गेली. या योजनेत पंधरा वर्ष एवढा नियोजन कालखंड विचारात घेतला होता. आणि या योजनेच्या अंमलबजावणीसाठी सुमारे १०००० (दहा हजार) कोटी रु. इतका खर्च अपेक्षित होता. देशातील दरडोई उत्पन्न दुप्पट करणे व राष्ट्रीय उत्पन्नामध्ये तीनपट वाढ घडवून आणणे ही या योजनेची मुख्य उद्दिष्ट्ये होती. त्याचबरोबर त्यावेळच्या आकडेवारीनुसार या योजना कालखंडात शेती उत्पादनात १३० टक्के, औद्योगिक उत्पादनात ५०० टक्के आणि सेवा क्षेत्रात २०० टक्के वाढ घडवून आणण्याचे लक्ष्य ठेवले होते. ही योजना अत्यंत महत्वकांक्षी योजना म्हणूनही ओळखली जाते.

**ब. जनता योजना :**

या योजनेचा नियोजनाचा कालखंड १० वर्षांचा होता. श्री. एम. रॉय यांनी ही योजना तयार केली होती. त्यासाठी सुमारे १५००० कोटी रु. खर्च करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. देशातील शेतीक्षेत्राचा विकास घडवून आणणे, उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनात वाढ घडवून आणणे तसेच देशातील शेतीक्षेत्राचे राष्ट्रीयीकरण घडवून आणणे इ. बाबींना या योजनेत प्राधान्य देण्यात आले होते.

**क. गांधी योजना :**

ही योजना तुलनात्मकरीत्या लहान स्वरुपाची होती. सन १९४४ मध्ये वर्धा येथील कॉमर्स कॉलेज चे प्राचार्य एस. अग्रवाल यांनी ही योजना तयार केली होती. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी इतर योजनांच्या तुलनेत कमी म्हणजे ३५०० कोटी रु. चा खर्च अपेक्षित होता. या योजनेत विकेंद्रित तसेच स्वयंपूर्ण शेती विकासाच्या संकल्पनेवर भर देण्यात आला होता. तसेच कुटीर उद्योगांचा विकास घडवून आणणे हे उद्दिष्ट यामध्ये ठरविण्यात आले होते. या योजनेत देशाच्या विकास प्रक्रियेत महत्वाची भूमिका असलेले अवजड व मुलभूत उद्योग यांकडे दुर्लक्ष करण्यात आले होते. त्यामुळे ही योजना कल्पनावादी असल्याची टीका केली जाते.

**ड. पुनर्बांधणी योजना :**

तत्कालीन भारत (ब्रिटीश) सरकारने सन १९४४ साली भारतासाठी 'नियोजन विभागा'ची स्थापना केली. या नियोजन विभागाचे अध्यक्ष सर अर्धशीर दलाल हे होते. दुसऱ्या महायुद्धाच्या कालखंडात या विभागाने विविध योजना तयार केल्या. त्यामध्ये अनेक अल्पकालीन व दीर्घकालीन योजनांचा समावेश होता. या विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी सन १९४६ मध्ये नियोजन व सल्लागार मंडळाने सरकारकडे पाठपुरावा केला.

**इ. कोलंबो योजना :**

भारत सरकारने मार्च १९५० मध्ये तत्कालीन पंतप्रधान पं. नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन मंडळ स्थापन केले. या मंडळाने सहा वर्षे कालावधीसाठी एक योजना तयार केली त्यास कोलंबो योजना म्हणून ओळखले जाते. या योजनेत लोकांचे राहणीमान सुधारणेसाठी अन्नधान्य तसेच औद्योगिक वस्तूंचे व अंतिम वस्तूंचे उत्पादन वाढविणे यांसारखी उद्दिष्ट्ये ठरविण्यात आली होती. सुमारे १३३९ कोटी रु. ची तरतूद असलेल्या या योजनेत विकास प्रकल्पावरही खर्च करण्याचेही उद्दिष्ट ठरविण्यात आले होते.

**नियोजन मंडळ व योजना :**

देशातील उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीचा पर्याप्त आणि समतोल वापर करण्यासाठी मार्च १९५० मध्ये भारताचे तत्कालीन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली भारताच्या नियोजन मंडळाची स्थापना केली. सन १९५१ मध्ये भारतातील नियोजन प्रक्रियेला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली असे म्हणता येईल. कारण जुलै १९५० मध्ये नियोजन मंडळाने पहिल्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा प्रसिद्ध केला. तेव्हापासून आत्तापर्यंत देशात एकूण बारा पंचवार्षिक योजनांची अंमलबजावणी झाली आहे. भारतातील २०१२-१७ या कालावधीतील १२वी पंचवार्षिक योजना ही शेवटची पंचवार्षिक योजना ठरली. भारतातील प्रत्येक योजनेचे उद्दिष्ट हे काहीसे वेगळे असल्याचे दिसून येते. पंचवार्षिक योजनांची आखणी व अंमलबजावणीसाठी मुख्यत वृद्धि, रोजगारनिर्मिती, सर्वसमावेशक वृद्धि, समतोल विकास, दारिद्र्य निर्मुलन, स्वयंनिर्भरता तसेच सामाजिक न्याय इ. मार्गदर्शक तत्वे आधारभूत मानली आहेत.

**भारतातील नियोजनाची प्रक्रिया :**

भारतात सन २०१५ पर्यंत आर्थिक नियोजन करण्याचे कार्य भारतीय नियोजन मंडळामार्फत केले जात होते.

त्यासाठी आर्थिक नियोजनासाठीचा आराखडा तयार करणे तसेच त्याची अंमलबजावणी व मूल्यमापन करण्याची जबाबदारी ही नियोजन मंडळाकडेच होती. या नियोजन व अंमलबजावणी प्रक्रियेत विकेंद्रीकरणावर भर दिला जात होता तसेच लोकांचा सहभाग वाढविण्यासंदर्भात विशेष लक्ष देण्यात आले होते.

भारतातील नियोजन प्रक्रियेत वार्षिक नियोजन, पंचवार्षिक योजना तसेच दीर्घकालीन नियोजन धोरणे यांना आखणीपासून ते पूर्णत्वास नेईपर्यंत अनेक प्रक्रियांमधून जावे लागते. त्यामध्ये आवश्यक साधनसामग्री खरेदी करण्यासाठीचा खर्च, त्यासाठी आवश्यक असलेली मंजुरी याबाबत चर्चा करणे व अंतिम निर्णयाप्रत येणे यांसारख्या अनेक बाबींचा समावेश होतो.

विकास योजनांना अंतिम स्वरूप प्राप्त होईपर्यंत तसेच त्याच्या अंमलबजावणी पर्यंत अनेक टप्प्यांचा समावेश होतो. भारताच्या नियोजन प्रक्रियेत समाविष्ट असलेल्या विविध टप्प्यांची चर्चा पुढीलप्रमाणे करता येईल.

**पहिला टप्पा :**

योजनेची आखणी करण्यासाठी साधारणत: दोन-तीन वर्षे आधीच योजनेच्या संदर्भात चर्चा करण्यास सुरुवात होते. नियोजन मंडळाकडून देशातील वर्तमान स्थितीचा अभ्यास केला जातो. तसेच अर्थव्यवस्थेचे मूल्यमापन करण्यात येते. देशाच्या विकास प्रक्रियेत अडथळा ठरणाऱ्या विविध स्वरूपाच्या सामाजिक, आर्थिक व संस्थात्मक बाबी, समस्या कमी करण्याच्या दृष्टीने योग्य त्या उपाययोजना असलेला अहवाल केंद्रीय मंत्रिमंडळ व राष्ट्रीय विकास परिषद यांच्याकडे योजना आराखड्याचे परीक्षण करण्यासाठी व मंजुरीसाठी सादर केला जातो. राष्ट्रीय विकास परिषदेला हा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यातील सर्वच बाबींवर विचारविनिमय केला जातो व नियोजन मंडळाने पुढच्या पंचवार्षिक योजनेत कोणत्या बाबींवर अधिक लक्ष केंद्रित करावे याबाबत सूचना दिल्या जातात.

**दुसरा टप्पा :**

यामध्ये नियोजन मंडळ विविध अभ्यास समित्या/ अभ्यास गट नियुक्त करून त्यांच्यामार्फत पंचवार्षिक योजनेमधील भौतिक घटकांसंदर्भात तयार केलेल्या 'मसुदा निवेदन पत्रिके'चा अभ्यास केला जातो. या अभ्यास गटांमध्ये विवध क्षेत्रातील तज्ज्ञ व त्या विभागाशी संबंधित केंद्रीय मंत्रालयातील अधिकारी यांचा समावेश असतो. प्रत्येक अभ्यासगट हा विविध विभाग व आर्थिक बाबींशी सबंधित असतो. भारतातील वित्तीय साधने, शेती, सिंचन, उर्जा, लोखंड, इंधन, सामान्य शिक्षण, तांत्रिक शिक्षण, संशोधन, आरोग्य व कुटुंब नियोजन, घरबांधणी (गृहनिर्माण), ग्रामीण नियोजन व मागास घटकांचे कल्याण इ. विविध बाबींचा अभ्यास करण्यासाठी वेगवेगळ्या विशिष्ट अभ्यास गटांची सन १९६५ मध्ये नियुक्ती केली होती. यातील प्रत्येक अभ्यासगट हा संबंधित क्षेत्राचा अभ्यास करतो आणि त्या क्षेत्राशी संबंधित असलेल्या समस्यांची नोंद करतो. प्रत्येक अभ्यासगट हा प्रथमत: राष्ट्रीय पातळीवरील घटकांची माहिती घेतो. त्यामध्ये सर्वप्रथम केंद्राच्या विविध बाबींचा आढावा घेतला जातो. त्याच धर्तीवर राज्यांनीही आपले स्वतंत्र अभ्यासगट स्थापन करणे गरजेचे असते. प्रत्येक राज्याच्या विकासाचा

आराखडा तयार करणे हे राज्य शासनाच्या अभ्यासगटाचे मुख्य उद्दिष्ट असते. नियोजन मंडळाचे अध्यक्ष हे अभ्यासगटांसाठी तज्ज्ञ, विशिष्ट क्षेत्राशी संबंधित अभ्यासक, विषयतज्ज्ञ व कर्मचारी यांची यादी तयार करतात. हे सर्व घटक मुख्यत: तज्ज्ञ हे अशासकीय असतात. हे तज्ज्ञ त्यांच्या अभ्यासक्षेत्रातील संबंधित योजनेची आखणी व व्यापक धोरण या दृष्टीने सल्ला देतात.

अभ्यासगटाच्या अहवालामधील सूचनांनुसार नियोजन मंडळ नियोजनाबाबतचा 'मसुदा आराखडा' तयार करते. त्यालाच 'मसुदा निवेदन पत्रिका' म्हणूनही ओळखले जाते. त्यानंतर केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत ही 'मसुदा निवेदन पत्रिका' सादर केली जाते व त्यावर सर्व बाजूंनी विचार केला जातो व सविस्तर चर्चा घडवून आणली जाते. याबाबतची सर्व कागदपत्रे नंतर राष्ट्रीय विकास परिषदेकडे पाठविली जातात. ततपूर्वी पुढील टप्प्यातील योजनेसाठी मसुदा आराखडा तयार केला जातो.

**तिसरा टप्पा :**

या टप्प्यात अधिक विस्तृत असा मसुदा आराखडा तयार केला जातो. तसेच विविध क्षेत्रांशी संबंधित असलेल्या समस्या/ प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी सविस्तर व विस्तृत स्वरूपाच्या योजना तयार केल्या जातात. त्यामध्ये प्रमुख धोरणे व उद्दिष्ट्ये याबाबतची दिशा ठरविली जाते. नियोजन मंडळाकडून मसुदा आराखडा तयार केला जातो आणि त्यानंतर केंद्र सरकारची सर्व मंत्रालये व राज्य सरकारे यांच्याकडे चर्चेसाठी पाठविला जातो. केंद्रीय मंत्रीमंडळाकडून मान्यता मिळाल्यानंतर हा आराखडा राष्ट्रीय विकास परिषदेकडे सादर केला जातो. राष्ट्रीय विकास परिषदेने मान्यता दिल्यानंतर देशातील नागरिक, विविध राजकीय पक्ष, सामाजिक व आर्थिक संघटना इ. ची त्याबाबतची मते जाणून घेण्यासाठी व त्यावर सविस्तर चर्चा व्हावी यासाठी हा मसुदा आराखडा सर्वांसाठी प्रसिद्ध/खुला केला जातो. त्यावर सर्व क्षेत्रातील घटकांची मते जाणून घेतल्यानंतर दोन्ही मंत्रीमंडळामध्ये यावर चर्चा केली जाते. लोकसभेतील विविध समित्या देखील त्यावर सविस्तर चर्चा करतात.

**चौथा टप्पा :**

या टप्प्यात मसुदा आराखड्यावर संपूर्ण देशातून चर्चा व विचार विनिमय होत असतानाच अनेक राज्यांच्या संदर्भात नियोजन मंडळ देशाच्या केंद्रीय मंत्रीमंडळाबरोबर सविस्तर चर्चा करते. या चर्चेमध्ये मुख्यत: देशातील वित्तीय संसाधनांची उपलब्धता, वाढीव साधनांचे नियोजन व तपशीलवार विकास योजना यांवर भर दिला जातो. आणि अंतिमत: राज्यातील विशेष तज्ज्ञ व संबंधित राज्याचे मुख्यमंत्री यांच्याशी विचार-विनिमय करून अंतिम निर्णय घेतला जातो. त्यासाठी केंद्रीय नियोजन मंडळ व राज्ये यांच्यामध्ये समन्वय असणे आवश्यक असते. प्रत्येक राज्याचे आकारमान, लोकसंख्या व प्राकृतिक रचना विचारात घेऊन राज्यांच्या आवश्यकतेनुसार योजना तयार केली जाते. ही योजना पूर्णत्वास नेण्याची आणि त्यामध्ये ठरविलेली लक्ष्ये साध्य करण्याची जबाबदारी राज्य सरकारांनी घेणे आवश्यक असते. त्यासाठी योजनेतील राज्यांचा वाटा ठरविला जातो व त्यास अनुसरून केंद्र सरकारकडून राज्य सरकारांना सहाय्य केले जाते.

**पाचवा टप्पा :**

या टप्प्यामध्ये नियोजन मंडळ नवीन मसुदा निवेदन पत्रिका तयार करण्यासाठी विविध संघटीत संस्था व विविध अभ्यास गट यांची स्थापना करते. तसेच याबाबतीत राज्य सरकारांशी सविस्तर चर्चा करते. त्यामध्ये धोरणांची दिशा ठरविण्यावर अधिक भर दिला जातो. त्याचबरोबर विशिष्ट मुद्यांवर आवश्यकतेनुसार विस्तृत चर्चा केली जाते. ही सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ही निवेदन पत्रिका केंद्रीय मंत्रिमंडळ व राष्ट्रीय विकास परिषद यांना सादर केली जाते.

**सहावा टप्पा :**

या टप्प्यामध्ये राष्ट्रीय विकास परिषदेला प्राप्त झालेल्या माहितीवरून पंचवार्षिक योजनांच्या संदर्भात निर्णय घेतला जातो. त्या निर्णयाच्या आधारे नियोजन मंडळ पंचवार्षिक योजनेचा अंतिम अहवाल तयार करते. त्यामध्ये योजनेची उद्दिष्ट्ये, प्रकल्प, विविध योजना इ. बाबत सविस्तर माहिती अंतर्भूत असते. या आराखड्यावर केंद्र सरकार व राज्य सरकारे पुन्हा नव्याने आपली मते मांडतात आणि शेवटी केंद्रीय मंत्रिमंडळ व राष्ट्रीय विकास परिषद यांच्याकडे मंजुरीसाठी सादर करतात. राष्ट्रीय विकास परिषदेने मान्यता दिल्यानंतर देशाचे पंतप्रधान नियोजन मंडळाचे अध्यक्ष या नात्याने हा अहवाल संसदेत सादर करतात आणि त्यानंतर तो प्रसिद्ध केला जातो. संसदेच्या दोन्ही सभागृहात त्यावर सविस्तर चर्चा केली जाते. त्यासाठी काही दिवसांचा कालावधी जातो. आणि त्यानंतर या योजनेस संसदेच्या दोन्ही सभागृहांची मान्यता मिळते व देशात योजनेची अंमलबजावणीची कार्यवाही केली जाते.

अशा प्रकारे देशाच्या पंचवार्षिक योजना तयार करत असताना एकूण सहा टप्प्यांमधून त्याचा प्रवास होत होता. परंतु सन २०१५ मध्ये नियोजन मंडळ बरखास्त करण्यात आले आहे व त्याऐवजी निती आयोगाची स्थापना केली आहे. त्यामुळे इथून पुढे देशात पंचवार्षिक योजनांची आखणी व अंमलबजावणी होणार नाही.

**३.२.२ नियोजनाचे मूल्यमापन – भारतीय नियोजनाची उद्दिष्टे :**

भारतातील आर्थिक नियोजनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१. आर्थिक वाढ घडवून आणणे :**

देशाच्या विविध वस्तू व सेवांचा दीर्घकालीन व वाढत्या प्रमाणात पुरवठा करण्याच्या क्षमतेत वाढ घडवून आणणे म्हणजे आर्थिक वाढ होय. भारतीय नियोजन प्रक्रियेत शेती, उद्योग, उर्जा, वाहतूक, दळणवळण या क्षेत्रांमध्ये वाढ घडवून आणण्याच्या दृष्टीने सातत्याने भर दिला गेला आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून या विविध क्षेत्रांच्या विकासाला प्राधान्य दिल्याचे दिसून येते. भारत सरकारने प्रत्येक पंचवार्षिक योजनेत क्षेत्रनिहाय वाढीचे उद्दिष्ट ठरविण्यात आल्याचे दिसून येते. तसेच संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या वृद्धिदराचे देखील उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. जसे की, पहिल्या योजनेत २.२%, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत २.५%, तिसऱ्या योजनेत ५.६%, चौथ्या योजनेत ७%, पाचव्या योजनेत ९% तर सहाव्या योजनेत ११% इतक्या वृद्धीदराचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते.

थोडक्यात देशातील उपलब्ध साधनसामग्रीचा पर्याप्त वापर करून विविध क्षेत्रांमध्ये आणि पर्यायाने भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये वाढ घडवून आणणे हे नियोजन प्रक्रियेचे मुख्य उद्दिष्ट आहे.

**२. अर्थव्यवस्थेस आत्मनिर्भर बनविणे :**

अर्थव्यवस्थेच्या गरजेच्या वस्तू व सेवा यांच्या उत्पादनात स्वावलंबी होणे म्हणजे आत्मनिर्भरता होय. देशाला स्वयंपूर्ण बनवण्याच्या दृष्टीने नियोजनाच्या माध्यमातून आत्मनिर्भरता प्राप्त करण्याचा प्रयत्न केला जातो. देशाचे परकीय मदतीवरील अवलंबन कमी करण्यासाठी देशांतर्गत उत्पादनात विविधता आणण्यावर भर दिला जातो. तसेच आयात कमी करण्याचेही प्रयत्न केले जातात. त्याचबरोबर आयातीचे परकीय चलनातील मूल्य अदा  करण्यासाठी असणारी परकीय चलनाची गरज पूर्ण करण्यासाठी निर्यातीवर भर दिला जातो. त्यासाठी निर्यातक्षम वस्तूंचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढविण्यासाठी नियोजनाच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले जातात.

भारतात तिसऱ्या पंचवार्षिक योजनेनंतर देशाच्या आत्मनिर्भरतेला विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. महत्वाच्या वस्तूंच्या आयातीत घट होऊन निर्यातक्षम वस्तूंचे उत्पादन वाढावे यासाठी परकीय अवलंबन कमी करण्यासाठी तसेच देशांतर्गत उत्पादनात विविधता निर्माण करण्यासाठी पंचवार्षिक योजनांचा अवलंब करण्यात आला आहे. देशाला सातत्याने प्रतिकूल असणाऱ्या व्यापारतोलामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी आत्मनिर्भरता प्राप्त करण्याच्या उद्दिष्टाला प्राधान्य देण्यात आले आहे.

पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून भारताने अन्नधान्याच्या उत्पादनात स्वावलंबन प्राप्त केले आहे. तसेच लोखंड पोलाद यंत्रसामग्री तसेच अवजारे इत्यादी उत्पादनात वाढ घडवून आणण्याचे उद्दिष्ट काही प्रमाणात साध्य झाले आहे. त्याचबरोबर विज्ञान, तंत्रज्ञान अणुऊर्जा, अवकाश संशोधन, अंतराळयान, संरक्षण सामग्री इत्यादी बाबतीतही स्वयंपूर्णता प्राप्त झाली आहे. परंतु काही बाबतीत मात्र अपयश आल्याचे दिसून येते. त्यामध्ये परकीय गंगाजळी, विदेशी व्यापारातील तूट, परकीय कर्जाची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. असे असले तरीही नियोजनाच्या माध्यमातून आत्मनिर्भरता प्राप्त करणे हे नियोजनाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

**३. बेकारी निर्मुलन करणे :**

जगातील सर्वच देशांमध्ये बेकारीची गंभीर समस्या असल्याचे दिसून येते. भारतही त्याला अपवाद नसल्याचे दिसून येते. भारतात नियोजन प्रक्रियेत पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून बेकारीची समस्या कमी करण्यासाठी प्रयत्न केले जातात. त्यासाठी रोजगार संधी वाढविण्यावर भर दिला जातो. भारतासारख्या विकसनशील देशात वेगाने वाढणारी लोकसंख्या, गरिबीचे सहअस्तित्व, आर्थिक व सामाजिक विषमता अशा अनेक समस्या आहेत. दिवसेंदिवस या समस्यांची तीव्रता वाढत आहे. देशातील बहुतांश समस्यांचे मूळ हे सार्वत्रिक दारिद्र्यात असल्याचे दिसून येते. त्यामुळे सर्वच पंचवार्षिक योजनांमध्ये दारिद्र्य निर्मूलनावर भर देण्यात आला आहे.

तज्ञांच्या मते अर्थव्यवस्थेचा आर्थिक विकास आणि पूर्ण रोजगार या बाबी परस्परपूरक आहेत. रोजगार पातळीत होणारी वाढ ही विकासाच्या प्रक्रियेत गतिमानता निर्माण करते. म्हणजेच रोजगार पातळी व विकास यामध्ये

एकाच दिशेने बदल होतो. तथापि बेकारीमुळे आर्थिक विकासाची प्रक्रिया मंदावते. बेकारीमुळे बहुमूल्य अशा मानवी भांडवलाचा अपव्यय होतो. तसेच दारिद्र्याचे प्रमाण वाढते. त्यामुळे नियोजन प्रक्रियेत बेकारीचे प्रमाण कमी करणे हे प्रमाणभूत मानले जाते. नियोजनाच्या कालखंडात देशातील रोजगार संधी वाढवण्यासाठी सीमांत शेतकरी व शेतमजूर योजना, रोजगार हमी योजना, ग्रामीण रोजगार कार्यक्रम, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम, एकात्मिक ग्रामीण विकास योजना, सुवर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना अशा अनेक योजनांची अंमलबजावणी करण्यात आली आहे. यापैकी बहुतांश योजना या ग्रामीण भागांसाठी राबविण्यात आल्या आहेत. कारण ग्रामीण भागामध्ये छुपी बेरोजगारी मोठ्या प्रमाणामध्ये आढळते. अरुण घोष यांच्या मताप्रमाणे, बेकारीची समस्या सोडविण्यासाठी प्रतिवर्षी किमान दोन-तीन टक्के एवढा रोजगार वाढीचा दर साध्य होईल अशा रीतीने गुंतवणुक संरचनेत बदल करणे आवश्यक असते.

**४. आर्थिक विषमता दूर करणे :**

भारतासारख्या लोकशाहीचा अवलंब करणाऱ्या देशात आर्थिक विकासाबरोबरच उत्पादनाच्या योग्य वितरणालाही तेवढेच महत्त्व प्राप्त झाले आहे. कोणत्याही योजनेची आखणी व अंमलबजावणी करत असताना देशातील उत्पादनात व उत्पन्नात वाढ करण्याबरोबरच उत्पन्नाची योग्यप्रकारे वाटणी करणे ही बाब देखील आवश्यकच असते. लोकशाही असलेल्या देशात राजकीय समानते बरोबरच आर्थिक समानता ही महत्वाची असते. लोकशाही व्यवस्थेमध्ये सर्वांना समान पद्धतीने विकासाची संधी प्राप्त व्हावी यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातात. त्यासाठी नियोजन प्रक्रियेत आर्थिक विषमता नष्ट करणे हे उद्दिष्ट ठरवले जाते.

आर्थिक शक्तीचे केंद्रिकरण झाल्यास गरीब व उपेक्षित वर्गाला दुःख व दारिद्र्य सहन करावे लागते. याउलट उच्चपदस्थ नोकरदार, उद्योगपती, व्यापारी, जमीनदार, बॅंकर हे आर्थिकदृष्ट्या प्रभावशाली घटक ऐषआरामाचे आणि चैनीचे जीवन जगत असतात. त्यामुळे उपभोगवादी, चंगळवादी व अनुकरणवादी संस्कृती उदयास येते व त्यामुळे समाजात व्यसनाधीनता वाढते व सामाजिक स्वास्थ्य बिघडण्याची शक्यता निर्माण होते. याउलट समाजात बहुसंख्य प्रमाणात असलेला एक मोठा वर्ग दारिद्र्यात आणि हलाखीत जीवन कंठत असतो. आर्थिक असमानतेमुळे सामाजिक ताण-तणाव आणि राजकीय अस्थैर्य निर्माण होऊन देशाच्या सार्वभौमत्वाला धोका निर्माण होतो. या सर्व शक्यता विचारात घेऊन पंडित जवाहरलाल नेहरू यांनी उत्पन्न वाटपातील विषमता कमी करणे आणि विकासाचे लाभ समाजातील विविध वर्गात विभागले जातील यावर लक्ष केंद्रित केले.

भारतात तिसऱ्या व चौथ्या पंचवार्षिक योजनेत यासाठी जोरदार प्रयत्न करण्यात आले. त्यासाठी कुळ कायदे, कसेल त्याची जमीन, जमीनदारी पद्धतीचे उच्चाटन, कमाल जमीनधारणा कायदा, सरकारी शेती यांसारख्या अनेक उपाययोजना अवलंबिण्यात आल्या. त्यानंतर वीस कलमी कार्यक्रम, मक्तेदारी प्रतिबंधक कायदे, समन्वित ग्रामीण विकासाचे कार्यक्रम, किमान वेतन कायदे, बेकारी भत्त्याची तरतूद, सामाजिक सुरक्षा योजनांची अंमलबजावणी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी अनुदान व औषधांची तरतूद असे अनेक कार्यक्रम सातत्याने राबविले गेले. त्यामुळे आर्थिक विषमता कमी होण्यास काही प्रमाणात मदत झाली.

### ५. दारिद्र्य निर्मुलन करणे :

सामान्यत: दारिद्र्याचे दोन प्रकार आहे, सापेक्ष दारिद्र्य आणि निरपेक्ष दारिद्र्य. विकसनशील व अविकसित देशात निरपेक्ष दारिद्र्याचे प्रमाण अधिक असते. तर विकसित देशांमध्ये सापेक्ष दारिद्र्य आढळून येते. निरपेक्ष दारिद्र्याचा संबंध मुख्यत: व्यक्तींच्या मूलभूत गरजांची पूर्तता करण्याच्या क्षमतेशी असतो. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य व शिक्षण या मूलभूत गरजा पूर्ण करण्याइतपत उत्पन्न व्यक्तींना मिळत नसेल तर त्यास गरिबी किंवा दारिद्र्य असे म्हणतात.

भारतातील दारिद्र्याच्या संदर्भात डॉ. वि. म दांडेकर व रथ या तज्ञांनी आपले विचार मांडले आहेत. त्यांच्या मते जर व्यक्तीला दररोजच्या आहारातून २२५० कॅलरी पेक्षा कमी उष्मांक मिळत असेल तर अशा व्यक्तींचा समावेश दारिद्र्यरेषेच्या खालील गटात करण्यात येतो. विकसनशील व अविकसित अर्थव्यवस्थेमध्ये गरिबी ही सार्वत्रिक समस्या असल्याचे दिसून येते. गरीबीच्या बाबतीत अभ्यास करण्यासाठी अनेक तज्ञांचा समावेश असलेले अभ्यासगट व अनेक समित्या स्थापन केल्या आहेत. नियोजन मंडळाच्या अंदाजानुसार, सन २०१० मध्ये भारतीय लोकसंख्येतील जवळपास ३५ टक्के लोकसंख्या ही दारिद्र्यरेषेखाली होती. म्हणजे एकूण लोकसंख्येपैकी एक तृतीयांश लोकसंख्येला आपल्या मूलभूत व किमान गरजांची पूर्तता करता येत नाही. भारतीय नियोजनकारांनी राष्ट्रीय उत्पन्नात तसेच दरडोई उत्पन्नात वाढ घडवून आणण्याबरोबरच वाढत्या उत्पन्नाचा लाभ देशातील तळागाळातील लोकांना होऊन त्यांचे राहणीमान उंचावेल यावर भर दिला आहे. दारिद्र्य निर्मुलनाचे उद्दिष्ट समोर ठेवून तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी 'गरिबी हटाओ' ही घोषणा दिली आणि दारिद्र्य निर्मुलनाचे अनेक कार्यक्रम आखले व त्याची अंमलबजावणी केली आहे. त्यामध्ये मुख्यत: कृषी क्षेत्राच्या विकासासाठी कृषी, जलसिंचन, प्रकर्षित शेती, ग्रामोद्योग, लघुउद्योग व रोजगार हमी योजना इत्यादी कार्यक्रम राबविले. त्यामुळे शेती क्षेत्राच्या विकासाबरोबरच ग्रामीण भागातील जनतेला रोजगार उपलब्ध होऊन त्यांचे उत्पन्नाचे प्रमाण वाढेल आणि राहणीमान उंचावेल हे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. त्याचबरोबर शहरी भागातील दारिद्र्य कमी करण्यासाठी औद्योगिकीकरण, तांत्रिक शिक्षण, व्यावसायिक शिक्षण यावर भर दिला. तसेच झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम व सार्वजनिक वितरण प्रणालीचा विकास असे अनेक कार्यक्रम राबवण्यात आले आहेत.

### ६. आधुनिकीकरणाचा वेग वाढविणे :

सुमारे १५० वर्षे भारत हा पारतंत्र्यात असल्यामुळे परकीयांनी भारताची मोठ्या प्रमाणात लूट केली. त्यामुळे एकेकाळी समृद्ध असलेला देश गरीब व मागास अवस्थेत पोहोचला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशातील उपलब्ध साधन सामग्रीचा पर्याप्त वापर करून विकासाची गती वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे. देशाच्या पंचवार्षिक योजनांमध्ये आधुनिकीकरणाला प्राधान्य देण्यात आले आहे. अर्थव्यवस्थेतील विविध प्रकारचे संस्थात्मक व रचनात्मक बदलास आधुनिकीकरण असे म्हटले जाते. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत यांत्रिक स्वरूपाच्या सुधारणा, विज्ञान-तंत्रज्ञान, विपणन, वाहतूक व दळणवळण या क्षेत्रातील बदल यांचा समावेश होतो. अशा बदलांमुळे एकूण उत्पादन, वस्तुंची गुणवत्ता इ. मध्ये वाढ होते तसेच वस्तुंच्या उत्पादन खर्चात कपात झाल्यामुळे त्यांची स्पर्धा

क्षमता वाढून वस्तूंचा बाजारातील खप देखील वाढतो. भारतातील आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे देशातील पोलाद, पेट्रोकेमिकल्स, लोखंड, पेट्रोलियम, धातू, इलेक्ट्रिकल साधने तसेच मोठी यंत्रसामग्री इ. उद्योगांची प्रगती झाली. तसेच या उद्योगांची स्पर्धा क्षमता वाढल्यामुळे देशाच्या निर्यातक्षमतेत वाढ झाली आहे. सार्वजनिक क्षेत्राचा विकास देखील आधुनिकीकरणामुळे घडून आला आहे. सार्वजनिक आरोग्य देखील सुधारले आहे. ग्रामीण भागातील विद्युतीकरण, कृषी, जलसिंचन, पेयजल उपलब्धता तसेच रस्ते वाहतुकीच्या सोयीत वाढ या सुविधा देखील मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत.

वरील उद्दिष्टांशिवाय सामाजिक न्याय, समतोल विकास, सामाजिक सुरक्षितता, कल्याणकारी राज्य इ. उद्दिष्टे देखील आहेत. यातील काही उद्दिष्टे अल्पकालीन तर काही उद्दिष्टे दीर्घकालीन स्वरूपाची आहेत. त्याचबरोबर राजकीय, आर्थिक व सामाजिक स्वरूपाची देखील उद्दिष्टे त्यामध्ये अंतर्भूत आहेत.

**भारतीय नियोजनाचे यश अपयश :**

वर्तमान स्थितीत प्रत्येक राष्ट्र हे विकासाच्या वेगवेगळ्या योजनांची आखणी व त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देत आहे. त्यामुळे विसावे व एकविसावे शतक हे नियोजनाचे शतक म्हणून ओळखले जाते. भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात जरी विकासाच्या वेगवेगळ्या योजना आखल्या गेल्या असतील तरी भारतात स्वातंत्र्यानंतर खऱ्या अर्थाने आर्थिक नियोजनाला सुरुवात झाली असे म्हणता येईल. त्यातही भारतातील मुख्यत: १९५१ नंतरचा कालखंड हा नियोजनाचा कालखंड म्हणून ओळखला जातो. भारतातील नियोजन प्रक्रियेचे मूल्यमापन करण्यासाठी पंचवार्षिक योजनेत ठरवलेली उद्दिष्टे तसेच साध्य या बाबींचा विचार केला जातो. सन १९५० ते २०१७ पर्यंत भारतात एकूण १२ पंचवार्षिक योजना राबवण्यात आल्या आहेत. त्याचा संक्षिप्त आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**तक्ता क्र. ३. १ पंचवार्षिक योजनाकाळातील वृद्धीदर**

| अ. क्र. | पंचवार्षिक योजना | कालावधी | घोषवाक्य | लक्ष्यित वृद्धीदर | साध्य वृद्धीदर | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | शेती | उद्योग | सेवा | एकूण |
| १ | १ ली | १ एप्रिल १९५१ ते ३१ मार्च १९५६ | पुनरुत्थान योजना | २.१ | २.७१ | ५.५४ | ४.१७ | ३.५ |
| २ | २ री | १ एप्रिल १९५६ ३१ मार्च १९६१ | समाजवादी समाजरचनेची निर्मिती | ४.५ | ३.१५ | ४.९४ | ५.५९ | ४.२ |
| ३ | ३ री | १९६१–६६ | | ५.६ | ३.१५ | ५.५९ | ४.९४ | २.८ |
| ४ | ४ थी | १९६९–७४ | स्थैर्यासह आर्थिक वृद्धी | ५.७ | २.५७ | ४.९१ | ३.२२ | ३.२ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ५ वी | १९७४-७९ | गरिबी हटाओ | ४.४ | ३.२८ | ६.५५ | ५.६६ | ४.७ |
| ६ | ६ वी | १९८०-८५ | दारिद्र्य निर्मुलन व रोजगारनिर्मिती | ५.२ | २.५ | ५.३ | ५.४ | ५.५ |
| ७ | ७ वी | १९८५-९० | प्रादेशिक विषमता, बेकारी व दारिद्र्य निर्मुलन | ५.० | ३.४ | ६.७ | ६.७ | ५.६ |
| ८ | ८ वी | १९९२-९७ | मानवी भांडवल विकास | ५.६ | ४.७२ | ७.२९ | ७.२८ | ६.५ |
| ९ | ९ वी | १९९७-२००२ | | ६.५ | २.४४ | ४.२९ | ७.८७ | ५.५ |
| १० | १० वी | २००२-२००७ | रोजगार, उर्जा निर्माण व सामाजिक विकास | ७.९ | २.३० | ९.१७ | ९.३० | ७.७ |
| ११ | ११ वी | २००७-१२ | सर्वसमावेशक व वेगवान विकास | ९.० | ३.२ | ७.४ | १०.०० | ८.१ |
| १२ | १२ वी | १०१२-१७ | | ४.० | ९.० | ७.६ | | |

Source : Indian Economy (2016), Datt and Sundaram, S. Chand Publication, New Delhi.

वरील तक्ता ३.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे अर्थव्यवस्थेचा वृद्धिदर पहिल्या पंचवार्षिक योजनाकाळात ३.५ % होता. तो ११ व्या पंचवार्षिक योजनेअखेरीस ८.१% पर्यंत वाढला. तसेच याच कालावधीत शेतीक्षेत्राचा वृद्धीदर २.७१% वरून ३.२% पर्यंत, उद्योग क्षेत्राचा वृद्धीदर ५.५४ % वरून ७.४ % तर सेवा क्षेत्राचा वृद्धीदर ४.१७ % वरून १० % पर्यंत वाढल्याचे दिसून येते. यावरून नियोजन काळात संपूर्ण अर्थव्यवस्थेची प्रगती झाली आहे असे म्हणता येईल.

**तक्ता ३.२ : योजना खर्च**

| अ.क्र. | पंचवार्षिक योजना | अपेक्षित खर्च (कोटी रु.मध्ये ) | वास्तव खर्च (कोटी रु.मध्ये ) |
|---|---|---|---|
| १ | १ ली | २३७८ | १९६० |
| २ | २ री | ४८०० | ४६०० |
| ३ | ३ री | ७५०० | ८५७७ |
| ४ | ४ थी | १५९०० | १५७९९ |
| ५ | ५ वी | ३७२५० | ३९४२६ |
| ६ | ६ वी | ९५५०० | १०३२९२ |
| ७ | ७ वी | १८०००० | २१०७३० |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | ८ वी | ४३४००० | ४९५६७० |
| ९ | ९ वी | ८५९२०० | ९४१०४१ |
| १० | १० वी | १५९२३०० | १६५३०६५ |
| ११ | ११ वी | ३६४४७१८ | ३६७६९३६ |
| १२ | १२ वी | ७६६९८०७ | – |

Source : Indian Economy (2016), Datt and Sundaram, S. Chand Publication, New Delhi.

तक्ता ३.२ मध्ये दर्शविल्यानुसार अपेक्षित खर्च आणि वास्तव खर्च यांमध्ये कितीतरी पटीने वाढ झाल्याचे दिसते. १ ल्या पंचवार्षिक योजनेत केलेला वास्तव खर्च १९६० कोटी रु. इतका होता. त्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होऊन ३६७६९३६ कोटी रु. पर्यंत पोहचला.

### ३.२.२.१ भारतीय नियोजनाचे यश

भारतात नियोजनाला सुरुवात होऊन सुमारे ७० वर्षांपेक्षा अधिक कालखंड लोटला आहे. त्यामुळे देशातील सध्याचे जे सकारात्मक चित्र आहे त्याचे श्रेय प्रामुख्याने नियोजन प्रक्रियेला जाते. त्यामुळे नियोजनाच्या माध्यमातून मिळालेले यश पुढील मुद्द्यांच्या आधारे सांगता येईल.

**१. राष्ट्रीय उत्पन्न वाढले :** भारतात सन १९५१ मध्ये देशाचे निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न १,३२,३६७ कोटी रुपये इतके होते. सन २०१२ मध्ये ते ११,७५,१७१ कोटी रुपये इतके वाढले आहे. म्हणजेच नियोजनाच्या या ६० वर्षांपेक्षा अधिक कालखंडात दरवर्षी ५ टक्के या दराने हे उत्पन्न वाढल्याचे दिसून येते.

**२. दरडोई उत्पन्नात वाढ :** सन १९५१ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या ३६ कोटी इतकी होती. सन २०११ मध्ये ती १२१ कोटी इतकी प्रचंड प्रमाणात वाढली. या काळात लोकसंख्येतील वाढ जवळपास तिपटीने झाल्याचे दिसून येते. त्याचबरोबर देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात देखील मोठ्या प्रमाणामध्ये वाढ झाली आहे. लोकसंख्येतील वाढीपेक्षा राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर हा अधिक असल्यामुळे दरडोई उत्पन्नात वाढ झाल्याचे दिसून येते आणि हा वाढीचा दर सुमारे २% इतका आहे.

**३. कृषी क्षेत्रातील उत्पन्न वाढले :** नियोजनाच्या कालखंडात कृषी मालाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात देशात राबवण्यात आलेल्या भूसुधारणा, सिंचनाच्या सोयीमध्ये झालेली वाढ, रासायनिक खते व कीटकनाशके यांचा वाढता वापर, शेतीच्या यांत्रिकीकरणावर भर व  कृषी पतपुरवठा सोयींमध्ये झालेली वाढ इत्यादींमुळे भारतीय शेती क्षेत्रातील उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले आहे. नियोजनाच्या माध्यमातून निधीचा व उपलब्ध नैसर्गिक साधन सामग्रीचा पर्याप्त वापर करून सन १९५१ ते २०२१ या कालखंडात देशातील अन्नधान्य उत्पादन ५० दशलक्ष टनांवरून २४० दशलक्ष टनांपर्यंत वाढल्याचे दिसून येते.

**४. औद्योगिक प्रगती घडून आली :** योजना काळात सरकारने सातत्याने औद्योगिक विकासाला प्राधान्य दिले आहे. उद्योगांचा विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने सकारात्मक निर्णय घेतले व औद्योगिक विकासावर भर दिला आहे. त्याचा परिणाम म्हणून सन १९५० ते २००१ या कालखंडात कोळसा उत्पादनात १४ पटीने, लोखंड उत्पादनात २२५० पटीने तर सिमेंट उत्पादनात ३०० पटीने वाढ झाल्याचे दिसून येते. औद्योगिक विकासामुळे भांडवली वस्तूंचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

**५. बचतीचा दर वाढला :** स्वातंत्र्योत्तर काळात नियोजनाच्या अवलंबामुळे एकूण उत्पन्नाशी असलेले बचतीचे प्रमाण वाढले आहे. त्यामध्ये १०.२% वरून २५.६% पर्यंत वाढ झाली आहे. तसेच त्यामुळे भांडवल निर्मितीचा दर वाढण्यासही मदत झाली आहे.

**६. अन्नधान्याची दरडोई उपलब्धता वाढली :** प्रत्येक व्यक्तीला जिवंत व कार्यक्षम राहण्यासाठी अन्नधान्याची आवश्यकता असते. तसेच इतर कृषिमाल देखील पुरेशा प्रमाणात उपलब्ध होणे गरजेचे असते. त्यामध्ये प्रामुख्याने गहू, तांदूळ, भाजीपाला, फळे, दूध इत्यादींचा समावेश होतो. सन १९५०-५१ मध्ये देशात अन्नाचा सरासरी दरडोई उपभोग ३३४ ग्रॅम वरून सन १९९६ मध्ये ४६४ ग्रॅम पर्यंत वाढला आहे.

**७. खाद्यतेल उत्पादन लक्षणीय प्रमाणात वाढले :** खाद्यतेल, वनस्पती तूप या कृषिमालापासून मिळणाऱ्या स्निग्ध पदार्थापासून मनुष्याला ऊर्जा प्राप्त होते. सन १९५०-५१ मध्ये याची दरडोई उपलब्धता ही ३.१ कि.ग्रॅ. इतकी होती. ती वाढून सन १९९६-९७ मध्ये ९.२ कि.ग्रॅ. पर्यंत वाढली आहे. म्हणजेच यामध्ये तीन पटीपेक्षा अधिक वाढ झाली आहे.

**८. दूध व मासे उपभोगात वाढ :** भारतात नियोजन कालखंडात दुधाच्या एकूण उपभोगात दुपटीने तर प्रतिव्यक्ती मासे उपभोगात साडेतीन पटीने वाढ झाली आहे. त्यामुळे लोकांची कार्यक्षमता वाढण्यास मदत झाली आहे.

**९. चहाचे उत्पादन लक्षणीय प्रमाणात वाढले :** गेल्या पन्नास वर्षात भारतातील लोकसंख्या तिपटीने वाढली आहे. याच कालखंडात चहाचा सरासरी उपभोग देखील याच प्रमाणात वाढल्याचे दिसते. चहाचा सरासरी उपभोग २१४ ग्रॅम वरून ६५७ ग्रॅम पर्यंत वाढल्याचे दिसून येते.

**१०. कापड उपभोग वाढला :** भारताच्या विविध पंचवार्षिक योजना काळात इतर उत्पादनाबरोबरच कापड उत्पादनात देखील वेगाने वाढ झाली. सन १९५० मध्ये भारतातील दरडोई कापड उपभोग केवळ बारा मीटर होता तो १९९६-९७ मध्ये ३० मीटर प्रतिव्यक्ती इथपर्यंत वाढला.

**११. आरामदायी वस्तू उत्पादनामध्ये वाढ झाली :** आरामदायी किंवा चैनीच्या वस्तु मध्ये प्रामुख्याने विजेचे दिवे, पंखे, फ्रिज, स्कूटर, मोटार इ. चा समावेश होतो. या वस्तूंच्या वापरामुळे उपभोक्त्यांचा राहणीमानाचा दर्जा सुधारतो. नियोजन काळात या सर्व वस्तूंचे उत्पादन वाढल्यामुळे राहणीमानाचा दर्जा देखील वाढ झाली आहे.

**१२. पायाभूत सोयी-सुविधा वाढल्या :** देशातील रस्ते वाहतूक, ऊर्जा तसेच पाणीपुरवठा इत्यादींचा समावेश पायाभूत सोयी-सुविधा मध्ये होतो. नियोजनाच्या कालखंडात पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून पायाभूत

सोयी मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे देशातील लोकांचे जीवन जगणे अत्यंत सुकर झाले आहे.

**१३. निर्यात रचनेत बदल :** नियोजन पूर्व कालखंडात म्हणजे सन १९५० पूर्वी भारतातून केल्या जाणाऱ्या निर्यातीत प्रामुख्याने कच्चा माल, चहा, कॉफी तसेच मसाल्याचे पदार्थ इ. प्राथमिक वस्तूंची निर्यात मोठ्या प्रमाणात केली जात होती. योजना काळात मात्र भारताच्या निर्यातीची रचना खूप बदलली आहे. भारतातून होणाऱ्या निर्यातीत विविधता आली आहे. सध्या भारतातून औद्योगिक क्षेत्रात उत्पादित केल्या जाणाऱ्या वस्तू, स्कूटर, दागिने, वाहने अशा अनेक वस्तूंची निर्यात होत आहे. म्हणजे ज्या वस्तू पूर्वी आयात केल्या जात होत्या त्या वस्तू सध्या निर्माण केल्या जातात. केवळ नियोजनाच्या माध्यमातून हे शक्य झाले आहे. त्यामुळे भारतीय नियोजनाचे यश म्हणून भारतातील निर्यातीच्या बदललेल्या रचनेकडे पाहिले जाते.

**१४. सरासरी आयुर्मानात वाढ :** नियोजन काळात भारतात दवाखाने, औषधनिर्मिती उद्योग, शस्त्रक्रियेच्या सुविधा यामध्ये वाढ झाली. तसेच साथीचे रोग आटोक्यात आणण्यास यश मिळाले. एकूणच भारतातील आरोग्यविषयक सोयींत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे एकूण मृत्युदर दरहजारी २१ वरून ९ पर्यंत कमी झाला आहे. तसेच नागरिकांचे सरासरी आयुर्मानदेखील ५१ वर्षावरून ६१ वर्षापर्यंत वाढले.

**१५. साक्षरता दर व शैक्षणिक सुविधा यामध्ये वाढ झाली :** नियोजन कालखंडात देशातील शैक्षणिक सुविधांमध्ये वाढ झाली आहे. आरोग्य, शिक्षण, अभियांत्रिकी शिक्षण, व्यवस्थापन, कृषी, दुग्धशास्त्र, मत्स्यशास्त्र इत्यादी शैक्षणिक सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. परिणामी शैक्षणिक सुविधांच्या बाबतीत भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाचा देश बनला तसेच साक्षरतेचे प्रमाण देखील लक्षणीयरीत्या वाढले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार केल्यास नियोजनाच्या कालखंडात देशातील सर्व आघाड्यावर प्रगती झाल्याचे दिसून येते.

**नियोजनाचे अपयश :**

भारताच्या विकासामध्ये पंचवार्षिक योजनांची भूमिका खूप महत्त्वपूर्ण ठरली आहे. नियोजनाच्या माध्यमातून सर्वच क्षेत्रामध्ये वाढ झाली आहे. तथापि काही बाबतीत मात्र ठरवलेली उद्दिष्टे गाठता आली नाहीत. त्यालाच नियोजनाचे अपयश म्हणता येईल. भारतातील नियोजनात आलेले अपयश खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**१. दारिद्र्य निर्मुलनात अपयश :** भारतात निरपेक्ष व सापेक्ष दारिद्र्य असल्याचे दिसून येते. योजना कालखंडात देशातील दारिद्र्यात घट झाली. त्यामुळे देशातील निरपेक्ष दारिद्र्याचे प्रमाण कमी झाले आहे. परंतु आर्थिक विषमता वाढल्यामुळे तौलनिक दारिद्र्य म्हणजे सापेक्ष दारिद्र्यात वाढ झाली आहे. देशातील उत्पन्नाच्या असमान वितरणामुळे आर्थिक विषमता, संपत्तीचे केंद्रीकरण तसेच भ्रष्टाचार व काळा पैसा या समस्या निर्माण होतात. त्यामुळे सापेक्ष दारिद्र्यात वाढ होत आहे.

**२. बेकारी कमी करण्यात अपयश :** योजना काळात भारतात रोजगार वाढीसाठी सातत्याने प्रयत्न करण्यात आले आहेत. त्यासाठी विविध रोजगार विषयक कार्यक्रम राबविण्यात आले. त्यामध्ये लघुउद्योगांना

मदत व प्रोत्साहन देणे, ग्रामीण रोजगार कार्यक्रम, हरितक्रांती, धवलक्रांती, नीलक्रांती इ. मुळे रोजगार संधी वाढण्यास मदत झाली आहे. परंतु भारतातील बेरोजगारीचे समूळ उच्चाटन करणे अद्याप शक्य झालेले नाही. त्यामुळे आजही भारतात बेकारांची संख्या कोट्यावधी असल्याचे दिसून येते. कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे तर भारतातील बेकारीची समस्या अधिकच गंभीर झाली आहे.

**४. आर्थिक असमतोल वाढला :** योजना काळात भारतातील विविध क्षेत्रांचा विकास घडून आला आहे. रोजगार संधी मध्ये वाढ झाली. परंतु वाढत्या राष्ट्रीय उत्पन्नाचे व आर्थिक विकासाचे लाभ देशातील ठराविक वर्गालाच मिळाल्याचे दिसून येते. त्यामुळे आर्थिक विषमता वाढली. त्यामुळे श्रीमंत अधिक श्रीमंत झाले तर गरीब अधिक गरीब झाल्याचे आढळते.

**५. मोठ्या औद्योगिक घराण्यांचा उदय :** देशात पंचवार्षिक योजना काळात कृषी धोरण, ग्रामीण विकास धोरण, औद्योगिक धोरण राबविण्यात आले. आर्थिक विकासाच्या या कार्यक्रमांचा लाभ देशातील मोजक्या आणि ठराविक लोकांना झाला. त्यामुळे मोठे शेतकरी, मोठे उद्योजक, मोठे गुंतवणूकदार हे वर्ग निर्माण झाले. उदाहरणार्थ टाटा, बिर्ला, दर्डा, चौगुले यांसारख्या ठराविक औद्योगिक घराण्यांचा जास्त विकास झाला आहे.

**६. वित्तीय तूट वाढली :** योजना काळात सरकारच्या सार्वजनिक खर्चात मोठी वाढ झाली आहे. त्या प्रमाणात शासनाचा महसूल वाढला नाही. त्यामुळे खर्च व उत्पन्न यातील अंतर कमी करण्यासाठी तुटीचा अर्थभरणा या मार्गाचा अवलंब करण्यात आला. तसेच परकीय कर्जाचे प्रमाण वाढले. महसुली उत्पन्नाच्या तुलनेत महसुली खर्च वाढत गेला. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील वित्तीय तूट वाढत गेली आणि सातत्याने त्यात आणखी वाढ होत असल्याचे दिसून येते.

**७. भुसुधारणा कार्यक्रमास अपयश :** भारतात सन १९५६ पासून म्हणजे दुसऱ्या योजनेपासून शेतीविषयक सुधारणांचा अवलंब करण्यात आला आहे. त्यामध्ये कमाल जमीन धारणा कायदा, कुळकायदे, जमीनदारी पद्धती, जमीनदारी पद्धतीचे निर्मूलन, जमिनीचे पुनर्वाटप, तुकडेबंदी, तुकडेजोड इ.चा समावेश होतो. परंतु यामध्ये पुरेसे यश मिळाले नसल्याचे दिसून येते.

अशा प्रकारे अर्थव्यवस्थेतील सर्वच गंभीर समस्यांचे निर्मुलन करणे नियोजनाच्या माध्यमातून शक्य झाले नाही.

### ३.२.३ नियोजन मंडळ व राष्ट्रीय विकास परिषद :

अर्थव्यवस्थेचे नियोजन करण्याचा सर्वस्वी अधिकार हा शासनाला असतो. राज्यकारभार करणारा या अर्थाने नियोजनाची आखणी व अंमलबजावणी करणे हे कार्य आधार नव्हता राज्यघटनेमध्ये नियोजन मंडळाच्या स्थापनेबाबत कोणतीही तरतूद नाही तर ते व्यवस्थेतील संसाधनांचा व निधीचा वापर या बाबतीत नियोजन मंडळ सरकारला सल्ला देते. परंतु त्याबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार सरकारकडे असतो.

**नियोजन मंडळाची रचना**

नियोजन मंडळामध्ये एकूण आठ सदस्य असतात. देशाचे पंतप्रधान हे नियोजन मंडळाचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. इतर सात सभासदांमध्ये केंद्रीय मंत्री, अर्थतज्ञ, सनदी अधिकारी इ. चा समावेश असतो. हे सर्व सभासद स्थायी स्वरूपाचे असतात. या स्थायी  सभासदांव्यतिरिक्त आवश्यकतेनुसार इतर अंशकालीन सभासद आणि अर्थतज्ज्ञांचे मंडळ नियुक्त केले जाते. या नियुक्त्यांसंदर्भात कोणतेही निश्चित असे नियम नाहीत.

देशातील लोकांचे राहणीमान सुधारणे, राष्ट्रीय संसाधनांचा विकास करणे तसेच त्यांचा पर्याप्त वापर करणे, विविध वस्तूंच्या उत्पादनात वाढ घडवून आणणे, रोजगार निर्मिती करून रोजगार संधी विस्तारणे इ. साठी योग्य योजनांची आखणी करण्यासाठी सरकारने नियोजन मंडळाची स्थापना केली आहे.

**नियोजन मंडळाची भूमिका :**

**१. संसाधनांचे मूल्यमापन व पर्याप्त वापर :**

देशातील उत्पादन प्रक्रियेसाठी सहाय्यभूत ठरणाऱ्या विविध मानवी व नैसर्गिक संसाधनांचा अभ्यास करून त्याचे मूल्यमापन करणे, त्याचबरोबर जी अपुरी संसाधने आहेत अशा संशोधनामध्ये वाढ घडवून आणणे यासाठी नियोजन मंडळ काम करते. उपलब्ध संसाधनांचा अधिकाधिक प्रभावी व समतोल वापर यावर लक्ष केंद्रित करून योजना आखण्याची महत्त्वपूर्ण भूमिका नियोजन मंडळाला पार पाडावी लागते.

**२. धोरण समिती म्हणून कार्य करणे :**

देशाच्या राष्ट्रीय विकास परिषदेच्या मार्गदर्शनाखाली नियोजन मंडळ कार्य करत असते. नियोजन मंडळ देशाचे नियोजन ठरवणारी मुख्य समिती म्हणून कार्य करते.

**३. योजनांची आखणी करणे :**

देशाची विकास प्रक्रिया अधिकाधिक गतिमान करण्यासाठी आणि आर्थिक नियोजनासाठी वार्षिक योजना, पंचवार्षिक योजना तसेच राज्य सरकारला विविध योजना आखण्यासाठी मार्गदर्शन करणे इ. कार्ये नियोजन मंडळामार्फत केली जातात. याशिवाय योजना कार्यक्रमांचे तसेच विकास प्रकल्पांचे परीक्षण देखील नियोजन मंडळ करत असते.

**४. सामूहिक विकास योजनांची आखणी :**

मानवी व आर्थिक विकासातील गुंतागुंतीच्या समस्या सोडविण्यासाठी विशिष्ट विकास योजनांची आवश्यकता असते. त्यासाठी सामूहिक विकास योजना तयार करण्याचे कार्य भारतीय नियोजन मंडळ करत असते.

**५. समन्वयात्मक व एकात्मिक योजना तयार करणे :**

देशातील सर्वच भागांचा समतोल विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने पिण्याच्या शुद्ध पाण्याची उपलबधता, ग्रामीण विद्युतीकरण, आरोग्यविषयक सुविधा, ग्रामीण भागात विद्युतीकरण तसेच पर्यावरण संरक्षण इ.चा अवलंब

केला जातो. सामाजिक आणि संतुलित विकासासाठी अशा समन्वयात्मक आणि एकात्मिक योजनांची नियोजन मंडळामार्फत आखणी केली जाते.

**६. उत्पादनामध्ये वाढ घडवून आणणे :**

नियोजनाच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या वाढत्या खर्चाबरोबरच उपलब्ध असलेल्या संसाधनांचे केंद्रीकरण टाळण्यासाठी त्याचे योग्य विभाजन व कार्यक्षम वापराद्वारे उत्पादनाचे प्रमाण वाढवणे यावर नियोजन मंडळाचा अधिक भर असतो.

**७. मध्यस्थाची भूमिका पार पाडणे :**

उत्पादन साधने व विविध संसाधनांची कमतरता व त्यांचा पर्यायी उपयोग यामुळे उपलब्ध असणाऱ्या मर्यादित संसाधनावर अतिरिक्त ताण निर्माण होतो. त्यामुळे केंद्र व राज्य यामध्ये संसाधनांचे विभाजन करणाऱ्या व्यवस्थेत अडथळे निर्माण होतात. हा गुंता सोडविण्यासाठी व योजनांच्या माध्यमातून देशाचे हित साध्य करण्यासाठी नियोजन मंडळाला मध्यस्थाची भूमिका पार पाडावी लागते.

**८. उच्च उत्पादन क्षमता विकसित करणे :**

केंद्र सरकार व राज्य सरकारे यांना राज्यकारभार करत असताना अनेक प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे अशा अडचणींचे विचारपूर्वक निवारण करणे तसेच त्यासाठी आवश्यक ते बदल स्वीकारणे आणि त्याद्वारे अर्थव्यवस्थेत अधिक उत्पादन क्षमता असलेली संस्कृती विकसित करणे यासाठीची यंत्रणा व व्यवस्था निर्माण करण्याचे कार्य नियोजन मंडळ करते.

**९. सल्लागार म्हणून कार्य करणे :**

विविध विकास योजनांच्या बाबतीत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार हा केंद्र सरकारकडे असतो. परंतु उपलब्ध संसाधनांचा योग्य व कार्यक्षम वापर करून उत्पादकता वाढवण्यासाठी आवश्यक असलेला सल्ला मदत व मार्गदर्शन केले जाते. त्यासाठी आवश्यक असलेली उत्तम व्यवस्था निर्माण करण्यामध्ये नियोजन मंडळ सल्लागाराची भूमिका पार पाडते.

**१०.माहिती प्रसिद्ध करणे :**

अर्थव्यवस्थेच्या बाबतीत उपलब्ध असलेली आकडेवारी, उपयुक्त माहिती नियोजन मंडळ प्रसिद्ध करते. जेणेकरून अर्थव्यवस्थेच्या बाबतीत निर्माण झालेल्या जटील व गुंतागुंतीच्या समस्यांवर समाजात विचारमंथन होऊन या समस्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने योग्य निर्णय घेता येतो.

अशा प्रकारे नियोजन मंडळाला महत्वाची भूमिका पार पाडावी लागते. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील उपलब्ध घटकांचे योग्य प्रकारे वितरण करणे, त्यांचा कार्यक्षम वापर घडूवून आणणे तसेच अर्थव्यवस्थेचे काटेकोर नियोजन करणे शक्य होते.

### ३.२.३ राष्ट्रीय विकास परिषदेची भूमिका

भारतातील नियोजनाची आखणी करण्यामध्ये नियोजन मंडळा बरोबरच राष्ट्रीय विकास परिषदेची भूमिका देखील महत्त्वाची असते. भारतीय नियोजनात विकेंद्रीकरणाचा अवलंब केला जात असल्याने भारतातील नियोजन हे बहुस्तरीय नियोजन म्हणून ओळखले जाते.

राष्ट्रीय नियोजन परिषदेची स्थापना सन १९५१ मध्ये झाली. केंद्रीय मंत्रिमंडळ आणि राज्य सरकार यांच्यामध्ये विकासात्मक बाबींवर चर्चा घडवून आणणे आणि समन्वय प्रस्थापित करण्याची सर्वात महत्त्वाची भूमिका राष्ट्रीय विकास परिषदेला पार पाडावी लागते. राष्ट्रीय विकास परिषदेमध्ये राज्य सरकारचे मुख्यमंत्री आणि नियोजन मंडळाचे सदस्य यांचा समावेश असतो. देशाचे पंतप्रधान या परिषदेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. ही परिषद भारतात बहुस्तरीय नियोजनाचा अवलंब करते. त्यासाठी सर्वप्रथम जिल्हा पातळीवरील योजना तयार करण्यात येतात. त्यानंतर राज्य पातळीवरील योजना तयार केली जाते आणि अंतिमतः केंद्र व राज्य सरकारे यांच्या वेगवेगळ्या योजनांचे एकत्रीकरण करून संपूर्ण देशासाठी योग्य ठरेल अशा योजनेचा आराखडा तयार केला जातो. सर्व टप्पे पार केल्यानंतर हा योजना आराखडा प्रथम नागरिकांची मते जाणून घेण्यासाठी व त्यानंतर संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये चर्चेसाठी सादर केला जातो. संसदेच्या मंजुरीनंतर तो राष्ट्रीय विकास परिषदेच्या मान्यतेसाठी पाठविला जातो. परिषदेच्या मान्यतेनंतर त्यास अंतिम स्वरूप प्राप्त होते. अशा प्रकारे कोणत्याही योजनेला अंतिम रूप देण्यासंदर्भात राष्ट्रीय विकास परिषदेची भूमिका महत्त्वपूर्ण असते.

जेव्हा एकच राजकीय पक्ष केंद्रात किंवा राज्यात सत्तेत असेल किंवा अनेक राजकीय पक्ष एकत्रित सत्तेत सहभागी असतात तेव्हा परिणामकारक योजनांची आखणी व अंमलबजावणी करणे यामध्ये परिषदेला अनेक समस्या उद्भवतात. या बाबतीत अभ्यास गटाने परिषदेला त्यांच्या कामकाजात सुधारणा घडवून आणणे तसेच अधिक परिणामकारक भविष्यकालीन योजना अंमलबजावणीसाठी मध्यम मार्ग काढण्याची शिफारस केली होती. तसेच अभ्यास गटाने राष्ट्रीय विकास परिषदेच्या संरचना व कार्य या संदर्भात इतरही अनेक शिफारशी केल्या. त्यास अनुसरून ७ आक्टोबर १९६७ मध्ये त्या बाबत ठराव करून राष्ट्रीय विकास परिषदेची पुनर्बांधणी करण्यात आली आहे. त्यानुसार नियोजन मंडळाचे सचिव हेच राष्ट्रीय विकास परिषदेचे काम पाहतील असा निर्णय घेण्यात आला. राष्ट्रीय विकास परिषदेला पार पाडाव्या लागणाऱ्या भूमिका पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१. कार्यक्षम संसाधनांची निर्मिती करणे :** देशातील गरजेच्या तुलनेत मर्यादित असलेला संसाधनांचा पुरवठा विचारात घेता संसाधनांची कार्यक्षमता वाढवणे तसेच कार्यक्षम संसाधनांची निर्मिती करणे आवश्यक असते. त्यासाठी राष्ट्रीय विकास परिषद प्रयत्न करते.

**२. संसाधनांची गतिशीलता वाढविणे :** देशात उपलब्ध असलेली संसाधने ही बहुउपयोगी असतात. त्यामुळे वेगवेगळ्या उपयोगामध्ये संसाधनांचा वापर सुलभरीत्या करता येतो आणि संसाधनांची गतिशीलता वाढते. यासाठी राष्ट्रीय विकास परिषद महत्वाची भूमिका पार पाडते.

**३. नियोजन कार्यात सुधारणा घडवून आणणे :** राष्ट्रीय विकासावर परिणाम करणाऱ्या विविध सामाजिक राजकीय व आर्थिक समस्या सोडविण्यासाठी योग्य धोरण परिषदेमार्फत ठरवले जाते. तसेच नियोजनाचे कार्य अधिक काटेकोरपणे होण्यासाठी राष्ट्रीय परिषद कार्य करते.

**४. योजनेच्या अंमलबजावणीबाबत शिफारशी करणे :** राष्ट्रीय पातळीवरील योजनेची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी योग्य कृती आराखड्याची निर्मिती व अंमलबजावणी याबाबत सातत्याने वेगवेगळ्या शिफारशींच्या माध्यमातून सविस्तर मार्गदर्शन करत असते.

**५. नियोजनातील सहभाग :** देशातील सर्व राज्यांचे मुख्यमंत्री नियोजन प्रक्रियेत सहभागी करून घेऊन प्रादेशिक प्रतिनिधित्व वाढविण्याचा प्रयत्न परिषद करते. राष्ट्रीय विकास परिषदेचे गव्हर्नर तसेच प्रादेशिक घटक विचार-विनिमय करून योजना सादर करतात.

**६. मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे :** योजनांसाठी उपलब्ध असलेल्या साधनांचे योग्य पद्धतीने मूल्यमापन करून त्यांचा अपव्यय टाळण्यासाठी व नियोजनाचा योग्य आराखडा तयार करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे परिषदेमार्फत तयार केली जातात.

**७. प्रश्नांची सोडवणूक करणे :** देशाच्या विकासावर परिणाम करणाऱ्या विविध सामाजिक व आर्थिक धोरणांच्या संदर्भात असलेल्या विविध प्रश्नांचा विचार करून ते सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला जातो.

वरील कार्यांशिवाय राष्ट्रीय विकास परिषद विकास योजनांची लक्ष्ये गाठण्यासाठी शिफारशी करणे, कामकाजात सुधारणा करणे, नियोजन प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग व सहकार्य वाढविणे यासाठी परिषद कायम प्रयत्नशील असते. अशा प्रकारे राष्ट्रीय विकास परिषद ही नियोजन प्रक्रियेतील सर्वोच्च संस्था म्हणून कार्य करते.

### ३.२.४ निति आयोगाची गरज, स्थापना, रचना, उद्दिष्ट्ये व कामगिरी

#### निती आयोग

स्वातंत्र्यानंतर जवळपास ६५ वर्षे नियोजन आयोगाच्या माध्यमातून आर्थिक विकासाबाबतची अनेक उद्दिष्टे साध्य केली. त्यासाठी वेगवेगळ्या पातळ्यांवर अनेक योजनांची आखणी व अंमलबजावणी केली. नियोजन आयोगाची स्थापना १५ मार्च १९५० रोजी तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली केली होती. नियोजन आयोगाचे कार्य ३१ डिसेंबर २०१४ रोजी संपुष्टात आले. आत्तापर्यंतच्या नियोजनाच्या कालखंडात आयोगाने १२ पंचवार्षिक योजनांची आणि वेगवेगळ्या कालखंडात सहा वार्षिक योजनांच्या माध्यमातून सुमारे २० लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक निधीचे वाटप करण्यात आले आहे. यावरून नियोजन आयोगाच्या कार्याची व्यापकता लक्षात येते. तथापि देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी १५ ऑगस्ट २०१४ रोजी ६७ व्या स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून देशाला उद्देशून केलेल्या भाषणात आत्तापर्यंत नियोजन आयोगाने आपली भूमिका योग्य पद्धतीने पार पाडली आहे. पण आता बदलत्या काळानुरूप व गरजांनुसार नव्या संरचनेची, नव्या कल्पनांची व नव्या दृष्टिकोनाची गरज आहे. राज्ये ही विकासाच्या केंद्रस्थानी असून गेल्या साठ वर्षांपेक्षा

सध्या अधिक महत्त्व देशाच्या संघराज्याला येत आहे असे सांगून नियोजन आयोग बरखास्त केले जाणार याचे सूतोवाच केले. त्यानंतर राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसोबत पंतप्रधानांनी एक बैठक घेतली आणि त्यानंतर साधारण तीन आठवड्यांनी नियोजन आयोगाला पर्याय म्हणून निती आयोग स्थापन करण्याचा निर्णय घेतला. हा निती आयोग केंद्र व राज्य सरकारांना धोरणांची आखणी करण्यासाठी एक विचार गट म्हणून कार्य करेल आणि त्याचे पदसिद्ध अध्यक्ष देशाचे पंतप्रधान असतील असे ठरवले गेले. निती आयोगालाच 'राष्ट्रीय भारत परिवर्तन संस्था' असेही म्हणतात. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या ठरावास अनुसरून १ जानेवारी २०१५ रोजी निती आयोगाची स्थापना केली आहे. नियोजनाच्या क्षेत्रात गेली ६५ वर्षांपेक्षा जास्त काळ काम करणाऱ्या नियोजन आयोगाची जागा निती आयोगाने घेतली आहे. देशाच्या बदलत्या आर्थिक व सामाजिक गरजांचा विचार करून केंद्र व राज्य सरकारे यांना विकासासाठी नवीन योजना सुचविणारा हा एक विद्वानांचा व तज्ज्ञांचा गट आहे. केंद्र सरकार, राज्य सरकार, केंद्रशासित प्रदेश तसेच स्थानिकांचे प्रतिनिधित्व असणारा हा आयोग सरकारला धोरणांची आखणी व कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शन करतो.

देशातील प्रत्येक राज्याचे वेगळे वैशिष्ट्य असून प्रत्येक राज्य हे विकासाच्या वेगवेगळ्या पातळीवर आहे. प्रत्येक राज्याला कोणत्या ना कोणत्या बाबींची कमतरता भासते. त्याची कोणती ना कोणती न्यूनता आहे. या सर्व बाबींचा विचार करता सर्व राज्यांना, संपूर्ण देशाला एकच विकासाचे धोरण योग्य ठरणार नाही. तसे झाल्यास राज्याच्या व देशाच्या विकासात अडथळे निर्माण होतात. जागतिक स्पर्धेत भारताला टिकून राहायचे असेल तर प्रत्येक राज्यासाठी त्यांच्या गरजेनुसार स्वतंत्र धोरण आखणे आवश्यक आहे.

या सर्व बाबी लक्षात घेऊन व सर्वदूर त्याचा विचार करून निती आयोगाची स्थापना करण्याचा निर्णय घेतला आहे.

**निती आयोगाची रचना :**

अध्यक्ष : भारताचे पंतप्रधान (पदसिद्ध अध्यक्ष असतात)

उपाध्यक्ष : पंतप्रधानांनी नियुक्त केलेले अर्थतज्ज्ञ असतात.

नियामक परिषद (गव्हर्निंग कौन्सिल) : यामध्ये सर्व राज्यांचे मुख्यमंत्री व केंद्रशासित प्रदेशांचे नायब राज्यपाल किंवा मुख्य सचिव यांचा समावेश आहे.

तदर्थ सदस्य : नामांकित संशोधन संस्थांमधील दोन सदस्य यामध्ये समाविष्ट असतात. प्रतिनियुक्तीवर त्यांची नियुक्ती केलेली असते.

पदसिद्ध सदस्य : पंतप्रधानांनी नामनिर्देशित केलेले केंद्रीय मंत्री. यामध्ये जास्तीत जास्त चार मंत्र्यांची नियुक्ती केली जाते.

मुख्य कार्यकारी अधिकारी : केंद्रीय सचिव दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती ठराविक कालावधीसाठी पंतप्रधानांकडून केली जाते.

सचिव : हा प्रशासकीय व स्वायत्त अधिकारी असतो

**निती आयोगाची उद्दिष्टे :**

देशाच्या नियोजन प्रक्रियेत सरकारला मार्गदर्शन करणे, सल्ला देणे यांसारखी कार्ये निती आयोग करतो. तसेच हा एक तज्ञांचा विचार गट आहे. सरकारला आर्थिक नियोजनाबाबत सल्ला देण्याचे कार्य निति आयोगामार्फत केली जाते. निती आयोगाची स्थापना करण्यामागची आणखीही काही उद्दिष्ट आहेत ती खालीलप्रमाणे सांगता येतील.

**१. नियोजन प्रक्रियेत राज्याचे प्रतिनिधित्व वाढविणे :**

केंद्र व राज्य सरकारांच्या विकास प्रक्रियेत निती आयोग विकास योजना बाबतचा कच्चा आराखडा तयार करते. त्यामुळे केंद्र व राज्य सरकारच्या विकास योजनांना योग्य दिशा मिळते. नियोजन आयोगाच्या माध्यमातून योजना तयार करून सरकारकडे अंमलबजावणीसाठी पाठवली जात होती आणि त्यामध्ये राज्यांचा फारसा सहभाग नव्हता. मात्र निती आयोगामध्ये राज्य सरकार व नागरिक यांनाही नियोजन प्रक्रियेमध्ये प्रतिनिधित्व दिले जाते. तसेच आणखी सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जातात.

**२. केंद्र व राज्य सरकारांशी सल्लामसलत :**

निती आयोगामध्ये विविध क्षेत्राशी संबंधित असलेल्या तज्ञांचा समावेश असतो. कोणतीही विकास योजना आखण्यापूर्वी हा विचारगट केंद्र व राज्य सरकार यांच्याशी सल्लामसलत करतो आणि विकासाच्या योग्य योजना आखण्याचे कार्य करतो. त्यामुळे योजना राबविण्यातील अडचणी दूर करता येतात.

**३. केंद्र व राज्य सरकार यांच्यातील परस्पर सहकार्य वाढविणे :**

राष्ट्रहिताचा विचार करता केंद्र आणि राज्य सरकार यांच्यात समन्वय आणि सहकार्य असणे आवश्यक असते. कोणताही विकास कार्यक्रम राबविताना निती आयोग केंद्र व राज्य सरकार यांच्यात समन्वय प्रस्थापित करण्याचा व त्यातील परस्पर सहकार्य वाढविण्याचा प्रयत्न करतात.

**४. योजनांची विश्वासार्हता वाढविणे :**

निती आयोग वेगवेगळ्या पातळ्यांवर विकासाच्या योजनांची आखणी करतो. ग्रामीण क्षेत्राच्या विकासासाठी देखील विशिष्ट योजना तयार करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने निती आयोग कार्य करतो. तसेच ग्रामिण क्षेत्राच्या विकासासाठी ग्रामीण पातळीवर योजनांची कार्यक्षमता व विश्वानसार्हता वाढवणे हे निती आयोगाचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे ग्रामीण जनतेला अधिकाधिक योजनेत सहभागी करून घेता येईल व त्यांचा योजना कार्यक्रमातील सहभाग वाढीस लागेल.

**५. तज्ञांचा सहभाग वाढविणे :**

निती आयोगामध्ये विविध क्षेत्रातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील तज्ञांचा समावेश असतो. त्यांच्या ज्ञानाचा उपयोग देशाच्या नियोजन व विकास प्रक्रियेमध्ये करून घेता येतो. त्यामुळे नवीन उपक्रमांना चालना

मिळते तसेच क्षेत्रीय व विभागीय समस्यांची सोडवणूक करता येते. यादृष्टीने तज्ञांचा सहभाग वाढवणे व त्यांच्या ज्ञानाचा उपयोग करून घेणे हे या आयोगाचे उद्दिष्ट आहे.

अशा प्रकारे वरील विविध उद्दिष्टांची पूर्ती करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर निती आयोग स्थापन केला आहे. त्यामुळे विकास योजनांची आखणी व त्याची कार्यक्षमपणे अंमलबजावणी करणे शक्य झाले आहे.

**३.२.४.४ निति आयोगाची कार्ये :**

भारत हा एक खंडप्राय स्वरूपाचा तसेच संघराज्य पद्धतीने राज्यकारभार करणारा देश आहे. त्यामुळे केंद्र सरकार, राज्य सरकार व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यातील संबंध विकासाच्या दृष्टीने परस्परपूरक असणे गरजेचे आहे. त्यामध्ये निती आयोग महत्त्वाची भूमिका पार पाडतो. याव्यतिरिक्त निती आयोगाची कार्य पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१. सहकारी संघवाद :**

राज्य सरकार व केंद्र सरकार यांच्या संयुक्त सहभागातून विविध प्रकारची संख्यात्मक व गुणात्मक उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी विविध कालावधीचे विकास कार्यक्रम आखण्याचे कार्य निती आयोगाच्या माध्यमातून केले जाते. यासाठी केंद्र व राज्य सरकार यांच्यात आवश्यक असणारा योग्य समन्वय साधला जातो. त्यामुळे विकास योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी राज्याकडून केली जाते. केंद्राकडून राज्यावर नियोजन लादण्याऐवजी केंद्र व राज्य या दोघांच्या समन्वयातून योजनांची आखणी करून त्यांची विभागीय पातळीवर अंमलबजावणी केली जाते. अशा प्रकारे केंद्र राज्य व स्थानिक सरकार यांच्यातील परस्पर सहकारी संघवाद वाढीस लावणे हे निती आयोगाचे कार्य आहे.

**२. राष्ट्रीय पातळीवर विकास कार्यक्रमांची आखणी करणे :**

राष्ट्रीय पातळीवर विविध विकास योजनांची आखणी करताना केंद्र व राज्य यांच्याशी सल्लामसलत केली जाते. नियोजनात सर्वांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रशासित प्रदेशांचे गव्हर्नर यांना सदस्य म्हणून सहभागी करून घेतले जात असल्याने योजना कार्यक्रमांच्या आखणीत त्यांचा सक्रीय सहभाग राहतो. तसेच या योजनांसाठी विविध तज्ञ व केंद्रीय मंत्री यांचाही सहभाग असतो.

**३. अत्याधुनिक संसाधन केंद्राची निर्मिती :**

देशात अत्याधुनिक संसाधन विकास केंद्र निर्माण करण्यासाठी विविध तज्ञांचा अनुभवी व व्युव्हरचना यांचा उपयोग करून घेतला जातो. तसेच त्याद्वारे विकास कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याचे कार्य निति आयोगामार्फत केले जाते. त्यातून देशाचे भवितव्य घडविण्याचा प्रयत्न निति आयोगामार्फत केला जातो.

**४. ग्रामीण व राष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रमांची आखणी :**

देशातील गाव, तालुका, जिल्हा, राज्य व केंद्र या सर्वांच्या सहभागातून नियोजनाची पुनर्रचना करणे व राष्ट्रीय पातळीवरील योजना गावपातळीपर्यंत पोहोचणे व त्यांची कार्यक्षमरित्या अंमलबजावणी करण्याचे कार्य

नित्य आयोगामार्फत केली जाते. त्यामुळे विकेंद्रित नियोजनाचा लाभ अगदी खालच्या स्तरापर्यंत पोहोचवता येतो.

**५. नवीन ज्ञान उपक्रमशीलता आणि नवउद्योजक/संयोजक यांना प्रोत्साहन देणे :**

निती आयोगात व्यवसायिक तज्ञ व संशोधक यांचा देखील सहभाग असतो. त्यामुळे उत्तम ज्ञान व लोकांच्यात उपक्रमशीलता निर्माण करण्यासाठी राज्यकर्त्यांना मार्गदर्शन केले जाते. तसेच देशातील सर्व संयोजकांना उद्योगासाठी प्रोत्साहन व त्यासाठी मदत देऊन विकास कार्यक्रमांना चालना देण्याचे प्रयत्न निति आयोगामार्फत केले जातात.

**६. आधुनिक तंत्रज्ञान आणि क्षमता विकसित करणे :**

जागतिक बाजारपेठेतील अत्याधुनिक तांत्रिक व व्यवस्थापकीय ज्ञान यांची विकासातील भूमिका विचारात घेऊन अद्ययावत तंत्रज्ञान निर्मितीवर लक्ष केंद्रीत करण्याचे कार्य निती आयोग करते.

**७. विकास कार्यक्रम व्यूहरचना व परिणामकारकता यावर देखरेख ठेवणे :**

देशाच्या विकासासाठी रणनीती आखणे व कार्यात्मक चौकट तयार करणे ही प्रमुख कार्ये निति आयोग करते. तसेच भारताचा भविष्यकाळ उज्ज्वल करण्यासाठी, विविध क्षेत्रांसाठी व विविध कालावधीसाठी कार्यक्रमांची आखणी करणे यावरही लक्ष केंद्रित केले जाते. त्याचबरोबर विविध व्युव्हरचना आखत असताना व कार्यक्रमाची रूपरेषा तयार करत असताना येणाऱ्या संभाव्य अडचणी इ.चा देखील त्यामध्ये विचार केला जातो.

**८. सल्ला देणे व भागीदारी प्रोत्साहन देणे :**

केंद्र व राज्य सरकारांना विकास योजनांच्या बाबतीत योग्य सल्ला देण्याचे तसेच मार्गदर्शन करण्याचे काम निति आयोग करतो. खाजगी उद्योजक व व्यक्तींची सरकारशी भागीदारी करून त्यात वाढ होण्यासाठी निति आयोग प्रोत्साहन देते.

**९. मागास भागाकडे विशेष लक्ष पुरविणे :**

विकास कामांची आखणी करताना राज्यांची शक्तिस्थाने, कच्चे दुवे, कमतरता व तुलनात्मक लाभ या सर्व बाबींचा विचार केला जातो. तरीही काही विभाग व राज्यांचे दुर्लक्ष झाले असल्यास व पुरेशा लाभापासून वंचित राहिले असल्यास अशा विभागाकडे पुरेसे लक्ष देण्याचे कार्य निति आयोगाकडून केले जाते.

**१०.राष्ट्रीय सुरक्षेला नियोजनात प्राधान्य :**

कोणतेही विकासाचे व आर्थिक नियोजनाचे कार्यक्रम आखताना देशाची सुरक्षा प्राधान्याने विचारात घेतली जाते. आर्थिक धोरणांची आखणी करताना राष्ट्रीय सुरक्षिततेचा त्यामध्ये समावेश करणे व सुरक्षाहीतांची जपणूक करण्याची महत्त्वाची भूमिका निति आयोगाला पार पाडावी लागते.

**११.संघर्ष टाळणे :**

देशात क्षेत्रांतर्गत, आंतरराज्य तसेच केंद्र-राज्य यांच्यामध्ये विविध मुद्द्यावर मतभेद वा वाद असतात.

त्यामुळे काही समस्या निर्माण होतात. हा संघर्ष टाळून निर्माण होणाऱ्या गुंतागुंतीच्या समस्यांवर तोडगा काढण्याचे कार्य निति आयोग करतो.

**१२. सुसूत्रता आणणे :**

सरकारच्या विविध पातळीवरील योजनांच्या कृती कार्यक्रमात सुसूत्रता आणण्याचे कार्य निति आयोग करतो. समस्यांची गुंतागुंत निर्माण झाल्यास तसेच पुनरुद्भवी समस्यांचे निराकरण करण्यासाठी व विविध घटकांचे एकत्रीकरण, सुसूत्रीकरण करण्याचे कार्य निति आयोगामार्फत केले जाते.

**१३. जागतिक प्रक्रियेत समरस होणे :**

देशाच्या विकास प्रक्रियेत जगातील इतर राष्ट्रांशी तसेच देशांतर्गत विविध संस्थांशी तसेच आंतरराष्ट्रीय संघटना यांच्यामध्ये सुसंवाद प्रस्थापित करण्यात निती आयोगाची भूमिका महत्त्वाची असते.

**३.२.४.५ निति आयोगाची कामगिरी :**

निति आयोगाच्या स्थापनेनंतर दि. ८.२.२०१५ रोजी निति आयोगाची पहिली बैठक दिल्ली येथे संपन्न झाली. या बैठकीत आयोगाचे व्यवस्थापन, राष्ट्रीय विकासासाठी प्राथमिकता, धोरणात्मक नियोजन, क्षेत्रीय रणनीती, सहकारात्मक संघराज्यवाद, पायाभूत सेवा इ. मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. सन २०१७-१८ ते २०१९-२० या कालावधीत निति आयोगाने केलेल्या कार्यांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**१. दरडोई उत्पन्न :** सन २००४-०५ किंमतीनुसार सन २०१३-१४ ते २०१९-२० या कालावधीत मध्ये भारतीयांच्या दरडोई उत्पन्नात ३९९०४ रु. वरून १३४४३२ रु. इतकी वाढ झाली आहे. म्हणजेच भारतीयांचे उत्पन्न तिपटीपेक्षा जास्त झाले आहे.

**२. औद्योगिक विकास :** भारतातील औद्योगिक विकासाचा दर सन २०१४-१५ मध्ये ७.५ %, तो २०१९-२० या आर्थिक वर्षात कमी होऊन ३.८ टक्क्यांवर स्थिरावला आहे. मात्र हा दर कमी होण्यास इतरही जागतिक आणि देशांतर्गत परिस्थिती कारणीभूत आहे.

**३. सेवा क्षेत्र :** सन २०१४-१५ मध्ये देशाच्या सेवा क्षेत्राचा वृद्धीदर ९.७ % होता. त्यामध्ये घट होऊन सन २०१९-२० मध्ये ६.९ % इतका झाला आहे.

**३.३ सारांश :**

जगात सर्वप्रथम रशिया या देशाने नियोजनाचा अवलंब करून निर्धारित काळात देशाच्या विकासाचे उद्दिष्ट बहुतांशी प्रमाणात साध्य केले. या नेत्रदीपक कामगिरीने भारतासह जगातील अनेक देशांनी नियोजनाचा अवलंब केला. भारताने नियोजनासाठी पंचवार्षिक योजनांचे प्रतिमान स्विकारले. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांना स्वातंत्र्योत्तर काळातील नियोजनाचे जनक म्हटले जाते. भारतात आजपर्यंत १२ पंचवार्षिक योजना व सहा वार्षिक योजनांचा अवलंब करण्यात आला आहे. त्याद्वारे शेती, उद्योग, बँकिंग, रस्ते, रेल्वे,

व्यापार, शिक्षण तसेच सेवा क्षेत्राचा विकास वेगाने घडून आला आहे. तथापि दारिद्र्य, बेकारी, सामाजिक व आर्थिक विषमता, विभागीय असमतोल इ. समस्या पूर्णपणे सोडविता आल्या नाहीत हे भारतीय नियोजनाचे अपयश मानावे लागेल. देशासमोर असलेल्या अनेक गंभीर समस्या सोडविण्याच्या दृष्टीने सरकारने नियोजनाच्या बाबतीत काही संस्थात्मक सुधारणा केल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणजे पूर्वीच्या नियोजन मंडळाच्या जागी निति आयोगाची निर्मिती केली आहे.

**३.४ पारिभाषिक शब्द :**

**१) पंचवार्षिक योजना :** पाच वर्षे कालावधीसाठी विशिष्ट उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवून आखण्यात आलेली योजना म्हणजे पंचवार्षिक योजना होय.

**२) वार्षिक योजना :** काही कारणांमुळे पंचवार्षिक योजनेची अंमलबजावणी न करता एक वर्ष कालावधीसाठी योजना आखली जाते त्यास वार्षिक योजना असे म्हणतात.

**३) दारिद्र्य :** व्यक्तिला तिच्या मुलभूत गरजाही पूर्ण न करता येणारी परिस्थिती म्हणजे दारिद्र्य होय.

**४) सापेक्ष दारिद्र्य :** उच्च उत्पन्न गटातील लोकांपेक्षा कमी उत्पन्न असणे म्हणजे सापेक्ष दारिद्र्य होय.

**५) निरपेक्ष दारिद्र्य :** व्यक्तिला तिच्या मुलभूत गरजा पूर्ण करण्याइतके उत्पन्न न मिळणे म्हणजे निरपेक्ष दारिद्र्य होय.

**६) राष्ट्रीय विकास परिषद :** देशातील नियोजन प्रक्रियेतील सर्वोच्य संस्था.

**७) नियोजन मंडळ :** राष्ट्रीय विकास परिषदेच्या मार्गदर्शनाखाली विकास योजना आखणारी महत्वाची संस्था.

**८) निती आयोग :** देशाच्या विकासाच्या दृष्टीने सरकारला योजना आखण्यासाठी योग्य सल्ला देणारी व मार्गदर्शन करणारा पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखालील एक विचारागट (थिंक टँक)

**३.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न**

१. जगात .............. या देशाने सर्वप्रथम नियोजनाचा अवलंब केला.

अ. जपान ब. भारत क. रशिया ड. अमेरिका

२. भारतात .............. मध्ये नियोजनाला सुरुवात झाली.

अ. १९५० ब. १९४९ क. १९५१ ड. यापैकी नाही

३. भारतीय नियोजन मंडळाचे पहिले अध्यक्ष ............ हे होते.

अ. गुलझारीलाल नंदा ब. पं. जवाहरलाल नेहरू क. लाल बहादूर शास्त्री ड.इंदिरा गांधी

४. भारतीय नियोजन मंडळाची स्थापना ............ मध्ये झाली.

अ. १९५० ब. १९५१ क. १९४८ ड. १९४९

५. ......... रोजी नियोजन मंडळ बरखास्त केले.

अ.३१ डिसेंबर २०१४ ब. १ जानेवारी २०१५ क.१३ सप्टेंबर २०१४ ड. यापैकी नाही

६. पहिल्या पंचवार्षिक योजनेचा कालखंड .......... हा आहे.

अ. १५५१-५६ ब. १९५६-६१ क. १९६९-७४ ड. १९७४-७९

७. निति आयोगाची स्थापना ....... रोजी झाली.

अ.३१ डिसेंबर २०१८ ब. १ जानेवारी २०१५ क.१३ सप्टेंबर २०१४ ड. यापैकी नाही

८. देशाचे ............ हे निति आयोगाचे पदसिद्ध अध्यक्ष असतात.

अ. पंतप्रधान ब. अर्थमंत्री क. राष्ट्रपती ड.लोकसभा सभापती

९. ......... हे/ही निति आयोगाचे/ची कार्य/ये आहे/त.

अ. मागास भागाकडे विशेष लक्ष पुरविणे ब. सहकारी संघवाद
क. अत्याधुनिक संसाधन केंद्राची निर्मिती ड. यापैकी सर्व

१०. ........ हे निति आयोगाचे पदसिद्ध सदस्य असतात.

अ. सर्व केंद्रीय मंत्री ब. सर्व राज्यमंत्री क. पंतप्रधानांनी नियुक्त केलेले केंद्रीय मंत्री ड. यापैकी नाही.

## ३.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. रशिया २. १९५१ ३. पं. जवाहरलाल नेहरू ४. १९५०
५. ३१ डिसेंबर २०१४ ६. १९५१ ते ५६ ७. १ जानेवारी २०१५ ८. पंतप्रधान
९. वरील सर्व १०. पंतप्रधानांनी नियुक्त केलेले केंद्रीय मंत्री

## ३.७ सरावासाठी स्वाध्याय

१. भारतातील नियोजनाची प्रक्रिया सविस्तर स्पष्ट करा.

२. नियोजन मंडळाची कार्ये स्पष्ट करा.

३. निति आयोगाची भूमिका विविध मुद्यांच्या आधारे स्पष्ट करा.

४. निति आयोगाच्या स्थापनेची गरज स्पष्ट करा.

५. निति आयोगाची कार्ये स्पष्ट करा.

### ३.८ संदर्भ ग्रंथाची यादी :


- ✼ Datt and Sundaram , Indian Economy (2016), S. Chand Publication, New Delhi.
- ✼ Puri, V.K. Economics of Development and Planning (Theory and Practice) (2016),
- ✼ Mishra K.S., Himalaya Publishing House, Mumbai.
- ✼ डॉ. जे. एफ. पाटील प्राचार्य जे. पी. ताम्हणकर, आर्थिक विकास व नियोजन
- ✼ Webliography : http://www.niti.gov.in/ https://ndconline.org/


✼✼✼

# घटक ४

# भारतातील नियोजन २

# ( Planning in India - II )

**अनुक्रमणिका**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१. भारतीय नियोजनातील योजना प्रतिमाने

४.२.२. नियोजन कालावधीतील शेती विकास

४.२.३. नियोजन कालावधीतील औद्योगिक विकास

४.२.४. नियोजन कालावधीतील सेवा क्षेत्राचा विकास

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द

४.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

४.६ अधिक वाचनासाठी संदर्भ सूची


## ४.० उद्दिष्टे :

प्रस्तुत घटकाच्या अभ्यासानंतर आपणास पुढील बाबींचे आकलन होईल.

१. भारतातील पंचवार्षिक योजनांसाठी वापरलेली योजना प्रतिमाने लक्षात येतील.

२. नियोजन कालावधीतील शेती विकासाची कल्पना येईल.

३. नियोजन कालावधीतील औद्योगिक विकास समजून घेता येईल.

४. नियोजन कालावधीतील सेवा क्षेत्राचा विकास लक्षात येईल.

## ४.१. प्रास्ताविक :

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि खऱ्या अर्थाने भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाला दिशा मिळाली. दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील बहुतांशी देशांनी आर्थिक विकासासाठी नियोजनाचा स्वीकार केला. महायुद्धामुळे झालेली हानी भरून काढण्यासाठी जगातील अनेक देश गुंतलेले होते. जवळपास १५० वर्षे भारतात ब्रिटिशांची वसाहत असल्यामुळे भारतासही या युद्धाची झळ पोचली होती. त्यामुळे युद्धोत्तर हानीपासून सावरणे हे एक प्रमुख उद्दीष्ट शासनकर्त्यांसमोर होते. जगात सर्वप्रथम रशियाने १९२८ मध्ये नियोजनाचा अवलंब केला. स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारतात वाढती लोकसंख्या, अपुऱ्या शेतीची अल्प उत्पादकता, बेरोजगारीचे वाढतेप्रमाण, अशिक्षित जनता, दारिद्र्य, सावकारांचे वर्चस्व, अपुऱ्या पायाभूत सुविधा इ. मुळे विकासात अनेक अडथळे होते. यास्तव देशाची अर्थव्यवस्था विकासाच्या प्रवाहात आणणे व जलद आर्थिक विकास साध्य करण्यासाठी नियोजनाची गरज होती. पारतंत्र्यात असलेली शेती, हस्तकला उद्योग, कर्जबाजारीपणा, जमीनदारी पद्धत यामुळे शेतीतून अपुरे अन्नधान्य उत्पादित होत असे. याच पार्श्वभूमीवर देशाच्या सर्वांगीण विकासासाठी नियोजनबद्ध व्यूहरचनेची गरज विचारात घेऊन पंचवार्षिक योजनांस सुरवात झाली.

## ४.२ विषय विवेचन :

प्रस्तुत प्रकरणात आपण आर्थिक वृद्धी, देशातील जनतेचे जीवनमान सुधारणे, आर्थिक स्थिरता, स्वावलंबी अर्थव्यवस्था या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी विविध अर्थतज्ञ, अभ्यासक यांनी प्रतिमानांच्या स्वरुपात पंचवार्षिक योजनांची मांडलेली व्यूहरचना, नियोजन काळातील शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्र या तिन्ही क्षेत्रांचा विकास यांचा आढावा घेणार आहोत.

भारतात सन १९५१ पासून पंचवार्षिक योजनेस सुरवात झाली. हॅरॉड-डोमर, प्रा. महालनोबिस, प्रा. मान-रुद्र, ब्रम्हानंद-वकील, राव मनमोहन या जागतिक किर्तीच्या अर्थतज्ञांनी अभ्यासपूर्वक मांडलेल्या प्रतिमानांच्या आधारावर पंचवार्षिक योजनांचे आराखडे तयार करण्यात आले. या प्रतिमानांचा आधार घेऊन पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून देशातील विविध क्षेत्रे - कृषी, उद्योग, पर्यटन, सेवा, आरोग्य, वाहतूक व दळणवळण, ग्रामीण विकास, रोजगार वृद्धी, माहिती-तंत्रज्ञान, पायाभूत संरचना इ. चा विकास होण्यास मदत झाली आहे. भारतात १९५१ पासून २०१७ या कलावधीत एकूण १२ पंचवार्षिक योजना पूर्ण झाल्या असून सध्या १३ वी पंचवार्षिक योजना (२०१७ ते २०२२) सुरू आहे. प्रत्येक पंचवार्षिक योजनेचा कालावधी समान असला तरी उद्दिष्टे व फलनिष्पत्ती भिन्न असल्याचे दिसून येते.

### ४.२.१. भारतीय नियोजनातील योजना प्रतिमाने :

**(Plan Models in Indian Planning)**

भारतासारख्या विकसनशील देशात नियोजनाची अनेक उद्दिष्टे असतात. यामध्ये प्रामुख्याने देशाचा जलद आर्थिक विकास घडवून आणणे, उत्पन्न व संपत्तीतील विषमता कमी करणे, समतोल प्रादेशिक विकास, अन्नधान्य स्वयंपूर्णता, दारिद्र्यात घट करणे इ. उद्दिष्टे साध्य करण्यासाठी योजनाकार कोणते डावपेच आखतात यावर

नियोजनाचे यश अवलंबून असते. आर्थिक विकास घडवून आणणे व विकासाची गती वाढवणे यासाठी उचित प्रतिमानाची गरज असते. यास्तव भारतातील पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून ११ व्या पंचवार्षिक योजनेपर्यंतच्या काळात योजनांची विविध उद्दिष्टे साध्य करण्यासाठी योजनाकारांनी कोणकोणती प्रतिमाने अवलंबली, कोणकोणते डावपेच आखले हे पाहणे गरजेचे ठरते.

### १) हॅरॉड-डोमर प्रतिमान :

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली मार्च १९५० ला नियोजन आयोगाची स्थापना करण्यात आली आणि इथूनच भारताच्या नियोजनबद्ध विकास पर्वाचा आरंभ झाला. भारतातील पहिल्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी १९५१ ते १९५६ असा होता. पहिली पंचवार्षिक योजना हॅरॉड-डोमर या सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञांनी मांडलेल्या प्रतिमानावर आधारलेली होती. या प्रतिमानात शेती विकासावर अधिक भर देण्यात आला होता. भारताच्या फाळणीमुळे निर्माण झालेली बिकट परिस्थिती आणि अन्नधान्याची टंचाई निर्माण झाल्यामुळे पहिल्या योजनेत शेतीला प्राधान्य देण्यात आले. सन १९४३ साली रोडान यांनी मोठा धक्का सिद्धांत मांडला. यामध्ये रोडान यांनी आर्थिक विकासासाठी छोटे-छोटे किंवा विखुरलेले प्रयत्न उपयोगाचे ठरत नाहीत. एका किमान मोठ्या प्रमाणात भांडवल गुंतवणूक केल्यास अर्थव्यवस्थेला प्रबल चालना मिळते. या सिद्धांताचा आधार घेऊन शेती विकासावर लक्षं केंद्रित करण्यात आले. हॅरॉड-डोमर यांच्या मते- शेती क्षेत्रात मोठया प्रमाणात गुंतवणूक केल्यास उत्पादनात वाढ होते परिणामी उत्पन्न पातळीत वाढ होते. वाढीव उत्पन्न पातळीमुळे बचत वाढून गुंतवणूक व भांडवलनिर्मितीला चालना मिळते. यामुळे अर्थव्यवस्थेचा विकास एका स्थिर दराने होतो. या दृष्टीकोणातून पहिल्या पंचवार्षिक योजनेत हॅरॉड-डोमर यांच्या प्रतिमानाचा आधार घेण्यात आला होता. पंचवार्षिक योजनेतील एकूण खर्चापैकी १/३ (३१ % ) इतका खर्च शेती क्षेत्रावर करण्यात आला. औद्योगिक विकास वेगाने साध्य करण्यासाठी अन्नधान्य उत्पादन व कच्च्या मालाच्या उत्पादनात मोठी वाढ घडवून आणणे गरजेचे असल्याने शेती विकासावर अधिक भर देण्यात आला. लहान व मोठे सिंचन प्रकल्प, जलविद्युत प्रकल्प उभारणे, वाहतूक व दळणवळण या घटकांवर अधिक भर देण्यात आला.

### २) महालनोबीस प्रतिमान :

दुसरी पंचवार्षिक योजना कलकत्ता येथील इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूटचे संचालक प्रो. पी. सी. महालनोबीस यांनी मांडलेल्या प्रतिमानावर आधारित होती. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचे महालनोबीस हे शिल्पकार होते. या योजनेत औद्योगिकीकरणाला प्राधान्य देण्यात आले. या प्रतिमानातील व्यूहरचनेनुसार जलद आर्थिक विकास साध्य करण्यासाठी अवजड व मूलभूत उद्योगांच्या वाढीवर भर देण्यात आला. उदा. लोखंड व पोलाद, खत, अभियांत्रिकी, धातू यंत्रसामुग्री, रसायने अशा मोठया उद्योगांची उभारणी करून औद्योगिकीकरणास चालना देण्याचा प्रयत्न करण्यात आला. यामुळे संबंधित अन्य उद्योगधंदे निर्माण होतील या हेतूने हे पाऊल टाकण्यात आले. महालनोबीस यांच्या प्रतिमानानुसार उपभोग्य वस्तू उत्पादन प्रक्रियेमध्ये मोठया प्रमाणावर गुंतवणूक केल्यास अल्पावधीत उत्पादन वेगाने वाढून रोजगार वृद्धीचे उद्दीष्ट साध्य करता येईल. तथापि, या मार्गाने होणारा विकास मंदगतीने असतो. मात्र याउलट पायाभूत सुविधा व भांडवली वस्तूंची निर्मितीमध्ये मोठया प्रमाणात गुंतवणूक

केल्यास दीर्घकाळात मोठी वृद्धी साध्य करता येईल. भांडवली व अवजड उदयोगामध्ये रोजगारसंधी कमी असते म्हणून कमी भांडवलात अधिक रोजगार निर्माण करणाऱ्या लघु व कुटीर उद्योगांना प्रोत्साहन देण्यात आले.

महालनोबीस प्रतिमानामध्ये मूलभूत व अवजड उद्योगांवर अधिक भर देण्यात आला असला तरी शेती, लघु व कुटीर उद्योग, उपभोग्य वस्तू उत्पादन, देशांतर्गत बचतीला महत्व देण्यात आले. आयात पर्यायीकरण धोरण अवलंबण्यात आले. स्वातंत्र्याच्या वेळी भारतीय अर्थव्यवस्था असंतुलित होती. देश औद्योगिकदृष्टया मागासलेला होता, यामुळे अधिकाधिक नवीन उद्योगांची स्थापना करणे आणि पारंपारिक उद्योगांचा विकास करणे ही तत्कालीन गरज होती. भांडवली साधनांसाठी परदेशावर अवलंबून राहणे ही विकासातील मोठा अडथळा असल्याने आयात पर्यायीकरणाचे धोरण अवलंबण्यात आले. भारतात औद्योगिकदृष्टया आवश्यक वस्तूंची मोठया प्रमाणावर आयात केली जात होती. ती या धोरणाने घटण्यास मदत झाली. शिवाय या भांडवली वस्तूंच्या आयतीवर मोठया प्रमाणात करांची आकारणी केल्यामुळे आयात घटण्यास मदत झाली. अशा वस्तूंचे उत्पादन देशात सुरू झाले. यामध्ये यांत्रिक अवजारे, ट्रॅक्टर्स, औषधे, रेल्वे इंजिन, विद्युत उपकरणे इ. चे उत्पादन देशात सुरू झाले.

थोडक्यात, महालनोबीस यांच्या प्रतिमानाचा अवलंब केल्याने सार्वजनिक क्षेत्रातून वाहतूक सामग्री, विमाने, पेट्रोलियम पदार्थ, खते अशा महत्वाच्या वस्तूंचे उत्पादन झाल्याने याचा फायदा संपूर्ण अर्थव्यवस्थेला विशेषत: मोठया उद्योगांना झाला आहे. देशातच यंत्रसमुग्री उपलब्ध झाल्याने स्वयंपूर्ण औद्योगिक विकास साधता आला आणि पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्याने औद्योगिक उत्पादनात वाढ करता आली. या प्रतिमानाने औद्योगिक क्षेत्राचा आणि अर्थव्यवस्थेचा विकास होण्यास मोलाचे सहकार्य दिले आहे.

### ३) ॲलन मान व अशोक रुद्र प्रतिमान :

भारताची चौथी पंचवार्षिक योजना (१९६९-७४) ॲलन मान व अशोक रुद्र यांच्या प्रतिमानावर आधारलेली होती. चौथ्या पंचवार्षिक योजनेचे डॉ. गाडगीळ हे उपाध्यक्ष होते. डॉ. गाडगीळानी याच प्रतिमानावर आधारित चौथ्या पंचवार्षिक योजनेचा मसुदा तयार केला. ॲलन व रुद्र प्रतिमान देशाच्या सर्वांगिण विकासास दिशा देणारे ठरल्याने या योजनेपासून सहाव्या योजनेत देखील हेच प्रतिमान वापरण्यात आले. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत भांडवली वस्तूंचे उत्पादन करणे, उपभोग्य वस्तूंचे उत्पादन, पायाभूत सेवा सुविधांची निर्मिती यापैकी कोणत्या घटकास प्राधान्यक्रम द्यावा यासंबंधीचा निर्णय प्रा. महालनोबीस यांच्या प्रतिमानाच्या आधारे घेण्यात आला तसेच भांडवली वस्तूंचे उत्पादन वाढवण्यासाठी दीर्घकालीन मोठया गुंतवणुकीचे उद्दीष्ट निश्चित करण्यात आले. परंतु नियोजनात खंड पडल्याने मोठया भांडवल गुंतवणुकीवर मर्यादा आल्या. याच पार्श्वभूमीवर ॲलन मान व अशोक रुद्र यांनी सुयोग्य पर्याय सुचविणाऱ्या प्रतिमानाची मांडणी केली.

या प्रतिमानानुसार मागासलेल्या प्रदेशांचा विकास करण्यासाठी त्या परदेशात निघणाऱ्या उद्योगांना कर सवलत, सोयी सवलतीची तरतूद, कर्जाची सोय, सार्वजनिक उद्योगांची स्थापना इ. गोष्टी उपलब्ध करून देण्यात आल्या. मान व रुद्र यांच्या प्रतिमानानुसार अर्थव्यवस्थेमध्ये विकासास अनुकूल व प्रतिकूल परिस्थिती असताना कोणती व्यूहरचना आखावी याची सविस्तर मांडणी करणेत आली आहे. मान व रुद्र यांच्या मते, जेंव्हा देशात

राजकोषिय उत्पन्न, परकीय व्यापारतोल, आयात-निर्यात, रोजगार निर्मिती दर इ. बाबी अनुकूल असतील तर तेंव्हा भांडवली वस्तूंच्या उत्पादनावर भर देणे आवश्यक असते. याउलट या बाबी प्रतिकूल असतात तेंव्हा उपभोग्य वस्तू व सेवांचे उत्पादन घेण्यावर भर देणे देशाच्या विकासाला पोषक असते. यालाच मान व रुद्र यांचे 'खुले सातत्य प्रतिमान' असे संबोधले जाते. या प्रतिमानाच्या आधारे चौथ्या पंचवार्षिक योजनेमध्ये समतोल प्रादेशिक विकास संकल्पनेचे महत्व वाढले.

**४) ब्रह्मानंद - वकील प्रतिमान :**

सातवी पंचवार्षिक योजना पी. आर. ब्रह्मानंद व सी. आर. वकील यांच्या प्रतिमानावर आधारित होती. सहाव्या पंचवार्षिक योजनेपर्यंत भांडवली वस्तू व पायाभूत सुविधा यावर मोठया प्रमाणात गुंतवणूक केली जात होती. मात्र रुद्र व मान यांच्या प्रतिमानाद्वारे ही वाढीव गुंतवणूक उपभोग्य वस्तू व सेवांवर करण्यासही सुरवात झाली. पुढे ब्रह्मानंद व वकील यांच्या प्रतिमानानुसार भांडवल गुंतवणूक उपभोग्य वस्तू व सेवांच्या निर्यातीकडे मोठया प्रमाणावर करणेत आली. खाजगी क्षेत्राला प्रोत्साहन देऊन अधिकाधिक खाजगी भांडवलदार उपभोग्य वस्तूची निर्मिती करतील यावर लक्ष्य केंद्रित करणेत आले.

ब्रह्मानंद व वकील यांनी १९५६ मध्ये लिहीलेल्या "Planning for an Expanding Economy' या ग्रंथामध्ये देशातील दारिद्र्य आणि बेरोजगारी संबंधीत विवेचन केले आहे. ब्रह्मानंद व वकील यांचे प्रतिमान प्रामुख्याने रोजगार वृद्धी, दारिद्र्य निर्मूलन, उत्पन्न विषमता कमी करणे इ. वर अधिक भर देते. वास्तव मजूरी ठरवणाऱ्या वस्तूंचे उत्पादन वाढवण्यावर भर देते. शिवाय समाजातील मागास व गरीब जनतेच्या विकासावर भर दिला आहे. प्रा. ब्रह्मानंद व प्रा. वकील यांचे प्रतिमान भारतीय नियोजनातील दुसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी वापरण्यात आलेल्या प्रा. महालनोबिस यांच्या प्रतिमानास पर्यायी प्रतिमान म्हणून मांडण्यात आले होते. प्रा. वकीलांचे प्रतिमान मार्क्सच्या बदलते भांडवल (V) संकल्पनेशी संबंधीत होते. हे प्रतिमान सनातनवादी आर्थिक तत्वज्ञानावर विशेषत: रिकार्डो, मार्क्स, रोडान आणि नर्क्स इ. च्या विचारसरणीवर आधारित होते.

विकसनसील देशांतील ग्रामीण भागात कामगारांची प्रचंड उपलब्धता असते. या गृहितावर हे प्रतिमान अवलंबून आहे. ग्रामीण भागातील कामगार/श्रमिक शेती उत्पादनात घट न करता हस्तांतरित करणे शक्य असून त्यांचा उपयोग भांडवली वस्तूंचे उत्पादन करण्यास केला जाऊ शकतो. या दृष्टीकोनावर हे प्रतिमान अवलंबून आहे. थोडक्यात भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी केवळ मोठ्या प्रमाणावरील छुपी बेकारी, मूलभूत व अवजड भांडवली वस्तू उत्पादन करणे हेच महत्वाचे नसून उपभोग्य वस्तू उत्पादनासाठी प्राधान्य देणे गरजेचे असल्याने या प्रतिमानाने नमूद केले. मजूर हा उत्पादनाच्या इतर कोणत्याही उत्पादन घटकशिवाय भांडवली वस्तूंचे उत्पादन करू शकतो या गृहिताचा आधार हे प्रतिमान घेते.

प्रा. ब्रह्मानंद व प्रा. वकील यांनी देशातील छुपी बेरोजगारी संभाव्य बचत म्हणून ओळखली जावी असे सुचवले आहे. शेती क्षेत्रातील बेरोजगारांना भांडवली वस्तू क्षेत्राकडे हस्तांतरित करण्याचे दर वेतन-वस्तूंचा पुरवठा दरावर अवलंबून असतो. मजुरी - वस्तूंचे दर यामधील तफावत दूर होत नाही तोपर्यंत कृषी क्षेत्रातील मजूर बिगर कृषी क्षेत्राकडे वळवणे शक्य नसल्याचे हे प्रतिमान सांगते. सातव्या पंचवार्षिक योजनेच्या व्यूहरचनेत अवजड

उद्योगांच्या विकासाऐवजी श्रमिक उपभोग घेत असलेल्या वस्तू व सेवांच्या उत्पादनाला महत्व देण्यात आले. थोडक्यात उपभोग्य वस्तूंची मागणी वाढण्यासाठी लोकांची खरेदीशक्ती वाढली पाहिजे यासाठी रोजगार संधीत वाढ करणे यावर भर देण्यात आला. यामुळे हे प्रतिमान 'मजुरी-वस्तू प्रतिमान' या नावानेही ओळखले जाते.

**५) राव-मनमोहन प्रतिमान :**

सन १९९० मध्ये भारताची सातवी पंचवार्षिक योजना पूर्ण झाली. आठवी पंचवार्षिक योजना सन १९९० मध्ये सुरु होणे अपेक्षित असताना अर्थव्यवस्थेतील मोठ्या चढउतारामुळे सन १९९० ते १९९२ या कालखंडात कोणतीही योजना कार्यान्वीत झाली नाही. यामुळे सन १९९२ हा कालखंड नियोजनातील सुट्टीचा कालखंड म्हणून ओळखला जातो . या खंडात भारतीय अर्थव्यवस्थेला अनेकविध मोठया पेचप्रसंगाला सामोरे जावे लागले. वाढती महागाई, खनिजतेलाचे वाढते दर, परकीय कर्जाचा वाढता भार, वाढती राजकोषीय तूट, व्यवहार तोलामध्ये तूट, व्याज देयतेमध्ये वाढ, विदेशी चलन तुटवडा अशा अनेक समस्यांमध्ये भारतीय अर्थव्यवस्था सापडली होती. या समस्यांमधून अर्थव्यवस्थेला बाहेर काढण्यासाठी आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांचे सहकार्य घेण्याशिवाय गत्यंतर नव्हते.

आंतरराष्ट्रीय वित्तीय सस्थांनी भारताला सहकार्य करण्याची तयारी दर्शविली परंतू यासाठी त्यांनी काही अटी समोर ठेवल्या. या अटींची पूर्तता करणे भारताला अपरीहार्य होते आणि या अटींची पूर्तता करण्यासाठी भारताला नवीन आर्थिक सुधारणा (New Economic Reforms) स्वीकारणे भाग पडले. तत्कालीन देशाचे अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग व देशाचे पंतप्रधान श्री. पी. व्ही. नरसिंहराव यांनी देशाच्या सर्वांगीण विकासासाठी आठव्या पंचवार्षिक योजनेत विकासाची व्यूहरचना तयार केली. या व्यूहरचनेसच राव-मनमोहन प्रतिमान म्हणून ओळखले जाते. हे प्रतिमान L.P.G. या नावानेही ओळखले जाते.

१९९१ ला भारताने नवीन आर्थिक सुधरणांचा स्वीकार केला. तेव्हापासून भारतात खाजगीकरण (Privatization), उदारीकरण (Liberization) व जागतिकीकरण (Globalization) यास खऱ्या अर्थाने सुरवात झाली. आठव्या पंचवार्षिक योजनेपासून अकराव्या पंचवार्षिक योजनेपर्यंत राव-मनमोहन प्रतिमानाचा अवलंब पंचवार्षिक योजनांच्या व्यूहरचनेत करण्यात आला. राव-मनमोहन प्रतिमानामध्ये प्रामुख्याने खाजगी क्षेत्राला चालना, सार्वजनिक क्षेत्राला कमी महत्व, पायाभूत सुविधांचा विकास, मुक्त व्यापार आणि उदार धोरण या घटकांवर अधिक भर देऊन विकासात्मक विविध उपक्रम राबवण्यात आले.

थोडक्यात राव-मनमोहन प्रतिमान भारतीय नियोजनात एक प्रभावी व नावीन्यपूर्ण प्रतिमान म्हणून ओळखले जाते. सन १९९१ ला नवीन आर्थिक सुधारणा स्वीकारल्यानंतर पुढील दशकापर्यंत या प्रतिमानाचा प्रभाव अर्थव्यवस्थेच्या प्रगतीवर दिसून येतो. जलद आर्थिक विकास साध्य करण्यासाठी व देशाला महासत्तेकडे वाटचाल करण्यासाठी राव-मनमोहन यांचे प्रतिमान निश्चितच उपयुक्त ठरले आहे.

**६. नव गांधीवादी प्रतिमान किंवा PURA- प्रतिमान :**

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी २००४ मध्ये व्हीजन २०२० ही कल्पना

मांडली. या संकल्पनेमध्ये पुरा (PURA) Provision of Urban Amenities in Rural Areas प्रतिमानाचा आराखडा मांडण्यात आला. ग्रामीण भागात शहरी सुविधा पुरवणे उद्देशाने या प्रतिमानाची मांडणी करणेत आली. या विकासाचे लाभ पुरेशा प्रमाणात न मिळालेला ग्रामीण भाग हा या प्रतिमानाचा केंद्रबिंदू मानन्यात आला. ग्रामीण भागात नागरी सुविधा उपलब्ध करून देणे (Provision Urban Amenities in Rural Areas) अर्थात PURA असे या प्रतिमानाचे प्रमुख उद्दीष्ट होते. ग्रामीण भागाचा संतुलित विकास साध्य करण्यासाठी पुरा प्रतिमान सुचविण्यात आले आहे. ग्रामीण भागातील तरुण, सुशिक्षित मनुष्यबळाचा वापर करून रोजगार निर्मिती व ग्रामीण भागाचा कायापालट करू शकणारी एक वैशिष्टयपूर्ण योजना म्हणून (PURA) या प्रतिमानावाडे पाहिले जाते.

डॉ कलाम यांच्या विश्लेषणानुसार भारतात जवळपास २० कोटी लोक दारिद्रेरेषेखाली आहेत. त्यापैकी ७५ टक्के लोक ग्रामीण भागात राहतात. कलाम यांच्या मते, देशांत उत्पन्न वाढीचा वेग वाढत आहे. हा दर बराच काळ टिकून राहिल्यास आपण विकसित देशांच्या गटात जाऊ शकतो. हे करण्यासाठी पाच कलमी कृती आराखडा राबविणे आवश्यक आहे.

१) इ.स. २०२० पर्यंत शेतीमध्ये अन्नधान्य व इतर शेतमालाचे उत्पादन ३६ कोटी टनापर्यंत वाढविणे. यासोबतच शेतमालावर प्रक्रिया उदयोगांची वाढ केल्यास विकासाचा वेग वाढेल.

२) ग्रामीण व शहरी असा फरक न करता संपूर्ण देशात वीजेचा शाश्वत पुरवठा उपलब्ध व्हावा.

३) शिक्षण आणि आरोग्य व्यवस्था संपूर्ण देशात सहज उपलब्ध व्हावी.

४) ग्रामीण भागात माहिती व दळणवळणाचा विस्तार घडून यावा.

५) देशाच्या भवितव्यासाठी अंतराळ, आण्विक व संरक्षण यामध्ये आधुनिकता असली पाहिजे.

वरील आराखड्याच्या आधारे नद्या जोडणी प्रकल्प, वीजेचा अखंड पुरवठा, ग्रामीण भागात आवश्यक त्या सर्व सुविधा, दुसरी हरितक्रांती (सदाहरित क्रांती), पर्यटन, माहिती व दळणवळण तंत्रज्ञानाची वाढ यांसारखे विविध कृती कार्यक्रम डॉ. अब्दुल कलाम यांना अपेक्षित होते. पुराचे ध्येय सर्वांना दर्जेदार उत्पन्न आणि उपजीविकेच्या संधी उपलब्ध करून देणे हे होते. या प्रतिमानाची कार्यवाही करण्यासाठी चार प्रकारच्या संलग्नता अपेक्षित आहेत.

**१) प्रादेशिक संलग्नता (Regional Connectivity) :**

यामध्ये आसपासची १५ ते २० खेडी रस्त्यांनी जोडली जावीत तसेच त्यांना उपयोगी पडेल असा एक बाह्य रस्ता असावा. या जोडणीमुळे ही खेडी एकमेकांच्या संपर्कात येतील. ग्रामीण विकासाला गती देण्यासाठी चांगल्या पायाभूत सुविधांची गरज असते.

**२) इलेक्ट्रॉनिक संलग्नता : (Electronic Connectivity) :**

यामध्ये प्रामुख्याने दूरध्वनी, इंटरनेट यांसारख्या सेवांचा समावेश असतो. सर्व खेड्यांना अशा सेवांनी जोडणे अपेक्षित आहे.

**३) ज्ञान संलग्नता (Knowledge Connectivity) :**

खेड्यांना जोडणाऱ्या मुख्य रस्त्यांवर प्रत्येकी ५ ते ७ कि. मी. अंतरावर प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, रुग्णालये स्थापन केली जावीत.

**४) आर्थिक संलग्नता (Economic Connectivity) :**

खेड्यांच्या प्रत्येक गटामध्ये चांगली बाजारपेठ, विकसित केली जावी जेणेकरून त्याठिकाणी लोकांना आपले उत्पादन विकणे शक्य होईल तसेच त्यांना गरजेच्या वस्तू विकत घेणे सोपे होईल.

वरील विवेचनामध्ये खेड्यांचा एक गट म्हणजे एक 'पुरा' (PURA) होय असे विचारात घेतले आहे. खेड्यांचा संतुलित विकास हे या प्रतिमानाचे प्रमुख ध्येय असून अधिकाधिक सुविधा खेड्यामध्ये पोहचवणे यास प्राधान्यक्रम देण्यात आला आहे. खेड्यांचे वर्गीकरण प्रामुख्याने पुढील प्रकारांत करणेत आले.

**१) 'अ' वर्गीय समूह :**

ज्या खेड्यांच्या गटाला शहरी क्षेत्र अगदी जवळ आहे याचाच अर्थ शहरी भागापासून खेड्यांचा जो गट अतिशय नजीकच्या अंतरावर आहे व त्याठिकाणी रस्ते, शाळा, आरोग्य केंद्र इ. सुविधा असतील त्यांचा समावेश 'अ' वर्गात केला जावा.

**२) 'ब' वर्गीय समूह :**

शहरी भागापासून जवळच्या अंतरावर असून देखील तेथे बऱ्याचशा सुविधांचा अभाव असेल तर अशा खेड्यांचा समावेश 'ब' वर्गात करावा.

**३) 'क' वर्गीय समूह :**

शहरापासून खूप दूरच्या अंतरावर किंवा दुर्गम भागात असणारी खेडी जेथे रस्ते तसेच प्राथमिक सुविधांचा अभाव आहे अशा खेड्यांचा समावेश 'क' वर्गात केला जावा.

याप्रमाणे खेड्यांचे समूह तयार करून तेथे गुंतवणूक केली तर काही काळानंतर खेड्यांचा विकास होईल. शिवाय ग्रामीण भागातील उत्पादित मालाला त्याच ठिकाणी बाजारपेठ मिळेल आणि ग्रामीण भागात औद्योगिकरण आणि रोजगार निर्मिती यांचे चक्र सुरू होईल. सन २०२० पर्यंत 'पुरा' प्रतिमानाची काटेकोर अंमलबजावणी केल्यास भारताचा खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक विकास घडून येईल, असे भाकीत करणेत आले होते.

थोडक्यात, 'पुरा' या प्रतिमानाचे परीक्षण केल्यास त्यामध्ये गांधीवादी दृष्टीकोन आढळून येतो. आर्थिक विकासाबाबत गांधी यांचे विचार अहिंसा व आत्मनिर्भरतेच्या तत्वांवर आधारित आहेत. गांधीजींनी 'खेड्याकडे चला' असे आवाहन केले होते. गांधींसाठी स्वयंपूर्ण गावांचे मॉडेल हा स्वतंत्र लोकशाहीचा आधार होता. खेड्यांच्या विकासाशिवाय देशाचा विकास अशक्य आहे ही गांधीजींची आर्थिक विकासाची विचारसरणी होती. त्यामुळे महात्मा गांधीच्या खेडे विकासाच्या दृष्टीकोनाचे प्रतिबिंब 'पुरा' या प्रतिमानात दिसून येते. यास्तवच पुरा

हे प्रतिमान नव-गांधीवादी प्रतिमान ठरते. ग्रामीण भागात रोजगारांच्या संधी उपलब्ध झाल्या तर शहराकडे होणारे स्थलांतर रोखण्यास मदत होईल असे हे सूचीत करते.

### ४.२.२. नियोजन काळातील कृषी विकास (Agriculture Development under Plans) :

भारतात पंचवार्षिक योजना सुरू होण्यापूर्वी (१९५० च्या अगोदरचा कालखंड) शेती व्यवसाय अत्यंत मागासलेल्या अवस्थेत होता. शेती प्रामुख्याने पारंपरिक पद्धतीनेच केली जात असल्याने शेतीतून मिळणारे उत्पन्न अल्प होते. बहुतांशी शेती पावसाच्या पाण्यावरच अवलंबून होती. शेतकरी अशिक्षित व कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला असल्यामुळे शेतीत गुंतवणूक कमी होती परिणामी शेती उत्पादन अल्प होऊन शेतकरी विकासापासून वंचित होते. भारतातील ७० टक्केपेक्षा अधिक लोक उपजीविकेसाठी शेती व्यवसायावर अवलंबून होते. स्वातंत्र्यापूर्वी भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण नव्हता. सन १९४७ मध्ये भारताची फाळणी होऊन भारत व पाकिस्तान असे दोन देश निर्माण झाले. फाळणीमुळे कापसाचे मोठया प्रमाणात उत्पादन करणारा सिंध प्रांत, गव्हाचे उत्पादन करणारा पश्चिम पंजाब प्रांत आणि कच्च्या तागाचे मोठया प्रमाणावर उत्पादन करणारा पूर्व बंगालचा बराचसा भाग पाकिस्तानकडे गेला. याचा परिणाम भारतात अन्नधान्याची तूट निर्माण झाली. शेतीकडे व्यवसाय म्हणून न पाहता उदरनिर्वाहाचे साधन म्हणून पहिले जात असे. शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण १८८१ मध्ये ६१ टक्के होते. कालांतराने खेड्यातील हस्तोद्योग व कुटीरोद्योग बंद पडल्याने शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण वाढून १९९१ मध्ये ७१ टक्के झाले. शेती क्षेत्राचे अर्थव्यवस्थेतील स्थान विचारात घेऊन नियोजनाच्या माध्यमातून शेती विकास करण्यावर भर देण्यात आला. पंचवार्षिक योजनांच्या कलावधीत शेती क्षेत्राचा झालेला विकास पुढील विविध बाबींवरून स्पष्ट होतो.

**१) कृषी उत्पादनात वाढ :**

नियोजनाच्या माध्यमातून कृषी विकास घडवून आणण्याकरिता कृषी उत्पादन व उत्पादकतेत वाढ घडवून आणणे यावर प्रामुख्याने भर देण्यात आला. हरितक्रांतीमुळे शेतीची उत्पादन क्षमता वाढली. परिणामी सन १९५०-५१ पासून २०२०-२१ पर्यंत अन्नधान्याचे उत्पादन ५१ मिलियन टनावरून ३०८.६५ मिलियन टनापर्यंत वाढेल. तांदूळाचे उत्पादन याच काळात २१ मिलियन टनावरून ११२.९ मिलियन टनापर्यंत वाढले तर गव्हाचे उत्पादन ६ मिलियन टनावरून १७१ मिलियन टन इतके वाढले. १९६४-६५ मध्ये गव्हाची प्रति हेक्टर उत्पादन ९०१ कि.ग्रॅम होती ती २०२०-२१ मध्ये ३४००० कि.ग्रॅम इतकी झाली. खाद्य तेलाचे उत्पादन ५ मिलियन टनावरून ३३.३ मिलियन टन इतके वाढले. ऊसाच्या उत्पादनात ५७ मिलियन टनावरून ३७८.९ टनापर्यंत वाढले.

पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत अन्नधान्याचे उत्पादन अनुक्रमे ६४.८ दशलक्ष टन व ७६ दशलक्ष टन व ७२ दशलक्ष टन इतके झाले. चौथ्या, पाचव्या, सहाव्या आणि सातव्या योजनेत अनुक्रमे १०४.७ दशलक्ष टन, १३१ दशलक्ष टन, १४५.५ दशलक्ष टन व १७१ दशलक्ष टन इतके वाढले. आठव्या पंचवार्षिक योजनेत अन्नधान्याचे उत्पादनाचे लक्ष्य २१० दशलक्ष टन इतके होते सन २०१०-११ मध्ये अन्नधान्याचे उत्पादन २४२ दशलक्ष टन झाले तर २०११-१२ मध्ये २५६ दशलक्ष टन इतके अन्नधान्याचे उत्पादन वाढले. सन २०२०-

२१ मध्ये अन्नधान्य उत्पादन ३०८-६५ दशलक्ष टन होण्याचा अंदाज आहे.

### २) शेती क्षेत्रातील रोजगार निर्मिती :

भारत हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. आजही बहुतांश लोकसंख्या खेड्यात राहते. भारताच्या नियोजन काळामध्ये तर शहरीकरण व औद्योगिकीकरणाचा वेगदेखील काहीसा मंदच होता. परिणामी वाढत्या लोकसंख्येला रोजगार निर्माण करणासाठी ग्रामीण भागातच प्रयत्न करणे गरजेचे होते. त्यासाठी ग्रामीण भागातील प्रमुख व्यवसाय असलेल्या शेती क्षेत्रावरच अधिक भर दिला गेला. रसायनिक खते, सुधारित बियाणे, कीटकनाशकांची फवारणी, नवनवीन यंत्रांचा वापर इ. मुळे विविध कामात रोजगार उपलब्ध झाला. हरितक्रांतीमुळे विविध प्रकारची पिके संपूर्ण वर्षभर घेतली जाऊ लागली. यामुळे आणखी रोजगार वाढला. यासाठी १९५२ मध्ये समुदाय विकास कार्यक्रम, १९५३ मध्ये कार्यान्वीत झालेली राष्ट्रीय विस्तार योजना, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना यांचा समावेश होतो. ग्रामीण भागात शेळी, मेंढीपालन, कुक्कुटपालन, शेती, पशुपालन, मत्स्य व्यवसाय, वनऔषधी, कृषी प्रक्रिया उद्योग, दुग्ध व्यवसाय, कृषीमाल विपणन याद्वारे मोठया प्रमाणावर रोजगार सन २०१९ मध्ये ४२.६% शेतमजूरांचे प्रमाण निर्माण झाला. १९५१ मध्ये ९८ दशलक्ष श्रमिक शेती क्षेत्रात होते ते २००१ मध्ये २३५ दशलक्ष इतके झाले.

### ३) शेतीवरील अतिरिक्त भार कमी :

बहुसंख्य लोकांचे उपजिवीकेचे साधन आजही प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे शेती हेच आहे. मात्र आर्थिक विकासाबरोबरच देशाची लोकसंख्या वाढत गेली याबरोबरच अन्नधान्य, उपभोग्य वस्तू व रोजगार इ. बाबतीत शेतीवरील अवलंबन वाढत गेले. रोजगार व शेतमालाची मागणी ज्या प्रमाणात वाढत गेली त्या प्रमाणात पुरवठा मात्र वाढला नाही. परिणामी शेती क्षेत्रावर अतिरिक्त ताण पडू लागला. परिणामी शेतीक्षेत्रात उत्पादन खर्चात वाढ, भाववाढ, अतिरिक्त मजुरांमुळे मजुरी दरात घट अशा समस्या येऊ लागल्या. सन १९५१ मध्ये देशातील एकूण कर्त्या लोकसंख्येपैकी तब्बल ६९.७% लोकसंख्येला शेती क्षेत्रात रोजगार उपलब्ध होत होता. मात्र एवढी प्रचंड लोकसंख्या वाहून नेणारी शेती पारंपारिक व मागासलेली होती.

पाऊस व हवामानाची अनिश्चितता, किंमतीची अस्थिरता यांसारख्या समस्या शेती क्षेत्राला भेडसावत होत्या. परिणामी शेतीमध्ये अर्ध बेकारी, छुपी बेकारी व हंगामी बेकारी मोठया प्रमाणात निर्माण झाली होती. या विविध समस्यांवर उपाय योजण्याकरिता नियोजन काळात मधुमक्षिका पालन, दुग्ध व्यवसाथ, पशुपालन, कुक्कुटपालन, मासेमारी, खत निर्मिती, वनऔषधी उद्योग, बांबू, कागद इ. उद्योगांच्या उभारणीवर अधिक भर देण्यात आला. ऊस, कॉफी, रबर, तंबाखू, मासे, मसाल्याचे पदार्थ, कापूस, चहा, हळद, ताग, ज्यूट, फुले, फळे व भाजीपाला अशा कृषी प्रक्रिया संबंधित नगदी व व्यापारी पिकांच्या उत्पादनावर भर दिला गेला. या सर्व प्रयत्नांद्वारे शेतीवरील लोकसंख्येचा वाढता भार कमी करण्याचा प्रयत्न नियोजन काळात झाला.

### ४) हरित क्रांतीचा प्रयोग :

भारतात १९६० नंतरच्या काळात शेती क्षेत्रामध्ये महत्वपूर्ण बदल घडून आले. भारतात १९६६ ते ६८

या काळात तीन वार्षिक योजना राबवण्यात आल्या. हरितक्रांतीमुळे शेती उत्पादनात वेगाने वाढ घडून आली. शेती क्षेत्राच्या विकासासाठी सरकारने योजलेले अनेक उपाय हे हरितक्रांतीला जबाबदार ठरले. याच काळात कृषी क्षेत्रात हरितक्रांतीचा प्रयोग घडवून आणला. रासायनिक खते, कीटकनाशके संकरित बियाणे, यंत्रे यांचा वापर वाढला. यामुळे शेतीतून अन्नधान्य व इतर पिकांचे उत्पादन मोठया प्रमाणावर वाढले. HYVP अंतर्गत दर्जेदार बियाणे उपलब्ध करून देण्यात आले. उच्च पैदाशीच्या बियाणांमुळे निरनिराळ्या पिकांचे उत्पादन वाढले. शेतीक्षेत्रातील हा बदल हरितक्रांती म्हणून ओळखला जातो. अधिक उत्पादन देणाच्या संकरीत बियाणांचा वापर, रासायनिक खते व किटकनाशकांचा वापर करणेत आला.

शेतीला पाणीपुरवठयाची सोय उपलब्ध करण्यासाठी सिंचन प्रकल्प उभारण्यात आले. पारंपरिक औजारांऐवजी शेतीत यांत्रिक औजाराच्या वापरला उत्तेजन देण्यात आले. हरितक्रांतीचे जनक मानल्या जाणाऱ्या एम. एस. स्वामीनाथन यांनी उच्च पैदास असणाऱ्या बीयाणांचा शोध लावला. यामुळे शेती उत्पादनात प्रचंड वाढ झाली. शेतीकडे व्यापारी दृष्टीकोनातून पाहण्यास सुरुवात झाली. थोडक्यात, शेती क्षेत्रात घडून आलेली हरितक्रांती हे भारतीय नियोजनाचे यश मानले जाते. दर्जेदार बियाणांचा पुरवठा सुलभतेने होण्यासाठी सरकारने १९६३ मध्ये बियाणे महामंडळाची स्थापना केली. तसेच १९९९-२००० मध्ये बियाणे बँकेची (Seed Bank) स्थापना केली यामुळे हरितक्रांतीचे लाभ संपूर्ण देशभरातील शेतकऱ्यांना झाल्याचे दिसून येते.

**५) धवल क्रांती :**

सन १९७० मध्ये डॉ. वर्गीस कुरीयन यांच्या प्रेरणेतून 'ऑपरेशन फ्लड' म्हणजेच 'दुध महापुर' योजनेचा पहिला टप्पा सुरु झाला. देशातील शेती क्षेत्राला जोडधंदा असणाऱ्या' दुग्ध व्यवसायात मोठे सकारात्मक बदल घडून आले. दुग्ध उत्पादनामध्ये विक्रमी वाढ करून संपूर्ण देशभरात दुधाचा महापूर यावा अशी या योजनेची मूळ संकल्पना होती. या योजनेची अंमलबजावणी करण्याचे काम 'नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्ड' या संस्थेमार्फत केले गेले. याला अभूतपूर्व यश मिळाले. या उपक्रमाचे नेतृत्व डॉ. वर्गीस कुरीयन यांनी केले. दुधाच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने यास 'धवल क्रांती' या नावाने ओळखले जाते. कृषी क्षेत्रात घडून आलेल्या या दुग्ध क्रांतीमुळे शेतीच्या विकासाला निश्चित हातभार लागण्यास मदत झाली.

**६) शेतीतील पायाभूत व संस्थात्मक सुधारणा :**

नियोजन काळात कृषी क्षेत्रात विविध प्रकारच्या पायाभूत तसेच संस्थात्मक सुधारणांचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न झाला. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात दामोदर खोरे प्रकल्प, भाक्रानांगल धरण, हिराकुड प्रकल्प उभारण्यात आले. या विविध सिंचन प्रकल्पाच्या आधारे कृषी विकासावर भर देण्यात आला. दुसऱ्या पंचवार्षिक योजना काळात रुरकेला येथे खत कारखाने उभारण्यात आले. तिसऱ्या पंचवार्षिक योजना काळात १९६५ मध्ये शेतमालाच्या किंमतीचे निर्धारण करण्यासाठी 'कृषी मूल्य व किंमत आयोगाची' (CACP) स्थापन करण्यात आली. याबरोबरच १९६५ मध्ये अन्न महामंडळाची स्थापना करण्यात आली. पाचव्या पंचवार्षिक योजना कालखंडात ग्रामीण भागातील शेती व शेतीशी संलग्न व्यवसायांना पुरेसा व सुलभ पतपुरवठा व्हावा या हेतूने १९७५ मध्ये 'प्रादेशिक ग्रामीण बँकांची' स्थापना करण्यात आली. जलसिंचनाच्या सुविधा,

आर्थिक विकासासाठी आवश्यक असलेल्या ऊर्जा, पाणीपुरवठा व वाहतूक या आधारभूत संरचनेची नियोजन काळात प्रगती घडवून आणली गेली. त्यामुळे औद्योगीकरण कार्यक्रमाचा पाया मजबूत झाला. पाणीपुरवठा व हायड्रो इलेक्ट्रिक योजनेने कारखान्यांना वीज पुरवणे शक्य झाले.

## ७) जमीन सुधारणा कार्यक्रम (Land Reforms) :

नियोजन काळात भारतातील बहुसंख्य लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्यास होती. शिवाय ६५ टक्के पेक्षा अधिक लोक उदरनिर्वाहासाठी शेतीवरच अवलंबून असल्याने शेती क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्याची गरज होती. नियोजन काळात प्रारंभी बहुतांश ठिकाणी जमीनदारी पद्धत अस्तित्वात होती. यामध्ये शेती करणारे वेगळे आणि शेतीवर मालकी असणारे वेगळे लोक असल्याने शेती विकास करण्यावर मर्यादा होत्या. जमिनदारांकडून कुळांची मोठया प्रमाणात पिळवणूक केली जात असे. शेती करणारा शेतकरी हा वर्ग असंघटित असल्याने आपल्यावरील अन्यायाला तोंड देण्याची ताकद त्यांच्याकडे नव्हती. स्वातंत्र्योत्तर काळात जमीन सुधारणांकडे सरकारने विशेष लक्ष केंद्रित केले. यामध्ये प्रामुख्याने जमीनदारी पद्धतीचे उच्चाटन व निर्मूलन करण्यावर सरकारने भर दिला. एकूण उत्पादनात वाढ होण्यासाठी शेतीमध्ये कायमस्वरूपी सुधारणा करण्यासाठी वित्तीय संस्थांकडून कुळांना आर्थिक मदत देण्यात आली. कुळकायद्यातील तरतूदीनुसार कुळांचा मालकी हक्क अबाधित राखण्यात आला. जमीन सुधारणांमुळे जमीन धारणेतील विषमता कमी झाली. जमीनदार आणि मध्यस्थांचे उच्चाटन झाले. शेतमजूर, भूमिहीन, कुळांना आणि वेठबिगारांना जमीनी प्राप्त झाल्या.

## ८) कृषी विकासाच्या विविध योजना :

भारतातील नियोजन काळात एकूण १२ पंचवार्षिक योजना, तीन वार्षिक योजना व सरकती योजना यांच्या माध्यमातून शेती विकासाकरीता अनेक उपक्रम राबविण्यात आले. प्रत्येक योजनेत कमी अधिक प्रमाणात कृषी क्षेत्राच्या विकासासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येते. पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये ‘समुदाय विकास कार्यक्रम’ व राष्ट्रीय विस्तार योजना सुरु केली. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात जमीन, पाणी, वने, मृदा, इ. च्या शाश्वत विकासासाठी ‘अवर्षण क्षेत्र विकास कार्यक्रम’ राबविणेत आला. पाचव्या पंचवार्षिक योजना काळात वाळवंटी भागाचा विकास करण्यासाठी व दुष्काळी भागाचे होणारे वाळवंटीकरण रोखण्यासाठी ‘वाळवंट विकास कार्यक्रम’ हाती घेतला गेला.

सहाव्या पंचवार्षिक योजना काळात ‘डेअरी विकास’ (दुग्ध विकास) कार्यक्रम सुरु करण्यात आला. त्यासोबतच राष्ट्रीय बियाणे विकास कार्यक्रमाचीदेखील सुरुवात करण्यात आली. सन १९८८ मध्ये सातव्या पंचवार्षिक योजना काळात अनुसूचित जाती व जमातीमधील लोकांना मोफत विहिरी बांधून देण्याची ’दशलक्ष विहिर योजना’ राबविण्यात आली. आठव्या पंचवार्षिक योजना काळात अपूर्ण राहिलेल्या सिंचन प्रकल्पांच्या पुर्ततेसाठी ’वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रम’ त्याचप्रमाणे कृषी कर्जासाठी व्याज अनुदान योजना सुरू करण्यात आली. नवव्या पंचवार्षिक योजना काळात ‘फलोत्पादन अभियान’, राष्ट्रीय सेंद्रीय उत्पादन कार्यक्रम’ तसेच ‘राष्ट्रीय कृषी विमा योजना’ सुरू करण्यात आली.

अकराव्या पंचवार्षिक योजना काळात २००७ मध्ये 'राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान' सुरू करण्यात आले. पुर्वीच्या कृषी विमा योजनेत सुधारणा करून २०१०-११ मध्ये सुधारित 'राष्ट्रीय कृषी विमा योजना' सुरु करण्यात आली, १२ व्या पंचवार्षिक योजना काळात देशात 'एकात्मिक फलोत्पादन अभियान' सुरू करण्यात आले. २०१६ मध्ये नाबार्ड व जर्मन सरकार यांच्या सहकार्यातून मृदा संरक्षण आणि अन्न सुरक्षेसाठी पुनर्वसन कार्यक्रम हाती घेण्यात आला. तसेच प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, एकात्मिक कृषी विकास योजना तसेच २०१६ मध्ये प्रधानमंत्री फसल विमा योजना सुरू केली तसेच या योजना काळात शेती क्षेत्रात दुसरी हरितक्रांती घडवून आणण्यासाठी राष्ट्रीय शेतकरी आयोगांची स्थापना करण्यात आली.

### ९) कृषी पतपुरवठा :

स्वातंत्र्योत्तर कालखंडात नियोजनाचा स्विकार केल्यामुळे भारतात बिगर संस्थात्मक घटकांचा प्रभाव कमी होण्यास मदत झाली. बिगर वित्तीय संस्थात्मक घटकांचा प्रभाव कमी होण्यास मदत झाली. बिगर संस्थात्मक कर्जपुरवठा यामध्ये प्रामुख्याने सावकार, व्यापारी, कमिशन एजंट, नातेवाईक व जमीनदारांचा मोठा हिस्सा होता. नियोजनाच्या सुरुवातीपासून बँक व्यवसायाचा विस्तार घडून आल्यामुळे शेतीक्षेत्रास कर्जपुरवठा होणे सोयीस्कर व सुलभ झाले. भारतात सन १९०४ साली सहकारी चळवळीस सुरुवात झाली. ही सहकारी चळवळ सहकारी पतपुरवठयाच्या माध्यमातून सुरू झाली. नियोजन कालावधीमध्ये सहकारी बँकांनी शेतीला कर्जपुरवठा करण्यात मोलाची भूमिका बजावली आहे. शेतीला अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीची कर्जे सहकारी क्षेत्राकडून पुरवली जातात. सन १९८२ मध्ये शेती व ग्रामीण भागाच्या विकासासाठी 'नाबार्ड' या राष्ट्रीय स्तरावरील बँकेची स्थापना करण्यात आली. सहकारी बँका व सहकारी समित्यांच्या माध्यमातून १९८४-८५ मध्ये ३४४० कोटी रुपयांचा कर्जपुरवठा करण्यात आला होता. सन १९९०-९१ मध्ये ३९७० कोटी रुपयांचा तर २००९-१० मध्ये सहकारी संस्थांमार्फत ७४९३८ कोटी रुपयांचा कर्ज पुरवठा करण्यात आला.

भूमिहीन मजूर, लहान शेतकरी यांना कर्जपुरवठा करण्यासाठी प्रादेशिक ग्रामीण बँकांची स्थापना करण्यास २६ सप्टेंबर १९७५ ला परवानगी देण्यात आली. राज्य सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या माध्यमातून ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर कर्ज पुरवठा करण्यात येत असल्याने शेतीस पतपुरवठा उपलब्ध होऊन शेती विकासाला चालना मिळाली आहे. याबरोबरच किसान क्रेडिट कार्ड (KKC) योजना, अग्रणी बँक योजना, पीक विमा इ. सारख्या योजना शेतीच्या विकासास पोषक ठरलेल्या दिसून येतात. सहाव्या पंचवार्षिक योजना काळात शिवरामन समितीच्या शिफारशीनुसार ग्रामीण व कृषी विकासाला चालना देण्यासाठी १२ जुलै १९८२ रोजी 'राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बैंक' म्हणजेच नाबार्ड (National Bank for Agricultural and Rural Development NABARD) ची स्थापना करण्यात आली.

### १०) नवीन कृषी धोरण २००० :

भारत सरकारने २८ जुलै २००० रोजी नवीन कृषी धोरण जाहीर केले. जागतिकीकरणाच्या युगात शेती व्यवसाय टिकून रहावा, शेतीची स्पर्धात्मकता वाढावी व ग्रामीण शेतकऱ्यांचे राहणीमान सुधारावे या हेतूने नवीन कृषी धोरणाची आखणी करण्यात आली. २०२० सालापर्यंत कृषी क्षेत्राचा वार्षिक वृद्धीदर ४% ठेवण्याचे उद्दिष्ट

समोर ठेवण्यात आले होते. या धोरणांतर्गत शेतीच्या विकासासाठी विविध धोरणात्मक पावले उचलण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने अपुरी सिंचनक्षमता व विजेची वाढती टंचाई यावर मात करण्यासाठी राष्ट्रीय जलसंपत्ती धोरण व वीज पुरवठ्यात वाढ घडवून आणण्यासाठी विशेष प्रकल्पांची उभारणी केली जात आहे. शेती क्षेत्राशी निगडित दूध, मांस, अंडी तसेच पशुधनाची गरज व उत्पादकता वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे निश्चित करण्यात आले होते. देशातील वाढत्या लोकसंख्येबरोबरच अन्नधान्य व व्यापारी पिकांच्या उत्पादन वाढीसाठी या धोरणात विशेष प्रयत्न केले जात आहेत. तसेच प्रादेशिक समतोल, पर्यावरण संवर्धन व ग्रामीण विकास या धोरणातून साध्य केला जाणार आहे.

**सारांश :**

भारतीय नियोजनाच्या एकूण कालखंडात कृषी क्षेत्रामध्ये उत्पादन वाढ, रोजगार निर्मिती, पायाभूत सुविधा, हरित व धवलक्रांती तसेच कृषी विकाससंबंधीच्या विविध योजना यांद्वारे कृषी विकासाचे अनेकविध प्रयत्न करण्यात आले. या सर्व प्रयत्नांमधून देश कृषी उत्पादनाच्या बाबतीत केवळ स्वयंपूर्ण झाला असे नसून तो शेतमालाचा आघाडीचा निर्यातदार देश झाला आहे. यातूनच शेतीचा पारंपरिक मागासलेपणा जावून त्यात आधुनिकता व व्यापारी दृष्टीकोन वाढीस लागला आहे. नगदी पिकांद्वारे कृषीवर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांचे नवे पर्व उदयास आले आहे. शेतीमुळे उपभोग्य व भांडवली वस्तूंना, यंत्रांना, अवजारांना, वाहनांना तसेच वित्तीय सेवांना मागणी वाढू लागली आहे.

**४.२.३. नियोजन काळातील औद्योगिक क्षेत्राचा विकास (Industrial Development under Plans):**

भारतीय अर्थव्यवस्थेत औद्योगिक क्षेत्राचे महत्व अनन्यसाधारण असे आहे. या क्षेत्रामध्ये भांडवल निर्मिती, उपभोग्य व भांडवली वस्तू निर्मिती आणि रोजगार निर्मिती मोठया प्रमाणावर होते. विविध पंचवार्षिक योजनांद्वारे औद्योगिक क्षेत्राच्या विकासावर भर दिला गेला. औद्योगिक क्षेत्राच्या वेगवान विकासासाठी विविध धोरणांची आखणी वेळोवेळी करण्यात आली. अनेक योजना व उपक्रम राबविण्यात आले. नियोजन काळातील औद्योगिक विकासाचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**१) पहिली पंचवार्षिक योजना (१९५१ ते १९५६) :**

पहिली पंचवार्षिक योजना कृषी क्षेत्रावर अधिक भर देणारी असली तरी देशातील औद्योगिक क्षेत्राचा पाया भक्कम करण्याकरता या योजनेत अनेक पावले उचलली गेली. यामध्ये १९५१ मध्ये 'उद्योग विकास व नियमन कायदा' लागू करण्यात आला. सन १९४८ च्या पहिल्या औद्योगिक धोरणाला बळकटी देणारा हा कायदा होता. तसेच याच काळात देशातील पहिली Indian Institute of Technology (IIT) 'भारतीय तंत्रज्ञान संस्था' ची स्थापना केली. त्यातूनच देशातील उद्योग क्षेत्रातील महत्वाची संस्था म्हणून IIT ओळखली जाऊ लागली. उद्योगांसाठी पाणी व विजनिर्मितीसाठी दामोदर खोरे विकास प्रकल्प, भाक्रानांगल धरण, कोची धरण, हिराकूड धरण यांसारख्या प्रकल्पांची उभारणी करण्यात आली. याच काळात रेल्वेचे डबे तयार करणारा कारखाना, रेल्वे इंजिन निर्मिती कारखाना, खत कारखाना असे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग सुरु करण्यात आले. मोठया उद्योगातील उत्पादन वाढीचा वार्षिक दर या योजनेत ६ टक्के इतका होता.

या योजनेत औद्योगिक क्षेत्रातील गुंतवणूकीसाठी रु. ७९७ कोटींची तरतूद करण्यात आली होती. वस्तू उत्पादन उद्योगामध्ये विद्यमान क्षमतेचा पूर्ण वापर करण्यामध्ये प्रामुख्याने कापूस, कापड साखर, साबण, वनस्पती, रंग इ. चा समावेश करणेत आला. तसेच भांडवली आणि वस्तू उत्पादन उद्योगाची क्षमता वाढवणे यामध्ये लोखंड, स्टील, ॲल्युमिनियम, सिमेंट, खत, जड रसायने यावर अधिक भर देण्यात आला. या योजनेत केलेली गुंतवणूक २९३ कोटी रु. होती. भांडवली वस्तूंचे उत्पादन सुमारे ७० टक्के वाढले तर कच्च्या मालाचे उत्पादन २४ टक्के इतके वाढले. या योजना कलावधीत सिमेंट, कागद, सोडा, रासायनिक उद्योगामधील उत्पादनात लक्षणीय वाढ झाली तर डिझेल इंजिन, पंप, रेडिओ, इलेक्ट्रिक दिवे इ. च्या उत्पादनात घट झाली.

### २) दुसरी पंचवार्षिक योजना (१९५६ ते १९६१) :

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीलाच ३० एप्रिल १९५६ रोजी समाजवादी समाजरचनेच्या तत्व प्रणालीवर आधारित असे दुसरे औद्योगिक धोरण जाहिर करण्यात आले. या योजना काळात १९५३ मध्ये भारत हेवी इलेक्ट्रॉनिक लिमिटेडची भोपाल येथे स्थापना करण्यात आली. तसेच १ मार्च १९५८ रोजी सर होमी भाभा यांच्या अध्यक्षतेखाली अणुऊर्जा प्रकल्पाची स्थापना करण्यात आली. त्याचबरोबर नांगल खत कारखाना, भिलाई लोह पोलाद उद्योग, दुर्गापूर लोह पोलाद उद्योग, भारतीय जीवन विमा निगम, मुंबई शेअर बाजार इ. उद्योगांची स्थापना करण्यात आली.

दुसऱ्या पंचवार्षिक योजना कालावधीत ॲल्युमिनियम, सिमेंट व जड रसायने यासारख्या साहित्यांची उपलब्धता लक्षणीय प्रमाणात वाढली. बांधकाम उद्योगाच्या वाढीमध्येही मोठी प्रगती झाली. मशीन टूल उत्पादनाचे मूल्य सन १९५०-५१ मध्ये ३.४ कोटी रु. इतके होते ते १९६०-६१ मध्ये ५.५ कोटी रू. इतके झाले. न्यूज प्रिंट, स्कूटर, मोटरसायकल आणि कॅल्शिअम कार्बाइडचे उत्पादनही या काळात सुरू झाले. औद्योगिक क्षेत्रात एकूण १८१० कोटी रु. ची गुंतवणूक करण्यात आली. लहान यंत्रे, सायकली, मोटार, शिवणयंत्रे इ. वस्तूंचे उत्पादन करण्यात बरेच यश या योजना काळात मिळाल्याचे दिसून येते.

### ३) तिसरी पंचवार्षिक योजना : (१९६१ ते १९६६) :

या पंचवार्षिक योजना कालावधीत औद्योगिक क्षेत्रात मोठी पीछेहाट झाली. पहिल्या दोन पंचवार्षिक योजनांच्या काळातील अनुभवाच्या आधारे तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत औद्योगिक, ऊर्जा, वाहतूक क्षेत्रे मजबूत करण्याचे उद्दिष्ट ठरवले. सन १९६४ साली देशात मोठा दुष्काळ पडल्याने मोठ्या प्रमाणावर देशाला अन्नधान्यांची आयात करावी लागली. सन १९६५ साली भारत-चीन युद्ध झाले. परिणामी देशात अस्थिरतेचे वातावरण होते. या योजना काळात औद्योगिक प्रगतीला मोठया प्रमाणावर हातभार लावण्याचे ठरवण्यात आले. तथापि, सिमेंट उद्योगाने निश्चित केलेली उद्दिष्ट्ये साध्य करता आली नाहीत.

सन १९६१-६२ मध्ये आर्थिक वृद्धीचा दर ८.२ टक्के होता तो सन १९६२-६३ मध्ये ९.६ टक्के इतका सर्वोच्च झाला. परंतु सन १९६५-६६ मध्ये वृद्धी दर ५.३ टक्के इतका घटला. ॲल्युमिनिअम, पेट्रोलियम उत्पादने, ऑटोमोबाइल, मशीन टूल्स इ. उद्योगांसाठी निश्चित केलेली उद्दिष्टे साध्य झाली. स्टील उद्योगाची उत्पादन क्षमता

सन १९६०-६१ मध्ये ३.४ दशलक्ष टन इतकी होती ती वाढून सन १९६५-६६ मध्ये ६.२ दशलक्ष टन इतकी झाली. तथापि हे उद्दिष्ट निर्धारित उद्दिष्टांपेक्षा कमी होते. देशाला आत्मनिर्भर करण्याच्या उद्देशाने अन्न महामंडळ, भारतीय औद्योगिक विकास बँक, कृषी मूल्य आयोग या संस्थांची स्थापना करण्यात आली. यामुळे देशाच्या शेती व औद्योगिक विकासाची संस्थात्मक चौकट बळकट होण्यास हातभार लागला.

### ४) तीन वार्षिक योजना (१९६६ ते १९६९) :

सन १९६६ मध्ये तिसरी पंचवार्षिक योजना संपल्यानंतर लगेचच चौथी पंचवार्षिक योजना सुरू झाली नाही. भारत पाकिस्तान युद्ध, दुष्काळ, रूपयांचे अवमूल्यन आणि आर्थिक मंदी इ. कारणामुळे चौथी पंचवार्षिक योजना सुरू करण्यात खंड पडला. यास्तव सरकारने तीन वार्षिक योजनांची अंमलबजावणी केली. या तीन वर्षांच्या काळात सरकारला अनेक कठीण आव्हानांना तोंड द्यावे लागले. दुष्काळामुळे परदेशातून अन्नधान्याची आयात करावी लागली. दुष्काळामुळे शेती क्षेत्रातून कच्च्या मालाचा अपुरा पुरवठा, मोठी भाववाढ, सरकारी कर्मचाऱ्यांकडून मागणी केलेली महागाई भत्ता वाढ इत्यादी कारणांनी देशात आर्थिक अस्थैर्य निर्माण झाले होते. परिणामी चौथी पंचवार्षिक योजना पुढे ढकलण्यात आली. सन १९६६-६७ हे वर्ष योजनेला सुट्टी म्हणून घोषित करण्यात आले. तरीही आणखी दोन वर्षे चौथी योजना सुरु होण्यास लागले.

सन १९६५ मध्ये औद्योगिक क्षेत्रातील गुंतवणुकीचा दर १४ टक्केवरून सन १९६६-६७ मध्ये बारा टक्केपर्यंत खाली आला. जून १९६६ मध्ये रुपयाचे अवमूल्यन झाले. परिणामी औद्योगिक विकासासाठी विकासावरील निर्बंध वाढले. खाण यंत्रे, कागद, कापड यंत्रे, साखर इत्यादीचे उत्पादन घटले. परंतु अल्युमिनियम, स्टील, वीज निर्मिती इ. उद्योगांवर अधिक लक्ष केंद्रित करण्यात आले. अनेक नवीन प्रकल्प सुरु करण्यात आले. सन १९६६-६७ मध्ये औद्योगिक क्षेत्रासाठीचा खर्च रूपये ४६२ कोटी इतका होता. तथापि औद्योगिक उत्पादन अपेक्षेइतके वाढले नाही. सन १९६७-६८ यावर्षी औद्योगिक क्षेत्राची वाढ केवळ ०.५ टक्क्यांनी झाली. सन १९६८-६९ मध्ये औद्योगिक क्षेत्रातील सकारात्मक बदलाने समाधानकारक प्रगती साध्य केली. सन १९६८-६९ मध्ये औद्योगिक क्षेत्राने ६.२ टक्क्यांची वाढ साध्य केली.

### ५) चौथी पंचवार्षिक योजना (१९६९ ते १९७४) :

चौथ्या पंचवार्षिक योजना काळातही देशात राजकिय व आर्थिक अस्थिरता निर्माण झाली होती. या काळात खनिज तेलाचे संकट, भारत व पाकिस्तान यांच्यातील युद्ध, सन १९७२ मधील भयानक दुष्काळ अशी आव्हाने देशासमोर होती. अशा कठीण परिस्थितीत देशाच्या विकासाला स्थैर्य आणि गती प्राप्त करण्यासाठी 'स्थैर्यासह विकास' हे या योजनेचे उद्दीष्ट समोर ठेवण्यात आले होते. या योजनेच्या काळात औद्योगिक क्षेत्रातील मक्तेदारी संपविण्याकरिता सन १९५९ मध्ये 'मक्तेदारी नियंत्रण कायदा' (Monopoly and Restrictive Trade Practices Act MRTP) लागू करण्यात आला. सन १९७२ मध्ये बोराको येथे लोह-पोलाद उद्योगाची स्थापना तर १९७३ मध्ये स्टील ॲथॉरिटी ऑफ़ इंडियाची स्थापना केली गेली. त्यामुळे देशात अवजड उद्योगांच्या विकासाला चालना मिळाली. सन १९७२ मध्ये औद्योगिक उत्पादनात ७.१ टक्केनी वाढ झाली. परंतू सन १९७३ मध्ये एकूण उत्पादनात केवळ ०.७ टक्के इतकीच वाढ झाली. सन १९७४ मध्ये कच्चा माल आणि वीजपुरवठ्यात

समाधानकारक वाढ झाल्याने औद्योगिक उत्पादन २.५ टक्केनी वाढले. चौथ्या पंचवार्षिक योजनेचा निर्धारित वार्षिक वृद्धी दर ८ टक्के होता परंतू तो ४.५ टक्के इतकाच साध्य करणे शक्य झाले.

### ६) पाचवी पंचवार्षिक योजना (१९७४ ते १९७८) :

मुख्य क्षेत्रातील उद्योगांची वेगाने वाढ करण्यावर या योजनेत लक्ष्य केंद्रित करण्यात आले. याबरोबरच या योजनेत प्रामुख्याने कृषी व सेवा क्षेत्राच्या विकासावर अधिक भर देण्यात आला. 'गरीबी हटाव' हे या योजनेचे प्रमुख उदिष्ट होते. औद्योगिक क्षेत्राचा वेगाने विकास होण्यासाठी पायाभूत सुविधांची गरज ओळखून पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर भर देण्यात आला. प्रादेशिक ग्रामीण बँका आणि गृहनिर्माण वित्त विकास महामंडळ (HDFC) या संस्थांची स्थापना करण्यात आली. १९७३ मध्ये औद्योगिक उत्पादनाचा विकास दर ०.७ टक्के इतका होता तो १९७४ मध्ये २.५ टक्के पर्यंत पोचला. या योजनेच्या काळात वीजेच्या उत्पादनात लक्षणीय अशी १० टक्के वाढ घडून आली आणि संपूर्ण योजना काळात ही वाढ स्थिर राहिली.

तसेच २० कलमी योजनेप्रमाणेच महत्वाकांक्षी अशी योजना तयार करण्यात आली. तसेच ग्रामीण भागातील तरुणांसाठी मुलभूत तांत्रिक व व्यावसायिक कौशल्यांचे प्रशिक्षण देणे व स्वयंरोजगारासाठी ग्रामीण तरुणांचे प्रशिक्षण (Training of Rural Youth for Self-Employment- TRYSEM) ही योजना १५ ऑगस्ट १९७९ मध्ये सुरु करण्यात आली. औद्योगिक उत्पादन वाढीचा एकंदर वार्षिक दर ५.९ टक्के इतका होता.

### ७) सरकती योजना (१९७८ ते १९८०) :

जनता सरकारच्या काळात तीन वर्षासाठी ही स्वतंत्र 'सरकती योजना' राबविण्यात आली. या योजना काळात औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी १ मे १९७८ रोजी 'जिल्हा उद्योग केंद्राची' स्थापना करण्यात आली. प्रत्येक जिल्हयात या उद्योग केंद्रांद्वारे लघु व कुटीर उद्योगांच्या विकासावर लक्ष्य केंद्रित करण्यात आले. या केंद्रांच्या मार्फत लघु आणि कुटीर उद्योजकांना आवश्यक वस्तू, सेवा, साधने, प्रशिक्षण व मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात आले. छोटे-छोटे व्यवसाय सुरू करण्याकरिता अर्थसहाय्य, अनुदान व वीजपुरवठा उपलब्ध करुन देण्यात झाला.

### ८) सहावी पंचवार्षिक योजना (१९८० ते १९८५) :

या योजनेमध्ये सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील उत्पादन व उत्पादन क्षमता वाढवण्यावर भर देण्यात आला. या योजना काळात औद्योगिक विकासासाठी तामिळनाडू राज्यातील सालेम याठिकाणी १९८२ मध्ये रुंद पोलादी पत्रे निर्मितीसाठी लोह-पोलाद उद्योग सुरु करण्यात आला. आंध्रप्रदेश राज्यातील विशाखापट्टनम येथेही याच वर्षी लोह-पोलाद उद्योग निर्मिती कारखाना सुरू करण्यात आला. सहाव्या योजना काळात औद्योगिक उत्पादनात उल्लेखनीय अशी ५ पटीने वाढ झाली. एकूण खर्चाच्या १३.७ टक्के इतक्या रकमेची तरतूद औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी या योजनेत केली होती. याबरोबरच भांडवली वस्तू उद्योग आणि इलेक्ट्रॉनिक्स उद्योगावर विशेष भर देण्यात आला. सहाव्या पंचवार्षिक योजनेत सरकारच्या औद्योगिक धोरणात व्यापक बदल झाले. औद्योगिक आणि व्यापारी धोरणात बरीच शिथिलता आणण्यात आली. याचा सकारात्मक परिणाम म्हणून

औद्योगिक उत्पादनात वेगाने वाढ होत गेली. या योजनेत उत्पादन वाढीचा सरासरी दर ८ टक्के निश्चित करणेत आला होता, प्रत्यक्षात तो ६३.७ % इतका साध्य झाला.

### ९) सातवी पंचवार्षिक योजना (१९८५ ते १९९०) :

सातवी पंचवार्षिक योजना ही औद्योगिक विकासाबाबत उदासिन होती. औद्योगिक क्षेत्राच्या विकासाचा वेग वाढविणे आणि औद्योगिक क्षेत्राचा स्थूल राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा २० टक्केपर्यंत वाढविण्याचे उद्दीष्ट या योजनेत समोर ठेवण्यात आले. पहिल्यांदाच सातव्या योजनेत खाजगी क्षेत्राला सार्वजनिक क्षेत्रापेक्षा अधिक महत्व देण्यात आले. एकूण सार्वजनिक खर्चाच्या केवळ १२.५ टक्के इतकी रक्कम उद्योग क्षेत्राच्या विकासासाठी खर्च करण्यात आली. या योजनेत प्रामुख्याने ऊर्जेच्या बाबतीत सुधारणा, उच्च तंत्रांचा वापर, सापेक्षतेने स्पर्धात्मकता अधिक असलेल्या वस्तूंचे उत्पादन वाढविण्यावर भर देण्यात आला. साखर, पोलाद, क्रूड ऑइल या वस्तूंच्या उत्पादनाच्या बाबतीत लक्षणीय वाढ झाली. परंतू इतर उद्योगांच्या बाबतीत निश्चित उद्दिष्टये साध्य झाली नसली तरी उत्पादनात समाधानकारक वाढ झाल्याचे दिसून येते. सन १९८९-९० मध्ये साखर उत्पादनाचे लक्ष्य १०.२ दशलक्ष टन इतके होते ते १०.८ दशलक्ष टन इतके साध्य झाले. पोलाद उत्पादनाच्या बाबतीत १२.६४ दशलक्ष टनाचे उद्दीष्ट असताना प्रत्यक्षात मात्र १३ दशलक्ष टन इतके उत्पादन साध्य झाले. सातव्या योजनेच्या व्यूहरचनेत यांत्रिकीकरणावर अधिक भर देण्यात आला.

### ९) दोन वार्षिक योजना (१९९१ ते १९९२) :

सन १९९१ व १९९२ या दोन वार्षिक योजनांचा काळ हा प्रचंड अशा राजकिय व आर्थिक अस्थिरतेचा होता. भारताला मोठया तेल संकटाचा सामना करावा लागला. तसेच सन १९९१ मध्ये देशात मोठे आर्थिक संकट निर्माण झाले होते. देशातील परकीय चलनाचा साठा संपुष्टात आला होता. याच काळात २४ जुलै १९९१ रोजी उदारीकरण, जागतिकीकरण आणि खाजगीकरणाला पोषक असे नविन औद्योगिक धोरण जाहीर करण्यात आले. सन १९९१ मध्ये भारताने नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केला. देशातील उद्योगांची जागतिक पातळीवर स्पर्धक्षमता वाढावी यासाठी या नवीन औद्योगिक धोरणात अनेक उद्योगांच्या रचनेत बदल घडवण्यात आले.

### १०) आठवी पंचवार्षिक योजना : (१९९२ ते १९९७) :

सन १९९० च्या सुमारास देशात आर्थिक अस्थैर्य, भाववाढीचा प्रश्न, औद्योगिक क्षेत्रात मंदी अशी एकंदर परिस्थिती होती. सात पंचवार्षिक योजना पूर्ण झाल्याने व या योजनांतील धोरणांच्या कार्यवाहीमुळे देशात मोठया प्रमाणावर औद्योगीकरण झाले. देशातील उद्योगांचे विविधिकरण झाल्याने उत्पादनक्षमता वेगाने वाढली. पूर्ण रोजगारचे उद्दीष्ट गाठण्यासाठी पुरेशा रोजगार संधी निर्माण करणे या हेतूने सदर योजनेची कार्यवाही सुरू झाली. आठव्या पंचवार्षिक योजनेत मानव संसाधन विकासावर भर देण्यात आला. विशेषत: ग्रामीण भागातील लघु व कुटीर उद्योगांचा विकास, रोजगार निर्मिती व कौशल्य विकास यावर भर दिला गेला. यासाठी ग्रामीण कारागिरांना व्यवसायासाठी आधुनिक हत्यारे, यंत्रे, अवजारे यांचा पुरवठा करणे, आश्वासित मजुरी योजना, पंतप्रधान रोजगार योजना, राष्ट्रीय सामाजिक सेवा योजना अशा विविध योजनांच्या माध्यमातून संतुलित प्रादेशिक विकास साध्य

करण्यावर लक्ष केंद्रित करणेत आले.

विविध क्षेत्रातील रोजगार निर्मिती प्रतिवर्षी २.६ टक्क्यांनी वाढेल असे उद्दिष्ट निश्चित करणेत आले होते. ८ व्या योजनेच्या पहिल्या २ वर्षात ८० लक्ष रोजगार निर्मिती व शेवटच्या २ वर्षात ९० लक्ष रोजगार निर्मिती होईल असा अंदाज होता. खाणकाम व दगडांच्या खाणी या क्षेत्रातील वार्षिक वृद्धीदर सन १९८० च्या दशकात ६.८ टक्के होता तो वाढवून ८.१ टक्के इतका करणेत आला. वीज, गॅस आणि पाणी या क्षेत्रांचे महत्व विचारात घेऊन यामध्ये १२.८ टक्के इतकी गुंतवणूक करणेत आली. या योजनेत उद्योग व खनिजांवर ७५०९५ कोटी रू. खर्च करण्याचे लक्ष होते. या योजनेत वार्षिक वृद्धीदर ५.६ टक्के इतका अपेक्षित होता तो ६ टक्के इतका साध्य झाला.

**११) नववी पंचवार्षिक योजना (१९९७ ते २००२) :**

नवव्या पंचवार्षिक योजनेची सुरवात १ एप्रिल १९९७ पासून झाली. शेती व शेतीमालावर प्रक्रिया करणारे उद्योग यामध्ये उत्तम समन्वय साधण्याचे या योजनेत ठरवणेत आले. मोठ्या व मध्यम आकाराच्या औद्योगिक क्षेत्राच्या विकासावर विशेष भर देण्यात आला. उद्योगांतील कार्यक्षमता वाढवणे, अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्णता आणणे, परकीय गुंतवणुकीत वाढ करणे याबरोबरच सार्वजनिक क्षेत्रातील प्रकल्पांची कार्यक्षमता वाढवण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. नवव्या पंचवार्षिक योजनेत औद्योगिक क्षेत्रामध्ये ८.२ टक्के एवढा वार्षिक वृद्धीदर गाठण्याचे लक्ष निर्धारित करण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात ही वाढ ६.७ टक्के एवढीच राहिली. कारण या काळात देशाला कारगील युद्ध, गोध्रा हत्याकांड अशा संकटांचा सामना करावा लागला.

परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी सन २००० साली Special Economic Zone (SEZ) 'विशेष आर्थिक क्षेत्र' धोरण जाहीर करण्यात आले. औद्योगिक विकासाला अधिक गती प्राप्त व्हावी हा या पाठीमागे उद्देश होता. या योजना काळात खाण उद्योगाचा विकास ३.८ टक्के, बांधकाम उद्योग ६.८ टक्के, वीज, गॅस आणि पाणीपुरवठा क्षेत्राचा ६.५ टक्के इतका विकास दर साध्य करण्यात यश मिळाले. याबरोबरच विभागीय असमतोल दूर करण्यासाठी व औद्योगिकरणाचा वेग वाढवण्यासाठी विशेषत: मागासलेल्या भागाच्या विकासाला या योजनेत प्राधान्य देण्यात आले.

**१२) १० वी पंचवार्षिक योजना (२००२ ते २००७) :**

या योजनेमध्ये औद्योगिक वस्तू उत्पादनामध्ये १० टक्के वाढ करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात होते. प्रत्यक्षात मात्र ते ८.२ टक्के एवढे गाठले गेले. दहाव्या पंचवार्षिक योजना कलावधीत क्षेत्रीय स्थूल देशांतर्गत उत्पादनात (GDP) उद्योगाचा वाटा वाढू लागला. औद्योगिकरणाकरीता बांधकाम पाणी, वीज, रस्ते, माहिती तंत्रज्ञान, वाहतूक दळणवळण अशा पायाभूत सुविधांच्या निर्मिती, विकास व विस्तार यासाठी सन २००५-०६ मध्ये 'भारत निर्माण योजना' सुरू करणेत आली. सूती कापड, यंत्रसामग्री, वाहतूक उपकरणे, कागद आणि कागदी उत्पादने, मूलभूत धातू, उपकरणे आणि इतर उत्पादन उद्योगांनी लक्षणीय वाढ केली. रसायने आणि फार्मास्युटिकल्ससारख्या कौशल्य-केंद्रित विभागांमध्ये भारताची स्पर्धात्मकता वाढली. हा एक महत्त्वाचा विकासात्मक बदल या योजनेत झालेला दिसून येतो. या योजनेतील काही वर्षांमध्ये २०% पेक्षा जास्त दराने औद्योगिक माल

निर्यातीत सातत्याने वाढ झाली आहे.

### १२) ११ वी पंचवार्षिक योजना (२००७ ते २०१२) :

'समावेशक वृद्धी' (Inclusive Growth) हे उद्दीष्ट समोर ठेवून ११ वी पंचवार्षिक योजना सुरू झाली. या योजनेमध्ये औद्योगिक क्षेत्राकरिता १० टक्के एवढा वृद्धीदर अपेक्षित धरण्यात आला होता. ११ व्या योजनेत उद्योग, पायाभूत सुविधा आणि रोजगार इ. ना प्राधान्य देण्यात आले. वीज जोडणी, पाणी, तंत्रज्ञान, शिक्षण, टेलिफोन यावरही या योजनेत भर दिला गेला. रोजगार निर्मिती कार्यक्रमांची नव्याने आखणी केली गेली. उद्योग क्षेत्रात उच्च दर्जाचे रोजगार उपलब्ध करायचे असल्यास औद्योगिक कामगिरी अजूनही सुधारणे आवश्यक असल्याचे दिसून आले. या योजना काळात उत्पादन क्षेत्राचा औद्योगिक उत्पादनामध्ये ७७ टक्के इतका वाटा असून ही वाढ लक्षणीय अशीच आहे. ११ व्या योजना कलावधीत गॅस, वीज आणि पाणी पुरवठा यांचा सरासरी वृद्धी दर ६.०१ टक्के होता.

देशातील उत्पादन क्षेत्राचा विकास दर सन २००७-०८ या वर्षात १०.३ टक्के इतका होता तो सन २००८-०९ मध्ये २.५ टक्के इतका झाला. सन २००९-१० मध्ये हाच विकास दर ४.८ टक्के तर सन २०१०-११ मध्ये ९.० टक्के आणि सन २०११-१२ यावर्षी ३.९ टक्के इतका होता. विदेशी व्यापार धोरण (Foreign Trade Policy) अंतर्गत हस्तकला आणि हातमाग उद्योगावर अधिक लक्ष केंद्रित करून ६५० दशलक्ष लोकांपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले. हे उद्दिष्ट बीपीओ (BPO) आणि विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) यांद्वारे साध्य करण्याचे नियोजन करण्यात आले. रोजगार निर्मितीचे एक प्रभावी माध्यम म्हणून याकडे पाहिले जाते.

### १३) बारावी पंचवार्षिक योजना (२०१२ ते २०१७) :

'वेगवान, शाश्वत व समावेशक वृद्धी' हे लक्ष घेऊन १२ वी पंचवार्षिक योजना सुरू झाली. स्थूल देशांतर्गत उत्पादनात वेगाने वाढ घडवून आणण्यावर या योजनेत भर देण्यात आला. बाराव्या पंचवार्षिक योजनेत औद्योगिक विकासाचा दर ९.६ टक्के एवढा निश्चित करण्यात आला होता. या योजना काळात ऊर्जा संवर्धन, पर्यावरण संरक्षण, रोजगार निर्मिती, कौशल्य विकास, स्वयंरोजगार, आणि औद्योगिकरणाला प्रोत्साहन देण्यात आले. कापड आणि वस्त्रे, लेदर आणि पादत्राणे, रत्ने आणि दागिने इ. च्या वेगवान विकासाकडे अधिक लक्ष देण्यात आले. खाजगी गुंतवणुकीला या योजनेत मोठया प्रमाणात चालना दिली गेली.

### सारांश :

स्वांतत्र्यप्राप्तीनंतर आर्थिक नियोजनाच्या माध्यमातून देशातील औद्योगिक विकासाकरिता अर्थव्यवस्थेत विविध योजना आणि प्रकल्प राबविण्याचा प्रयत्न झाला. तब्बल १२ पंचवार्षिक योजनांच्या कालखंडात १९४८ चे पहिले औद्योगिक धोरण, १९५६ चे दुसरे औद्योगिक धोरण, १९७३ मधील औद्योगिक धोरण, १९७७ चे औद्योगिक धोरण, १९८० औद्योगिक धोरण आणि १९९१ चे नवीन औद्योगिक धोरण अशा अनेक धोरणांच्या माध्यमांतून देशाच्या औद्योगिकीकरणाचा पाया विस्तारला गेला. या सर्व पार्श्वभूमीवरच अलिकडील काळात मेक इन इंडीया, स्टार्टअप इंडिया, स्टँड अप इंडीया सारख्या विविध योजना पुढे आणल्या गेल्या आहेत. या विविध योजनांद्वारे देशाच्या औद्योगिक विकासाला चालना देण्याचा प्रयत्न करणेत आले. विविध उद्योगांची वेगाने

प्रगती झाल्याने भारत अनेक भांडवली वस्तूंची निर्यात करू लागला आहे. थोडक्यात, नियोजनामुळे भारत हळूहळू उद्योगप्रधान देश बनत आहे.

**४.२.४. नियोजन काळातील सेवा क्षेत्राचा विकास (Service Sector Development under Plan) :**

एक कृषीप्रधान देश म्हणून भारताची ओळख असली तरीदेखील स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात कृषी व औद्योगिक क्षेत्रांना पूरक समजल्या जाणाऱ्या सेवा क्षेत्राचा विकासही अधिक वेगाने होत गेला आहे. या सेवा क्षेत्रामध्ये शिक्षण, आरोग्य, माहिती तंत्रज्ञान, संशोधन, वाहतूक व दळणवळण, बँकिंग, विमा, वित्तीय बाजार, पर्यटन इ. चा अंतर्भाव होतो. अलिकडील काळात झपाटयाने विकसित होत असलेले एक क्षेत्र म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेतील सेवा क्षेत्राकडे पाहिले जात आहे. देशाच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनात (GDP) या क्षेत्राचा हिस्सा ६० टक्यांपेक्षा अधिक आहे. सेवा क्षेत्र हे भारताच्या जीडीपी मध्ये केवळ प्रभावी क्षेत्र नाही, तर त्यांनी लक्षणीय परदेशी गुंतवणूकदेखील आकर्षित केली आहे. निर्यातीत लक्षणीय योगदान दिले आहे आणि मोठया प्रमाणावर रोजगार उपलब्ध केला आहे. सेवा क्षेत्रामध्ये प्रामुख्याने व्यापार, हॉटेल आणि रेस्टॉरंट, बँक, वाहतूक आणि दळणवळण, वित्तपुरवठा, विमा, स्थावर मालमत्ता, व्यवसाय सेवा, सामाजिक आणि वैयक्तिक सेवा आणि बांधकामाशी संबंधित सेवा अशा विविध प्रकारच्या घटकांचा समावेश होतो. देशाच्या नियोजन काळात सेवा क्षेत्राचा विकास कशाप्रकारे होत गेला आहे याचे सविस्तर विवेचन पुढीलप्रमाणे केले आहे.

**१) पहिली पंचवार्षिक योजना– (१९५१–१९५६) :**

पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून सेवा क्षेत्राच्या विकासाकडे लक्ष दिलेले दिसून येते. १० मार्च १९५४ रोजी जागतिक आरोग्य संघटना व युनिसेफ (UNICEF) यांच्या सहकार्याने महाराष्ट्रात पुणे येथे अतिशय माफक किंमतीत पेनीसिलीनचे उत्पादन करण्यासाठी 'हिंदुस्थान एंटीबायोटिक्स' ची उभारणी करण्यात आली. आरोग्य क्षेत्रातीब ही एक महत्वपूर्ण बाब मानली जाते. तसेच बँकिंग क्षेत्राच्या विकासाला चालना देण्यासाठी २ जुलै १९५५ मध्ये इंपिरियल बँकेचे राष्ट्रीयीकरण करून 'स्टेट बँक ऑफ इंडीया' ची निर्मिती करण्यात आली. तसेच १९५५ मध्ये भारतीय औद्योगिक पत आणि गुंतवणूक महामंडळ (ICICT) आणि खरगपूर येथे IIT या तंत्रज्ञान विकास संस्थेची स्थापना करण्यात आली.

पहिल्या पंचवार्षिक योजना काळात काही प्रमुख सेवा उदा. व्यापार, हॉटेल, उपग्रह इ. चा स्थूल देशांतर्गत उत्पादनातील (GDP) हिस्सा ८.५ टक्के होता. वित्त, विमा व्यवसाय, बँकिंग आणि व्यापार सेवा इ. चा स्थूल देशांतर्गत उत्पादनातील (GDP) हिस्सा ७.५ टक्के होता. सामाजिक सेवा व वैयक्तिक सेवा यांचा हिस्सा १०.४ टक्के तर वाहतूक व गुदामे यांचा हिस्सा ३.४ टक्के इतका होता. भारतात विमान वाहतूकीची सुरवात सन १९२० ला झाली. सन १९५३ मध्ये भारतात हवाई वाहतूकीसंदर्भात महामंडळ कायदा करण्यात आला. वाहतूक या प्रकारावर पहिल्या पंचवार्षिक योजनेत १ कोटी रू. पेक्षा कमी खर्च करण्यात आले. या योजना काळात अंतर्गत जलवाहतूक समितीची स्थापना करण्यात आली.

## २) दुसरी पंचवार्षिक योजना (१९५६–१९६१) :

दुसऱ्या पंचवार्षिक योजना काळात १ सप्टेंबर १९५६ रोजी आयुर्विमा सेवा देणाऱ्या देशातील २४५ खाजगी संस्थांचे राष्ट्रीयीकरण करून Life Insurance Corporation of India (LIC) म्हणजेच 'भारतीय जीवन विमा निगम' ची स्थापना करण्यात आली. तसेच १ ऑगस्ट १९५७ रोजी मुंबई शेअर बाजार (Bombay Stock Exchange) ची स्थापना करणेत आली. देशांतर्गत जल वाहतूक विस्तारण्यासाठी एक समिती नेमण्यात आली. या समितीने आपला अभ्यास अहवाल सन१९५९ मध्ये सादर केला. जलवाहतूकीच्या संदर्भातील या समितीने अंतर्गत जलमार्ग वाहतूकीत सुधारणा करण्याच्या दृष्टीने दीर्घकालीन सुधारणा सुचवल्या.

## ३) तिसरी पंचवार्षिक योजना (१९६१–१९६६) :

या योजना काळात औद्योगिक विकासाला वित्तीय सेवा पुरवण्यासाठी Industrial Development Bank of India (IDBI) या वित्तीय संस्थेची स्थापना करण्यात आली. तसेच युनिट ट्रस्ट ऑफ इंडियाची (UTI) स्थापन करणेत आली. सन १९६१ मध्ये वाहतूकीच्या संदर्भात भारतीय वाहतूक महामंडळाची (The Shipping Corporation of India) स्थापना करण्यात आली. या महामंडळाकडे १०५ व्यापारी जहाजे असून जगातील सर्वच सागरी मार्गावर ते वाहतूक करत आहेत.

## ४) चौथी पंचवार्षिक योजना (१९६९–१९७४) :

चौथी पंचवार्षिक योजना देशातील बँकिंग क्षेत्रासाठी निर्णायक वळण देणारी ठरली. या योजना काळात १४ जुलै १९६९ रोजी देशातील मोठया १४ खाजगी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. तसेच या योजना काळात प्रदेशनिहाय व क्षेत्रनिहाय बँकींग सेवांच्या विस्तारीकरणाला प्राधान्य देण्यात आले. बँक व्यवसाय अधिक सक्षम करण्यासाठी सरकारने सन १९८० ला पुन्हा ६ व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. सेवा क्षेत्रातील रोजगार १९७२–७३ मध्ये १४.६७ टक्के इतका होता. सेवा क्षेत्रातील स्थूल उत्पन्न सन १९७२–७३ मध्ये एकूण उत्पन्नापैकी ३४.२ टक्के होते. सन १९७०–७१ मध्ये भारतीय जहाजांत १ कोटी टन मालाची वाहतूक करण्यात आली.

## ५) पाचवी पंचवार्षिक योजना (१९७४–१९७९) :

रस्ते वाहतूकीचे वाढते महत्व विचारात घेऊन सन १९७०–७१ मध्ये ४२० हजार किलोमीटर इतके पक्के रस्ते तयार करण्यात आले. रस्ते वाहतुकीसंदर्भात आंतरराज्य प्रवासातील मोटार– वाहनांसंबंधीच्या विविध नियमांमुळे येणारे अडथळे दूर करण्यासाठी मोटार वाहन परवाना पद्धती सन १९७५–७६ मध्ये सुरू करण्यात आली. यामुळे घटक राज्यांच्या हद्दीतून जाताना येणारे अडथळे दूर होण्यास मदत झाली. या योजनेत जलवाहतूकीसाठी ३४ कोटी रू. ची तरतूद करण्यात आली.

## ६) सहावी पंचवार्षिक योजना (१९८०–१९८५) :

सहाव्या पंचवार्षिक योजना काळात बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा दुसरा टप्पा पार पडला. त्यानुसार १५ एप्रिल १९८० रोजी आणखी ६ मोठया खाजगी क्षेत्रातील बँकाचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. तसेच देशाच्या आयात

व निर्यातीचा विकास घडवून आणण्यासाठी व व्यापारविषयक सेवा उपलब्ध करण्यासाठी १ जानेवारी १९८२ रोजी EXIM Bank (आयात निर्यात बँक) स्थापन करण्यात आली. याच काळात कृषी व ग्रामीण भागात पायाभूत सुविधांच्या विकासासाठी १२ जुलै १९८२ रोजी NABARD या बँकेची स्थापना करण्यात आली. सन १९८४-८५ मध्ये देशातील पक्के रस्ते ८३० हजार कि.मी. लांबीचे होते. शिवाय या योजना काळात देशाच्या व राज्यांच्या दृष्टीने काही महत्वाचे अंतर्गत जलमार्ग-वाहतूक प्रकल्प हाती घेण्यात आले तर देशातील काही महत्वपूर्ण अंतर्गत जलमार्ग राष्ट्रीय जलमार्ग म्हणून जाहीर करण्याचे ठरवण्यात आले. या योजनेत अंतर्गत जलमार्ग वाहतूकीच्या विकासाला अधिक प्राधान्य देण्यात आले. यासाठी २६.६० कोटी रु. खर्चाची तरतूद करण्यात आली होती.

### ७) सातवी पंचवार्षिक योजना (१९८५-१९९०) :

सातवी पंचवार्षिक योजना ही सेवा क्षेत्राला प्राधान्य देणारी ठरली. या योजना काळात गृहनिर्माण क्षेत्राला अर्थपुरवठा करण्यासाठी (National Housing Bank) राष्ट्रीय गृहनिर्माण बँक स्थापन्यात आली. या पंचवार्षिक योजनेत वाहतूक व दळणवळण क्षेत्राच्या विकासासाठी रूपये ५२,००० कोटींची तरतूद करण्यात आली. योजनेच्या कालावधीत जलवाहतूकीचे महत्व ओळखून अंतर्गत जलवाहतूकीवर रूपये २२५.७३ कोटी रू. खर्च करण्याचे ठरवण्यात आले.

### ८) आठवी पंचवार्षिक योजना (१९९२-१९९७) :

आठव्या पंचवार्षिक योजना काळात देशाच्या शेअर बाजारातील गैरव्यवहारांना आळा घालण्यासाठी व शेअर बाजारावर नियंत्रण ठेवून त्याचा विकास घडवून आणण्यासाठी सन १९८८ मध्ये Security Exchange Board of India (SEBI) सेबी या सर्वोच्च संस्थेची स्थापना करण्यात आली. सन१९९३-९४ मध्ये सेवा क्षेत्रामध्ये रोजगार २१.२ टक्के इतका होता. १९९३-९४ च्या घटक किमतींनुसार स्थूल देशांतर्गत उत्पादनातील सेवा क्षेत्राचा हिस्सा १९५०-५१ मध्ये २७.५ टक्के होता तो १९९०-९१ मध्ये ४०.६ टक्के इतका वाढला. या योजना काळात सरकारने सेवा क्षेत्राच्या विकासासाठी अनेक धोरणात्मक उपाय हाती घेतले. छपाई क्षेत्रामध्ये २६ टक्के पासून १०० टक्के पर्यंत प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीला मान्यता देण्यात आली. माहिती तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा, $BPO_S$ इ. क्षेत्रांत परकीय गुंतवणूक करण्यास मान्यता देण्यात आली. सन १९९४ मध्ये राष्ट्रीय टेलिकॉम पॉलिसीद्वारे जागतिक अर्थव्यवस्थेला भारतीय अर्थव्यवस्था जोडण्यात आली.

### ९) नववी पंचवार्षिक योजना (१९९७-२००२) :

नवव्या पंचवार्षिक योजना काळात सेवा क्षेत्रातील महत्वपूर्ण समजल्या जाणाऱ्या शिक्षण क्षेत्राच्या विकासावर भर देण्यात आला. त्यानुसार ६ ते १४ वर्ष वयोगटातील मुलींसाठी 'सर्व शिक्षा अभियान' राबविण्यात आले. तसेच ग्रामीण भागात पायाभूत सुविधांच्या विकासासाठी या योजनेत अधिक लक्ष केंद्रीत करण्यात आले. त्यामध्ये देशातील गावे पक्क्या व बारमाही रस्त्यांनी जोडण्याकरिता 'प्रधानमंत्री ग्राम सडक योजना' राबविली गेली. सन २००० च्या दशकात सेवा क्षेत्राची निर्यात सातत्याने ९.५ टक्केनी वाढत आहे. सन २००० साली

भारतात ग्रामीण भागात ९ दशलक्ष फोन होते ते जून २०१० मध्ये वाढून २१९.१४ दशलक्ष म्हणजेच आठपटीने वाढले.

या योजना काळात १९९९ साली न्यू टेलिकॉम पॉलिसी सुरू करण्यात आली. या पॉलिसीनुसार जागतिक स्तरावर भारतीय अर्थव्यवस्था कार्यक्षमरित्या जोडण्यात आली. सन २००० नंतर सरकारने बांधा-वापरा-हस्तांतर करा या तत्वावर खाजगी प्रकल्प उभारण्यास सुरवात केली आहे. यात प्रत्यक्ष गुंतवणूकीला १०० टक्के परवानगी दिली आहे. यामुळे रस्ते बांधणी, पाणीपुरवठा, पूल बांधणी इ. क्षेत्रात मोठी गुंतवणूक वाढत आहे. सन २००१-०२ मध्ये सेवा क्षेत्रातील मूळ उत्पन्न एकूण उत्पन्नाच्या ४९.३ टक्के झाले. सन २००१-०२ मध्ये दर श्रमिकामागे उत्पादकता सेवा क्षेत्रातील ६६.०८० रू. होती तर याच वर्षात प्रती कामगारामागे उत्पादकतेतील विषमता गुणोत्तर इतर क्षेत्राच्या तुलनेत सेवा क्षेत्रात अधिक आहे. सन २००६-०७ मध्ये सेवा क्षेत्रातील रोजगार २९.४४ टक्के इतका होता.

### १०) दहावी पंचवार्षिक योजना (२००२-२००७) :

या पंचवार्षिक योजनेमध्ये देशातील आरोग्य क्षेत्रावर भर देण्यात आला. या योजनेत देशातील गरोदर मातांना आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी खाजगी व सरकारी क्षेत्रांच्या सहभागातून 'वंदे मातरम' योजना राबविण्यात आली. त्याबरोबरच प्रसुतीपूर्ण व प्रसुतीनंतरचे उपचार व सेवा देण्यासाठी आणि अर्थसाहाय्य देण्यासाठी 'जननी सुरक्षा योजना' राबविण्यात आली. या योजनेला अधिक बळकटी प्राप्त करण्यासाठी 'राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान' सुरु करण्यात आले. दहाव्या पंचवार्षिक योजना काळात माहिती-तंत्रज्ञानाचा विस्तार वेगाने झाला. सन २००४ मध्ये ब्रॉडबँड पॉलिसी राबवण्यात आली. शिवाय पर्यटन, आय. टी. व्यापार, बँकिंग, विमा आणि स्थावर मालमत्ता इ. मध्ये प्रोत्साहानपर निर्णय घेऊन विविध उपक्रम राबवणेत आले. सन २००६-०७ मध्ये सेवा क्षेत्रातील रोजगार २९.४४ टक्के इतका होता.

### ११) अकरावी पंचवार्षिक योजना (२००७-२०१२) :

अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात शिक्षणातील गळती रोखणे, मध्यान्ह भोजन, शिष्यवृत्ती योजना यांचा अधिक विस्तार घडवून आणला गेला. गृहसेवा क्षेत्रात अकराव्या पंचवार्षिक योजना काळात शहरी क्षेत्रात २४.७ मिलियन घरे उभारणीचे लक्ष ठेवण्यात आले होते. सन २००९-१० मध्ये सेवा क्षेत्राचा GDP मधील हिस्सा वाढून ५६.९ टक्के इतका झाला. सन २०१०-११ मध्ये पुन्हा यामध्ये वाढ होवून तो ६३.३ टक्के झाला. हा बदल सेवा क्षेत्राचे वाढते महत्व दर्शवतो. सन २०१०-११ मध्ये व्यापार, हॉटेल व उपहारगृह इ. सेवांचा स्थूल देशांतर्गत उत्पादनातील हिस्सा १६.९ टक्के झाला होता.

विमा, बँकिंग, वित्त व व्यावसायिक सेवा यांचा देशांतर्गत उत्पादनातील हिस्सा या योजना काळात १६.४ टक्के पर्यंत वाढला तर सामाजिक व वैयक्तिक सेवा यांचा हिस्सा १४.३ टक्के इतका वाढला. वाहतूक व गुदाम व्यवस्थेचा हिस्सा ७.७ टक्के तर बांधकाम क्षेत्राचा GDP मधील हिस्सा ७.७ टक्के इतका होता. सन २०१० मध्ये इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या १६.७ टक्के होती. देशातील शेतकऱ्यांना BSNL ने विशेष सवलतीच्या दरात

मोबाइल सेवा उपलब्ध करून दिली. यामुळे शेती तज्ञांकडून शेती संबंधित समस्यांची माहिती, सल्ला घेणे शेतकऱ्यांना शक्य झाले आहे. वायरलेस फोनचा वापर वाढत असल्याने याचे वापरकर्ते सन २००७ मध्ये १६५.०९ दशलक्ष होते ते वाढून सन २०१२ मध्ये ९१९.१७ दशलक्ष इतके झाले. सन २०११-१२ मध्ये GDP मधील बांधकाम व्यवसायाचा हिस्सा ८.२ टक्के होता. ३१ डिसेंबर २०११ रोजी केंद्रीय गुदाम मंडळाची भारतात एकूण ४६९ गुदामे होती. यांची क्षमता ९९.८४ मे. टन होती. सन २०१०-११ मध्ये या महामंडळाकडून २.०९ लाख मे. टन क्षमतेची गोडावून उभारण्यात आली.

**१२) बारावी पंचवार्षिक योजना (२०१२-२०१७) :**

'जलद, शाश्वत आणि समावेशक वाढ' ही १२ व्या पंचवार्षिक योजनेचे मुख्य उद्दिष्ट होते. या योजनेत सामाजिक व वैयक्तिक सेवांचा विकासदर ८ टक्के इतका अपेक्षित होता. माध्यमिक शिक्षणाचे सार्वत्रीकरण करण्याचे उद्दीष्ट निश्चित करणेत आले. सन २०१७ पर्यंत उच्च शिक्षणातील प्रवेशाचे प्रमाण २० टक्केवरून सन २०२२ पर्यंत २५ टक्केपर्यंत वाढवण्याचे ध्येय ठरवणेत आले. बाराव्या पंचवार्षिक योजना काळात १८.७ मिलियन घरे उभारणीचे लक्ष ठेवण्यात आले होते. १२ व्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस केंद्र व राज्य सरकारकडून आरोग्यावरील खर्च १.३% वरून २ ते २.५ टक्केपर्यंत वाढविण्याचे नियोजन करण्यात आले होते. बांधकाम क्षेत्रातील विकास दर १०.०६ टक्के, इलेक्ट्रिक गॅस आणि पाणीपुरवठा यामध्ये ८.५५ टक्के वाढीचे लक्ष होते.

दूरसंचार क्षेत्रात मागील दशकात अभूतपूर्व वाढ झाली आहे. मोबाइल, टेलिफोन वापरकर्त्यांची संख्या वेगाने वाढली आहे. ग्राहकांच्या संख्येच्या बाबतीत कव्हरेज मार्च २०१२ मध्ये ९५१.३४ दशलक्षपर्यंत पोहोचले आहे. इंटरनेट ब्रॉडबँड वापरकर्त्यांचे प्रमाण मार्च २०१२ मध्ये १४ दशलक्ष होते. याबरोबरच १२ व्या पंचवार्षिक योजनेत सन २०१७ पर्यंत १२०० दशलक्ष नवीन कनेक्शन जोडण्याची तरतूद करणेत आली होती. सर्व ग्रामीण भागामध्ये मोबाइलचा वापर वाढवणे आणि सन २०१७ पर्यंत ग्रामीण भागातील टेलिडेन्सीटी ७० टक्केपर्यंत वाढवणेचे उद्दीष्ट होते.

**४.३ सारांश :**

भारतामध्ये नियोजनाच्या सुरुवातीपासूनच सेवा क्षेत्राचा विकास घडवून आणण्यावर भर देण्यात आला. देशाच्या अर्थव्यवस्थेत या क्षेत्राचे स्थान प्रथम क्रमांकावर आहे. देशाच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनामध्ये सेवा क्षेत्राचा हिस्सा ६७.५ इतका आहे. देशात सर्वाधिक जास्त परकीय गुंतवणूक सेवा क्षेत्रामध्ये झालेली आहे. सेवा क्षेत्रामध्ये बांधकाम क्षेत्र हे सध्या सर्वाधिक रोजगार पुरविणारे क्षेत्र आहे. विशेषत: आठव्या पंचवार्षिक योजनेनंतर पुढील सर्व पंचवार्षिक योजना काळात सेवा क्षेत्राचा विस्तार अधिक वेगाने होत गेला. त्यामध्ये प्रामुख्याने व्यापारी सेवा, पर्यटन सेवा, वाहतूक सेवा, रिअल इस्टेट सेवा, दळणवळण सेवा या सेवांचा विस्तार खूपच वेगाने होत आहे.

## ४.४ पारिभाषिक शब्द :

१) **पुरा (PURA) :** 'व्हीजन २०२०' या संकल्पनेमध्ये 'पुरा' **(PURA) Provision of Urban Amenities in Rural Area** या प्रतिमानाचा आराखडा मांडण्यात आला. ग्रामीण भागात शहरी सुविधा पुरवणे या उद्देशाने या प्रतिमानाची मांडणी करण्यात आली.

२) **हरितक्रांती :** कृषी क्षेत्रात संशोधन, कृषी विषयक अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरुन व काही कृषी संस्थांच्या माध्यमातून अन्नधान्य उत्पादन वाढवून कृषी क्षेत्र स्वयंपूर्ण होण्यासाठीच्या धोरणाला 'हरितक्रांती' असे म्हणतात.

३) **जमीन सुधारणा :** जमिनदारांकडून कुळांची होणारी पिळवणूक थांबवण्यासाठी सरकारकडून विविध धोरणात्मक उपाय म्हणजे जमीन सुधारणा होय. यामध्ये प्रामुख्याने वित्तीय संस्थांकडून कुळांना आर्थिक मदत, कुळांचा मालकी हक्क अबाधित राखणे, कमाल जमीन धारणा इ. धोरणात्मक उपायांमुळे जमिनदार व मध्यस्थांचे उच्चाटन झाले यामुळे जमिनधारणेतील विषमता कमी होण्यास मदत झाली.

४) **सर्वसमावेशक वाढ (Inclusive Growth) :** यामध्ये आर्थिक वाढीदरम्यान आर्थिक सहभागीसाठी समाजातील प्रत्येक घटकाला मिळणाऱ्या फायद्यांसह समान संधी प्रदान केला जाते. समावेशक वाढ म्हणजे आर्थिक वाढ जी रोजगाराच्या संधी निर्माण करते आणि गरिबी कमी करण्यास मदत करते.

## ४.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न आणि त्यांची उत्तरे :

### अ) खालील योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.

१) भारतात सन -------- पासून पंचवार्षिक योजनेस सुरवात झाली.

अ) १९५० ब) १९५१ क) १९५२ ड) १९५३

२) जगात सर्वप्रथम ------------- ने १९२८ मध्ये नियोजनाचा अवलंब केला.

अ) रशिया ब) अमेरिका क) भारत ड) श्रीलंका

३) भारतातील पहिल्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी ---------- होता.

अ) १९५६ ते १९६१ ब) १९६१ ते १९६६ क) १९९२ ते १९९७ ड) १९५१ ते १९५६

४) पहिली पंचवार्षिक योजना ------------- यांनी मांडलेल्या प्रतिमानावर अवलंबून होती.

अ) सोलो ब) मार्शल क) हॅरॉड डोमर ड) महालनोबिस

५) पहिल्या पंचवार्षिक योजनेत ------------- वर अधिक भर देण्यात आला.

अ) उद्योग ब) शेती क) व्यापार ड) वरीलसर्व

६) ------------ यांनी छुपी बेरोजगारी संभाव्य बचत म्हणून ओळखली जावी असे सुचवले.

अ) लॉर्ड केन्स ब) रॉबर्टसन क) प्रा. नर्क्स ड) ब्रम्हानंद व वकील

७) ब्रंहानंद व वकील यांचे प्रतिमान ----------------- या नावानेही ओळखले जाते.

अ) ए. के प्रतिमान ब) मजूरी-वस्तू प्रतिमान क) स्थूलवृद्धी ड) समतोल वृद्धी प्रतिमान

८) ------------- ला भारताने नवीन आर्थिक सुधारणांचा स्वीकार केला.

अ) १९९१ ब) १९५१ क) २००१ ड) १९८१

९) नवीन कृषी धोरण ------------ मध्ये जाहीर करणेत आले.

अ) २८ जुलै २००० ब) २००५ क) १९९१ ड) १० जून २००१

१०) सरकारने ------------- मध्ये बियाणे महामंडळाची स्थापना केली.

अ) १९७४ ब) १९६३ क)१९८२ ड) १९९१

११) दुध महापुर योजनेचा पहिला टप्पा ------------- मध्ये सुरु झाला.

अ) १९६० ब) १९७० क) १९८० ड) १९८४

१२) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान ------------ मध्ये सुरू करण्यात आले.

अ) २००० ब) २००५ क) २००७ ड) २०१५

१३) ---------- मध्ये 'उद्योग विकास व नियमन कायदा' लागू करण्यात आला.

अ) १९४७ ब) १९५१ क) १९६४ ड) १९७५

१४) TRYSEM ही योजना ------------ मध्ये सुरु करण्यात आली.

अ) १५ ऑगस्ट १९७९ ब) १० जून १९८०

क) १ जानेवारी १९७४ ड) १ जानेवारी १९९५

१५) भारत निर्माण योजना ----------- मध्ये सुरू करणेत आली.

अ) २००१-०२ ब) २००५-०६ क) २००९-१० ड) २०१४-१५

१६) ११ व्या पंचवार्षिक योजनेचे------------ हे प्रमुख उद्दीष्ट होते.

अ) गतिमान वृद्धी ब) शाश्वत विकास क) वेगवान विकास ड) समावेशक वृद्धी

१७) भारतीय जीवन विमा निगम (LIC) ची स्थापना ----------- मध्ये करण्यात आली.

अ) १९५१ ब) १९७४ क) १९८२ ड) १९५६

१८) भारतात सर्वाधिक जास्त परकीय गुंतवणूक ---------- क्षेत्रामध्ये झालेली आहे.

अ) सेवा ब) शेती क) व्यापार ड) उद्योग

**अ) उत्तरे :**

| | | | |
|---|---|---|---|
| १) १९५१ | २) रशियाने | ३) १९५१ ते १९५६ | ४) हॅरॉड डोमर |
| ५) शेती | ६) ब्रंहानंद व वकील | ७) मजुरी-वस्तू प्रतिमान | ८) १९९१ |
| ९) २८ जुलै २००० | १०) १९६३ | ११) १९७० | १२) २००७ |
| १३) १९५१ | १४) १५ ऑगस्ट १९७९ | १५) २००५-०६ | १६) समावेशक वृद्धी |
| १७) १९५६ | १८) सेवा | | |

**ब) सरावासाठी स्वाध्याय :**

१) भारतीय नियोजनातील योजना प्रतिमाने स्पष्ट करा.

२) भारतीय नियोजनात अवलंबविण्यात आलेल्या योजना प्रतिमानांची चर्चा करा.

३) नियोजन काळातील कृषी विकास स्पष्ट करा.

४) पंचवार्षिक योजनांच्या काळातील कृषी विकासाचा आढावा घ्या.

५) नियोजन काळातील औद्योगिक विकास स्पष्ट करा.

६) पंचवार्षिक योजनांच्या काळातील औद्योगिक विकासाचा आढावा घ्या.

७) नियोजन काळातील सेवा क्षेत्राच्या विकासाची चर्चा करा.

८) पंचवार्षिक योजनांच्या काळातील सेवा क्षेत्राच्या विकासाचा आढावा घ्या.

**क) टीपा लिहा.**

१) भारतीय नियोजनातील योजना प्रतिमाने

२) नियोजन काळातील कृषी विकास

३) नियोजन काळातील औद्योगिक विकास

४) नियोजन काळातील सेवा क्षेत्राचा विकास

**४.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ : (Reference books for further Reading)**

१) देसाई व भालेराव (२०१६), 'भारतीय अर्थव्यवस्था', निराली प्रकाशन, पुणे.

२) कविमंडन विजय (२०१२), 'कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र', मंगेश प्रकाशन, नाशिक.

३) कायदे पाटील गंगाधर (२००८), 'शेतीचे अर्थकारण', चैतन्य प्रकाशन, नाशिक.

४) योजना मासिक, शेतीशी संबंधित विविध अंक.

५) Datta Ruddar and Mahajan Ashwini (2016), "Indian Economy', Chand and Company Ltd, New Delhi.

६) Misra S. K and Puri V. K. (2016) Economic Environment of Business, Himalaya Publishing House, Mumbai.

७) Gupta P. K. (2012), "Agricultural Economics' Virendra publications Ltd. Delhi.

८) Chakravarty, Sukhamoy (1987), Development Planning: The Indian Experience, Clarendon Press, Oxford.

९) Patil, J. F. (2005), "Economics of Growth and Development' (Marathi), Phadake Publishers, Kolhapur.

१०) Patil, J. F. & Tamhankar P. J. (1990), "Economics of Development and Planning' (Marathi), Continental Publishers, Pune.

११) Todaro Michael P.and Stephen C. Smith (2017), Economic Development, Pearson Education.

१२) Lekhi, R. K. (2005) Economics of Development and Planning, Kalyani Publishers, Delhi.

१३) Bhagwati, J. and Desai, P. (1970), India: Planning for Industrialization, Oxford University Press, London.

१४) Datta Gaurav and Ashwini Mahajan (2016), Indian Economy, S. Chand Publishing, New Delhi.

१५) Jhingan, M. L. (2005) The Economics of Development and Planning, Vrinda Publications Ltd. Delhi.

***